विलायतचा प्रवास.

भाग दुसरा.

आर्यभूषण छापखाना

पुणे.

विलायतचा प्रवास.

भाग दुसरा.

पुणें येथें "आर्यभूषण" छापखान्यांत
हरि नारायण गोखले, म्यानेजर,
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१८९२.

(मालकीचे सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यांनें राखिले आहेत.)

अनुक्रमणिका.

भाग दुसरा.

	पृष्ठें.
लंडन शहराचें प्रथम प्रदर्शन	१
पथिकाश्रम...	४
लंडन शहर...	५
लंडन शहरांतील वहानें...	११
लंडन शहरांतील रस्ते	२३
पथिकजनांच्या सोयींचे प्रकार...	२८
लंडन शहराची किरकोळ माहिती	३१
इंग्लंडांतील ऋतु आणि दिनमान...	३४
लंडन शहरचे शिंपी...	३७
बरोबरच्या एका माणसाचा मृत्यु...	३८
मेणाच्या पुतळ्यांचें प्रदर्शन...	५०
टेम्स नदीच्या तीराजवळील प्रांत...	५३
उद्यानभूमिका—हाइडपार्क...	५७
पार्लमेंट सभागृहें...	७४
एक उपहारसमारंभ...	८१
रीजन्ट्स पार्क	८५
लंडन शहरांतील घरें व तेथें मिळणारे जिन्नस ...	८७
टॉवर आफ् लंडन	९२
मिस मॉर्निंग	११७
क्रिस्टल पॅलेस	११९

पृष्ठ.

टंकसाळ १२६
ईटन पाठशाळा १२८
लॉर्ड व लेडी रोजबरी;–एक यनगृह १२९
ऑस्कट येथील शर्यती १३३
टेम्स टनेल १८३
साऊथ केन्सिंगटन म्यूझियम १८७
अमेरिकन एक्झिबिशन १९१
नॅचरल हिस्टरी म्यूझियम १९३
आल्बर्ट मेमोरियल १९५
भाजीपाल्याचा बाजार १९७
इंडिया म्युझियम १९७
आल्बर्ट हॉल १९९
न्याशनल गॅलरी व रॉयल अकॅडेमी २००
ब्राडफर्ड शहर २०३
मॅन्चेस्टर २११
न्यूकासल २१७
एडिनबर्ग २२१
बर्मिंगहाम २२६
नेव्हल रिव्ह्यू २२८
डालिच २३३
हॅम्प्टन कोर्ट २३५
लॉर्कोर्ट २३८
हार्टफील्ड हाऊस २३९
पुनरागमन २४३

प्रस्तावना.

विलायतचा प्रवास, जो कित्येक दिवस **केसरी** वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत होता, तो संपल्यावर त्याचें स्वतंत्र पुस्तक छापून प्रसिद्ध केलें असतां पुष्कळ महाराष्ट्रभाषाभिज्ञ व त्या भाषेचा उत्कर्ष इच्छिणाऱ्या जनांच्या आश्रयास पात्र होईल, असें जाणून तो ग्रंथ लिहिणाऱ्या विद्वान् गृहस्थांस आम्हांस तो छापून प्रसिद्ध करण्याची परवानगी देण्याची विनंती आह्मी केली व ती त्यांनीं मोठ्या आनंदानें दिली. त्या परवानगीबरहुकूम हा त्या प्रवासाचा उत्तरभाग आह्मीं महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या लोकांस विनयपूर्वक सादर करीत आहों व त्यांनीं त्याचा उल्हासानें स्वीकार करावा अशी आमची त्यांस प्रार्थना आहे.

आमच्या लोकांत प्रवास करणारे फार थोडे. त्यांतून प्रवासापासून ज्ञानलाभ जोडून घेणाऱ्यांची संख्या अल्पच असते. आणि जे असा लाभ करून घेतात त्यांपैकीं बहुतेक साधनाभावामुळें त्या ज्ञानाचा फायदा आपल्या देशबंधूंस देण्याला असमर्थ असतात. यास पुरावा पहाणें झाल्यास दूर जाण्याची जरूर नाहीं. आमच्या इकडे प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांची यादी चाळली असतां तींत असल्या पुस्तकांची उणीव तेव्हांच दिसून येते. अशा स्थितींत **विलायतचा प्रवास** लिहिणारांचें

अभिनंदन करणें अनवश्यक अगर गैरवाजवी आहे असें म्हणणारा कोणी निघेल असें आम्हांस वाटत नाहीं.

हा दुसरा भाग पहिल्या भागाहूनही विशेष महत्वाचा आहे. कारण यांत खुद्द इंग्लंड देशांतील लोकस्थिति, रीतरिवाज, मनोहर, उपयुक्त आणि राजकारणी महत्वाच्या स्थलांचें व प्रसंगाचें वर्णन आलें आहे. आपला व इंग्लंड देशाचा ईश्वरी संकेताच्या अनुरोधानें जो संबंध जडून आला आहे त्यामुळें त्या देशासंबंधीं जितकी अधिक माहिती आपल्याला मिळेल तितकें आपलें हित अधिक. ते राजे व आह्मी प्रजा हा संबंध किती काल राहील, दीर्घकालपर्यंत रहावा किंवा न रहावा इत्यादि प्रश्न काढून त्यांचा काथ्याकूट करीत बसण्यांत अर्थ नाहीं, तथापि इतकें खरें आहे कीं, हा संबंध उभयपक्षीं हितकारक होण्याचीं साधनें जितकीं जोडतां येतील तितकीं जोडण्याविषयीं झटणें आमचें कर्तव्य होय. परस्परांच्या स्वभावांचे व आचारविचारांचें यथार्थ ज्ञान हें या साधनांपैकीं एक महत्वाचें साधन आहे व आमच्या हल्लींच्या स्थितींत तर हें ज्ञान जितकें लवकर आह्मीं मिळवूं तितकी आमची उन्नति अधिक लवकर होईल. इंग्लंड देशाच्या व तेथील लोकांच्या संबंधानें जें जें कांहीं जाणण्यासारखें व स्वीकारण्यासारखें आहे तें तें मोठ्या मार्मिक दृष्टीनें अवलोकन करून या विद्वान् ग्रंथकर्त्यांनीं या आपल्या पुस्तकांत टिपून ठेवलें आहे. त्यांचीं वर्णनें जशीं चटकदार उतरलीं आहेत तसेच त्यांचे प्रसंगोपात्त विचार पोक्त, मार्मिक आणि उदात्त आहेत. भाषा प्रौढ व अलंकृत आणि विषय महत्वाचा व अवश्यक आणि विवेचन मनोरंजक व बोधपर—असें हें साधनत्रिकूट जमल्यावर पुस्तक विद्वान् व रसिक लोकांच्या आदरास पात्र कां होऊं नये !

सरतेशेवटीं सर्व महाराष्ट्रभाषाभिमानी जनांस आमची अशी

विनंति आहे कीं त्यांनीं या पुस्तकास उदार आश्रय देऊन ग्रंथकर्त्याच्या श्रमाचें चीज करावें आणि अशा प्रकारेंच महाराष्ट्रभाषेची सेवा करीत राहण्यास त्यांस उत्तेजन द्यावें.

डिसेंबर १८९२. **पुस्तकप्रकाशक.**

विलायतचा प्रवास.

भाग दुसरा.

लंडन शहराचें प्रथम दर्शन.

एक महिनाभर अविरत प्रवासामुळें जीव त्रासून गेला होता व त्यामुळें इंग्लंडच्या किनाऱ्यास पाय लागल्यावर मनाला आनंद वाटला असें पूर्वी लिहिलें आहे. हें तर खरेंच; परंतु दुसऱ्याही कांहीं कारणामुळें चित्तास आल्हाद झाला. लहानपणीं शाळेंत असतांना इंग्लंड देशाचा भूगोल पाठ करीत होतों तेव्हां त्या देशाबद्दल कल्पनाही मनांत येत नव्हती. पुढें जसजसें ज्ञान वाढत गेलें तसतसें त्या देशाविषयींची जिज्ञासा तद्विषयक पुस्तकें व वर्तमानपत्रें यांच्या द्वारानें तृप्त होत होती. कर्मधर्मसंयोगानें सुधारणेच्या उच्चकोटीप्रत पोंचलेल्या त्या देशाच्या विलक्षण स्थितीचा प्रत्यक्ष अनुभव मिळण्याचा प्रसंग प्राप्त झाला याबद्दल फारच चमत्कार वाटला; व सहा हजार मैलांचा प्रवास परमेश्वरानें निर्विघ्नपणें पार पाडला याबद्दल मनाला फारच समाधान वाटलें. असो. फोकस्टन बंदरांत उतरल्यावर जवळच आगगाडी उभी होती तिच्यामध्यें बसून आम्ही लंडनाकडे चाललों. आमचा डबा प्रशस्त होता व त्यांत पूर्वी न पाहिलेली अशी नवीनच सोय होती. लहान लहान चापटक्या अशा लोखंडी पेट्या दोन चार ठिकाणीं ठेविल्या होत्या. यांत ऊन पाणी घातलेलें होतें व त्यांचा उपयोग येवढाच कीं, त्यांवर पाय ठेवल्यानें पायांस उष्णता पोंचावी. ही सोय फारच सुखावह वाटली. हवेंत गारठा फार होता. आकाश अभ्राच्छादित असून अल्पवृष्टीही होत होती. जिकडे तिकडे थोडें धुकेंही पसरलें होतें. या सर्व कारणसमवायामुळें शरीरास शैत्याची बाधा फार होत होती. लोंकरीचे दुहेरी मोजे घातले

तरी बुटाच्या आंत पाय कसे कालासारखे गार होत होते. तेव्हां अशा स्थितींत पायांला उष्णता आणणारी ही सोय सुखावह झाली यांत काय नवल ? वाटेनें जो प्रदेश दृष्टिगोचर झाला तो फारच सुंदर होता. भूपृष्ठ हरिततृणाच्छादित असल्या कारणानें प्रकृतिसुभग दिसत होतें. क्षुद्र पर्वतराजीही त्याचप्रमाणें अल्पवृक्षावृत असून दृग्विषयास भयानक न करितां मनोरम करीत होत्या. लहान लहान ओढे व नद्या एकंदर वनश्रीच्या शोभेस पुष्टि देत होत्या. जे प्रवाह जवळच होते ते आपल्या स्फटिकासारख्या स्वच्छ जलानें व मन्दाभिसरणाच्या मंजुल स्वरानें नेत्र व कर्ण यांस तोषवीत होते; व जे दुरून दृग्गोचर होत होते ते क्षितिजावर जणुं काय रौप्यरसाच्या रेषेसारखे भासत होते. ज्या श्वेत पर्वतावरून रोमन लोकांनीं इंग्लंडास ‘ आल्बियन ’ हें नांव दिलें होतें ते पर्वतही वाटेनें आह्मांस दिसले. पण ते पाहून विशेष चमत्कार वाटला नाहीं. डोंगराची एखादी बाजू ह्मणून पांढरी माती काढून घेतल्यासारखे एका बाजूनें विशेष पांढरे हे दिसत होते. रस्त्यावर कांहीं लहान लहान खेडीं होतीं त्यांची व्यवस्था दुरून तरी फारच सुरेख दिसली. प्रत्येक घराला एक एक धुरांडें असून पुढील दारीं व मागील दारीं लहान अंगण होतें. मागील दारीं कांहीं ठिकाणीं कपडे वाळत घातलेले दृष्टीस पडले, व कांहीं बायका कोंपरापर्यंत हात उघडे, मळके कपडे, व चेहेरा मोठा राकट, अशा दिसल्या. ह्या बहुतकरून कामधंदा करणाऱ्या हलक्या वर्गांतील बायका असाव्या असें वाटलें.

अशा प्रकारें मार्ग क्रमीत सायंकालच्या सुमारास आह्मी लंडनशहराजवळ येऊन पोंचलों. हें शहर कितीही अवाढव्य असो; यांतील संपत्ति कितीही विपुल असो; यांतील लोकांच्या उद्योगाची पायरी कितीही उंच असो; यांतील सुखोत्पत्तीच्या योजना कितीही कल्पनातीत असोत; यांतील विविध संस्था कितीही प्रशंसनीय असोत; एवढें खचित आहे कीं त्याचें बाह्य स्वरूप प्रेक्षकास मोहून टाकीत नाहीं. लाखों घरांनीं व्यापिलेला तो विस्तीर्ण प्रदेश बाहेरून येणाऱ्यास केवळ अंधक दिसतो. याचें एक कारण धुकें

व दुसरें धूर. प्रत्येक घराच्या अग्रभागीं कमीजास्त धूर जाण्याचे नळ जोडलेले असतात. त्या सर्वांतून एकसमयावच्छेदेंकरून धूर बाहेर निघत असल्यावर सर्व शहर दुरून अंधकारमय दिसेल यांत काय आश्चर्य ? जसजसें शहरांत शिरावें तसतसे मोठमोठे पूल लागतात. ते अशा प्रकारचे कीं—पुलाखालून लोक जाण्यायेण्याचा रस्ता—–पुलावरून आगगाडी चाललेली–व त्याच पुलावर आणखी एक पूल असून त्यावर आगगाडी जाण्याचा लोखंडी रस्ता. त्याचप्रमाणें गाड्याघोडे यांची धामधूम व लोकांची हालचाल यांमुळेंही फार आश्चर्य वाटतें. टेम्स नदीवरून जातांना नदीचें पाणी गढूळ व पात्र संकुचित दिसलें. आह्मांस 'चेरिंग क्रास' स्टेशनावर उतरावयाचें होतें. तेथें जाण्याचे पूर्वीं आगगाडी दुसऱ्या एका स्टेशनावर जाऊन गेल्या वाटेनें थोडी परत आली व नंतर त्या स्टेशनावर थांबली. स्टेशन फारच विस्तीर्ण होतें. सामानसुमान उतरल्यावर तें प्रथम कस्टमच्या चौकींत न्यावें लागलें. तेथें त्याचा तपास झाल्यावर तें आमच्या हवालीं झालें. 'किंग' कंपनीचे गुमास्ते आमची सर्व व्यवस्था करण्यास स्टेशनावर हजर होते, त्यामुळें पंचाईत पडली नाहीं. नाहीं तर नव्या माणसाचे फारच हाल होण्याचा संभव असतो. इंग्रजी येत असलें ह्मणजे व्यवहाराची मात्र बिलकुल पंचाईत पडत नाहीं. त्यांतून तेथील गाडीवाले व हेलकरी मोठे कार्यदक्ष व हुषार असतात. आमचें सामान हातीं आल्यावर तें आमच्या आश्रमाच्या अधिकाऱ्याकडून गाडी आली होती तींत घालून रवाना केलें व मी स्वतंत्र एक 'हॅन्सम क्याब' (दोन चाकांची व एक घोड्याची गाडी) बोलावून तींत बसलों व जाण्याचें ठिकाण गाडीवाल्यास सांगितल्याबरोबर तो मला नेमका त्या ठिकाणीं घेऊन गेला. लंडनांत आमचा मुक्काम जाऊन येऊन सुमार तीन महिने व्हावयाचा होता. तेव्हां इतके दिवस एखाद्या आश्रमांत राहिलें असतां खर्चही फार लागेल, पाहिजे तितका स्वतंत्रपणा मिळणार नाहीं, व व्यवस्थाही चांगली रहाणार नाहीं ह्मणून स्वतंत्र घर घेण्याचा आमचा विचार होता. परंतु घर भाड्यानें घ्यावयाचें तें समक्ष

पाहून व त्यांतील सर्व सोयीचा विचार करून घ्यावें असें वाटल्यावरून प्रथम कांहीं दिवस एखाद्या पथिकाश्रमांतच रहाण्याचा आमचा बेत होता.

पथिकाश्रम.

ज्या आश्रमांत आह्मी राहिलों होतों, तो आश्रम शहराच्या पश्चिम भागांत असून " हैडपार्क " नामक प्रसिद्ध उद्यानभूमिकाच्या दक्षिणेस होता. आमचा आश्रम व हा बगीचा ह्यांमध्यें काय तो मोठा ' पिक्याडिलि ' हून आलेला रस्ता. रस्त्याच्या बाजूचीं दोन दालनें आमच्याकडे होतीं; त्यामुळें घरीं बसल्या बागेंतील स्वच्छ हवेचा व दृग्विषयाच्या सौंदर्याचा लाभ आह्मांस मिळत होता. आश्रमाची इमारत तीन मजली असून त्यांत सर्व प्रकारच्या सोयी होत्या. आमच्या तैनातीस दासदासींची रेलचेल होती व कोणत्याही गोष्टीची कमतरता नव्हती. कोणत्याही प्रकारची माहिती लागल्यास आश्रमांतील कारभाऱ्याकडून ताबडतोब मिळे; कोणतेंही काम करणें असल्यास त्याची विलंब न लावतां व्यवस्था होई. मात्र आठवड्याच्या अखेर जो हिशेब यावयाचा त्यांत या सर्व गोष्टींचा चांगला वचपा निघावयाचा. तारआफिसांत तार पाठविली—लिही त्याच्याबद्दल चार आणे. कामाकरितां मनुष्य पाठविला—लिही त्याच्याबद्दल रुपया. नाटकाचीं तिकिटें आणविलीं, घाल त्याबद्दल आठ आणे ! असे एक ना दोन,—हजार प्रकारचे आंकडे त्या हिशेबांत असावयाचे; ह्मणजे जागेच्या भाड्याबद्दल अमुक रक्कम, भोजनखर्चाबद्दल जसा खप तशी अलाहिदा रक्कम, तैनातीच्या नोकरचाकरांबद्दल शिवाय, स्नानाबद्दल शिवाय, व यांखेरीज वर सांगितलेल्या बाबी नमूद व्हावयाच्या; ह्मणजे ज्यास अनुभव नाहीं त्याच्या अजमासाच्या दुप्पट आकार सहज व्हावयाचा. गरीबगुरीबांनीं तर नाहींच, पण मध्यम स्थितींतल्या लोकांनीं देखील अशा आश्रमांत राहून निभाव लागावयाचा नाहीं. चांगल्या श्रीमंत लोकांनींच यांची पायरी चढावी. बाकी ऐषआरामांत बिलकुल कसर नाहीं. हांक माराल तेव्हां मनुष्य हजर, मागाल ती जिन्नस तयार, सांगाल तें काम झालेंच ह्मणून समजा.—अशा स्थितींत आह्मी दोनच

आठवडे काढले तर केवळ तेथील खर्चाचा आकार चार हजार रुपये झाला ! गाड्याघोडे, कपडालत्ता, औषधपाणी वगैरेचा खर्च निराळाच ! या आश्रमांत सामान खालच्या मजल्यावरून वर नेण्याकरितां एक "हैड्रालिक लिफ्ट" होती. ही योजना लंडनशहरांत पुष्कळ मोठमोठ्या ठिकाणीं आहे. सुमार पांच-सहा माणसें उभीं राहण्याइतका एक लांकडी चौथरा करून त्याच्या तिनही बाजूंनीं लांकडाच्या फळ्या लाविलेल्या असतात. एक बाजू उघडी असते, व तिला दोन टोंकांस दोन इमारतीइतक्या उंचीच्या दोऱ्या असतात. ही काष्ठमय खोली बरोबर मावेल अशा प्रकारची पोकळ जागा इमारतीच्या वरपासून खालपर्यंत असते, व ह्या खोलीच्या खालून पाण्याचा दाब असतो. त्याच शक्तीनें ती वरखालीं होते. इमारतींत वर सांगितलेल्या पोकळीच्या बाजुला दर मजल्यावर एक एक दरवाजा असतो. आतां आमचें सामान तळमजल्यावरून दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर न्यावयाचें होतें; तर तळमजल्यावरील दाराच्या लगत ही काष्ठमय खोली आल्याबरोबर तेथें ती खोली थांबविली. सामान खोलींत घालून वर सांगितलेल्या दोन दोऱ्यांला हिसका दिल्याबरोबर खोली वर चढावयास लागली. दुसऱ्या मजल्याच्या जमिनीबरोबर आल्यावर तेथील दाराजवळ फिरून उभी राहून कांहीं सामान काढून घेतल्यावर फिरून दोरीस हिसका दिल्याबरोबर वर चालली; फिरून तशीच तेथें थांबून सामानाचा निकाल लागल्याबरोबर फिरून खालीं आली. या सर्व कृत्यास चालक एक माणूस पुरतो. मात्र खोलीमध्यें अजमासापेक्षां जास्त वजन चालत नाहीं. नव्या पहाणाराला ही योजना फारच आश्चर्य वाटण्याजोगी आहे. हिच्या योगानें मेहनत फार वांचून थोड्या वेळांत काम होतें. कांहीं कांहीं ठिकाणीं सामानाकरितांच नव्हे, तर माणसांची उतरचढ वांचविण्याकरितां उंच उंच मजल्यावर राहणारे लोक नियमानें या योजनेचा उपयोग करितात.

लंडनशहर.

टेम्स नदीच्या योगानें लंडनशहराचे लहानमोठे दोन भाग झाले आहेत. ही नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत गेली आहे.

या नदीच्या मुखापासून सुमार ५० मैलांपर्यंत जाहजें वगैरे जातात. नदीच्या दक्षिणेस जो लंडनचा भाग आहे तो विशेष महत्वाचा नाहीं. उत्तरेकडचा जो भाग आहे त्याचे पूर्वपुर व पश्चिमपुर असे दोन भाग कल्पिलेले आहेत. पूर्वपुरांत प्राचीन शहर व त्याच्या पूर्वेकडील भाग यांचा समावेश होतो. या भागांत सर्व प्रकारच्या व्यवहारांची घडामोड होत असते. बंदर, गोदी, ब्यांक, लहानमोठ्या व्यापाऱ्यांच्या पेढ्या, सट्यांची जागा (एक्सचेंज), मोठें पोस्टहापीस, मोठमोठे टाइम्ससारखे छापखाने, वगैरे सर्व द्रव्यार्जनास साधनीभूत होणाऱ्या महत्वाच्या संस्था या भागांत आहेत. पश्चिमपुरांत द्रव्याचा व्यय करणारी संपन्न मंडळी, संप्रदायदेवतेचे भक्त व ऐषआरामाचे शोकी--अशा लोकांची वस्ती आहे. राज्ञीमंदिर, अमीरउमरावांचे महाल, सर्व प्रकारचे समाज, संग्रहालयें, चित्रशाला, नाटकगृहें, पार्लमेंटची सभास्थानें, विस्तीर्ण उपवनें, प्रशस्त रथ्या, व सर्व प्रकारचा श्रीमंतीचा थाट--हीं या भागांत आढळतात.

प्राचीन शहर (किंवा सोयीसाठीं आपण त्याला 'शहर' च म्हणूं) या संज्ञेखालीं जो पूर्वपुराचा भाग येतो त्याची सर्व व्यवस्था स्वतंत्र आहे. त्याचे २६ वार्ड व १०८ पॅरिश असे विभाग आहेत व त्या सर्वांवर लार्ड मेयर याचा अधिकार आहे. जसजसा व्यापार वाढत चालला आहे तसतशी 'शहरांतील' वस्ती कमी होत चालली आहे. याचें कारण असें कीं केवळ व्यापारासंबंधीं व्यवहाराकरितां या जागेचें इतकें महत्व वाढत चाललें आहे कीं मनुष्यांस रहाण्याकरितां या जागेचा उपयोग करितां येत नाहीं. सर्व व्यवहाराकरितां दिवसा लोक शहरांत जमतात व सर्व कामें आटपून संध्याकाळीं शहराबाहेर आपल्या घरोघर जातात. या शहरांत चार हजारांवर घरें गस्तीची रिकामी असतात. १८८१ सालीं खानेसुमारी झाली त्या वेळेस शहरांत दिवसाची लोकवस्ती सुमारें २,६०,००० होती. इमारतीची जागा या ठिकाणीं इतकी महाग आहे कीं एका चौरस फुटाला २५० रुपयेपासून ८०० रुपयेपर्यंत पडतात. १८८१ सालीं शहरांत येणाऱ्याजाणाऱ्या लोकांची व गाड्यांची संख्या समजण्याकरितां मुद्दाम व्यवस्था केली होती; तेव्हां असें क-

ळून आलें कीं आठ लक्ष पायानें जाणारे लोक व ७२,००० गाड्या एका चोवीस कलाकांत शहरांत येतात. शहराच्या वतीनें पार्लमेंटांत दोन सभासद असतात. ही नुसत्या प्राचीन शहराची व्यवस्था झाली. शहर खेरीजकरून जो ' लंडनाचा ' भाग राहिला त्यामध्यें २७ ' बरोज ' (एका प्रकारच्या तुकड्या) आहेत. या सर्वांच्या वतीनें पार्लमेंटांत ५९ सभासद असतात. लंडनयुनिव्हर्सिटीलाही एक सभासद निवडण्याचा हक्क आहे.

शहर व पश्चिम पुर यांत कोणत्या प्रकारची वस्ती आहे, हें वर सांगितलेंच आहे. बाकी राहिलेल्या भागांत खालीं लिहिल्याप्रमाणें ठळक ठिकाणें आहेतः—पूर्वेस " लांग शोर " ह्मणून नदीच्या किनाऱ्याचा भाग आहे. तेथें सर्व प्रकारचा माल चढविण्याउतरण्याचे धक्के, वखारी व कारखाने आहेत, व खलाशी वगैरे लोकांची वस्ती आहे. " व्हाइट चापेल " येथें साखरेच्या भट्या आहेत व जर्मन मजूरदार लोकांची वस्ती आहे. " हाउन्ड्स डिच् " येथें ' ज्यू ' लोकांची वस्ती आहे. " बेथनल ग्रीन व स्पिटल फील्डस " येथें रेशीम विणणारे लोक आहेत. यांपैकीं कांहीं फ्रान्सदेशांतून पळून आलेल्या प्राटेस्टंट लोकांचे वंशज आहेत. " क्लार्कन्वेल " येथें घड्याळें करणारे व निरनिराळ्या धातूंचे पदार्थ बनविणारे लोक आहेत. "पॅटरनॉस्टर रो" हें पुस्तकें विकणारांचें ठिकाण. "चान्सरी लेन" व " इन्स आफ कोर्ट्स " येथें सर्व वकील, बॅरिस्टर वगैरे लोकांचीं कार्यगृहें आहेत. टेम्सच्या दक्षिण तीरावर " साउथवर्क व लॉम्बेथ " येथें चिनीमातीचीं भांडीं व कांचेचें सामान यांचे कारखाने, यंत्रांचे कारखाने व दारू गाळण्याचे कारखाने आहेत. " बरमांडसे " येथें कातडीं रंगविण्याचे कारखाने, संयोजक द्रव्यांचे कारखाने व लोंकरीच्या वखारी आहेत. " रादरहाइथ " येथें खलाशी, जहाजावरचे सुतार, कोळसे वाहणारे व गलबतांचे तांडेल या लोकांची वस्ती आहे. याप्रमाणें लंडनांतील ठळक ठळक ठिकाणांविषयीं हकीकत झाली.

या राजधानीच्या विस्ताराचा इतिहास मोठा विचित्र आहे. इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीत या नगराचें क्षेत्रफळ दोन

चौरस मैल होतें. सन १८१८ पर्यंत दोन चौरस मैलांचे सहा चौरस मैल झाले. सन १८१८ पासून १८३४ पर्यंत यांची दुप्पट झाली; परंतु १८३४ पासून १८८१ पर्यंत ४७ वर्षांत क्षेत्रफळ ८० चौरस मैल झालें. हल्लीं लंडनशहर व त्याच्या अतिनिकट असलेले भाग यांचें क्षेत्रफळ १२२ चौरस मैल आहे. लंडनपोलिसाची हद्द पाहूं गेलें तर चेरिंगक्रास मध्य बिंदु कल्पून सर्व बाजूंनीं १२ पासून १५ मैल लांबवर गेली आहे. या प्रदेशाचें क्षेत्रफळ ६९० चौरस मैल असून त्यामध्यें ५० लक्ष लोकांची वस्ती आहे; व एकंदर रस्त्यांची लांबी सात हजार मैल आहे. लंडन व निकटवर्ती उपनगरें यांचाच विचार केला तर एकंदर लांबी १४ व रुंदी ८ मैल आहे. एकंदर ८,००० रस्ते आहेत, व हे एकाशीं एक जोडले तर यांची लांबी ३,००० मैल होईल. या सर्व रस्त्यांत दहा लक्ष धुराचे दिवे आहेत. इमारतींची संख्या साडेपांच लक्ष असून त्यांपैकीं १,४०० निरनिराळ्या प्रकारचीं देवळें आहेत. ७,५०० दारूचीं दुकानें, २,००० काफीपानगृहें व ५०० पथिकाश्रम आहेत. या हद्दींत लोकसंख्या ४० लक्ष असून प्रतिवर्षी सुमारें ७० हजारांची भर पडत असते. यांपैकीं ३,००० शिंपी; ३,००० रोटी तयार करणारे; २५,००० खाटिक व ३ लक्ष घरकामाकरितां राहणारे नोकरचाकर आहेत; व भिकार सुमार दीड लक्ष आहे. गेल्या चाळीस वर्षांत लंडनची लोकसंख्या दुप्पट झाली आहे. लंडनशहरांत एडिनबर्गपेक्षां जास्ती स्कॉच लोक आहेत, डब्लिनपेक्षां जास्त आयरिश लोक आहेत, पॅलेस्टाईनपेक्षां ज्यूलोक जास्त आहेत, व रोमपेक्षां रोमन कॅथलिक लोक जास्त आहेत. या शहरांतील खाद्य व पेय सामुग्रीचें मानही असेंच विलक्षण आहे. त्यासंबंधाचे कांहीं आंकडे केवळ मौजेकरितां खालीं दिले आहेत. दरसाल वीस लाख क्वार्टर गहूं, चार लाख बैल, पंधरा लाख मेंढरें, दीड लाख कालवडी, अडीच लाख डुकरें, ८० लक्ष कोंबडीं, बदकें वगैरे, ४० कोट पाऊंड मासळी, ५० कोट कालवे, १२ लक्ष खेंकडे, ३० लक्ष सामन जातीचे मासे खपतात. ५० कोट रुपये किमतीचा तर खाटिकांचा माल खपतो. दारू पिण्याविषयीं तर लो-

कांची कमाल आहे! दरसाल अठरा कोट क्कार्ट पोर्टर व बिअर दारू, ८० लक्ष क्कार्ट ब्रांडी वगैरे जहाल दारूचे अर्क, व ३ कोट क्कार्ट द्राक्षासव वगैरे दारू खपते. पिण्याच्या पाण्याचा खप दररोज १५ कोट ग्यालन आहे; व पाण्याचा पुरवठा करणाऱ्या नऊ कंपन्या आहेत. दरसाल एक हजार कोळशाचीं गलबतें येतात, व त्यांमधून ४० लाख टन कोळसे येतात. तितकाच माल आगगाड्यांमधून येतो. वर्षाच्या कांठीं सर्व प्रकारचे लोक एकंदर कमींत कमी अडीच अब्ज रुपये खर्च करितात असा अजमास आहे. लंडनच्या बंदरांत दरसाल २०,००० व्यापारी जहाजें येतात व टेम्स नदीच्या बंदरांतून निर्यात माल सुमारें एक अब्ज रुपयांचा जातो.

वर सांगितल्याप्रमाणें जो लंडनशहराचा विस्तार दिवसानुदिवस वाढत आहे त्यामुळें लोकांत बरीच अस्वस्थता उत्पन्न झाली आहे व वारंवार चर्चाही सुरू आहे. जी मंडळी शहराच्या धामधुमीपासून दूर असावें या हेतूनें उपान्तभागीं जाऊन रहातात त्यांस त्यांच्या अपेक्षित स्वस्थतेचा उपभोग वर्ष दोन वर्षांपेक्षां अधिक कालपर्यंत मिळत नाहीं. दरवर्षी सर्व बाजूंनीं वस्ती वाढत असतेच; त्यामुळें जीं विविक्त स्थानें तीं अगदीं मध्य वस्तींत येतात व मोकळी हवा, मोकळी जागा व ग्रामसुलभ अशा ज्या अनेक उपभोग्य वस्तु त्यांचा अभाव होतो. १८८१ सालीं लंडनशहराच्या सर्व बाजू मिळून ८५ मैल विस्तार झाला. इतका विस्तार जरी आलीकडे प्रतिवर्षी होत नाहीं तरी १८८५ व १८८६ सालीं ३५ पासून ४० मैलपर्यंत विस्तार झाला; व दरवर्षी १०—१५ मैल होत आहेच. यामुळें शहराच्या बाहेर जाऊन वनश्रीच्या अवलोकनानें चित्तास शांति प्राप्त करून घेणें व दिवसभर श्रम करून उत्पन्न झालेल्या निर्वेदाचा परिहार करणें फारच अशक्य झालें आहे. अशा तऱ्हेनें जनसमूह कोंडून राहिल्यानें कालांतरीं त्यांच्या मनोवृत्तीवर, त्यांच्या शरीरप्रकृतीवर व त्यांच्या नीतीवर कांहीं घोर परिणाम होण्याचा संभव आहे असा कांहीं लोकांचा तर्क आहे. इलिझाबेथ राणीनें असा हुकूम

केला होता कीं लंडनपासून तीन मैलांच्या हद्दींत नव्या इमारती कोणीं बांधूं नये. अशाच प्रकारचा कांहीं तरी नियम हल्लीं होईल तर फार बरें असे कधीं कधीं उद्गार निघतात. या सर्व दुःखांत सुख येवढेंच कीं लंडन शहरभर जागजागीं चतुष्कोनाकृति जागा रिकाम्या ठेवल्या आहेत, व कांहीं कांहीं स्थळीं मोठमोठे सार्वजनिक बगीचे बनविलेले आहेत. त्यामुळें गरीबगुरीबांससुद्धां स्वच्छ हवेचा उपभोग घेण्याची सोय आहे. परंतु अशीं स्थळें पुरेशीं नाहींत अशाबद्दल तक्रार आहे. परंतु ही तक्रार किती सयुक्तिक आहे याचा तर्क आपल्या इकडील लोकांस करतां येणें शक्य नाहीं; कारण अशा प्रकारचीं स्थळें मुंबईसारख्या ठिकाणीं किती बरें सांपडतील ? दहा पांच तरी निघतील काय ? कठीणच. कलकत्त्यामध्यें मात्र पुष्कळ आहेत खरीं. त्या शहरांत अशा चतुष्कोनांची पद्धत लंडनच्या धर्तीवरच अनुसरली असावी असें दिसतें. लंडनशहरांत अशा प्रकारचीं स्थळें दोनशेंवर आहेत. यांपैकीं ५० मोठे बगीचे व विस्तीर्ण मैदानें आहेत व बाकीच्या लहान लहान चतुष्कोन, अर्धचंद्राकार व वर्तुलाकार अशा जागा आहेत. अशा प्रकारचीं स्थळें बऱ्याच अंशीं नगराच्या आरोग्यतेस कारणीभूत झालीं आहेत. लंडनशहरामधूनच टेम्स नदी गेली आहे असें मागें सांगितलेंच आहे; तर या नदीच्या योगानें शहरास स्वच्छ हवेचा लाभ होत असावा व नगरवासी जनांस यथेच्छ जलविहाराची सवड असावी असें सहज वाटण्याचा संभव आहे; परंतु नदी पाहिली ह्मणजे या भ्रमाचा निरास होतो. पाणी फारच गढूळ व दुर्गंधयुक्त आहे व तें स्वच्छ ठेवण्याकरितां हजारों रुपयांचा वार्षिक खर्च चालू आहे. तेव्हां अशा जलप्रवाहापासून शहराच्या आरोग्यास काय फायदा होणार ? असो.

अशा या अवाढव्य शहरांत दाखल झाल्यावर प्रथम कांहीं दिवस मनुष्यास काय करावें हें सुचत नाहीं. जें पहावें तें अचाट भासतें. भव्य व मळकट असल्याकारणानें उग्र रूप धारण करणाऱ्या अशा इमारती; आदि–व अंत–रहित भासणारे विस्तीर्ण रस्ते; अनेकव्यवहारव्यापृत असा जनसंमर्द; नानातऱ्हेचीं वाहनें;

व आगन्तुक जनास न समजण्यासारखे असे अनेक व्यापार— यांच्या योगानें मनुष्यास संभ्रम उत्पन्न होतो व वेड्यासारखें इकडे तिकडे पहात उगीच बसावें लागतें. मला पक्की आठवण आहे कीं विद्याभ्यासाकरितां बाहेरगांवाहून जेव्हां मी प्रथम मुंबईस आलों तेव्हां काळबादेवीच्या रस्त्यावरील गर्दी पाहून मी गांगरून गेलों व मुंबई शहरांतील विचित्र घडामोड पाहून मला अत्याश्चर्य वाटलें, व केव्हां केव्हां एकटा असतांना भयही वाटलें. तशीच स्थिति लंडनशहरांत गेल्यावर प्रथम कांहीं दिवस माझी झाली. खेडेगांवांतील लोकांस ज्याप्रमाणें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय मुंबईंतील प्रचंड व्यवहाराची कल्पना करतां यावयाची नाहीं, त्याचप्रमाणें लंडनास गेल्याशिवाय तेथील स्थितीची कल्पना यावयाची नाहीं. वर्णनकार कितीही स्वकार्यकुशल असला तरी त्याच्यानें तेथील वस्तुस्थितीचें यथार्थ निरूपण करवणार नाहीं असा माझा समज आहे. तेथील सर्वच प्रकरण असें प्रचंड आहे कीं क्षणोक्षणीं आपली क्षुद्रता आपल्यास भासते व जीव दडपून जातो. मनुष्य मोठा उत्साहबहादूर व मेहेनती असला तरी आपल्या पायांनीं हिंडतां फिरतां येण्याइतकी शहराची माहिती होण्यास त्यास निदान महिना लागतो. प्रथमारंभीं एक लंडनचा नकाशा मिळवावा व त्यावरून ठळक ठळक रस्त्यांच्या नांवांचा परिचय करून घ्यावा; ह्मणजे हळू हळू आपले डोळे उघडल्यासारखे होतात, फिरण्यासबरण्यास हुरूप येतो, व आम्निबस, आगगाड्या वगैरे जीं फिरण्याचीं साधनें त्यांचा उपयोग करण्याचें सामर्थ्य येतें. इतक्या आवश्यक माहितीशिवायच फिरावयाचें ह्मणजे ‘ क्याब ’ शिवाय गत्यन्तर नाहीं व ‘ क्याब ’ ह्मणजे मोठ्या खर्चाची बाबद; तेव्हां साधरण स्थितीच्या मनुष्यास अशा वाहनाचा उपयोग निरुपायास्तव ८–४ दिवस करितां येईल; नेहेमीं तसा कसा निभाव लागणार? ह्मणून शहरांतील ठिकठिकाणची माहिती स्वतः करून घ्यावी ह्याशिवाय दुसरा सुलभ मार्ग नाहीं.

लंडन शहरांतील वाहनें.

लंडनशहर व त्याचे उपान्तभाग यांत फिरण्याचीं साधनें

सात प्रकारचीं आहेतः—(१) क्याब, (२)आम्निबस, (३) ट्रामवे, (४) कोचेस, (५) भूपृष्ठावरून जाणाऱ्या आगगाड्या, (६) भुयारांतून जाणाऱ्या आगगाड्या, आणि (७) नौका.

(१) ' क्याब ' दोन प्रकारच्या असतात—दोन चाकांच्या व चार चाकांच्या. चार चाकांच्या गाड्यांत चार माणसें आंत व एकजण गाडी हांकणाराजवळ अशीं पांच माणसें बसावयाची सोय असते. शिवाय गाडीवर सामान ठेवण्याची सोय असते. ह्या गाड्या दिसण्यांत सुरेख नसून बसण्यासही सोयीच्या नसतात, व यांची गतीही फार सावकाश असते. दोन चाकांच्या गाड्यांस ' हॅान्सम ' ह्मणतात. ह्यांत दोन माणसांची सोय असते व गाडीवर थोडें सामान ठेवण्याची सोय असते. हांकणाराची जागा गाडीपाठीमागें उंचावर असते. ह्या गाड्या दिसण्यांत नीटनेटक्या, बसण्यास सोयीवार, चालण्यास जलद असतात. गाडीवाल्यांस कधीं खालीं उतरण्याचा प्रसंग येत नाहीं. बसण्याच्या जागेपुढें दोन फळ्यांचें मांडीइतकें उंच एक दार असतें. हे बहुधां लाविलेलें असतें, परंतु उघडें असलें तरी त्यापासून कांहीं हरकत नसते. दार सहज उघडतें व आंत बसून सहज लावून घेतां येतें. गाडीवाल्याची मदत लागत नाहीं. आंत बसल्यावर हें दार सुमारें आपल्या उरापर्यंत येतें. ह्या दारापासून वर छतापर्यंत जागा उघडी असते. परंतु पाऊस पडत असल्यास त्या उघड्या जागेंत कांचेचीं तावदानें लावण्याची व्यवस्था असते. बसण्याच्या जागेच्या वरतीच छतामध्यें एक वर्तुलाकार छिद्र असतें, तें उघडून त्यामधून गाडीवाल्याशीं बोलतां येतें. बसण्याच्या जागेच्या दोन बाजूंस कांहीं गाड्यांत लहान लहान आरसे लाविलेले असतात. समोरच भाड्याच्या निरखाचें कोष्टक लाविलेलें असतें व त्याच्या बाजूनें चौकट व वरून कांच लाविलेली असते. हा निरख दोन प्रकारचा आहे. एक अन्तराप्रमाणें व एक वेळाप्रमाणें. गाडींत बसण्याच्या अगोदर या गोष्टीचा निर्णय केला असतां पुढें भानगड पडत नाहीं. दोन मैलांपर्यंत भाडें एक शिलिंग आहे व पुढें दर मैलास अर्धा शिलिंग. तिसरा माणूस असला तरी

चालतो. मात्र त्याच्यासाठीं अर्धा शिलिंग जास्त भाडें द्यावें लागतें. सामानाबद्दल दर मोठ्या गांठोड्यास २ पेन्स पडतात. सहा मैलांपेक्षां जास्त अन्तर असल्यास गाडीवाल्यावर हक्क चालत नाहीं, व चेरिंगक्रॉस स्टेशनापासून चार मैलांवर दर मैलास एक शिलिंग पडतो. वेळाच्या शर्तीनें गाडी ठरविली असतां एक तासापेक्षां जास्त वेळ गाडी हांकण्याबद्दल गाडीवाल्यावर हक्क चालत नाहीं. यासंबंधानें माझी एकदां मोठी मौज झाली. मला कांहीं कामाकरितां दोन चार ठिकाणीं जावयाचें होतें; तेव्हां खोळंबा होईल ह्मणून वेळेच्या शर्तीवर गाडी ठरविली. गाडीवाला ज्या ठिकाणीं मला जावयाचें होतें त्याच्या अंतराप्रमाणें पैसे मागत होता, परंतु मी कबूल झालों नाहीं; तेव्हां त्यानें माझी खोड जिरविण्याचा बेत मांडला. वेळाची शर्त कबूल करून त्यानें गाडी हळू हळू चालविली व शेवटीं एकंदर आकार तो प्रथम मागत होता त्या रकमेपेक्षां जास्ती झाला. तेव्हांपासून वेळेच्या शर्तीवर गाडी ठरविण्याचें सोडलें! असो. साधारण प्रतीचे लोक हॉन्समचा उपयोग करीत नाहींत. चांगल्या स्थितींतले लोकच ह्यांत बसतात, कारण कीं दोन तीन तास या गाडींत फिरलें कीं ८–१० रुपये सहज गाडीभाड्यांत जावयाचे! या गाड्यांचे घोडे बहुधा चांगले, सुरेख, व जलद असतात. अशा गाड्यांची संख्या दहा हजारांवर आहे. व त्यांस जोडण्याचे घोडे अठरा हजारांवर आहेत. गाडीवाले फारच हुशार असतात. त्यांस पत्ता सांगितला ह्मणजे नेमके त्या ठिकाणीं घेऊन जातात. त्यांस शहराच्या सर्व भागांचा चांगला परिचय असतो. लंडनांत सर्व घरांचे नंबर घराबाहेर ठळक रीतीनें दुरून दिसण्यासारखे लिहिलेले असतात, म्हणून रस्त्याचें नांव व घराचा नंबर एकदां सांगून दिला ह्मणजे आपल्यास कांहींएक बोलण्याची जरूर पडत नाहीं. आपल्या इकडल्यासारख्या हालअपेष्टा होत नाहींत. कर या नाक्यावर गाडी उभी–विचार त्या गृहस्थाला–मग जा इकडून तिकडे आणि तिकडून इकडे. कोण ते हाल आणि कायती दशा! बरें, मध्येंच कुठें गाडी उभी करावीशी वाटल्यास गाडीवाल्याच्या नांवानें आरडाओरड

करावयाला नको–जिथें उतरावयाचें असेल त्या दिशेकडे छत्री किंवा काठी दाखविल्याबरोबर तो तेथेंच गाडी उभी करील. बोलणें नको–चालणें नको. आरडा नको–ओरडा नको. याचें नांव सोय !

लंडन शहरांतील वाहनें.

(२) दुसरें साधन आम्निबस–यांस बहुधा नुसतें 'बस' ह्मणण्याचाच प्रघात आहे. हे 'बस' सकाळचे आठ वाजल्यापासून मध्य रात्रींपर्यंत चालत असतात. यांच्या २००शाखा आहेत. या गाड्यांस दोन मजले असतात. दुसरा मजला उघडा असून त्यावर गाडीच्या मधोमध अशी एक उतारूस पाठ टेंकण्यासाठीं फळी असते व फळीच्या दोन्हीं बाजूंस उतारूंस बसण्याची सोय असते. शिवाय गाडी हांकणाराच्या उजव्या व डाव्या बाजूस एक एक जागा असते. खालचा मजला लहान खोलीसारखा किंवा आगगाडींतल्या डब्यासारखा असतो. त्यास एक दार असून दोन्ही बाजूंनीं खिडक्या असतात. मधोमध वाट असून दोन बाजूंनीं बांकें असतात. या गाड्यांस धिप्पाड व मजबूत असे दोन दोन घोडे लाविलेले असतात. एक गाडी हांकणारा असतो व एक कंडक्टर भाड्याचे पैसे वसूल करण्याकरितां असतो. कांहीं गाड्यांत टिकिटें देण्याची चाल आहे व कांहींमध्यें दाराच्या एका बाजूला एक कागदाचा तुकडा अडकविला असतो त्यावर नुसतें आलेलें भाडें मांडून ठेवण्याची चाल आहे. गाडी हांकणाराच्या जागेशेजारीं घंटेची सोय असते व त्या घंटेची दोरी पिछाडीस आलेली असते. गाडी उभी करणें झालें ह्मणजे कंडक्टर ही दोरी ओढतो ह्मणजे गाडी उभी रहाते, व चालू करावयाची असली ह्मणजे उभें रहाण्याचे जागेवर पायानें दोन तीन वेळ आवाज करतो. माझा प्रथम असा समज झाला होता कीं वरच्या मजल्यापेक्षां खालच्या मजल्यास हांशील अधिक पडत असेल; परंतु तसें कांहीं नाहीं. सर्व स्थळीं एकच दर. उलटें वर बसणाऱ्या लोकांची संख्या फार; कारण तेथें कोंडल्यासारखें वाटत नाहीं, व आजूबाजूची सर्व मौज दृष्टीस पडते. नव्या माणसानें तर हट-

कून वरच बसावें, व त्यांतून गाडी हांकणाराजवळ जागा मिळाल्यास फारच उत्तम; कारण कीं तसें केल्यानें सर्व प्रकारची माहिती मिळण्याचा संभव असतो व रस्त्याच्या दोन्ही बाजूंचा भाग दिसण्यांत येतो. कांहीं गाड्यांत वर चढण्यास चांगले जिने आहेत परंतु कांहींना एकावर एक अशा तीन थोटे रुंदीच्या पट्याच आहेत. त्यांवरून चढून जातांना नव्या माणसास फारच जपायाला पाहिजे; परंतु त्या लोकांची मौज अशी कीं, बायका देखील मोठ्या होसेनें वर चढून बसतात. खालच्या मजल्यावर बसावें कोणी ? तर जी बाई अजारी असेल किंवा वृद्ध असेल, किंवा जिच्याजवळ लहान मूल असेल तिनें. पण हीं सर्व गोष्ट पाऊस नसला ह्मणजे. पाऊस असला कीं खालच्या मजल्यांत लोकांची गर्दी व्हावयाचीच. कांहीं खप्पी असे असतात कीं पाऊस पडत असला तरी ओव्हरकोट व छत्री घेऊन वर बसतात. गाड्यांच्या बाहेरून दोन्ही बाजूंनीं ज्या रस्त्यांकडून गाडी जावयाची असेल त्या रस्त्यांचीं नांवें लिहिलेलीं असतात; परंतु आंत बाहेर जिकडे तिकडे जाहिराती चिकटविल्या असल्या कारणानें नव्या माणसास तीं नांवें एकदम समजत नाहींत. हें वाहन थोड्या पैशांत फार सोयीचें खरें; परंतु यांत अशी गैरसोय आहे कीं, रस्तोरस्तीं हें चालत नसून आपल्यास ज्या भागांत जावयाचें त्या भागाच्या जवळ जाणारी कोणती गाडी याचा निर्णय करण्यास शहराच्या नकाशाची माहिती चांगलीच पाहिजे; नाहीं तर भलत्या दिशेला वाहून जाण्याचा संभव आहे. या गाड्यांचें भाडें कमींत कमी एक पेनी व जास्तींत जास्ती सहा पेन्स असें अंतराप्रमाणें आहे. कांहीं फार लांबच्या स्थलांचें भाडें एक शिलिंग असतें. ह्या गाड्या ठिकठिकाणीं थांबत व सावकाश अशा जात असतात. भाड्याच्या निरखाचें कोष्टक प्रत्येक गाडींत असतें. प्रत्येक नाक्यावर गाडी पांच पांच दहा दहा मिनिटें उभी असते. त्या वेळेस कंडक्टर मोठ्या स्वरानें गाडी अमुक रस्त्यानें अमुक ठिकाणीं जाईल असें ओरडत असतो; परंतु त्याचा उच्चार अस्पष्ट असल्यामुळें नव्या माणसास त्यापासून बोध होत नाहीं. जवळ जाऊन

समक्ष विचारिलें असतां मात्र सभ्यपणानें उत्तर मिळतें. सर्व प्रकारच्या गाड्यांचा असा सक्तीचा नियम आहे कीं त्यांनीं रस्त्यांमधून आपल्या डाव्या बाजूनें जावें. तेव्हां गाडींत बसणें झाल्यास तिच्या डाव्या बाजूच्या पार्श्वपथावर उभें रहावें व गाडी जवळ आली ह्मणजे हात वर करावा ह्मणजे झालें. गाडींत बसतांना जवळ मोड घेऊन ठेवावी ह्मणजे आपला खोळंबा होत नाहीं.

(३) तिसरें साधन ट्रामवे. ह्या गाड्या मध्य वस्तींत मुळींच आढळत नाहींत. शहराच्या बाजूनें सर्व दिशांस आहेत. या गाड्या चांगल्या प्रशस्त व बहुतकरून दोन मजल्यांच्या असतात. यांचें भाडें माफक असतें. वाफेच्या योगानें चालणाऱ्या ट्रामवेच्या गाड्या लंडन शहरांत नाहींत. सर्व गाड्यांना घोडे लाविलेले असतात. मात्र हायगेटच्या टेंकडीवर नेलेली ट्रामवे आहे तिला घोडे नाहींत व एंजिनही नाहीं. गाडी चालते कशी ह्मणाल तर रस्त्याच्या एका टोंकास वाफ उत्पन्न करण्याचा कारखाना आहे. त्या वाफेच्या योगानें एका लोखंडी दोरीला सतत गति प्राप्त होते. ही दोरी गाडीच्या दोन रुळांच्या मधोमध एक कंगोरा आहे त्यामधून गेली असते. या दोरीचीं टोंकें दृष्टीस पडत नाहींत. एंजिन सुरू आहे तोंपर्यंत ही दोरी एकसारखी हालत असते. गाड्यांच्या पुढाशीं मध्यभागीं आंकड्याची योजना असते. हा आंकडा वाटेल तेव्हां आकुंचित करितां येतो व वाटेल तेव्हां सईल होतो. शिवाय चाकावर दाब बसण्यासाठीं यंत्राची योजना असते. गाडी चालू करावयाची असली ह्मणजे वर सांगितलेला आंकडा लोखंडी दोरीजवळ येईल असें करून त्याचें आकुंचन करितात, ह्मणजे आंकडा दोरीवर घट्ट बसतो व दोरीबरोबर गाडी चालते. वाटेंत गाडी उभी करणें झाली तर आंकडा सईल सोडला ह्मणजे दोरीचा संबंध सुटतो, व तिजपासून मिळत असलेली गति बंद होते; परंतु चढण असल्या कारणानें गाडी आपोआप खालीं उतरण्याचा संभव आहे ह्मणून ब्रेक दाबतात, त्यामुळें चाकांवर दाब पडून गाडी घसरत नाहीं. सपाट रस्ता असल्यास ब्रेकांची जरूर लागावयाची

नाहीं. ह्या गाड्या एकच मजल्याच्या होत्या. भाडें फारच थोडें ह्मणजे चढतांना दोन पेन्स व उतरतांना एक पेनी. या गाड्या फारच सुरळीत रीतीनें जातात व येतात. कर्कश अवाज वगैरे कांहीं होत नाहीं.

ट्रामवेच्या गाड्यांसंबंधानें दुसरी एक सांगण्यासारखी गोष्ट नजरेस पडली. कांहीं नियमित अंतरावर जाणाऱ्या गाड्यांस हांकणारा मात्र असतो. कंडक्टर नसतो. अंतर नियमित असण्याचें कारण हें कीं भाड्याचा दर एकच प्रकारचा ठरीव असल्याशिवाय कंडक्टरावांचून चालावयाचेंच नाहीं. या गाड्या सुमार एक एक मैल जाणाऱ्या असतात व भाडें कोठेंही बसून कोठेंही उतरलें तरी एक पेनी असतें. भाड्याच्या वसुलाची व्यवस्था फारच विचित्र आहे. गाडीच्या एका टोंकास एक लहानशी पेटी अडकविलेली असून तिला एक पेनी जाण्याइतकें छिद्र ठेविलेलें असतें. 'या पेटींत पैसे टाका' अशीं पेटीवर अक्षरें लिहिलेलीं असतात. पेनी आंत टाकल्याबरोबर एका घंटेचा आवाज होतो. त्यावरून गाडी हांकणारास पेनी टाकला असें समजतें. सुटा पेनी नसल्यास एक लहान खिडकी असते ती उघडून गाडीवानाजवळ मोड मागावी ह्मणजे मिळते. आतां गाडींत कोण बसलें व कोण उतरलें याचा पत्ता गाडीवानास कसा लागावा ह्मणाल तर त्यासाठीं गाडीवानासमोर एक आरसा लाविलेला असतो. गाडींत बसणाऱ्या माणसाचें प्रतिबिंब या आरशावर पडून गाडीवानास दिसतें व पैसे दिल्याचा आवाज त्याच्या कानीं पडतो. तेव्हां या दोन्ही गोष्टींचा मेळ पडला ह्मणजे वसूल बरोबर झाला असें समजावयाचें. दुसरी अशी खुबी आहे कीं पेटींत पैसे टाकण्याचें जें छिद्र आहे त्यांतून एका पेनीशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्रकारचें नाणें गेलें असतां आवाज होत नाहीं. तेव्हां पेनीऐवजीं अर्धा पेनी टाकून कार्यभाग होण्याचा संभव नाहीं. आतां पेनीच्या आकृतीचा व पेनीच्याच वजनाचा तुकडा टाकल्यास कदाचित् चालण्यासारखें असेल, परंतु केवळ कंपनीचें एक पेनीचें नुकसान करण्याकरितां इतका उपद्व्याप कोण करीत बसला आहे ? ही वसुलाची

योजना सर्वस्वी निर्दोष ह्मणतां येत नाहीं; कारण कीं गाडी-वाल्याची नजर आरशापासून चळण्याचा संभव आहे व तेव-ढ्या अवकाशांत एखादा कोणी बसल्यास व त्यानें पैसे न दिल्यास चालण्यासारखें आहे. याला कांहीं तोड नाहीं. दुस-ऱ्या उतारूंची भीति असल्यानें मात्र अशी दगलबाजी कर-ण्यास मनुष्य प्रवृत्त होण्याचा संभव कमी आहे. एकंदरीनें कंड-क्टराचा पगार वांचविण्याची ही युक्ति बरीच साधली आहे. एके दिवशीं अशा प्रकारच्या एका गाडींत बसून जात असतां एका वृद्ध गृहस्थाची गांठ पडली. हे गृहस्थ हिंदुस्थानाविषयीं फार कळकळ बाळगणारे होते; तेव्हां त्यांनीं माझ्याशीं संभा-षणाचा उपक्रम केल्यावर अनेक विषय निघाले, त्यांत मीं असल्या गाड्यांच्या वसुलांत दगलबाजी होण्याचा संभव आहे असें ह्मटलें, तें त्यास रुचलें नाहीं. ते ह्मणाले कीं अशा प्रकारची गोष्ट इंग्लंड देशांत शक्य नाहीं. परस्परांचा विश्वास व वाइटांस चांगल्याची भीति हें त्या देशाच्या उन्नतीचें बीज आहे, व त्यावरच सर्व व्यवहार अव्याहत चालत आहेत. खरेंच आहे.

(४) चवथें साधन 'कोचेस.' हें वाहन आपल्या इकडे फारसें दिसण्यांत येत नाहीं. 'कोच' ह्मणजे एक चार चाकांची प्रशस्त गाडी असून आंत पांच सहा माणसें बसण्याइतकी जागा असते. शिवाय गाडीवर चार रांगा मिळून १०-१२ माणसें बसण्याची सोय असते. शिवाय खाद्य व पेय वस्तूंची सामुग्री ठेवण्या-साठीं जागा केलेली असते. यांस नेहमीं चार घोडे जोडण्या-ची चाल आहे. पुष्कळ श्रीमंत लोक शोकासाठीं अशा गा-ड्या ठेवितात व सुट्टीच्या किंवा सणाच्या दिवशीं, किंवा शर्य-तीच्या दिवशीं मित्रमंडळीसहवर्तमान त्यांत बसून स्वतः गाडी हांकीत फिरावयास निघत असतात. भाड्याच्याही अशा गाड्या आहेत. वसंत व ग्रीष्म ऋतूंमध्यें ह्या गाड्या नियमित वेळीं पिकॅडिलीमधून सुटून शहरापासून दूर असलेल्या प्रसिद्ध ठिकाणीं लोकांस घेऊन जाऊन परत आणूनही पोंहोचवितात. या गाड्यांत बसण्यांत फायदा असा असतो कीं आजूबाजूच्या प्रदेशाची शोभा यामधून चांगली दृष्टीस पडते. आगगाडीचा वेग मोठा असल्या कारणानें तसें होत नाहीं.

(५) पांचवें साधन भूपृष्ठावरून जाणाऱ्या आगगाड्या. यांचीं लंडन शहरांत १५ मुख्य स्टेशनें आहेत. हीं स्टेशनें फारच विस्तीर्ण असून त्यांत विद्युत्प्रकाशाची योजना आहे. या प्रत्येकावरून पांच पांच सहा सहा आगगाडीचे फांटे गेलेले आहेत, यामुळें नव्या माणसाची स्टेशनावर मोठी तारांबळ होते. निरनिराळ्या फांट्यांसाठीं निरनिराळीं टिकीटहापिसें असल्या कारणानें बरीच धकाधक पडते. हें खरें कीं, ठिकठिकाणीं उतारूंच्या सोयीसाठीं निराळ्या नांवांच्या फळ्या मारलेल्या असतात, परंतु नव्या माणसास त्यांपासून फारशी सोय होत नाहीं; कारण कीं या बिचाऱ्या फळ्या बाजूच्या मोठ्या अक्षराच्या जाहिरातींमध्यें अगदीं लपून जातात. जाहिरातींचा अनर्थ कांहीं विचारूं नका. सर्व लहानमोठ्या स्टेशनांवर व वाटेनें जिकडे तिकडे या दिसत असतात, त्यामुळें स्टेशनाच्या नांवाचा बोध होणें फार कठीण पडतें. तेव्हां दुसऱ्या माणसास न विचारतां कोणताही कार्य भाग होत नाहीं. अमुक ठिकाणचें टिकीट कुठें मिळतें हें विचारल्याशिवाय समजत नाहीं. टिकीट घेतल्यावर अमुक ठिकाणची गाडी कोणत्या ठिकाणीं उभी आहे याची चौकशी केलीच पाहिजे. बरें, येवढें झालें ह्मणजे जिकीर संपली का? नाहीं. गाडीचा कोणता भाग कुठें जातो हेंही विचारलें पाहिजे; कारण कीं कांहीं गाड्यांचा अर्धा भाग एका स्टेशनापर्यंत जातो व दुसरा मध्येंच तोडून घेतात व तो दुसऱ्या गाडीला जोडला जाऊन दुसऱ्या दिशेस जातो. असें असलें ह्मणजे भलत्याच भागांत बसल्यास भलत्याच ठिकाणीं वाहून जाण्याचा संभव आहे. माझी स्वतःची एकदां अशी फजिती झाली. लंडनपासून कांहीं अंतरावर डलिच नांवाचें गांव आहे, तेथें माझ्या ओळखीच्या एका साहेबाची गांठ घेण्याकरितां मी गेलों. जातांना बिनचूक गेलों; परंतु येतांना मात्र चुकलों. ज्या गाडींत मी बसलों तिचे दोन भाग होते. लंडन शहराच्या अमुक भागांत जाणाऱ्या लोकांनीं पुढल्या भागांत बसावें व बाकीच्यानीं दुसऱ्या भागांत बसावें असें स्टेशनावरचा एक माणूस ओरडत होता; परंतु त्याचा उच्चार फारच अस्फुट असल्या

कारणानें मला कांहींच बोध झाला नाहीं. विचारपूस करावी तर वेळ नव्हता. स्टेशन लहान असल्याकारणानें गाडी फारच थोडा वेळ उभी रहावयाची होती ह्मणून धांदलीनें एका गाडींत बसलों. बसतांना मात्र डब्यांत दोनचार बाया बसल्या होत्या व एक पुरुषही होता, त्यास हा डबा कोठें जातो ह्मणून विचारलें, परंतु त्यांनीं कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. उलट तोंडाला रुमाल लावून बाया माझ्याकडे पाहून हंसूं लागल्या. वाटेंत गाडीचा पुढला भाग केव्हां निराळा झाला हें समजण्यांत आलें नाहीं त्यामुळें मला जेथें जावयाचें होतें तेथें न पोंचतां भलत्याच ठिकाणीं पोंचलों. थोडे पैसे जास्ती द्यावे लागले व शिवाय घरीं जाण्यास उशीर झाला. ज्या शहराच्या भागांत मी उतरलों तो भाग माझ्या परिचयांतला होता ह्मणून बरें झालें, नाहीं तर आणखी धांदल झाली असती. स्टेशनांतून बाहेर पडून आम्निबसमध्यें बसलों व घरीं गेलों. गाडींत एक अमेरिकन गृहस्थ भेटला. त्यानें मोठ्या अगत्यानें माझी विचारपूस केली. मीं सहज बोलण्यांत त्यास वरची हकीकत सांगितली; तेव्हां तो ह्मणाला इंग्रज लोक मोठे मगरूर व असभ्य आहेत. अमेरिकेंत असा प्रकार घडला नसता. हें त्याचें ह्मणणें कितपत खरें आहे याचा प्रत्यय अमेरिकेंत गेल्याशिवाय कसा मिळणार ? असो.

कांहीं कांहीं स्थलीं दोन दोन तीन तीन कंपन्यांचीं स्टेशनें आहेत. लंडनाहून म्यांचेस्टरास जाण्याला पांच निराळ्या शाखा आहेत. यावरून असें दिसतें कीं, एका कंपनीच्या गाड्यांनीं उतारूंचा निर्वाह होत नाहीं. इतकी उतारूंची गर्दी ! जास्ती कंपन्या असल्या ह्मणजे येवढा मात्र फायदा असतो कीं चढाओढीनें उतारूंची सोय चांगली होते व हंशील माफक पडतें. कांहीं कांहीं ठिकाणीं या गाड्या भूपृष्ठावरून न जातां जमिनींत पुरलेल्या खांचांवरून जातात; यामुळें असा फायदा होतो कीं मधली जागा दुसऱ्या कामाला लावितां येते. लंडन शहरांत लोकवस्ती मोठ्या झपाट्यानें वाढत चालली आहे हें वर सांगितलेंच आहे. या वाढत्या वस्तीच्या सोयीसाठीं उपान्तभागांवर आक्रमण होत चाललें

आहे, हेंही सांगितलेंच आहे. याशिवाय शहरांतल्या शहरांत जास्त जागा उपयोगांत आणण्याच्या मार्गांचें अवलंबन होतच आहे. जमीन खोदून व पोखरून जास्त जागा काढावयाची हा एक मार्ग व दुसरा खांब वगैरे पुरून आकाशाच्या पोकळींतल्या जागेवर हल्ला करावयाचा हा दुसरा मार्ग; यामुळें एक तर जास्त जागा उपयोगांत येते व दुसरें असें कीं घरंदारें पाडून टाकण्याचें कारण न पडल्या कारणानें लोकांचें नुकसान भरून देण्यासाठीं पैसा खर्च होत नाहीं. आतां अधांत्रीं आगगाडीचा रस्ता करण्यास खर्च पुष्कळ येत असेल खरा; परंतु शहरांतील जागेच्या किंमतीचा विचार केला ह्मणजे हा खर्च कमीच ह्मणावा लागेल.

शहरांत व शहराच्या जवळपास ज्या गाड्या जातात त्यांचे डबे फारसे चांगले नसतात. तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत सुद्धां बसावयास गाद्या असतात; परंतु दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांतील बसण्याची जागा फार रुंद नसते, व लघुशंका वगैरे करण्याची सोय कोणत्याच वर्गाच्या गाडींत नसते. लांबच्या प्रवासाच्या गाड्यांत सोय चांगली असते. या गाड्यांचा वेग आपल्या इकडील गाड्यांपेक्षां पुष्कळ जास्ती असतो. साधारण गाड्या ३०–४० मैल जातात, व फार लांबच्या, मध्यें न थांबणाऱ्या, गाड्या एका तासांत ६० मैल–ह्मणजे मिनिटाला मैलप्रमाणें जातात. गाड्यांचें हांशील माफक असतें.

(६) सहावें साधन भुयारांतून जाणाऱ्या गाड्या. यांस "मेट्रापॉलिटन रेलवे" ह्मणतात. या गाड्या मुख्यत्वेंकरून शहराच्या मध्यवस्तीभोंवताली चालू आहेत. यांचे कांहीं फांटे उपान्तभागांतही गेलेले आहेत. या गाड्यांच्या रस्त्यांचा मोठा भाग घरांच्या व रस्त्यांच्या खालून पोखरलेल्या भुयारांतून आहे व कांहीं भाग मोठमोठ्या घरांच्या उंच भिंतींच्या मधोमध रिकाम्या असलेल्या जागेंतून गेला आहे. मुख्य मुख्य रस्त्यांवर या प्रकारच्या गाड्यांचीं २७ स्टेशनें आहेत. स्टेशनें फार मोठीं व भव्य नसून कोंजट आहेत. रस्त्याला लागूनच एक लहानशी पडवी असून तिच्यावर स्टेशनाचें नांव लिहिलेलें असतें.

पडवीच्या आंत गेलें ह्मणजे तिकिटहपीस लागतें व नंतर उजव्या व डाव्या बाजूस उतरण्याकरितां पायऱ्या असतात. आपल्याला ज्या दिशेस जावयाचें असेल त्याप्रमाणें उजव्या किंवा डाव्या बाजूच्या पायऱ्या उतरून खालीं जावें ह्मणजे प्लॅटफार्म लागतो. तेथें प्रकाश बेताबाताचाच असतो व हवा दमट असते. प्रकाश येण्यासाठीं वरच्या बाजूनें सर्व कांचा लाविलेल्या असतात. धक्क्यावर तीन ठिकाणीं तीन फळ्या मारलेल्या असतात; त्यांवर कोणत्या वर्गाच्या उतारूंनीं कोठें उभें रहावें याबद्दल सूचना असते. गाडीच्या एंजिनाच्या अग्रभागीं गाडी कोणत्या दिशेस जावयाची हें लिहिलेलें असतें. शिवाय पुढें असणाऱ्या कंदिलांच्या रंगावरूनही दिशेचा निर्देश होतो. त्यावरून समज न पडल्यास पोर्टरास विचारावें व नंतर गाडींत बसावें. एकदां मी एका स्टेशनावर उभा असतां दहा गाड्या माझ्या समक्ष गेल्या, परंतु मला हवी ती गाडी मिळाली नाहीं चार चार पांच पांच मिनिटांनीं गाड्या येत असतात व सर्वांत उतारूंची गर्दी असतेच. गाडींतून जातांना अगदीं अंधार काळोख असा क्वचित् असतो; व स्वच्छ हवाही थोडीबहुत असतेच. डब्यांमध्यें धुराचे दिवे लाविलेले असतात. मधून मधून उघड्या जागेंत गाडी जाते तेव्हां प्रकाश पुष्कळ व हवा विपुल असते. या गाड्यांचें भाडें दुसऱ्या गाड्यांच्या भाड्यापेक्षां कमी असतें त्यामुळें थोड्या खर्चांत जलद जाण्यायेण्याची चांगली सोय आहे. कितीं लांबचा प्रवास असला तरी एक शिलिंगापेक्षां जास्त भाडें पडत नाहीं. या गाड्यांतून सालिना आठ कोटींवर उतारू जातात येतात; ह्मणजे दर आठवड्यास सुमारें पंधरा लक्ष पडतात, व यांस दर खेपेस सरासरी दोन पेन्स भाडें पडतें. या सर्व रस्त्यांच्या एकचतुर्थांश भागावर, ह्मणजे फॅरिंग्डन स्ट्रीट व मूरगेट स्ट्रीट यांचे दरम्यान, रविवार खेरीजकरून बाकी प्रत्येक दिवशीं १५३७ गाड्या चालतात. या गाड्या सकाळीं ६ वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंत चालू असतात. सकाळीं आठ वाजेतोंपर्यंत व संध्याकाळीं आठ वाजल्यानंतर दर पंधरा मिनिटांनीं गाड्या चालतात. आठ वाजल्यापासून आठ वाजेपर्यंत पांच पांच

दहा दहा मिनिटांनीं गाड्या चालतात. सारांश या गाड्या मोठ्या सोयीच्या आहेत. प्रथम प्रथम शहराची माहिती होईतोंपर्यंत व पहाण्याची हौस पुरी होईतोंपर्यंत नव्या माणसानें आम्निबस व कॅब यांचा उपयोग करावा; परंतु हौस पुरी झाली ह्मणजे मेट्रापालिटन रेलवेसारखें सुलभ, थोड्या खर्चाचें व जलद असें दुसरें फिरण्याचें साधन नाहीं.

आगगाडींत बसलें असतां स्त्रियांकडे न पाहण्याची व त्यांच्याशीं न बोलण्याची खबरदारी ठेवावी, असें लोक सांगतात. त्याचप्रमाणें एकटी बायको ज्या गाडींत असेल त्या गाडींत बसूं नये असें ह्मणतात. उगीच कुभांड रचून पैसे उपटण्याचा यत्न हलकट स्त्रिया करतात असें माझे ऐकण्यांत आलें. अमुक रुपये टाक नाहीं तर माझी अब्रू घेतल्याबद्दल पोलिसाकडे फिर्याद करितें अशी धमकी बाया घालतात,असें कांहीं लोकांच्या सांगण्यांत आलें. परंतु मला या गोष्टीचा प्रत्यय आला नाहीं.

(७) सातवें साधन नौका. टेम्स नदीच्या कांठावर उतारूंच्या सोयीसाठीं ४८ धक्के आहेत. यांपैकीं २६ उत्तरतीराला व २२ दक्षिणतीराला आहेत. नौकांचें भाडें एक पेनीपासून दीड शिलिंगपर्यंत असतें. जाण्यायेण्याचीं तिकिटेंही कमी दरानें मिळतात. रविवारीं व कांहीं सणांच्या दिवशीं भाड्यांचे दर चढवीत असतात. सर्व नौका चांगल्या सोयीच्या नसतात; परंतु नौकांवरून सहल केल्यानें लंडन शहरांतील व्यापाराचें अवाढव्य स्वरूप लक्षांत येतें, व इंग्लंड देशाच्या वैभवाचें बीज काय हें समजल्यावांचून रहात नाहीं.

लंडनशहरांतील रस्ते.

लंडनशहरांतील रस्ते दिवसानुदिवस सुधारत चालले आहेत. जो शहराचा भाग नवा वसला आहे त्यामध्यें रस्ते मोठे व व्यवस्थित आहेत, परंतु पुरातन भागांत वांकडेतिकडे, कोंजट व अरुंद असे रस्ते आहेत, यामुळें प्यारिस शहरांत जी रस्त्यांची शोभा व जो रेखींवपणा आढळतो त्याचा मासला लंडनांत मिळत नाहीं. जसजशी सवड मिळाली व मिळत

आहे तसतसे रस्ते सुधारत गेले व जात आहेत. शहरसुध-राईचें काम " मेट्रापालिटन बोर्ड आफ वर्कस " नांवाची एक मंडळी आहे तिच्याकडे सोंपविलें आहे. ही मंडळी आपल्या कामांत अश्रान्त परिश्रम करीत आहेत. रस्ते वाढविण्यासाठीं लोकांचीं घरें मोडून टाकावीं लागतात, व नुकसान भरून देण्यासाठीं अतोनात पैसे खर्ची पडतात. कांहीं प्रसंगीं एक एकर जमिनीसाठीं एक कोट रुपये देण्यांत आले आहेत. सर्व रस्त्यांस पार्श्वपथ आहेत व पादचारिजनांनीं या पथावरून जाण्याविषयीं निर्बंध आहे. पूर्वी सर्व रस्त्यांवर फरसबंदी होती, परंतु हळू हळू पुष्कळ रस्ते लांकडाचे करण्यांत आले आहेत. खडी वगैरे घालून रस्ता तयार झाल्यावर नंतर जाड लांकडाचे तुकडे चार चार सहा सहा बोटें रुंदीचे डांबराच्या योगानें एकाशीं एक जोडतात ह्मणजे झालें. रूळ वगैरे फिरवावा लागत नाहीं. या कामास लागणारें सर्व लांकूड अमेरिकेंतून येतें असें माझ्या ऐकण्यांत आलें. अशा प्रकारचे रस्ते असल्याकारणानें गाड्यांचा आवाज कमी होऊन बाजूच्या घरांतील लोकांस त्रास होत नाहीं, व चिखलही कमी होतो. रस्ते साफ ठेवण्याची फार खबरदारी असते. मोठमोठ्या रस्त्यांवर ठिकठिकाणीं लहान मुलें हातांत केरसुणी व सूप घेऊन उभीं असतात व घोड्यांची लीद व दुसरी कांहीं घाण पडल्यास ती एकदम काढून जागा साफ करितात. ज्या ठिकाणीं अजून लांकडी रस्ते झाले नाहींत त्या ठिकाणीं आपल्या इकडल्यासारखे खडी वगैरे घालून केलेले रस्ते आहेत; परंतु फरसबंदी कोठेंच आढळण्यांत आली नाहीं. यूस्टनच्या स्टेशनांत जाण्याला एक रस्ता असा केला आहे कीं त्यावरून गाडी चालली असतां बिलकुल आवाज होत नाहीं. या रस्त्यावर कांहीं नरम पदार्थ घालून त्यावर डांबर ओतलें असावें. असे रस्ते फार दिवस टिकत नसतील असा माझा समज आहे. जे रहदारीचे रस्ते आहेत त्यांच्या दोनही बाजूंनीं दुकानांच्या रांगा आहेत. सर्व दुकानांचे व घरांचे नंबर ठळक अक्षरांनीं दुरून अवलोकनांत येण्यासारखे लिहिलेले असतात, त्यामुळें घराचा किंवा दुकानाचा नंबर समजला ह्मणजे नेमक्या ठिकाणीं

जातां येतें व कोणास विचारण्याची गरज पडत नाहीं. लहानमोठ्या सर्व रस्त्यांवर नामनिर्देश करण्यासाठीं पाट्या लाविलेल्या आहेत, परंतु मोठ्या रस्त्यांवर आजूबाजूच्या जाहिराती व दुकानांच्या पाट्या यांच्या गर्दींत त्या कधीं कधीं नजरेस पडत नाहींत. जाहिराती वाटेल त्या ठिकाणीं लावण्याची मनाई आहे. त्यांसाठीं नियमित जागा असतात, व त्या जागांचें भाडें द्यावें लागतें. जेथें जुनें घर मोडून वखळ झाली असेल किंवा जेथें नवें घर बांधण्याचें काम चाललें असेल तेथें रस्त्याच्या बाजूनें एक फळ्यांचीच भिंत बनवितात व त्या फळ्यांवर जाहिराती चिकटविलेल्या असतात. अशा प्रकारच्या सर्व जागांचा मक्ता घेणाऱ्या कांहीं मंडळ्या आहेत. दुसरी एक जाहिरातींची तऱ्हा रस्तोरस्तीं आढळण्यांत येते ती अशी कीं—पुरुषभर उंचीच्या दोन फळ्या घेऊन त्यांवर जाहिराती चिकटवितात,व त्या फळ्या मजुरांच्या डोक्यावर अडकवून त्यांस सर्व रस्ताभर फिरवितात. ही मजा मोठी पहाण्यासारखी असते. फळ्या उंच असल्या कारणानें मजुरांचे हात मुळींच दिसत नाहींत. मधोमध त्यांचें डोकें मात्र दिसत असतें; त्यामुळें एकदम नव्या मनुष्यास बाचकल्यासारखें होतें. अशा प्रकारच्या लोकांस "सॅन्डविचेस" ह्मणतात. "सॅन्डविचेस" हा एक खाण्याचा पदार्थ असतो. त्याच्या दोहीं बाजूंनीं पापुद्रा असून मध्यें पुरण असतें. तसे हे लोक दिसतात; ह्मणजे यांच्या पोटावर जाहिरातींची फळी व पाठीवर फळी व मध्यें त्यांचें शरीर असतें. केव्हां केव्हां अशा सहा सहा आठ आठ लोकांची रांगच्या रांग आढळते. मनुष्यासारख्या बुद्धिमान् प्राण्याचा असा पशूसारखा उपयोग करितात यास काय ह्मणावें ? आणि तेंही रानटी देशांत नव्हे, तर ज्या देशांतील लोक दासविक्रयाचा उच्छेद केल्याबद्दल शेखी मिरवितात व जेथें अर्थशास्त्राच्या तत्वाच्या अनुरोधानें सर्व व्यापार चालतात अशा देशांत !

सर्व रस्त्यांच्या दोहों बाजूंनीं धुराच्या दिव्यांचे कंदील आहेत व मोठमोठ्या रस्त्यांत शिवाय मधोमधही आहेत, त्यामुळें प्रकाश विपुल असतो. मध्यें असणाऱ्या दीपस्तंभांवर एक

आडवी फळी मारलेली असते. तिजवर "डाव्या बाजूनें चाला" असें लिहिलेलें असतें. टिकठिकाणीं रस्त्यांच्या नाक्यांवर व रस्त्यांच्या मधोमध लहान लहान फळ्यांचीं घरें बांधलेलीं आढळतात. येथें अग्निप्रलयाच्या उपशमनाची सर्व सामुग्री असते. आगीच्या बंदोबस्तासाठीं एक सहाशें लोकांची स्वतंत्र पलटणच ठेविलेली आहे, व सालिना खर्च दहा लाखांवर आहे. या खात्याच्या गाड्यांचा रंग लाल–त्यांचे कंदील लाल–नोकर लोकांचे कपडे लाल–सर्व कांहीं लाल रंगाचें. या सर्व चौक्यांवर रात्रंदिवस पहारा असतो.

सर्व मोठमोठ्या रस्त्यांवर लोकांची गर्दी फार असते. दोन तीन रस्ते जेथें मिळतात तेथें तर विशेषच असते. अशा ठिकाणीं रस्त्याच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे जाणें फारच धोक्याचें काम असतें. केव्हां केव्हां चार चार पांच पांच मिनिटें खोळंबा होतो. अशा वेळेस पोलिसचे शिपाई फार बंदोबस्त ठेवितात. या शिपायांची जरब इतकी असते कीं त्यांनीं आपल्या जागेवरून न हालतां नुसतें बोट वर केलें कीं सर्व गाड्या एकदम थांबतात. गाड्या थांबल्या ह्मणजे लोकांस इकडून तिकडे निर्वेधपणानें जातां येतें. पुनः खूण केली ह्मणजे गाड्या चालू होतात. पोलिसचे शिपाई फार सभ्य असतात व परक्या माणसानें कांहीं विचारल्यास त्यास अगत्यपूर्वक जबाब देतात. कोणत्याही रस्त्याबद्दल व घराबद्दल माहिती विचारणें झाल्यास पोलिसच्या शिपायास विचारावी; दुसऱ्या कोणास विचारण्याच्या भरीस पडूं नये; कारण कीं एक तर लोक साधारणतः बेपर्वा व स्वकार्यव्यग्र असतात, तेव्हां त्यांच्याकडून नीट उत्तर मिळण्याचा संभव कमी; व दुसरें असें कीं कांहीं हलकट लोक रस्तोरस्तीं फिरत असतात ते नवा मनुष्य पाहिला म्हणजे त्यास घोंटाळ्यांत घालण्याचा यत्न करितात. पोलिसचा शिपाई जवळपास नसल्यास पोष्टाचा शिपाई आढळल्यास त्यास विचारावें; व तोही न दिसल्यास जवळच्या एखाद्या दुकानांत जाऊन तेथें माहिती विचारावी.

सर्वांत अतिशय रहदारीचे असे मुख्य दोन मार्ग आहेत. हे हाईड पार्क नामक उद्यानाच्या उत्तरेकडून व दक्षिणेकडून

जातात. उत्तरेकडे ' मार्बल आर्च ' नांवाची एक उंच कमान आहे तेथें एक गाड्यांचें नाकें आहे. तेथें नैर्ऋत्यदिशेकडून 'एजवेअर रोड ' नांवाचा भव्य व विस्तीर्ण रस्ता येऊन मिळाला आहे, व पश्चिमेकडून उद्यानाशीं समांतर असणारा असा ' अक्सब्रिजरोड ' येऊन मिळाला आहे. ' मार्बल आर्च ' वरून निघालें ह्मणजे समोरच 'आक्सफर्ड स्ट्रीट' नांवाचा रस्ता लागतो. हा रस्ता एकसारखा मोठा असून याच्या दोन्ही बाजूंनीं शोभिवंत अशीं नानाप्रकारचीं दुकानें आहेत. पुढें एक वर्तुलाकार जागा आहे तेथें चार बाजूंनीं चार रस्ते मिळाले आहेत. या वर्तुलास ' आक्सफर्ड सर्कस ' ह्मणतात. या वर्तुलास उजव्या हाताकडून रिजन्ट स्ट्रीट मिळाली आहे. ही रथ्या फारच रुंद आहे व इच्यामध्यें उच्च व उज्ज्वल अशीं मन्दिरें आहेत. हीच पुढें ' पिक्याडिली 'च्या रस्त्यास मिळते. आक्सफर्ड सर्कस सोडलें ह्मणजे पुनः आक्सफर्ड स्ट्रीट नांवाचा रस्ता लागतो. नंतर कांहीं अंतरावर उत्तरेकडून आलेला 'टाटेनम कोर्ट रोड ' लागतो. पुढें न्यू आक्सफर्ड स्ट्रीट व 'हाय होबर्न ' व पुढें प्राचीन शहरांतील मोठीं घडामोडीचीं ठिकाणें ' चीप साईड, ' व ' रायल एक्सचेंज ब्यांक ' वगैरे लागतात. हाईड पार्कच्या दक्षिणेच्या टोंकाकडून जो रस्ता जातो त्याचें नांव ' पिक्याडिली. ' हा रस्ताही फार नामांकित आहे. या रस्त्यावरही मोठमोठीं दुकानें आहेत. या रस्त्यावरून कांहीं वेळ चाललें ह्मणजे एक वर्तुळ लागतें त्याचें नांव ' पिक्याडिलि सर्कस. ' नंतर थोडेंसें उजव्या बाजूला वळून ' पेलमेल 'मधून व ' ट्राफलगार स्केअर 'मधून गेलें ह्मणजे पुढें ' स्ट्रांड, ' नंतर ' फ्लीट स्ट्रीट,' व पुढें सेंट पाल्स कॅथेड्रल. हीं टाकून गेलें ह्मणजे प्राचीन शहरांतील ' चीप साईड ' वगैरे ठिकाणांजवळ आपण येऊन पोंचतों.

हे जे मुख्य दोन रस्ते सांगितले त्यांवर सकाळपासून संध्याकाळपर्यंत लोकांची गर्दी फार असते. सर्व व्यापाराचीं ठिकाणें प्राचीन शहरांत असल्या कारणानें सर्व प्रकारच्या लोकांचा ओघ तिकडे लोटतो. पेलमेलच्या दक्षिणेस वेस्टमिन्स्टर असून तिकडे सरकारी कार्यगृहें आहेत व पार्लमेंटगृहेंही तिकडेच आहेत; परंतु तिकडे लोकांची इतकी गर्दी नसते. हाइडपा-

कॅच्या पश्चिमेस ' केन्सिंग्टन गार्डन्स ' नांवाच्या उद्यानभूमिका आहेत व त्यांच्याही पलीकडे मोठीं संग्रहालयें आहेत, परंतु इकडेही गर्दी कमीच. रिजन्ट स्ट्रीटच्या उत्तरेस कांहीं अंतरावर ' रिजन्ट्स पार्क ' नांवाचा मोठा बगीचा आहे व पिक्याडिलीच्या दक्षिणेस ग्रीनपार्क व सेंट जेम्सेस पार्क आहेत. याप्रमाणें शहरांतील केवळ ठळक व नेहेमीं संबंध येणाऱ्या अशा स्थलांचा निर्देश झाला.

पथिकजनांच्या सोयींचे प्रकार.

लंडन शहरांत पथिकजनांच्या सोयींचे चार प्रकार आहेत:--

(१) पथिकाश्रम (हॉटेल्स). यांची संख्या ५०० आहे हें वर सांगितलेंच आहे. यांतील खर्चाचें मान स्थलविशेषावर आहे. सर्व मुख्य मुख्य रेलवे स्टेशनांवर पथिकाश्रम आहेत. यांत ठरीव दर असतात व गरीबापासून श्रीमंतापर्यंत ज्यांच्या त्यांच्या ऐपतीप्रमाणें सोयी उपलब्ध असतात; परंतु हे आश्रम ज्यास अल्पकालच रहावयाचें असेल त्यास विशेष सोयीचे असतात. सामानसुमान लांब न्यावें लागत नाहीं व वेळीं अवेळीं जाणाऱ्या गाडीनें प्रवास करणें झाल्यास फारसा त्रास होत नाहीं. ज्यांस फार दिवस रहावयाचें असेल त्यांनीं इतर आश्रमांत जावें. पश्चिमपुरांतील आश्रमांत पूर्वपुरांतील आश्रमांपेक्षां खर्चाचें मान फारच जास्त आहे. येथील आश्रमांची संख्या जरी मोठी आहे तरी कधीं कधीं पूर्वीं व्यवस्था न केल्यास जागा मिळण्याची पंचाईत पडते. वसंत व ग्रीष्म ऋतूंमध्यें-- ह्मणजे एप्रिलपासून आगस्ट महिन्यापर्यंत बाहेरगांवाहून लोकांचें येणें जाणें फार असतें व सर्व श्रीमंत लोक व अमीरउमराव पश्चिमपुरांतील उंच प्रतीच्या आश्रमांत रहातात; यासाठीं कोणीही जाण्याच्या अगोदर पत्र किंवा तार पाठवून तजवीज केली असतां बरें. कांहीं कांहीं उंच प्रतीच्या आश्रमांत पूर्वीं तजवीज न केल्यास किंवा कोणी ओळखीच्या माणसाच्या मार्फत न गेल्यास सोय होतच नाहीं. " क्लारिजेस हॉटेल " हा सर्वांत श्रेष्ठ आश्रम मानला गेला आहे. येथें राजेरजवाडे, अमीरउमराव, परदेशीय राष्ट्रांचे प्रतिनिधि वगैरे लोक उतरतात.

" लांगह्महोटेल " व " मोर्लेसहोटेल " मध्यें बहुधा अमेरिकन लोक उतरतात. " लॉग्सहोटेल " मध्यें शिकारी लोक, " लीस्टरस्केअर " मध्यें फ्रेंच लोक, " टेंपलहोटेलें " मध्यें स्वीड व जर्मन लोक–अशीं कांहीं लोकांचीं ठरीव ठिकाणें आहेत. लीस्टरस्केअरच्या आजूबाजूला कांहीं आश्रम आहेत तेथें असभ्याचाराचा प्रचार आहे अशी कुणकुण आहे. या स्थळीं माहितीशिवाय किंवा चांगली विचारपूस केल्याशिवाय न जाण्याची खबरदारी ठेवावी. पश्चिमपुरांतील आश्रमांत खर्चाचें मान साधारणतः खालीं लिहिल्याप्रमाणें आहेः–निजण्याच्या खोलीचें रोजचें भाडें ४–१० शिलिंग; बसण्याच्या खोलीचें १०–२० शिलिंग; नोकराच्या तैनातीबद्दल दीड शिलिंग; प्रातराहाराबद्दल ३–४ शिलिंग; रात्रीच्या जेवणाबद्दल पांचपासून दहा शिलिंग. दिवाबत्तीबद्दल बहुतकरून निराळे पैसे घेत नाहींत; परंतु बूट साफ करणाऱ्या माणसास, तसेंच आपल्या खास तैनातीस असणाऱ्या माणसास जाते समयीं बक्षिस देण्याचा संप्रदाय आहे. बहुतेक आश्रमांत धूम्रपानासाठीं निराळ्या खोल्या असतात त्यांशिवाय इतरत्र धूम्रपान करण्याची मनाई असते. सर्व आश्रमांत लोकांच्या उपयोगासाठीं वर्तमानपत्रें घेण्याची चाल आहे. सर्वांस भोजन करण्याकरितां एक दिवाणखाना असतो तेथें सर्वांनीं जमावें लागतें. तेथें न गेल्यास खर्चाचा आकार जास्त असतो. पूर्वपुरांत खर्चाचें मान बरेंच कमी असतें. स्ट्रांड नांवाचा जो रस्ता आहे त्या रस्त्यांतून टेम्स नदीकडे जाणाऱ्या ज्या लहान लहान वीथिका आहेत त्यांवर पुष्कळ " फामिली होटेल्स " आहेत. हे आश्रम बरेच सोयीचे असून त्यांमध्यें खर्च फारच माफक पडतो.

(२) दुसरी सोय ' बोर्डिंग हौसेस. ' कांहीं सभ्य परंतु मध्य स्थितींतले कुटुंबवत्सल लोक आपल्या घरीं परक्या लोकांची जेवणाखाणाची व रहाण्याची सोय प्रसिद्धपणें करितात; परंतु वर्तमानपत्रांत जाहिरात दिली असतां एखाद्या चांगल्या कुटुंबांत खासगी रीतीनें राहण्याची सोय होते. ज्यास फार दिवस रहावयाचें असेल त्यास अशा प्रकारची सोय फार सुखावह

होते. खर्च थोडा लागून कुटुंबांत राहिल्यानें एकटें असें वाटत नाहीं व प्रसंगविशेषीं थोडाबहुत जास्त पैसा खर्च केल्यास औषध व पथ्याची तजवीज चांगली राहते. दर आठवड्यास सुमारें ४० शिलिंग दिले ह्मणजे जागेचें भाडें व जेवणाखाणाचा सर्व खर्च त्यांत येतो. मात्र सर्व व्यवहार कुटुंबांतील माणसांतच करावे लागतात. केवळ निजण्यास स्वतंत्र खोली मिळते. एरव्हीं बसणेंउठणें बाकीच्या लोकांतच झालें पाहिजे. जेवणाची वेळ संभाळावी लागते, नाहीं तर फांका पडण्याचा संभव असतो. जो मनुष्य महिना पंधरा दिवस केवळ शहर पहाण्याकरितांच लंडनास जाईल त्यास अशा प्रकारची परतंत्रता सुखावह होणार नाहीं. ज्या भागांत तो उतरला असेल त्या भागापासून दूर एखादी प्रेक्षणीय वस्तु पहाण्यासाठीं तो गेला तर केवळ जेवणाची वेळ चुकेल ह्मणून अपेक्षित मौजेचा त्याग त्यास करावा लागावा हें इष्ट नाहीं. अशा प्रकारच्या प्रवासी जनांस (३) तिसरी सोय चांगली हितावह आहे. ही कोणती तर "प्रायव्हेट अपार्टमेंट्स" (स्वतंत्र खोल्या). अशा प्रकारच्या खोल्या आठवड्याच्या वायद्यानें लंडन शहराच्या सर्व भागांत मिळतात. ठिकठिकाणीं खिडक्यांत पाट्या लाविलेल्या असतात; तेथें शोध केला असतां सर्व तजवीज लागते; परंतु कोणत्याही प्रकारची भानगड न पडावी अशी इच्छा असल्यास एखाद्या दलालाकडे जाऊन त्याच्या मार्फत व्यवस्था करावी. पथिकाश्रमाप्रमाणेंच अशा खोल्यांच्या भाड्याचें मान स्थलविशेषावर आहे. पश्चिमपुरांतील कांहीं भागांत अशा जाग्यांचें भाडें आठवड्यास २ तें १५ पौंड असतें. इतर ठिकाणीं १५–२१ शिलिंग असतें व प्रातराहारासाठीं एक शिलिंग द्यावा लागतो. दिवाबत्ती, कोळसे, बूट साफ करणें, व बिछान्यावरील कपड्यांची धुणावळ यांचा आकार आलाहिदा असतो. याहीपेक्षां स्वस्ताईची जागा शहराच्या उपान्तभागांत मिळते. कमींत कमी १० शिलिंग भाडें पडतें. शिवाय भोजनखर्च. जागेच्या भाड्यांत नोकराच्या तैनातीचा समावेश होतो; तथापि नोकरास शिवाय कांहीं तरी बक्षिस देण्याची चाल आहे. या सर्व ठिकाणीं

केवळ बेफिकिर राहतां कामा नये. आपल्या सर्व चीजवस्तेला जपलेंच पाहिजे. कांहीं विशेष जोखिमेचा जिन्नस असल्यास आश्रमाच्या व्यवस्थापकाजवळ द्यावा व त्याची पावती घ्यावी. पथिकाश्रमांत आपण बाहेर गेल्यावर खोलीला कुलूप लावण्याची चाल नाहीं. बहुधा खोल्या उघड्या ठेवितात.

वर सांगितलेल्या सोयीशिवाय केवळ खाद्य व पेय वस्तु मिळण्याचीं दुसरीं साधनें आहेत. फक्त सामानसुमान ठेवण्यासाठीं व निजण्यासाठीं एक खोली भाड्यानें घेऊन सकाळीं नुसती चहापाण्याची वर्दी द्यावी. बाकी सर्व सोयी रोख पैसे देऊन प्राप्त होतात. स्नानाची सोय आहे; अल्पाहाराची सोय आहे; जेवणाची सोय आहे; पिण्याची सोय आहे; खेळण्याची सोय आहे; फिरण्याची सोय आहे; करमणुकीची सोय आहे;--सर्व कांहीं आहे. झोंपेची वेळ होईपर्यंत बिन्हाडाची आठवण होण्याचें कारण नाहीं. लंडन शहरांत ठिकठिकाणीं स्नानगृहें, तऱ्हेतऱ्हेचीं विश्रान्तिस्थानें (रेस्टोरान्ट्स), भोजनगृहें (डाइनिंगरूम्स) मिठाईवाल्याचीं दुकानें, क्रीडाभवनें (बिलियर्डरूम्स, काफेज), वाचनगृहें (रीडिंगरूम्स), पुस्तकालयें, विचित्र वस्तुसंग्रहालयें, चित्रशाळा व नानाविध तमाशे, नृत्यगायनप्रयोग, नाट्यप्रयोग यांचीं गृहें--आहेत; यामुळें प्रवासिजनांस सर्व आवश्यक गोष्टी प्राप्त होऊन अविरत मनोरंजनाचीं साधनें अल्पायासानें उपलब्ध होतात.

लंडन शहराची किरकोळ माहिती.

वर सांगितलेलीं नानाप्रकारचीं भोजनगृहें सकाळीं अकराबारा वाजल्यापासून रात्रीं आठनऊ वाजत तोंपर्यंत उघडीं असतात. खर्चाचें मान अर्ध्या शिलिंगापासून दहा शिलिंगांपर्यंत स्थलविशेषाच्या व ऐषआरामाच्या मानानें असतें. कांहीं कांहीं स्थलीं बुद्धिबळें वगैरे खेळण्याचीं साधनें व गायन वगैरे श्रोत्ररंजनाचीं साधनें असतात; कांहीं ठिकाणीं वाचण्यासाठीं वर्तमानपत्रेंही असतात. या सर्व स्थलीं नोकरचाकरांची टापटीप विशेष असते. प्रकाश उज्ज्वल असतो व स्वच्छता

वर्णनीय असते. कांहीं स्थलें केवळ शाकभुक् लोकांच्या सोयीसाठीं आहेत, व कांहीं मद्यपान न करणाऱ्या मंडळीसाठीं आहेत. शाकभुक् मंडळीच्या खाद्य वस्तूंमध्यें कोणकोणत्या वस्तूंचा समावेश होतो ह्मणाल तर डाळतांदूळ, भाजीपाला, दूधदहीं वगैरेनींच निर्वाह होत नाहीं, तर कोंबडीचीं अंडींही अनिषिद्ध पदार्थांत गणलीं जातात! हें वर्गीकरण कोणत्या तत्त्वाच्या अनुरोधानें झालें असावें हें सांगणें जरासें कठिण आहे. बहुतेक भोजनगृहांत नोकरांस थोडेंबहुत बक्षिस देण्याची चाल आहे; परंतु कांहीं ठिकाणीं असें बक्षिस देण्याची सक्त मनाई असते. कांहीं कांहीं स्थलीं एकाच विशिष्ट प्रकारचें भोजन मिळतें. कांहीं ठिकाणीं नोकर लोक स्त्रिया आहेत.

बहुतेक रस्त्यांवर स्मश्रू करण्याचीं दुकानें आहेत. घरीं हजाम बोलावण्याची चाल नाहीं. रोज दाढी हातानें करावी व महिनापंधरा दिवसांनीं केंस कापून घेण्यास दुकानांत जावें. 'पिकयाडिलि' मध्यें कांहीं फारच थाटाचीं दुकानें आहेत तेथें प्रिन्स आफ वेल्स वगैरे बडी बडी मंडळी जाते.

लंडन शहरांत स्नानगृहें पुष्कळ आहेत. कांहींमध्यें तुर्की हम्मामांसारखी सर्व प्रकारची योजना आहे. स्नानासाठीं कमींत कमी सहा पेन्स द्यावे लागतात. कांहीं सार्वजनिक स्नानगृहें आहेत तेथें मजूरदार वगैरे गरीब लोकांला एक पेनीला थंड पाण्याचें स्नान मिळतें. बहुतेक स्नानगृहांत पोहोण्याची तजवीज असते.

शहराच्या निरनिराळ्या भागांत वाचनगृहें (रीडिंग रूम्स) आहेत. कांहींची वर्गणी वर्षाची तीन पौंडपर्यंत आहे, व कांहीं ठिकाणीं १–२ पेन्स दिले असतां प्रवेश होतो. कांहीं उदार लोकांनीं जनहितार्थ 'फ्री लायब्ररीज' करून ठेविल्या आहेत, तेथें मुळींच वर्गणी द्यावी लागत नाहीं.

वर्तमानपत्रांचा तर कहर आहे. लंडन शहर व उपान्त भाग मिळून सुमारें ७०० वर्तमानपत्रें व ८०० मासिक पुस्तकें निघतात. मोठमोठ्या नामांकित पत्रांच्या देखील एका प्रतीची किंमत १ पेनीहून जास्त नसते. 'टाइम्सची' किंमत मात्र

तीन पेन्स आहे. आपल्याइकडील मोठ्या वर्तमानपत्रांच्या किरकोळ प्रतीची किंमत चारआठ आण्यांच्या खालीं नसते. वर्तमानपत्रें स्वस्त असल्यानें गरीबगुरीबांस त्यांपासून लाभ करून घेतां येतो व सार्वजनिक शिक्षणास मदत होते. केवळ रविवारीं निघणारीं अशीं कांहीं पत्रें आहेत. विशिष्ट जनवर्गाच्या सोयीसाठींच कांहीं पत्रें आहेत. कांहीं शिकारी लोकांसाठीं,—कांहीं शेतकरी लोकांसाठीं,—कांहीं शर्यतीचा शोक असणाऱ्या लोकांसाठीं,—कांहीं नाट्यप्रयोगांसंबंधीं,—कांहीं शास्त्रीय विषयांसाठीं,—कांहीं शिल्पकला, लेखनकला इत्यादि कलाविषयक,—कांहीं व्यापारी लोकांसाठीं, वगैरे.

कर्मणुकीचीं साधनें लंडनांत विपुल असतात. यांच्या जाहिराती सर्व ठळक ठळक वर्तमानपत्रांत असतात. त्यांवरून कर्मणुकीचा प्रकार व स्थलविशेष यांची माहिती करून घ्यावी, व सवडीप्रमाणें त्यांचा उपयोग करावा. नाट्यप्रयोग बहुधा रोज असतात. 'कान्सर्ट्स' (गायन व वादनप्रयोग), बॉल्स (नाच), जादूचे वगैरे तमाशे, नेहमीं सुरू असतात. यांतील कांहीं प्रयोग दिवसासही चालू असतात; परंतु यांशिवाय दिवसा कर्मणुकीचीं साधनें ह्मटलीं ह्मणजे चित्रशाला व विचित्रवस्तुसंग्रहालयें होत अशा प्रकारच्या संस्था लंडन शहरांत शेंकडों आहेत व थोडक्या खर्चांत त्यांचा उपयोग होण्यासारखा असतो. कांहीं कांहीं ऋतूंत घोडयांच्या शर्यतींचा हंगाम असतो. तिकडील लोकांस मासे धरण्याचा मोठा शोक आहे. टेम्स नदीवर रिच्मंडपासून वालिंगफर्डच्या दर्म्यान मासे धरण्याची मोकळीक आहे. कोणाचीही परवानगी घ्यावी लागत नाहीं. रोज दहा शिलिंग दिले ह्मणजे मत्स्यग्रहणाची सर्व सामुग्री, एक होडी व एक कोळी मिळूं शकतात.

लंडनमध्यें 'क्लब्स' पुष्कळ आहेत, परंतु त्यांचा उपयोग परकी मनुष्यास होत नाहीं. प्रवेश होण्यास अवश्यक गुण ते परकी मनुष्यांत असण्याचा संभव नसतो. कांहीं राजकीय संबंधाचे,—कांहीं धर्मसंबंधाचे,—कांहीं सामाजिक संबंधाचे,—वगैरे असतात.

इंग्लंडांतील ऋतु आणि दिनमान.

आह्मी मे महिन्याच्या आरंभीं लंडन शहरीं पोंचलों त्या वेळेस हवेंत गारठा पुष्कळ होता व पाऊस झिमझिम पडत होता. त्या देशांतील ऋतूचें मान आपल्या देशाहून भिन्न आहे. त्यांचा ऐन उन्हाळा ह्मटला ह्मणजे जूनपासून आगस्ट-पर्यंत, परंतु या दिवसांतही सूर्यप्रकाश सतत असतो असें नाहीं. केव्हां केव्हां ऐन उन्हाळ्यांत वादळ होऊन अतिवृष्टि होते व चहूंकडे धुकें पसरून अंधकारमय होतें; परंतु ज्या वर्षी आह्मी गेलों त्या वर्षी ग्रीष्म ऋतूचा प्रभाव अननुभूतपूर्व असा लोकांस भासला. अशा प्रकारची चांगली हवा असली ह्मणजे तीस " क्वीन्स वेदर " ह्मणण्याची चाल आहे; व ज्याअर्थी जुबिलीचा समारंभ या वर्षी होता त्याअर्थी अशा प्रकारचा ऋतूचा प्रसाद होणें हें राज्ञीच्या लोकविश्रुत सौभाग्याशीं संवादकच होतें. सप्टंबरपासून नवंबरअखेर त्यांचा पावसाळा; डिसेंबरपासून फेब्रुआरीअखेर त्यांचा हिंवाळा व मार्चपासून मेअखेर त्यांचा वसंतऋतु. आह्मी गेलों तेव्हां वसंतऋतु होता; तथापि,

> सुखाः प्रदोषा दिवसाश्च रम्याः
> सर्वं प्रिये चारुतरं वसन्ते ॥

याप्रमाणें कविकुलगुरूंनीं केलेलें वर्णन प्रत्ययास आलें नाहीं. दिवस रम्य नसून दुर्दिन होते. आकाश रविप्रकाशमय नसून धूमिकावृत होतें. वातावरण सुखसंवेदक व उल्हासजनक नसून दुःखसंवेदक व उद्वेगकर होतें. प्रदोषसमय सुखकर नसून शैत्यसंस्कारयुक्त होते व अर्थात् जनमनास उपभोगप्रवण न करितां सुखास्वादपराङ्मुख करीत होते. आमच्या पथिकाश्रमा-समोरच विस्तीर्ण उद्यानभूमिका होत्या; परंतु चूतरसासवांनीं मत्त झालेल्या अशा कोकिलांचें श्रुतिसुख कूजित ऐकूं आलें नाहीं व कमलाभोंवतीं गुंजारव करीत भ्रमण करणारे समद मधुकर दृग्गोचर झाले नाहींत; परंतु यांत दोष कोणाचा ? ऋतु केवळ नांवाचा नसून जर त्याच्यांत सुखाला अनुकूल अशी सर्व सामुग्री असती तर तद्देशीय कोकिल पक्षी कूजन-

पराङ्मुख व भ्रमर गुंजनविमुख झाले असते काय ? शीतार्ततेमुळें त्यांचा निरुपाय होऊन ते स्वसंरक्षणांतच व्यग्र होऊन आमच्यासारख्या आगंतुक जनांविषयीं त्यांनीं अनास्था दाखविली यांत काय नवल ? अथवा ' चूतरसासवा ' नें मत्त झालेले कोकिल त्या देशांत कसे दिसावे ? जेथें चूतवृक्षाचाच अभाव तेथें तद्रसासव कसा उपलब्ध होणार ? एतद्देशीय कवींस चूतवृक्ष, आम्रपल्लव, सहकारमंजरी यांपासून सृष्टिसौंदर्यवर्णनास चांगलीच मदत होत होती. तद्भावे पाश्चात्य कवींचे बरेच हाल झाले असतील नाहीं बरें ? त्याचप्रमाणें कामिजनाचे वशीकरणास साधनीभूत अशा ज्या शररूप ' सहकारमंजरी ' त्यांशिवाय मीनकेतनाचा दिग्विजयही बराच कुंठित झाला असेल नाहीं ? पण तसें ह्मणावें तर त्या देशांत त्याचा वेग तर अप्रतिहत भासतो, तेव्हां कदाचित् मंजरीपेक्षां तीक्ष्णतर अशा शरांची त्यास मदत नसेलना ? तसेंच

" आम्रमंजरी तुला अर्पितें नमुनी मीनकेतुला "

अशा प्रकारें वसंतऋतूची संभावना करण्यास प्रमदांस साधन नसावें हें किती शोचनीय आहे ! असो.

मेमहिनाअखेरपर्यंत मधून मधून पाऊस पडत होता, परंतु पावसाचे थेंब मोठमोठे नसून आवाजही फार होत नसे. एकदोन वेळ अतिशय धुकें पडलें होतें. तें इतकें कीं दिवसाढवळ्या दुकानांत व सर्व कार्यगृहांत दिवे लावावे लागले. थंडी पुष्कळ पडत होती व सर्व ठिकाणीं शेगडीची अवश्यकता वाटत होती.

ग्रीष्मऋतु मात्र आह्मी गेलों त्या वर्षी फारच बहारीचा होता. दोन महिने एकसारखें आकाश निरभ्र होतें व सूर्यताप प्रचण्ड नसून सुखकर होता. त्या देशांत इतकासा अवकाश वृष्टीशिवाय जात नाहीं; ह्मणून थट्टेनें कांहीं लोक आह्मांला ह्मणत कीं हिंदुस्थानी पाहुण्यासाठींच अशा प्रकारच्या अननुभूतपूर्व अशा निदाघसमयाची योजना झाली आहे ! इंग्रज लोकांस त्यांच्या देशांतील हरिततृणाच्छादित अशा भूमिभागांचा मोठा अभिमान असतो व वारंवार वृष्टि होत असल्या कारणानें बालतृण शुष्क होत नाहीं; परंतु या वर्षी अविरत अशा सूर्यतापाच्या योगानें सर्व स्थलें म्लान होऊन गेलीं; परंतु

इतका उन्हाळा होता तरी दोन तीन कपडे अंगांत घातल्याशिवाय फिरण्याची सोय नव्हती. उनांत छत्रीशिवाय जाववत असे. सूर्यकिरणें समोर लागत नसून तिरपीं लागत असल्यामुळें फार ताप देत नसत; तथापि ऊन चांगलें स्वच्छ व भासण्यासारखें पडत असे. या दोन महिन्यांत मात्र शेगड्या पेटविण्याचा प्रसंग क्वचितच आला. बाकीच्या ऋतूंचा अनुभव आह्मांस नाहीं; परंतु आह्मी असें ऐकिलें कीं हिंवाळ्यांत सर्व लोकांचे फारच हाल होतात. श्रीमंत लोक इंग्लंड सोडून इटाली वगैरे ऊष्ण देशांत वास करितात. मध्यम स्थितींतले लोक शहरांतच राहून वस्त्राच्छादन व अग्नितापयांच्या साहाय्यानें जीव बचावतात, परंतु गरीब लोकांचे हाल कुत्रा खाणार नाहीं. गरीबीला आमचा देश मोठा सोयीचा. अल्प वस्त्रानें व अल्पाहारानें निर्वाह त्या देशांत होणें नाहीं. तेथें अधिक द्रव्याची जरूर आहे. कांहीं नसलें तरी शेक घेण्यासाठीं कोळसे पाहिजेतच. आपल्या इकडे नुसत्या पोटाचीच काळजी. तिकडे पोटाची, वस्त्राची आणि विस्तवाची ! आतां अशा प्रकारची स्थिति असणें चांगलें का वाईट या गोष्टीचा निर्णय करणें अगदीं सोपें नाहीं. एका दृष्टीनें पाहिलें ह्मणजे असें ह्मणतां येईल कीं अधिक द्रव्याची गरज असल्यानें सर्व लोक अधिक द्रव्यार्जनांत व्यापृत असतात, व त्यामुळें अर्थोत्पत्ति अधिक होऊन देशाचा फायदा होतो. दुसऱ्या दृष्टीनें पाहिलें असतां मजूरदारास थोडा पैसा पुरत असला ह्मणजे मजुरी थोडी देऊन कार्यभाग होतो व भांडवलावर चांगला फायदा उरतो व व्यापाराला तेजी येते. या दोनही पक्षांस साधकबाधक प्रमाणें देतां येतील; परंतु या स्थलीं त्यांचा पाल्हाळ लावण्याची जरूर नाहीं.

तिकडील दिनमानही अगदीं निराळें. आह्मी गेलों त्या वेळीं साडेसात वाजतां सूर्य अस्तास जात असे व पहाटेचे तीन चार वाजतां उदय पावत असे. पुढें पुढें तर आठ साडेआठ वाजतां दिवस मावळूं लागला. अशा प्रकारचें दिनमान असल्यावर सर्व व्यवहार तद्नुरूप करूं ह्मटलें असतां चालावयाचें नाहीं. आपल्याइकडे सायंकाळ

झाला ह्मणजे सर्व व्यवहार बंद होतात, व प्रातःकाळीं सर्व सुरू होतात. तसें तिकडे करूं गेल्यास विश्रान्तीस अवकाश फारच थोडा मिळेल; ह्मणूनच तिकडे दिनमानाचा व्यवहाराशीं संबंध नसतो. दिनमान कसेंही बदलत गेलें तरी नियमित वेळीं सर्व कार्यें होतात. सकाळीं सहा वाजतां नियमानें उठणारे लोक लंडन शहरांत थोडेच आढळतील. बहुतेक लोक सात वाजल्यानंतर उठतात. गडीमाणसें देखील अगोदर उठत नाहींत. कांहीं कांहीं लोक आठनऊ वाजतां उठतात. ज्यांस दिवस उगवल्यावर झोंप न येण्याची सवय असते त्यांचे या देशांत मोठे हाल व्हावयाचे. सूर्यप्रकाश आंत न यावा ह्मणून निजण्याच्या खोलींत खिडक्यांना पडदे ठाविलेले असतात; तथापि थोडाबहुत तरी प्रकाश आंत आल्याशिवाय राहत नाहीं.

लंडन शहरचे शिंपी.

लंडनशहरीं पोंचल्यावर सुमारें १५ दिवस आह्मी "आलेक्सांड्रा" पथिकाश्रमांतच काढले. हे दिवस फार सुखाचे गेले नाहींत. रहाण्यासवरण्याची जरी फारशी गैरसोय नव्हती तथापि लंडन शहरांत पुष्कळ दिवस रहावयाचें, तेव्हां स्वतंत्र घर पहाण्यांत कांहीं वेळ गेला. आमच्या बरोबरचे उंची कपडे सर्व टास्मेनिया आगबोटींत असल्या कारणानें त्यांसही जलसमाधि मिळाला होता, तेव्हां त्यांचीही तजवीज करण्यासाठीं बरेच आयास पडले. लंडनशहर येवढें मोठें खरें. परंतु त्यांत आमच्या हिंदुस्थानी खऱ्या कलाबतूच्या, किनखापाच्या व भरजरी कापडाच्या तोडीचें कापड मिळालें नाहीं, तेव्हां फ्रेंच वस्त्रांवरच निर्वाह करावा लागला. त्याचप्रमाणें कपडे शिवण्याचीही गैरसोय. लंडन शहरांतील शिंप्यांची कर्मकुशलता, कार्यदक्षता, संकेतपालन व टापटीप यांबद्दल ख्याति आहे खरी, परंतु ती सर्व इंग्रजी रिवाजाचे कपडे शिवण्यासंबंधींच ह्मटली पाहिजे. हिंदुस्थानी तऱ्हेचे कपडे शिवण्यांत त्यांच्या गुणांचा फारसा उपयोग झाला नाहीं. आतां हें उघड आहे कीं किती झालें तरी सुधारलेल्या देशांतले शिंपी, तेव्हां त्यांनीं कार्यभाग बराच उरकला; परंतु हुबेहुब सर्व ठाकठीक साधली

नाहीं. कोणी अशी शंका घेतील कीं साधारण शिंप्याचीच आह्मी योजना केली असेल, तर असें नाहीं. लंडनशहरांत अमीरउमरावांच्या स्त्रियांचे कपडे शिवणाऱ्या प्रसिद्ध शिंप्याकडेच आह्मी गेलों होतों, व शिवणावळीबद्दल सुमारें तीन हजार रुपये खर्च केले ! असो. या प्रसंगीं तद्देशीय शिंप्याच्या टापटिपीचें थोडेंसें वर्णन केल्याशिवाय राहवत नाहीं. दुकानांत गेलें ह्मणजे एक नोकर आपल्याजवळ येऊन विचारपूस करितो. नंतर कपड्याच्या नमुन्याचें एक पुस्तक आपल्यास दाखवितो. त्यांतून अपेक्षित वस्त्राचा निर्देश केल्यावर शिंप्यास हांक मारितो. हांक मारावयाची ती घंटा वाजवून किंवा ध्वनिवाहक यंत्राच्या योगानें. नंतर शिंपी येतो; त्याच्या खांद्यावर माप घेण्याची नाडी असते. तो आपल्यास एका खोलींत घेऊन जातो. त्या खोलींत दोन्ही तिन्ही बाजूंनीं उंच व रुंद असे आरसे लाविलेले असतात, व बसण्यासाठीं खुर्च्या असतात. कपडे काढून ठेवण्यासाठीं सुरेख खुंट्या असतात. प्रकाशाची न्यूनता असल्यास दीपाची योजना असते. शिंपी मोज घेऊन तोंडानें आंकडे सांगत असतो व दुसरा मनुष्य ते टिपून घेत असतो. हें कृत्य आटपलें ह्मणजे आपलें नांव व पत्ता एका बुकांत नोंदून अमुक दिवशीं अमुक वाजतां कपडे अंगांत घालून पहाण्यास यावें असें सांगतात. त्या दिवशीं कापड बेतून उभा दोरा घालून कपडे तयार करून ठेवितात व आपण गेलें ह्मणजे अंगांत घालून कमजास्ती काय असेल त्याचें टिपण करून घेतात. नंतर नेमलेल्या दिवशीं नेमलेल्या वेळीं कपडे नीटनेटके कागदांत गुंडाळून अशा तऱ्हेनें पाठवितात कीं, त्यांची ती सुरेख व्यवस्था पाहून मनाला समाधान वाटतें, व कपड्यांची घडी न मोडतां ते तसेंच केवळ पहाण्यासाठीं ठेवावे अशी इच्छा होते. असो.

बरोबरच्या एका माणसाचा मृत्यु.

आमच्या बरोबरचा एक मनुष्य पारीस मुक्कामीं आजारी पडला हें पूर्वीं सांगितलेंच आहे. या मनुष्याची प्रकृति दिवसा-

नुदिवस न सुधारतां बिघडत चालली. त्यामुळें मंडळीचीं मनें फार अस्वस्थ झालीं. हवापाणी आपल्यास माफक पडतें कीं नाहीं याबद्दल सर्वांस भय वाटूं लागलें. परक्या ठिकाणीं बरोबरचीं माणसें फार नसल्यामुळें आजारी मनुष्याची शुश्रुषा चांगल्या तऱ्हेनें कशी रहावी याबद्दल प्रथम आह्मास मोठी चिंता पडली, परंतु ती लवकरच दूर झाली. 'दाम करी काम' या ह्मणीचा पूर्ण प्रत्यय लंडन शहरांत जसा येतो तसा दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं येण्यासारखा नाहीं. एक दामाजीपंताचें साहाय्य असलें ह्मणजे केवळ औषधपाणीच नव्हे, तर रात्रंदिवस उत्तम प्रकारची शुश्रूषा रहाण्याचीं साधनें लंडनांत विपुल आहेत. रोग्याला आराम होण्याचीं जीं जीं म्हणून साधनें तीं सर्व येथें तयार व अल्प अवकाशांत प्राप्त होण्यासारखीं असतात. शिवाय विशिष्टधर्मपंथप्रवर्तकांनीं व मुख्यत्वेंकरून रोमन कॉथलिक पंथाच्या लोकांनीं विपुल द्रव्य खर्च करून कांहीं स्त्रिया रुग्ण जनांच्या उपचारांत तरबेज करून ठेविल्या आहेत. या सर्व कुमारिका असून यांनीं आपला देह ईश्वरप्रीत्यर्थ झिजविण्याची शपथ घेतलेली असते. या स्वभावानें फार नम्र, सहनशील व ममताळू असतात, व मेहनत करण्यांत मोठ्या बहादर असतात. यांचीं ठिकाणें नेमलेलीं आहेत, तेथें यांच्यावर एक मुख्य बाई असते. तिच्या नांवानें चिठ्ठी पाठविली म्हणजे एक, दोन, किंवा लागतील तितक्या स्त्रिया ती पाठविते. या एकदां आल्या म्हणजे अगदीं निकडीच्या कामाशिवाय आजारी मनुष्यापासून हालत नाहींत. त्या आपलें भोजन वगैरे देखील तेथेंच उरकतात. त्यांचा आहार फारच नियमित असतो. आम्ही प्रथम एकच बाई बोलाविली होती, व नंतर एक दोन दिवसांनीं तिला मदत करण्यासाठीं, दुसरी बोलाविली. ही आल्याबरोबर तिनें सर्व कपडे नीटनेटके करून औषधपाणी, खाणेंपिणें, वगैरे बद्दलची सर्व चौकशी करून घेतली. आजारी मनुष्याच्या व्यवस्थेसाठीं कपडालत्ता कमीजास्त मागून घेतला व एकसारखी जवळ बसली. वैद्य आला ह्मणजे दुसऱ्या कोणाची त्यास गरज लागत नसे. तो

त्या बाईजवळ सर्व व्यवस्था सांगून ठेवी व ती त्याप्रमाणें वागे. औषध वेळच्या वेळेवर देणें, निरनिराळ्या वेळेस रोग्याच्या भावना कशा होतात त्यांचें टिपण ठेवणें, खाण्यापिण्याचा नियम ठेवणें, रोग्यास उठविणें, निजविणें, त्यास कपडे घालणें, खराब झालेले कपडे लगेच काढून खोलींत दुर्गंध असल्यास आवश्यक तजविजी करणें, रात्रंदिवस रोग्याजवळ बसणें—हें सर्व काम ही बाई फारच उत्तम रीतीनें करी. रोग्याशीं बोलणें झाल्यास फार ममतेनें हिडिसफिडीस न करितां तिनें बोलावें, सर्व उपचार न त्रासतां करावे व आराम न वाटल्यास कळवळावें. या स्त्रिया आपल्या कामांत फारच निपुण असतात. त्यांस औषधपाण्याची थोडीशी माहिती असते व पट्टी बांधणें, पोटिस लावणें, ब्लिस्टर मारणें, औषध लावणें व औषध देणें, या सर्व गोष्टी त्यांना शिताफीनें व स्वच्छपणानें करितां येतात, त्यामुळें आजारी मनुष्यास फारच सुख होतें. सारांश प्रत्यक्ष आपल्या मातृभगिनीगणाला देखील अशा प्रकारची शुश्रूषा करतां यावयाची नाहीं. बरें यांच्या मेहनतीबद्दल यांस कांहीं लाभ होतो काय ? नाहीं. दररोज एका बाईबद्दल आह्मांला एक गिनी (सुमारें १५ रुपये) द्यावी लागे. पण ती बाईच्या हातीं पडत नसे. सर्व पैसे त्यांच्या मुख्य अधिकारिणीकडे जात व या बायांना शिवाय बक्षिस वगैरे घेण्याची सक्त मनाई असे. असा देह झिजविणें हें एक धर्मतत्त्वच मानून त्यांनीं या पंथाचा स्वीकार केल्यामुळें त्यांस असल्या ऐहिक पारितोषिकाची काय अपेक्षा ? असो. या स्त्रियांच्या भोजनाची व्यवस्था मात्र आह्मांस ठेवावी लागत होती.

आमच्याकडे दोनतीन वैद्य रोज येत असत. त्यांपैकीं एक औषध देणारा व दुसरे दोन सल्लामसलत देण्यासाठीं. पहिल्याचें वेतन प्रत्येक खेपेस एक गिनी [सुमारें १५ रुपये] असे. दुसऱ्या दोघांचें पांच गिनी [पाऊणशें रुपये]. पहिला वैद्य मध्यम प्रतीचा असून दुसरे दोघे उच्च प्रतीचे होते. तरी उत्तमांतले नव्हत हो !—त्या वर्गांतील मंडळींचें वेतन मग काय असेल कोण जाणें ! या दोघांपैकींच एकाच्या घरीं जाऊन

प्रकृति दाखविण्याचा मला स्वतः प्रसंग आला होता, तेव्हां त्यास पंधरा रुपये द्यावे लागले ! असो. औषधें विकण्याचीं दुकानें गल्लोगल्लीं व रस्तोरस्तीं असतात. तेथें औषधाचें टिपण व पत्ता दिला ह्मणजे आपल्या घरीं औषध येतें. दुसऱ्या दिवशीं तेंच औषध पाहिजे असल्यास टपालमार्गे एक चिठ्ठी पाठविली असतां औषध घरीं येतें. औषध पोंचविण्याबद्दल निराळा आकार करीत नाहींत.

याप्रमाणें सर्व प्रकारची अनुकूलता जरी होती व आमच्या महाराजांनीं पाण्याप्रमाणें जरी पैसा खर्च केला तरी आमच्या स्नेह्याच्या प्रकृतीस दिवसानुदिवस आराम न पडतां तो ज्यास्त थकत चालला. मग का रोगाची चिकित्सा बरोबर झाली नाहीं म्हणावें का रोगच दुःसाध्य होता कोणास कळे. लंडनसारख्या शहरांत उच्च प्रतीच्या चिकित्सकास रोगपरीक्षा झाली नाहीं असें ह्मणणें म्हणजे एक प्रकारचें धार्ष्ट्यच ! बरें रोग दुःसाध्य ह्मणावा तर केवळ थंडीवाऱ्यापासून त्याचा उद्भव. तें कसेंही असो. आमच्या सोबत्याचा लंडनास पोहों-चल्यापासून दहावे दिवशीं अंत झाला. मग काय विचारावें! प्रसंग मोठा विलक्षण येऊन पडला. महाराजांच्या मनाची स्थिति चमत्कारिक झाली. आमचा मित्र चांगल्या रज-पूत कुळांतला असून त्याचे सर्व आप्त दरबारचे क-दीम नोकर होते व हाही लहानपणापासून महाराजांच्या जवळ असे, व त्याची महाराजांबरोबर येण्याची फार उत्कंठा पाहून त्याचें नानादेशादिदृक्षेचें कोड पुरविण्याच्या हेतूनेंच त्यास बरोबर घेतलें होतें. त्याचें वय सुमारें १८ वर्षांचें होतें व त्यास महाराज केवळ नोकराप्रमाणें वागवीत नसत. त्याचा अंतकाल जवळ आला तेव्हां मात्र महाराजांच्या डोळ्यांला पाणी आलें व त्यांनीं त्या मुलाचे हातून १००० रुपये धर्मादायाचें उदक सोडविलें. महाराजांचें धैर्य मोठें व सहनशीलता जबर. तरी या प्रसंगीं त्यांस तात्कालिक मोह उत्पन्न झाला व मन त्यांच्या स्वाधीन राहीना. त्यांस त्या मुलाबद्दल फार हळहळ वाटली व परत गेल्यावर त्याच्या आप्तबंधुजनांस काय सांगूं असें ह्मणून त्यांस वारंवार हुंदका

येई, परंतु ते तसाच दाबून धरीत. हा भयंकर प्रसंग त्यांच्या स्मृतिपटावर इतका कोरला गेला होता कीं त्याची प्रतीति इतरांपुढेही कधीं कधीं येई. बाकीच्या मंडळींसही फार वाईट वाटलें हें सांगणें नकोच. अशा प्रसंगीं केवळ मानसिकच दुःख सोसायाचें असतें तर हरकत नव्हती. सर्व मंडळी वयस्याच्या मरणानें व्यथित व सर्वच परकी, तेव्हां उत्तरकार्याचा निर्वाह कोणास कसा सुचावा ? आह्मी पडलों हिंदु व त्यांतून मृत मनुष्य अस्सल धर्माभिमानी रजपूत. लंडनांत अशा लोकांच्या और्ध्वदेहिक क्रियेची काय सोय असते कोणास ठाऊक ? अग्निसंस्काराशिवाय इतर विधीला आह्मी कबूल नाहीं, व तसा संस्कार वाटेल त्या ठिकाणीं करण्याची मनाई ! बरें, येवढ्याच पंचाइतीनें झालें का ? नाहीं. आमच्या बरोबरचा मनुष्य मेला येवढें देखील उघडपणें बोलण्याची चोरी. आश्रमाधिपतीनें ही बातमी गुप्त ठेवण्याविषयीं सक्त ताकीद केली. ज्या खोलींत शव होतें तिचें दार बंद करावयास सांगितलें, व कोणत्याही तऱ्हेनें दुसऱ्या कोणास ह्या गोष्टीचा गंधही मिळणार नाहीं अशाबद्दल खबरदारी ठेविली. पण या गोष्टीबद्दल इतकी चोरी कां याचें आह्मांस मोठें गूढ पडलें. चौकशी अंतीं असें समजलें कीं जर ही मरणाची बातमी आश्रमांत पसरली तर सर्व लोक व विशेषतः कोमल अंतःकरणाच्या स्त्रिया आश्रम सोडून भराभर निघून जातील व आश्रमाधिपतीचें नुकसान होईल व तें भरून देण्याबद्दल तो आमच्यावर दावा करील. या सर्व कोटिक्रमाचा आमच्यासारख्या हिंदुस्थानीय जनास उमज पडेना; परंतु तद्देशीय न्यायनिपुण नागरिकांच्या तो नेहमींच्या वळणांतला असल्या कारणानें आमच्या बुद्धिविवरांत त्याचा कसा प्रवेश होत नाहीं याचेंच त्यांस आश्चर्य वाटलें ! इलाज नाहीं ! लंडनस्थ नागरिकांचा हिंदुजनांशीं सामना झाला असतां त्यांच्याकडे तीव्रमतित्व व आमच्याकडे मंदबुद्धित्व यावें यांत नवल तें कोणतें ? काळच तसा आहे ! कसेंही असो; तंटा उपस्थित करून स्वपक्षसमर्थन व प्रतिपक्षखंडन करण्याची ती वेळ नव्हती ह्मणून आह्मी गप्प झालों व वाऱ्याला पाठ देऊन आह्माला जसें लो-

कांनीं सांगितलें तसें आह्मी ऐकिलें. हेंच आह्मी स्वतंत्र राहिलों असतों तर अशी पंचाईत पडतीना. बरें, पुढें तजवीज काय ? या विचारांत मंडळी निमग्न झाली. आह्मांस कांहींच सुचेना, तेव्हां आमच्याबरोबर साहेब होते ते त्या कामास लागले. त्यांनीं अतोनात परिश्रम करून कांहीं उपयुक्त माहिती मिळविली. अग्निसंस्काराची प्रवृत्ति करण्यासाठीं युरोपखंडांत कांहीं वर्षांपासून मोठी चळवळ चालली आहे हें सर्वांस विश्रुतच आहे. त्याच मताच्या अनुयायांचा एक समाज इंग्लंड देशांतही १८७५ सालापासून विद्यमान आहे व या समाजाचें मुख्य ठिकाण लंडनांत असून त्याच्या शाखा भिन्न भिन्न प्रांतांत आहेत. या समाजाचें स्मशान लंडनाच्या दक्षिणेस कांहीं अंतरावर सरे प्रांतांत वोकिंग मुक्कामीं आहे. आगगाडीच्या स्टेशनापासून गांव फार दूर नाहीं. आगगाडीचा रस्ता दोन अडीच तासांचा आहे. प्रेताच्या उत्तरकार्याची सर्व सामुग्री पुरविणारी व प्रेताच्या वहनासंबंधीं सर्व तजवीज राखणारी एक मंडळी आहे. तिला पांच पाऊंड दहा शिलिंग दिले म्हणजे सर्व तयारी करून प्रेत दहनस्थानीं नेऊन पोहोंचवितें. परंतु सर्वांनीं याच मंडळीची योजना केली पाहिजे असा नियम नाहीं. आम्हीं या मंडळीचा केवळ आवश्यक माहिती मिळविण्यापुरताच उपयोग केला. बाकी सर्व कार्य आमचें आम्हींच केलें. दुसरी अशी एक गैरसोय कीं हें दहनस्थान जरूर लागेल तेव्हां ताबडतोब मिळण्यासारखें नाहीं. त्याच्यासाठीं दोन दिवस अगोदर तजवीज करावी लागते. याचें कारण असें कीं त्या स्थळीं सर्व प्रकारची सिद्धता करण्यास अवकाश लागतो. अधिकाऱ्यांकडून परवानगी मिळवावी लागते. अग्नि सिद्ध करण्यासाठीं नेमलेल्या माणसास वर्दी देऊन त्याची जुळवाजुळव करावी लागते. परंतु आह्मी खटपट करून दोन दिवसांची मुदत एक दिवसावरच आणिली. समाजाच्या नियमांप्रमाणें प्रेतसंस्कार होण्यापूर्वी नानाप्रकारचे दाखले लागतात त्यांसंबंधानेंही साधारण मनुष्यास मोठी अडचण पडण्याचा संभव आहे; परंतु आह्मांस विशेष त्रास झाला नाहीं. दहनस्थानाचा उपयोग करण्यासाठीं व मजुरांच्या मेहेनती-

साठीं वगैरे मिळून सहा पौंड द्यावे लागतात. शिवाय समाजास मदत करण्यासाठीं ह्मणून कांहीं देणगी देण्याचीही चाल आहे. हा प्रेतसंस्कार दिवसासच झाला पाहिजे अशीही एक अट आहे. दिवसा तर उघडपणें प्रेत आह्मांस आश्रमांतून बाहेर नेण्याची मनाई. तेव्हां मध्यरात्र उलटल्यानंतर व जिकडे तिकडे सामसूम झाल्यानंतर आह्मी प्रेत दुसऱ्या एका ठिकाणीं नेऊन ठेविलें. अगोदरच प्रेतवहनासारखें भीतिप्रद कृत्य आणि तेंही मध्यारात्रीसारख्या भयंकर समयीं करण्याचें व तें पाऊलही न वाजवितां गुप्त रीतीनें ! त्या घोर प्रसंगीं 'हामलेट' मधील पिशाच दर्शनाची मला आठवण झाली व पिशाचदर्शनापूर्वी मध्यरात्रीच्या स्वरूपाचें हाम्लेट यानें केलेलें वर्णन स्मृतिगोचर झालें. शिशिरवायु अंगास झोंबत होता, व कांहीं स्थळीं प्रकाश अंधक असल्या कारणानें मनाला कांहीं तरी भयंकर आकृति कल्पिण्यास अवकाश मिळे. असो, एकंदरीनें त्या रात्रीचा प्रसंग फारच विलक्षण होता. व त्याची आठवण झाली म्हणजे अजून अंगावर शहारे येतात. दुसऱ्या दिवशीं सकाळीं शहराच्या अधिकाऱ्यांकडून आवश्यक दाखले घेऊन आम्हीं प्रेत वोकिंग मुक्कामीं नेलें. वोकिंग हें अगदीं खेडेगांव आहे व त्यांत शेपन्नास घरांची वस्ती आहे. तेथें गांवाला लागूनच एका लहानशा आवारांत एक लहान पडवी बांधिलेली आहे. पडवीच्या पिछाडीस कांहीं अंतरावर एक विस्तीर्ण चौथरा आहे. त्या चौथऱ्याच्या मध्यभागीं एक लहानशी खोली बांधिलेली आहे. त्या खोलीला पडवीच्या बाजूला एक खिडकी आहे. खोलीच्या वरच्या बाजूस धूर जाण्यासाठीं एक धुराडें आहे व पिछाडीच्या बाजूस लांकडें व कोळसे घालण्याची जागा आहे. खोलीच्या मध्यभागीं जमिनीपासून उंचावर असा एक लोहपंजर आहे याला खालून लोहस्तंभाचा आधार आहे. या पिंजऱ्यामध्यें दोन लोखंडी रूळ आहेत व त्या रूळांवर साधारण मनुष्याच्या लांबीइतकी लांब अशी एक लोखंडी गाडी आहे. वर जी खिडकी सांगितली तिला लागूनच दोन लांकडी कठडे आहेत व त्या कठड्यांवरही लोखंडी

रूळ आहेत. खिडकी उघडून आंतील गाडी ओढली ह्मणजे बाहेरील कठड्यावर येते. मग त्या गाडीवर प्रेत ठेवावयाचें. प्रेताबरोबर आवश्यक वस्त्र मात्र ठेवूं देतात. पेटी वगैरे ठेवूं देत नाहींत. प्रेत ठेविलें ह्मणजे ती गाडी आंत ढकलतात व खिडकी लावून घेतात. व्यवस्थापकांच्या वतीनें तेथें जो मनुष्य हजर होता त्यानें आह्मांस असें सांगितलें कीं, शरीरास कोळसे किंवा लांकडें यांचा प्रत्यक्ष स्पर्श मुळींच होत नाहीं. या साधनांनीं उत्पन्न केलेला जो अग्नि असतो त्याचा ताप प्रेताच्या सर्व बाजूंस पोहोंचतो व त्यामुळें शरीराचें दहन होतें. खरोखरी प्रकार काय होता त्याचा आम्हांस प्रत्यय मिळाला नाहीं; खोलीला मधून मधून झरोके होते त्यांमधून आह्मी पाहिलें तेव्हां अग्नीच्या ज्वाला मात्र आह्मांस दिसत व मधून मधून शवही दिसत होतें. शरीराची राख होण्यास पुरते दोन कलाकही लागले नाहींत. तेवढ्या अवकाशांत हाडांची सुद्धां जळून राख झाली. त्या राखेचें वजन केलें तें सुमार तीन पौंड भरलें. ती राख एका भांड्यांत भरून आह्मी आमच्या बरोबर घेतली. याप्रमाणें आमच्या स्नेह्याची व्यवस्था लावून आह्मी गांवांत गेलों व एका पथिकाश्रमांत जाऊन थोडी विश्रांति घेतली. हा आश्रम शहरांतील आश्रमाप्रमाणें नसून तेथील व्यवस्थाही चांगली नव्हती. बसण्यासाठीं एक साधारण खोली मात्र होती. पण खोलीच्या बाहेर लाल नाकाच्या राकट अशा स्त्रिया व पुरुष दिसत होते. ती सर्व व्यवस्था पाहून मला वाल्टर स्काट यांच्या कादंबऱ्यामधून वारंवार येणाऱ्या इन्सच्या वर्णनाची आठवण झाली. कांहीं वेळ तेथें बसून आह्मी स्टेशनावर परत गेलों व संध्याकाळच्या पूर्वी लंडनास परत आलों.

येथवर लंडन शहराची साधारण माहिती दिली व तेथें पोहोंचल्यावर प्रथमच जो मनाचा ग्रह झाला व स्नेह्याच्या मृत्युसंबंधीं जो दुःखप्रद प्रसंग आला त्याचा थोडक्यांत निर्देश केला. आतां लंडन शहरांत जो अल्पवास आह्मी केला त्या अवकाशांत आह्मी काय केलें व काय पाहिलें याची हकीकत द्यावयाची. आतांपर्यंत या हकीकतीची पद्धत दिव-

सक्रमाप्रमाणें होती; कारण कीं येथवर वाटचाल झाली म्हणण्यास हरकत नाहीं; परंतु आतां लंडन शहरीं येऊन आपण पोहोंचलों व स्थूलमानानें ठळक ठळक प्रांतांचा परिचयही करून घेतला. तेव्हां पुढें दिवसक्रमानें हकीकत देण्यांत विशेष मतलब नाहीं असें समजून सुमार पंधरा पंधरा दिवसांचा वृत्तांत समुच्चयानें देण्याचा विचार आहे; व याप्रमाणें सर्व वृत्तकथन झाल्यावर तेथील लोकांचे आचार, विचार, सामाजिक स्थिति, राजकीय स्थिति, गृहस्थिति यांबद्दल माझी समजूत काय झाली आहे याविषयीं दिग्दर्शन करण्यांत येईल.

ता० २ मे पासून १५ मे.—वर सांगितलेंच आहे कीं कांहीं वेळ कपडेलत्ते तयार करविण्यांत, राहण्यासाठीं घर पाहण्यांत, व बरोबरच्या स्नेह्याच्या शुश्रूषेंत गेला. बाकी राहिलेला वेळ करमणुकींत गेला. दोन दिवस रात्रीं नाटक पाहण्यास गेलों होतों. एक दिवस " टूल्सथिएटर " मध्यें ' बटूलर ' या नांवाचा प्रयोग पाहण्यास गेलों. हें नाटकगृह फारच संकुचित आहे व लंडन शहरास अनुरूप असें कांहींच त्या गृहांत दिसून आलें नाहीं. प्रयोग मात्र फारच सुरेख वठला. सर्व पात्रें आपापल्या कार्यांत अति निपुण असून त्यांच्या अभिनयांत न्यूनाधिक कांहींच आढळलें नाहीं. हें नाटक फारच लोकप्रिय आहे व आह्मी गेलों तेव्हां लागोपाठ कितीएक रात्रीं हाच प्रयोग होत होता. आणखी एके दिवशीं आह्मी ऑपरा पहाण्यास गेलों होतों. हा प्रयोग संगीतमय असून वेषसज्जा व रंगसज्जा फारच मनोहर होती. हे दोन्ही प्रयोग पाहून मनाची अशी खात्री झाली कीं हिंदुस्थानांत येणारे सर्व प्रकारचे खेळ फारच कमी प्रतीचे असतात व उच्च प्रतीच्या प्रयोगकारांस इकडे येण्यास सवडच मिळत नाहीं.

लंडन शहरांत पन्नासांवर नाटकगृहें आहेत. त्यांपैकीं सुमार पंचवीस चांगल्या प्रतीचीं आहेत. प्रयोगास सुरुवात सातपासून साडेसातांच्या दरम्यान होते व ११ वाजतां प्रयोग खलास होतो. उच्च प्रतीच्या नाटकगृहांत सर्व तजविजी फारच उत्तम प्रकारच्या असतात. दरवाजावर नोकर लोक उच्च वर्गा-

तील प्रेक्षकांस स्थाननिर्देश करण्यासाठीं हजर असतात. कांहीं कांहीं स्थळीं बायकाही तैनातीला असतात. त्या आपल्यास जागा दाखवून काय हवें नको याची विचारपूस करितात. प्रयोगाचें पुस्तक, पंखे, ऑपराग्लास (दुर्बिण), खाण्यापिण्याचे जिन्नस या सर्व गोष्टींची तजवीज या नोकरांच्या मार्फत लाविली येते. गृहांची रचना पूर्वी निर्दिष्ट केलीच आहे, तेव्हां आतां पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. सर्वांत उच्च प्रतीच्या जागा ह्मणजे 'बाक्सेस'. यांत चारपासून सहा माणसांचा समावेश होतो; परंतु या प्रतीची जागा सर्वांस सर्व वेळ मिळूं शकेल असा नेम नाहीं; कारण कीं बहुतकरून सर्व ऋतूचें आगाऊ भाडें देऊन श्रीमान् लोक या जागा स्वतःसाठीं राखून ठेवितात. मग त्यांच्या ओळखीनें किंवा त्यांच्या मेहेरबानीनें मात्र जागा मिळण्याचा संभव असतो. उच्च प्रतीच्या गृहांत या जागा फारच चांगल्या सजविलेल्या असतात. आसनास रेशमी कापडाचें आच्छादन असून सुगंध द्रव्यांच्या योगानें तीं सुवासिक केलेलीं असतात व सर्व स्त्रीपुरुष सायंकालीन वेष परिधान करून आलेले असतात. या वेषांत स्त्रियांचा शिरोभाग अनावृत्त असून उरःप्रदेश व बाहुयुगल हे अंशतः वस्त्राच्छादित असतात. इंग्लंडासारख्या शीतप्रदेशांत अशा पोषाकाची योजना कशी झाली याबद्दल शंका येणें साहजिकच आहे; परंतु संप्रदायानें ठरविलेल्या वेषास इतर कारणांनीं कसा व्यत्यय येणार ? इतर अडचणींचा निर्वाह अर्थात् इतर कारणांनीं होण्यासारखा असतोच. स्त्रिया अशा प्रकारचा वेष घरीं करून बाहेर निघतांना वरून एक अघळपघळ ओव्हरकोट घालितात, ह्मणजे लागणाऱ्या हवेपासून बाधा होत नाहीं, व नाटकगृहांत गेल्याबरोबर ओव्हरकोट काढून टाकितात. गृहांत गेल्यावर दीपसमूह व जनसमुदाय यांच्या योगानें वातावरणांत उष्णता आलेलीच असते व ही उष्णता आपल्या इथल्याप्रमाणें क्लमजनक न होतां सुखकरच होते व अशा वेषरचनेला अनुकूल असते. ज्या मानानें उच्चप्रतीच्या नाटकगृहांत आल्हादजनक अशी व्यवस्था असते त्याच मानानें कनिष्ट-

प्रतीच्या गृहांत निर्वेदकारक असा प्रकार असतो. तेथें सायंकालीन वेषाच्या जागीं मजूरदार व खलाशी लोकांच्या ग्राम्य व मलिन वस्त्रांचा प्रत्यय येतो व सुगंध द्रव्यांच्या परिमला ऐवजीं तंबाखू व मद्य यांचा शिरोवेदनाजनक दुर्गंध येत असतो. उच्च प्रतीच्या गृहांत नऊ दहा प्रतीच्या जागा असतात. पहिल्या प्रतीच्या जागेचा ह्मणजे बाक्सेसचा दर पंधरा रुपयांपासून दोनशें रुपयांपर्यंत असतो. मध्यम प्रतीच्या जागेचा आठ पासून दहा रुपये व कनिष्ठ प्रतीच्या जागेचा दोन रुपये. मध्यम प्रतीच्या गृहांत हेच दर दहा रुपयांपासून बारा आण्यांपर्यंत असतात, व कनिष्ठ प्रतीच्या गृहांत दोन रुपयांपासून चार आण्यांपर्यंत असतात. हिवाळ्यामध्यें सर्व दर फारच उतरतात; कारण कीं, त्या ऋतूंत श्रीमंतलोक बहुधा इतर देशीं जाऊन रहातात. वरच्या प्रतीचीं तिकिटें प्रसिद्ध व लोकप्रिय अशा प्रयोगाच्या दिवशीं नाटकगृहांत मिळत नाहींत. तीं मिळण्याचीं ठरीव ठिकाणें असतात. तेथें दिवसा तिकिटें घ्यावीं लागतात, व त्यासाठीं तिकिटांच्या किमतीवर कमिशनासाठीं जास्त पैसे द्यावे लागतात. कधीं कधीं एक एक महिना अगोदर टिकिटें घेऊन ठेवावीं लागतात. तिकिटें घेऊन विकणारांजवळ जागांचा नकाशा असतो त्यावरून कोणतें टिकिट घ्यावें याचा प्रेक्षकास अजमास करतां येतो. वसंत व ग्रीष्म ऋतूंमध्यें बहुतेक नाटकगृहांत रोज प्रयोग सुरू असतात व रोज प्रेक्षकांची अतिशय गर्दी असते. नाटकगृहें प्रशस्त व विस्तीर्ण आहेत, व एक हजारांपासून चार हजार लोकांचा समावेश होण्यासारखीं आहेत. असें असतां व प्रयोग रोज सुरू असून रोज गर्दी असते ही गोष्ट वैदेशिकाला फार विस्मयकारक वाटते; परंतु लंडन शहरांत लोकसंख्या किती आहे व तेथील संपत्तीचें मान काय आहे याची कल्पना मनांत आणली ह्मणजे या गोष्टींत असंभवनीय असें कांहीं वाटत नाहीं. सगळ्या लोकांस पाळीपाळीनें खेळ पहाण्यास मिळणें रोज प्रयोग झाल्याशिवाय शक्य होणार नाहीं हें एक कारण. दुसरें असें कीं, तेथील प्रयोगाचा प्रकार आपल्या इकडल्या सारखा नाहीं. जा-

गरण मुळींच होत नाहीं व जागरण झालें तरी हवा थंड असल्या कारणानें इकडल्यासारखें बाधत नाहीं. तिसरें कारण तेथील मध्यम स्थितींतले व उच्च स्थितींतले लोक दिवसा कार्यभार उरकून रात्रीं श्रमाचा अपनोद व मनाचा विनोद होण्यासाठीं नाटक वगैरेसारख्या करमणुकी करून घेण्यास तत्पर असतात. चवथें कारण तेथील प्रयोगकार फारच कर्मकुशल व अभिनयनिपुण असतात त्यामुळें प्रयोग वारंवार पाहिला असतां वीट कधींच येत नाहीं. निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या प्रकारच्या आनंदाचा अनुभव मिळतो. रमणीयतेचें रूप काय या प्रश्नाचें उत्तर एका कवीनें मोठ्या मार्मिक रीतीनें दिलें आहे तें असें:—

क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः ।

या उक्तीप्रमाणें या नाट्यकलाविशारद प्रयोगकारांचे प्रयोग प्रत्येक खेपेस नवेनवेच भासतात.

त्या देशांत नाटकाला जाणारे सर्व सभ्यलोक शिष्टाचाराप्रमाणें पोषाक करून जातात. आपल्या इकडे नाटकाला जाण्यास सभ्य पोषाखाची जरूर नाहीं अशीच कल्पना झालेली असते. जे कोणी दिवसा पागोटें घालून उपरणें वगैरे घेतात, ते रात्रीं नाटकाला चालले म्हणजे कोणी टोपी घालितात, कोणी रुमाल, व कोणी फेटा चढवितात, कोणी शेंड्या बाहेर टाकितात, कोणी कमरे इतके आखूड कोट घालितात व कोणी टांचेपर्यंत पुरण्या इतका चोगा घालितात. सारांश मनमानेल तसा पण तऱ्हेवाईक व शिष्टाचाराला अननुरूप असा पोषाक करण्याची आपल्याकडे चालच पडून गेली आहे. याचें कारण काय असेल तें असो. कदाचित आपल्यामध्यें साधारणतः नाटकास शिष्ट व सभ्य अशा जनांच्या मनोरंजनाचे जे मार्ग आहेत त्यांमध्यें अवकाश मिळत नाहीं; व आपल्या इकडे बहुतेक जीं नाटकें होतात त्यांच्या योग्यतेचा विचार केला ह्मणजे या शिष्टजनांच्या संप्रदायांत कांहीं वावगें नाहीं हेंही कबूल केलें पाहिजे. तेव्हां नाटकास जाणें

हेंच जर सभ्यतेला थोडेंसें विरुद्ध असें ठरलें तर सभ्य असो वेष असण्याची अवश्यकता मनावर कशी ठसावी ? असो.

मेणाच्या पुतळ्यांचें प्रदर्शन.

तारीख ४ मे रोजीं सकाळीं आह्मीं माडम टुसाडूसचे मेणाच्या पुतळ्याचें प्रदर्शन पहाण्यास गेलों. माडम टुसाड्स ही एक स्विस बाई होती. ही १८०२ सालीं इंग्लंडांत गेली व तेथें तिनें हें प्रदर्शन स्थापिलें. पुढें आयर्लंडांत जात असतां जहाज फुटून तिच्या सर्व मालाचा नाश झाला. तेव्हां तिनें पुतळे फिरून तयार करविले व प्रदर्शन फिरून स्थापिलें. १८५० सालीं नव्वद वर्षांच्या वयांत तिचा अंत झाला. हल्लीं तेंच प्रदर्शन तिच्याच गोत्रजांनीं चालविलें आहे.

हा प्रतिमासंग्रह केवळ अद्वितीय आहे. येथें वुइलियम-धी-कांकररपासून व्हिक्टोरिया राणीपर्यंत झालेल्या सर्व आंग्ल राजांच्या प्रतिमा आहेत. युरोपांतील इतर देशांतील कांहीं राजांच्याही आहेत. शिवाय इंग्लंड व इतर देशांतील प्रसिद्ध पुरुषांच्याही प्रतिमा आहेत. या सर्व मूर्ति मेणाच्या केलेल्या आहेत व त्या इतक्या कुशलतेनें बनविलेल्या आहेत कीं, त्या प्रतिकृति नसून जिवंत माणसें समोर उभीं आहेत असें वाटतें. अंगाचा रंग, तोंडाची कांति, डोळ्यांचें पाणी हीं इतकीं कांहीं चांगलीं साधलीं आहेत कीं, प्रेक्षकांस तात्कालिक संमोह उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. निरनिराळ्या मूर्तींस निरनिराळे वेष घातलेले आहेत, त्यांवरून भिन्नभिन्न कालीं वेषविपर्यय कसा झाला याचें ज्ञान चांगलें होतें. ज्यांनीं इंग्लंडचा इतिहास वाचला आहे त्यांस हा संग्रह पाहून विशेष मौज वाटते. टामस-आ-बेकेट, विक्लिफ, लूथर, कार्डिनल वुल्सी या नामांकित पुरुषांचें दर्शन झालें ह्मणजे मनाला एक प्रकारचा विलक्षण आनंद वाटतो, व त्यांच्या करामतीचें चित्र डोळ्यांसमोर उभें रहातें. क्रामवेल, मार्लबरो, नेल्सन व वेलिंगटन या शूर सरदारांच्या मूर्ति पाहून त्यांच्या पराक्रमाची आठवण होते व त्यांच्याविषयीं पूज्यभाव दृढ होतो. क्वीन मेरीला पाहून तिच्या निर्दयतेचें व धर्माग्रहाचें स्मरण होतें व मनांत तिटकारा उत्पन्न होतो;

व इलिझाबेथसारख्या सौम्यप्रकृतीच्या राज्ञीचें अवलोकन, तिच्या राज्यांत सर्व प्रजाजनांस प्राप्त झालेल्या सुखास्वादाचें स्मारक होऊन तिच्याविषयीं प्रेम व भक्ति जागृत करण्यास कारण होतें. प्रस्तुतच्या राणी साहेबांच्या कुटुंबांतील सर्व माणसांचा एक स्वतंत्र समूह आहे. एका स्थलीं लार्ड डफरिन साहेबांचा दरबार आहे, त्या दरबारांत शिंदे, होळकर, काश्मीरचे महाराज व भोपाळची बेगम यांचे जे पुतळे आहेत ते बिलकुल चांगले साधले नाहींत. त्यांच्या आकृति बेढब व पोषाक मलिन असल्याकारणानें पाहणाराच्या मनावर ग्रह चांगला होत नाहीं. एका स्थलीं मंचकावर निजलेल्या एका रूपवती स्त्रीचें चित्र आहे. तें पाहून तर मी फार थक्क झालों. दुरून प्रथम असा भास झाला कीं कोणी तरी स्त्री खरोखरीच निजली आहे. संग्रहालयांतील कोणी अधिकाऱ्याची स्त्री निजली असेल असें वाटून त्या दिशेकडे मी जात नव्हतों, परंतु आमचा मार्गदर्शक जेव्हां जाऊं लागला तेव्हां मी त्यास प्रश्न केला व त्याच्या सांगण्यावरून मी जवळ गेलों. त्या रूपवतीची ठेवण, तिच्या वदनकमलाची शोभा, तिच्या वक्रभ्रूलतांचें सौंदर्य, तिच्या मुखावरील निद्रेची छाया, तिचा विकीर्ण असा रुचिर केशकलाप या सर्वांचें सूक्ष्म अवलोकन केलें ह्मणजे कारागिराची धन्यता वाटते. जवळ उभें राहिलें असतां सुंदरीच्या निद्रेचा भंग होईल या भीतीनें उच्च स्वरानें भाषण सुद्धां करूं नये असें वाटल्या वांचून रहात नाहीं. ज्या दालनांत या सर्व प्रतिमा आहेत त्याच्या पिछाडीस एक लहानशी खोली आहे, तेथें पहिल्या नेपोलियन बादशहाच्या स्मारक अशा कांहीं वस्तूंचा संग्रह आहे. त्याचा निजावयाचा पलंग, त्याचीं वस्त्रें, त्याचीं शस्त्रें व दुसऱ्या कांहीं किरकोळ वस्तु येथें ठेविल्या आहेत. येथेंच एक त्या बादशहाची गाडी आहे. ही गाडी जेनाप मुक्कामीं प्रशियन लोकांनीं त्याजवळून हिरावून घेतली होती व माडम टुसाड हिनें आपल्या संग्रहालयांत ठेवण्यासाठीं तीस हजार रुपये देऊन ही विकत घेतली होती. या गोष्टीवरून कितीं प्रयत्न व किती द्रव्य खर्च करून हा संग्रह त्या बाईनें जमविला याची सहज कल्पना करितां येईल. खालच्या मजल्यावर

एक दालन आहे त्याचें नांव " चेम्बर आफ हॉरर्स " ह्मणजे भयप्रद वस्तूंच्या संग्रहाची शाळा. येथें देहांत प्रायश्चित मिळालेल्या घोर अपराध्यांचे मुखवटे आहेत व त्यांनीं केलेल्या अपराधांची थोडक्यांत माहिती दिली आहे. विषप्रयोगकार, दरोडेखोर, खुनी वगैरे सर्व प्रकारच्या लोकांचा संग्रह आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं या दुष्ट लोकांच्या उपकरणांचाही संग्रह केलेला आहे. त्याचप्रमाणें या लोकांस शिक्षा ज्या ज्या साधनांनीं झाल्या त्या सर्व साधनांचा संग्रह येथें आहे. फाशी देण्याचें यंत्र, मनुष्याचे अवयव ताणून मारण्याचें यंत्र, शिरश्छेद करण्याचीं निरनिराळ्या प्रकारचीं यंत्रें, पायाला घालण्याचा खोडा, वगैरे सर्व वस्तूंचा येथें संग्रह आहे. गेल्या शतकांत जें फ्रान्स देशांत परिवर्तन झालें त्यावेळेस " गिलो-टीन" या नांवाच्या एका यंत्रानें शिरश्छेद करण्यांत येत असे. याचा नमुनाही येथें आहे. एक लांकडी सांपळा असून त्यांत मनुष्यास बसण्यास जागा आहे. त्या जागेपुढेंच डोकें घालण्यासाठीं एक भोंक आहे. भोंकाच्या बाहेर वरच्या बाजूनें वीतदीडवीत रुंदीचें तीक्ष्ण धारेचें असें एक शस्त्र लट-कत असतें. हें शस्त्र वर उचलण्यासाठीं व खालीं पाडण्यासाठीं एका प्रकारची सोय केलेली असते. मनुष्याचें डोकें भोंकांत घातलें ह्मणजे तें तेथेंच अडकून रहावें अशीही तजवीज केले-ली असते. ज्या यंत्राच्या योगानें फ्रान्सचा राजा सोळावा लुई व मेरी आन्टोनेट या दोघांचा शिरश्छेद झाला तेंच यन्त्र येथें आणून ठेविलेलें आहे. हा सर्व संग्रह खालच्या मजल्या-वर असल्या कारणानें तेथें प्रकाश चांगला नाहीं; यामुळें व संग्रहीत वस्तूंच्या तऱ्हेमुळें मनाला फारच उदासीनता प्राप्त होते व पाहण्याचा कंटाळा येतो.

आह्मी हें संग्रहालय पहाण्यास सकाळीं गेलों होतों; परंतु रात्रीं दीपप्रकाशांत विशेष शोभा दिसते असें सांगतात. मुख्य दालनांत प्रवेशासाठीं एक शिलिंग द्यावा लागतो, व वर निर्दिष्ट केलेला नेपोलियन बादशहाच्या वस्तूंचा संग्रह पहा-ण्यासाठीं आणखी सहा पेन्स द्यावे लागतात. खालच्या

मजल्यावर उपहाराची वगैरे सोय आहे. संग्रहीत वस्तूंच्या यादीचें पुस्तकही विकत मिळतें.

टेम्स नदीच्या तीराजवळील प्रांत.

एक दिवस दोन प्रहरानन्तर आह्मी गाडींत बसून शहराचे कांहीं भाग पहाण्यास गेलों. व्हिक्टोरिया स्ट्रीटमधून जाऊन पार्लमेंट सभागृहांकडे वळलों व तेथून टेम्स एम्बांकमेंटच्या बाजूनें कांहीं वेळ जाऊन परत घरीं येतांना हाईड पार्कच्या भोंवती फेरा घातला. व्हिक्टोरिया स्ट्रीट ही रथ्या फारच सुंदर आहे. हिच्या दोन्ही बाजूंनीं सारख्या उंचीच्या सुरेख इमारती आहेत व इमारतींची रचनाही सारख्याच प्रकारची आहे, त्यामुळें शोभा विशेष आली आहे. हा रस्ता पूर्वपश्चिम असून पूर्वेकडून बाहेर पडलें ह्मणजे समोरच वेस्टमिन्स्टर ॲबे नांवाचें पुराणप्रसिद्ध प्रार्थनामंदिर आहे. या इमारतीच्या पुरोभागीं दोन कोंपऱ्यांस दोन अशीं उच्च शृंगें आहेत; परंतु तीं इमारतीच्या बाकीच्या अवयवांच्या मानानें जास्त उंच दिसतात. पलीकडेच पार्लमेंटचीं सभागृहें आहेत. हीं नदीच्या कांठास असून फारच विशाल व भव्य आहेत. इमारत तीन मजली असून ठिकठिकाणीं लहान मोठीं भिन्न भिन्न आकृतींचीं शृंगें आहेत तीं शोभेस पुष्टि देतात. इमारतीच्या एका बाजूस चौकोनी व तीन मजली असा एक मनोरा आहे, त्याचें नांव व्हिक्टोरिया टावर. त्याच्या अग्रभागीं ध्वजस्तंभ उभा केला आहे, व सभेचें काम असलें ह्मणजे या स्तंभावर ध्वज उभारतात. दुसऱ्या टोंकास एक मनोरा आहे, पण वर निर्दिष्ट केलेल्या मनोऱ्यापेक्षां तो लहान आहे. त्यावर चारी बाजूंनीं एक जंगी घड्याळ लाविलेलें आहे. इमारतीच्या पूर्वेस टेम्स नदीचें पात्र आहे. पश्चिमेस एक विस्तीर्ण पटांगण आहे. उत्तरेस वेस्ट मिन्स्टर ब्रिज नांवाचा पूल व पुलाकडे जाणारा रस्ता आहे. दक्षिणेच्या बाजूसही मोठी मोकळी जागा आहे. याप्रमाणें ही भवनराजि स्वयमेव सुंदर असून असमंताद्भागाच्या सौंदर्यपोषकतेमुळें विशेष रमणीय झाली आहे. जवळच्या पटांगणांत भव्य व उंच असे पुतळे आहेत. रिचर्ड क्युर-डि-ला-

यन राजाचा मिश्रधातूचा बनविलेला पुतळा पार्लमेंटगृहें व वेस्टमिन्स्टर ऑबे यांच्या दरम्यान आहे. उत्तरेस अर्ल आफ डर्बी यांचा पुतळा व जवळच लार्ड पामर्स्टन यांचा पुतळा आहे, व दुसऱ्या बाजूस सर राबर्ट पील यांचा पुतळा आहे. पटांगणाच्या पश्चिमेच्या बाजूस लार्ड क्यानिंग यांचा पुतळा आहे, व जवळच ग्रेट जार्ज स्ट्रीटच्या नाक्यावर एक मनोहर असें कारंजें आहे. हें कारंजें ज्या पुरुषानें गुलामांचा व्यापार बंद करण्यासाठीं अश्रान्त परिश्रम केले त्याच्या दीर्घ यत्नाचें स्मारक ह्मणून बनविलेलें आहे. दक्षिणेच्या बाजूस लार्ड बीकन्सफील्ड यांचा पुतळा आहे.

या भागांतच किंग स्ट्रीट नांवाचा एक जुना रस्ता आहे. पूर्वीच्या काळीं हा रस्ता फार महत्वाचा असे; कारण कीं व्हाइट हॉल येथील राजमहालांतून वेस्ट मिन्स्टर येथें जाण्यास दुसरा मार्गच नव्हता. याच प्रांतांत स्पेन्सर कवि, आलिव्हर क्रामवेल वगैरे प्रसिद्ध पुरुष राहत होते. पार्लमेंट स्ट्रीट नांवाचा रस्ता झाल्यापासून हा जुना रस्ता बंद पडला. सभागृहांच्या उत्तरेस वेस्टमिन्स्टर नांवाचा पूल आहे हें वर सांगितलेंच आहे. हा पूल फारच सुंदर आहे. याची रचना १८५६ पासून १८६२ सालापर्यंत झाली. याची लांबी ११६० फूट असून रुंदी ८५ फूट आहे. ८५ फुटांपैकीं ५३ फूट गाडीचा रस्ता आहे व १५ फुटांचे पार्श्वपथ आहेत. या पुलाच्या सात कमानी आहेत. त्या लोखंडी असून संगमरवरी दगडाच्या धक्क्यावर उभ्या केल्या आहेत. या पुलावरून सभागृहांची शोभा फारच स्पष्ट रीतीनें दिसते. या पुलावर २५ लाख रुपये खर्च झाले आहेत. पुलाच्या पश्चिमेच्या टोंकास फारच मोठे असे चार धुराचे दिवे आहेत त्यामुळें रात्रीं फारच मौज दिसते. पुलापलीकडे पार्लमेंटगृहांसमोरच सेंटटामस हास्पिटल आहे, व पुलावर न जातांना तसेंच उत्तरेकडे गेलें ह्मणजे टेम्स एंबांकमेंट नांवाचा रस्ता लागतो.

हा रस्ता टेम्स नदीच्या पात्राशीं समांतर आहे. टेम्सएंबांकमेंटचा जो भाग वेस्टमिन्स्टर ब्रिज व ब्लॅकफ्रायर्स ब्रिज

याच्या दरम्यान आहे त्यास व्हिक्टोरिया एंबकमेंट असें नांव आहे. वेस्टमिन्स्टर पुलापासून चेरिंग क्रास पुलापर्यंत रस्ता दक्षिणोत्तर आहे, व पुढें नदीचें पात्र वळून पश्चिम-पूर्व झाल्याकारणानें रस्ताही त्याच दिशेस गेला आहे. ज्या भागावर हा रस्ता झाला आहे तेथें पूर्वी दिवसांतून दोन वेळ भरतीचें पाणी येत असे. हा रस्ता १८६४–७० सालीं करण्यांत आला व त्यावर दोन कोट रुपये खर्च झाले. रस्त्याची लांबी २३०० यार्ड असून रुंदी १०० फूट आहे. मध्यभागीं ६४ फूट रुंदीचा गाडीचा रस्ता असून शहराच्या बाजूला १६ फूट रुंदीचा पार्श्वपथ आहे व नदीच्या बाजूला २० फूट रुंदीचा आहे. नदीच्या बाजूला आठ फूट रुंदीची दगडी भिंत आहे. या रस्त्याखालीं तीन बोगदे आहेत. शहराच्या बाजूला जो बोगदा आहे त्यांतून आगगाडीचा रस्ता गेलेला आहे. नदीच्या बाजूनें एकावर एक असे दोन बोगदे आहेत. त्यांपैकीं खालच्या बोगद्यांतून गटार गेलेलें आहे व वरच्यांतून पाण्याच्या व धुराच्या नळ्या व तारायंत्राच्या तारा गेलेल्या आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं सारख्या अंतरावर प्रच्छाय अशा वृक्षांच्या राजी आहेत. त्यामुळें नदीच्या पात्राच्या बाजूनें या रथ्येची शोभा विशेष दिसते. कांहीकांहीं ठिकाणीं नदीवर जाण्यासाठीं सोपानपरंपरा केलेल्या आहेत व त्यांस लागूनच नौकांचे बनविलेले आगबोटी लागण्याचे धक्के आहेत. हे धक्के लोखंडी असून भरतीओहटीप्रमाणें वर खालीं होतात. या धक्क्यांवर रहदारी बरीच असते. अवळपास जाणाऱ्या लहान मोठ्या आगबोटी येथें पुष्कळ असतात. याच रस्त्यावर चेरिंग क्रासच्या पुलाजवळ एक बगीचा आहे. त्यामध्यें जनरल उट्राम व दुसऱ्या कांहीं प्रसिद्ध पुरुषांचे पुतळे आहेत. रस्त्यावर एके ठिकाणीं जानस्टुअर्ट मिल यांचा पुतळा आहे. रस्त्याचे बाजूनें कांहीं भव्य इमारती आहेत, व एका स्थळीं एक उंच संगमरवरी दगडाचा स्तंभ आहे त्यास क्लिओपेट्राज नीडल ह्मणतात. याच्याच जोडीचा एक स्तंभ न्यूयार्क येथें आहे. हे दोन्ही हेलिओपोलिस येथून आलेक्झांड्रिया येथें प्राचीन काळीं नेण्यांत आले होते. यांपैकीं एक इजिप्टच्या मह-

मद् आलीनें इंग्लिश सरकारास १८१९ सालीं नजर दिला होता. याची ऊंची ६२ फुटांवर असून तळाशीं रुंदी ८ फूट आहे. वजन १८० टन आहे. इंग्लिश सरकारास नजर दिला तेव्हां हा खांब अलेक्झांड्रियाच्या वाळवंटावर आडवा पडलेला होता तो उचलून नेण्याचा खर्च सरकार आपल्यावर घेईना. तेव्हां डाक्तर इरास्मस वुइल्सन यानें एक लक्ष रुपये देऊं केले. या खांभाभोंवती एक लोखंडी पत्रा लावून आगबोटीवर आणीत असतांना बिस्केच्या आखातांत वादळ होऊन त्यास समुद्रांत टाकून देणें भाग पडलें. पुढें १८७८ सालीं फिरून त्या आखातांतून बाहेर काढून इंग्लंडांत आणून हा खांभ वर निर्दिष्ट केलेल्या रस्त्यावर उभा केला. याच्या पृष्टावर इजिप्शियन सांकेतिक लिपींत लिहिलेले कांहीं लेख आहेत व खालच्या चौथऱ्यावर इंग्रजी भाषेंत वृत्तांत सूचक असे लेख आहेत. शिवाय चौथऱ्याच्या दोन कोंपऱ्यांवर स्फिंक्सचे शिरोभाग मनुष्यासारखा व बाकीचे अवयव सिंहासारखे अशा प्रकारचे इजिप्शियन तऱ्हेचे पुतळे बसविलेले आहेत.

टेम्स नदीवर लंडन शहरच्या हद्दींत सुमारें वीस पूल आहेत. त्यांपैकीं स्वतंत्र आगगाड्यांचे असे तीन चारच आहेत. कांहीं आगगाड्यांच्या पुलावरून गाड्याघोड्यांसाठीं निराळे पूल केले आहेत. कांहीं ठिकाणीं दोन आगगाड्यांच्या कंपन्यांनीं जवळ जवळ असे स्वतंत्र पूल बांधिलेले आहेत. व्हिक्टोरिया एंबांकमेंटच्या रस्त्यावर वेस्टमिन्स्टर व ब्लॉक फ्रायर्स यांच्या दरम्यान आणखी दोन पूल आहेत. चेरिंग क्रासचा पूल दुहेरी ह्मणजे खालीं आगगाडीचा व वरून गाड्यांचा असा आहे. यांच्या पलीकडे वाटर्लूचा पूल आहे. हा पूल सर्व जगांत जे कांहीं सुंदर पूल आहेत त्यांपैकीं एक आहे. हा मूळ एक कोट रुपये खर्च करून एका कंपनीनें बांधला होता. या पुलावरून लंडनचा पश्चिमभाग चांगला दिसण्यांत येतो. १८७८ सालीं हा पूल शहर सुधारणाऱ्या मंडळीनें ५० लाख रुपये देऊन विकत घेतला, व कर न घेतां सर्व लोकांसाठीं खुला ठेविला. या पुलाच्या पलीकडेच सामर्सेट हाऊस नांवाची जंगी इमारत आहे. या इमारतीच्या

जागीं प्राचीन काळीं पहिला जेम्स, पहिला चार्लस व दुसऱ्या कांहीं राजांचे महाल होते. हल्लींची इमारत १७७६—८६ सालीं झाली. या इमारतीची नदीकडली बाजू ७८० फूट लांब आहे. या इमारतींत पुष्कळ कचेऱ्या आहेत. येथें सुमार ९०० कामगार काम करितात. येथें प्राचीनकाळचीं मृत्युपत्रें ठेविलेलीं आहेत. शेक्सपियर, व्हॅनडाइक, न्यूटन, साम्युअल जान्सन यांचीं मृत्युपत्रें येथें आहेत. पहिल्या नेपोलियननें सेंट हेलिना येथें केलेलें मृत्युपत्रही येथें पूर्वी होतें. परंतु १८५३ सालीं तें फ्रेंच लोकांच्या स्वाधीन करण्यांत आलें.

या रस्त्यावर शेवटचा पूल ह्मटला ह्मणजे ब्लॉक फ्रायर्स ब्रिज. या स्थलीं पूर्वी एक मठ होता त्यावरून पुलास ब्लाक फ्रायर्स हें नांव मिळालें आहे. हा पूलही दुहेरी आहे याची मधली कमान १८५ फूट रुंद आहे. या पुलावरून सेंट पाल्स काथीड्रलचा घुमट व आजूबाजूचा भाग चांगल्या तऱ्हेनें दृष्टीस पडतो.

व्हिक्टोरिया एंबांकमेंटावर कांहीं वेळ फिरून आह्मीं परत फिरलों व आश्रमांत जाण्यापूर्वी हाईड पार्क नामक उद्यानभूमिकांत अल्पकाल परिक्रमण केलें.

उद्यानभूमिका–हाइड पार्क.

लंडनशहरांत निरनिराळ्या रस्त्यावर चतुष्कोनाकृति अर्धचंद्राकार व वर्तुळाकार अशा मोकळ्या जागा आहेत हें पूर्वी सांगितलेलेंच आहे. या रिकाम्या जाग्यांतून लहानमोठीं झाडें लाविलेलीं असतात व अभ्यागत जनांस विश्रांति घेण्यासाठीं कांहीं आसनेंही मांडलेलीं असतात. अशा प्रकारच्या स्थळोद्यानांचा उपयोग सर्वांस सर्वकालीं थोड्या अवकाशांतही होण्यासारखा असतो. परंतु याशिवाय शहरच्या निरनिराळ्या भागांत विस्तीर्ण अशीं उपवनें आहेत, व येथें आजूबाजूच्या लोकांस यथावकाश वनश्रीची शोभा पाहून व जनसमूहाच्या आनंदांत विभागी होऊन मनाचें रंजन व श्रमाचें निरसन करण्यास संधि सांपडते. अशीं उद्यानें एकंदर दहा आहेत. पश्चिमभागांत रीजन्ट्स पार्क, हाईड पार्क

केन्सिगटन गार्डन्स, ग्रीन पार्क व सेंट जेम्सेस पार्क-दक्षिणेस बाटर्सी पार्क व केनिंग्टन पार्क;-पूर्वेस व्हिक्टोरिया पार्क, साउथवर्क पार्क, व ग्रीनिच पार्क;-या शिवाय नगराच्या कांहीं प्रांतांत व उपनगरांतून विस्तीर्ण व हिरव्या गवतानें आच्छादित अशा मोकळ्या जागा आहेत, त्यांस ग्रीन्स व कामन्स ह्मणतात. पश्चिम भागांत सर्व अमीर उमराव व संपन्न लोक रहातात हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां या भागांतील उद्यानभूमिका सर्वांत श्रेष्ठ व सर्वांपेक्षां सुखोपभोगास अनुकूल हें सांगणें अनवश्यक आहे. त्यांतूनही हाइड पार्क हें ठिकाण उपवनललाम ह्मटल्यास बाध येणार नाहीं.

ह्या बगीच्याच्या पश्चिमेस याला लागूनच केन्सिगटनची बाग आहे. या दोन्ही उद्यानभूमिका एकत्र घेतल्या तर यांचा विस्तार इतरां पेक्षां जास्त आहे. परंतु केवळ हाईडपार्कचाच विचार केला तर त्याचा विस्तार रिजन्ट्स पार्कच्या खालोखाल आहे. प्राचीन काळीं या ठिकाणीं हरिणाची शिकार करीत असत. नंतर कांहीं काल पर्यंत येथें घोड्यांच्या शर्यती होत असत. दुसऱ्या चार्लसच्या राज्यांत येथें एक वर्तुलाकार जागा तयार केली होती व तेथें सर्व शोकी लोक उत्तम प्रतीच्या वाहनांत बसून विहार करण्यास जात असत. कधीं कधीं स्त्रीजन कपटवेष परिधान करून येत असत. यामुळें बराच अनाचार माजला ह्मणून तो प्रकार बंद करण्यांत आला. नंतर कांहीं दिवस ही जागा ओस पडली होती व कधीं कधीं द्वंद्वयुद्धाचे प्रसंग येथें घडत असत.

प्रस्तुत काळीं या उद्यानभूमिका सर्व लंडन शहरांत रमणीयतम असा दृग्विषय बनून राहिल्या आहेत. यांचा विस्तार ३९० एकर असून सर्व बाजूंनीं लोहमय शलाकांचें आवरण आहे. वाहनांचा प्रवेश होण्यासारखीं प्रशस्त अशीं नऊ द्वारें असून शिवाय पादचारि जनांच्या उपयोगासाठीं दुसरीं पुष्कळ द्वारें आहेत. हीं सर्व मध्यरात्रीस बंद होतात. कांहीं ठिकाणीं गाड्यांसाठीं दुहेरी दरवाजे आहेत. एका दरवाजानें गाड्या आंत जातात व दुसऱ्या दरवाजानें बाहेर

येतात. दरवाजावर "IN" व "OUT" ह्मणजे 'आंत जाण्याचा रस्ता' व 'बाहेर निघण्याचा रस्ता' असे शब्द लिहिलेले असतात व या व्यवस्थेचा अतिक्रम न होऊं देण्याविषयीं पोलिस फार खबरदारी ठेवितात. सर्व दरवाजांमध्यें फार रहदारीचे ह्मणजे ईशान्य टोंकास कंबरलंडगेट व आग्नेय टोंकास हाईडपार्क कार्नर. या दोन्ही बाजूंनीं जनसंमर्द फार लोटत असतो व कधीं कधीं गाड्यांची इतकी गर्दी होते कीं दहा दहा पंधरा पंधरा मिनिटें मुक्काम करावा लागतो. कंबरलंड दरवाजावर एक भव्य शुभ्रमर्मरोपलनिर्मित अशी कमान आहे. ही कमान चवथ्या जार्जानें बकिंगहम नांवाच्या प्रासादासाठीं आठ लाख रुपये खर्च करून करविली होती, व १८५१ सालीं तिची स्थापना या स्थलीं झाली. या कमानीचे पृष्ठभाग मलीन झाल्याकारणानें प्रेक्षकांस श्वेतमर्मराचा प्रत्यय येत नाहीं. दरवाजे पंचरसी धातूचे असून फार सुंदर आहेत. हाईडपार्क कार्नरच्या बाजूचा दरवाजाही सुरेख आहे. यांत मध्यभागीं एक मोठा दरवाजा असून बाजूला दोन लहान दरवाजे आहेत. या कोंपऱ्याजवळच ड्यूक आफ वेलिंगटन, बॅरन राथ्सचाइल्ड, लार्ड नार्थब्रुक यांचीं मंदिरें आहेत, व याच बाजूला ड्यूक आफ वेलिंगटन यांचें स्मारक ह्मणून एक ऑकिलीजचा पुतळा ठेविलेला आहे. आंग्ल स्त्रियांनीं वर्गणी जमा करून हा पुतळा १८२२ सालीं करविला.

या विस्तीर्ण उपवनांत सौन्दर्यजनक व सौन्दर्यपोषक अशा सर्व उपायांची योजना केलेली आढळते. सर्व भागांत प्रशस्त व सुरेख असे रस्ते केलेले आहेत. अश्वारुढ जनासाठीं स्वतंत्र मार्ग आहे त्यास 'राटन रो' ह्मणतात. यानाधिष्ठितासाठीं विस्तीर्ण रस्ते आहेत. त्यांच्या बाजूंनीं पार्श्वपथ असून त्यांवर लहान मोठीं आसनें ठेविलेलीं आहेत. या रस्त्यांच्या बाजूंनीं कमरेइतक्या उंचीचे कठडे आहेत. दक्षिण व पूर्व बाजूंच्या टोंकास पुष्पांचे गालीचे बनविलेले आहेत. कांहीं ठिकाणीं मध्यम उंचीचीं झाडें आहेत व बहुतेक सर्व ठिकाणीं उच्च प्रच्छाय अशा वृक्षांची गर्दी आहे. 'राटन रो' च्या बाजूनें वृक्षांची फारच गर्दी आहे, व प्रातःकाळीं सूर्योदय झाल्या-

वर धुकें नाहींसें होत चाललें ह्मणजे अवशिष्ट राहिलेले जलकण पल्लवाग्रावर सूर्यकिरणांच्या तेजानें चमकत असल्यामुळें शोभा केवळ अवर्णनीय भासते. उपवनाच्या मध्यभागीं वृक्षांची इतकी गर्दी आहे कीं रविकिरणासही तेथें प्रवेश मिळत नाहीं. कांहीं ठिकाणीं सुंदर अशीं जलोद्धारयंत्रें आहेत व त्यांच्या बाजूनें वर्तुलाकार वृक्षवाटिका काढिलेल्या आहेत. एका यंत्राभोंवतीं शेक्सपियर, चासर व मिल्टन यांचे पुतळे आहेत, व त्यांच्याजवळ ट्राजेडी, कामेडी व पोएट्री यांच्या प्रतिकृति आहेत. स्थलीं स्थलीं हौशी लोकांच्या उपभोगास अनुकूल अशीं लतागृहें आहेत. इतर सर्व जागेवर मनोहर अशा हरिततृणाचें आच्छादन आहे. त्यामुळें कोणत्याही दिशेकडे दृष्टीची प्रेरणा केली तरी आनंद झाल्याशिवाय रहात नाहीं. उपवनाच्या नैर्ऋत्य भागांत एक कृत्रिम नदी आहे. ही नदी दुसऱ्या जार्जच्या राणीनें करविली होती. हल्लीं हिला पाण्याचा पुरवठा टेम्स नदीपासून आहे. या नदीचा कांहीं भाग केन्सिंगटन गार्डन्समध्यें आहे व कांहीं हाइडपार्कमध्यें आहे. हिची लांबी बरीच असून हिच्यावर एक सुंदर पूल आहे. या पुलावरून आसमन्ताद्भागाची शोभा फार चांगली दिसते. नदीच्या मध्यभागीं पाणी सात फूट खोल असून कांठाजवळ तीन फूट खोल आहे. नदीच्या उत्तर तीराशीं समांतर असा एक सुरेख रस्ता गेलेला आहे; त्यावरून गाड्यांत बसून श्रीमंत लोक सहल करीत असतात. बाजूनें पार्श्वपथ आहेत, त्यांवरही पुरुष, स्त्रिया व बालकगण बसलेले असतात. तीरावर स्थलीं स्थलीं घाट आहेत, त्यांना लागूनच लहान लहान नौका उभ्या असतात. घाटांच्या वरच्या बाजूस वल्हीं वगैरे सामान ठेवण्यासाठीं काष्टफलकनिर्मित अशीं लहान गृहें आहेत. नदीवर फिरण्यासाठीं भाड्याच्या होड्या असतात, व होड्या चालविणारे लोकही भाड्यानें मिळतात. नदींत स्नान करण्याची मनाई आहे. ग्रीष्म ऋतूंत मात्र सकाळीं आठ वाजण्यापूर्वी व संध्याकाळीं आठ वाजल्यानंतर एक तास स्नान करण्याची परवानगी असते. या वेळेस एक ध्वज उभारण्याची चाल आहे. वेळ संपली ह्मणजे बावटा खालीं

करितात, व तावडतोब सर्वजण स्नान आटपून आपआपली वाट धरितात. स्नानाच्या वेळीं मात्र एकच कल्लोळ उडालेला असतो. साधलेल्या प्रसंगाची संभावना करण्याविषयीं मंडळीची उत्कंठा फारच असते. कोणी ओरडतात; कोणी हंसतात; कोणी मस्ती करितात व कोणी पाण्यावर हात आपटून आवाज करितात. एकंदरीनें अल्प अवकाशांत उच्छृंखलपणानें जेवढी ह्मणून मौज होईल तेवढी करण्यांत सर्व लोक व्यापृत असतात. नग्न होऊन जलविहार करण्याचा आंग्ल लोकांचा संप्रदाय आहे. पुष्कळ लोक एका स्थळीं असले तरी एकमेकाची फारशी लज्जा बाळगीत नाहींत. ही चाल शिष्टाचाराशीं कशी संवादक होत असेल कोण जाणें ! हिंवाळ्यामध्यें या नदीचें पाणी थिजून जातें तेव्हां या घनीभूत जलराशीवर पादुकाविशेषाचा उपयोग करून विसर्पण करण्याची मौज पुष्कळ लोक अनुभवितात. यासमयीं कोणास कांहीं दुखापत झाल्यास त्याच्या तजविजीसाठीं रायल ह्यूमेन सोसायटीनें येथें एक दवाखाना ठेविला आहे.

या नदीचें पात्र विस्तीर्ण असून पाणी स्वच्छ आहे, व तीरप्रान्त परिष्कृत असल्या कारणानें प्रवाहाची नैसर्गिक शोभा अधिकतर झाली आहे. कांहीं भागीं पुष्पवृक्ष व हरिततृणभूमिकांच्या योगानें कृत्रिम सौंदर्य आलें आहे व कांहीं भागीं छायावृक्ष व वनलता यांच्या योगानें वनश्रीची प्रतीति येते. कांहीं स्थलीं अभ्यागत जनांच्या संचारामुळें व अश्वांच्या व वाहनांच्या आक्रमणामुळें उपवनप्रान्त कलकलमय असतो व कांहीं स्थलीं पवनान्दोलित वृक्षपर्णांच्या ध्वनीशिवाय इतर ध्वनि श्रुतिगोचर नसल्यामुळें प्रशान्त असतो. अशा भागांत जे जन संचार करितात, ते केवळ विविक्ताभिलाषी असल्या कारणानें ते प्रदेशाच्या शान्ततेचा भंग करण्यास अनिच्छु असतात व ह्मणूनच त्यांच्या संचारामुळें शांततेचा भंग होत नाहीं एवढेंच नाहीं तर त्यांच्या मौनामुळें प्रदेश जास्त गंभीर भासतो.

वसंत व ग्रीष्म ऋतूंमध्यें या उद्यानभूमिकांची शोभा अव-

र्णनीय असते. या दिवसांत सर्व अमीरउमराव व संपन्न आणि चैनी लोक लंडन शहरांत वास करितात व त्यांची फेरफटका करण्याची जागा हीच असते. घोड्यावर बसून फेरफटका करण्याची वेळ दुपारीं बारा वाजल्यापासून दोन वाजेतों पर्यंत असते. परंतु सायंकालच्या सुमारासही कांहीं लोक घोड्यावर बसून फिरतांना आढळतात. त्यांचे ते सुंदर व तेजस्वी घोडे मोठ्या ऐटींत असतात व मोठ्या आवेशानें कधीं भरधांव जात असतात व कधीं ठुमकत ठुमकत नाचत असतात. त्यांच्या तऱ्हेवरून जणूं काय यजमानांच्या श्रीमंतीचाच दिमाख ते मिरवितात असें वाटतें. बरोबर एखादुसरा अश्वारूढ नोकर असतोच; त्याचीही झाकी कमी असते असें नाहीं. डोक्याला उंच पंचपात्री सारखी टोपी, हातांत स्वच्छ सफेद हातमोजे, पायांत बूट व गुढग्यापर्यंत ब्रीचेस, हातांत चाबूक व कधीं कधीं बरोबर एक रिकामा घोडा—याप्रमाणें हा नोकरही मोठ्या झोंकांत असतो; परंतु याला मिशा बिलकुल नसावयाच्या. लंडन शहरांत असा रिवाज आहे कीं सर्व पुरुष चाकरांनीं आपआपल्या मिशा काढावयाच्या. बटलर, खानसामा, घोडेवाले कोचमन वगैरे सर्व नोकरांत हा रिवाज आढळतो, व विशेषेंकरून श्रीमंत लोकांच्या नोकरांत तर फारच जारी आहे. याचें कारण काय असेल तें समजत नाहीं. मीं एका गृहस्थाजवळ चौकशी केली. त्यानें असें सांगितलें कीं केशवपन हें एक नम्रतेचें चिन्ह आहे व नोकरांनीं मिशा ठेवणें ह्मणजे औद्धत्यसूचक आहे; असो. गाड्यांची गर्दी सायंकाळीं ५–७ पर्यंत असते. भाड्याच्या गाड्यांस आंत जाण्याची मनाई असते. केन्सिंगटन गार्डन्स व हाइडपार्क यांच्या दरम्यान एक रस्ता आहे, त्या रस्त्यानें मात्र भाड्याच्या गाड्या जाऊं देतात. या समयीं मजा फार पहाण्यासारखी असते. अव्वल राजवंशीय पुरुषांपासून तों नुकत्याच भाग्यास चढलेल्या अरेरावापर्यंत सर्व दर्जाचे लोक आपल्या उज्वल व प्रशस्त वाहनांत बसून, सुंदरवेषविभूषित, बहुमूल्य अशा अलंकारांनीं मंडित व नैसर्गिक लावण्यानीं युक्त अशा स्त्रीजनासमवेत बाजूनें जनसंमर्द टकटक पहात असतां मंद गतीनें जात असतात.

गाड्यांची गर्दी फार असते ह्मणून मंद गतीशिवाय दुसरी गति शक्यच नाहीं हें खरें, परंतु कदाचित् गर्दी नसतांही घोडे असेच मंदगति जातील अशी माझी कल्पना आहे; कारण कीं त्यांच्या त्या फुरफुरण्यावरून व खिकाळण्यावरून व त्यांच्या मानेच्या ऐटदार हलण्यावरून व जणुं काय तालाबरहुकूम होत असलेल्या पादविक्षेपावरून मला असा नेहेमीं भास होई कीं आपल्या यजमानांच्या भाग्याचा अभिमान त्यांचे ठायीं पूर्णपणें वास करीत आहे, व प्रेक्षक जनांस त्या भाग्याची स्फुट प्रतीति देण्यासाठींच ते मंदगति चालतात. कांहीं घोड्यांस कर्णफुलें लाविलेलीं असतात, व नोकर लोकांच्या टोप्यांवरही एका प्रकारचीं फुलें चिकटविलेलीं असतात. ज्यांस वाहनांची अनुकुलता नसते ते पायांनींच पार्श्वपथावरून परिक्रमण करीत असतात. लहान मुलांची गर्दीही बरीच असते. नाना तऱ्हेच्या लहान लहान गाड्यांतून सुबक व नीटनेटके कपडे घातलेलीं मुलें दृष्टीस पडतात. कांहीं फिरत असतात व कांहीं त्यांच्या अवस्थेस अनुरूप अशा क्रीडांत व्यापृत असतात. पार्श्वपथावरून वाहनांत जाणारा असा मुलांशिवाय दुसरा एक अभ्यागत गण असतो. तो कोणता म्हणाल तर अशक्त व रुग्ण जनांचा. लहान मुलांना बसवून फिरविण्याच्या ज्या गाड्या असतात त्यांपेक्षां मोठ्या आकृतीच्या अशा गाड्यांत बसून अतिवृद्ध व रोगग्रस्त असे लोक शुद्ध वातावरणांत कांहीं कालक्रमण करण्याच्या इराद्यानें हिंडत असतात. गाडीच्या पिछाडीस एक दांडा असतो. तो दांडा धरून गाडी लोटण्यासाठीं एक मनुष्य बरोबर असतो. या गाड्यांसही मुलांच्या गाड्यांप्रमाणेंच पार्श्वपथावरून जाण्याची परवानगी असते. ह्या गाड्या फार हलक्या असून ओढण्यास जड नसतात. आपल्या इकडे माणसें अतिवृद्ध झालीं म्हणजे चालण्याची शक्ति नाहीं ह्मणून घरांतच नेहमीं खितपत पडतात व चांगल्या स्वच्छ हवेचा उपभोग त्यांस कधींच न मिळाल्या कारणानें ते जास्त थकत जातात. त्या लोकांनीं या सोयीचा उपयोग केला असतां अवशिष्ट राहिलेली आयुष्ययात्रा त्यांस फार कष्टावह होणार नाहीं. यास खर्च काय तो प्रथम गाडी

घेण्याचा; नेहमींचा गडी ठेविण्याचेंही कारण नाहीं. वेळेपुरता मजूर बोलाविल्यासही चालण्यासारखें असतें. परंतु हा विचार आपल्या लोकांच्या मनांत यावयाचा नाहीं. हरप्रयत्न करून व सर्व उपायांची योजना करून सर्व स्थितींतल्या लोकांस शरीरयात्रा सुखावह व्हावी हा जो आधुनिक उन्नतीचा मुख्य सिद्धांत त्याचा परिचय आमच्या लोकांस होण्यास अजून किती काल लागेल कोण जाणें.

रविवारच्या दिवशीं या उद्यानांत दुपारपासूनच लोकांची गर्दी असते. सर्व कामाकाजाच्या लोकांस त्या दिवशीं सुटी असल्या कारणानें ते लोक सकुटुंब सपरिवार इतर दिवशीं असुलभ अशा आनंदाचा उपभोग घेण्यासाठीं बराच काळ येथें घालवितात. सायंकालच्या सुमारास तर गर्दी फारच असते. स्थलीं स्थलीं हजारों आसनें आहेत तीं सर्व भरून गेलेलीं असतात व पुष्कळ लोकांस उभें रहावें लागतें. इतर दिवशीं दुपारीं उद्यानप्रदेश शून्य असतो. रस्त्यांच्या बाजूच्या भागांत क्वचित् कोणी श्रांतजन विश्रांति घेण्यासाठीं बसलेले आढळतात, व कांहीं रिकामटेकडे लोक इतस्ततः भ्रमण करीत असतात. उद्योगक्षम असूनही उद्योगपराङ्मुख, व्यसनासक्त व दारिद्र्यपीडित असे कांहीं लोक येथें दृष्टीस पडतात. यांस रहाण्यासवरण्याचेंही ठिकाण असेल किंवा नाहीं याची शंकाच वाटते. यांचे कपडे मलिन व फाटके, शरीर स्नानसंस्काराच्या अभावामुळें तेजोहीन, व मुद्रा क्षुधार्ततेमुळें व दुर्व्यसनाधीनतेमुळें राकट व भयंकर अशी असते. यांस पाहून नव्या माणसास भय वाटल्याशिवाय रहात नाहीं. प्रसंगीं घोरकृत्य करण्यासही हे लोक मागें पुढें पहाणार नाहींत असें त्यांच्या तऱ्हेवरून वाटतें. अशा प्रकारचे लोक दिवसा रात्रीं या स्थलीं लोळत पडलेले असतात. मध्यरात्रीस दरवाजे लागले तरी ते तसेच निजून रहातात, व प्रातःकाळीं पोटाची कशी तरी व्यवस्था लावण्यासाठीं बाहेर पडतात.

रात्रीं आठ वाजल्यानंतर सभ्य पुरुष व स्त्रिया या उपवनांत संचार करीत नाहींत. सर्व उपभोगास अनुकूल अशा या

बगीच्यांत सुखप्रद अशा चंद्रिकेचा व रमणीय अशा प्रदोष समयाचा अनुभव मिळण्यास सभ्य जनांस अवकाश नसावा हें आश्चर्य वाटण्यासारखें खरें. रात्रीं सर्व अंधकारमय असतें असें नाहीं, स्थलीं स्थलीं दीपस्तंभ असून दीपांचा प्रकाशही उज्ज्वल असतो. रहदारीच्या रस्त्यावरून शिपाई लोक उभे असतात व त्यामुळें अभ्यागतजनांस निःशंकपणें फिरण्याची सवड असते. असें असतां आठ वाजल्यानंतर सभ्य लोक येथें कां आढळत नाहींत? अशी कल्पना होण्याचा संभव आहे कीं इंग्लंड देश उद्योगाचें माहेरघर व त्यामध्यें लंडन शहर हें आदिपीठ, तेव्हां तत्रस्थ जनांस अनेक कार्यव्यापृततेमुळें ऐष आरामास सवड मिळत नसेल; परंतु ही कल्पना अनवकाश आहे. लंडन उद्योगाचें आदिस्थान खरें; परंतु त्याच मानानें तें चैनबाजीचेंही आदिस्थान आहे. आपापलें काम संभाळून चैन करण्यास तेथील लोक मागेंपुढें पहात नाहींत. कदाचित् हेंच त्यांच्या उद्योगशीलतेचें बीज असेल. कांहीं कालपर्यंत सतत परिश्रम केल्यानें खिन्न झालेल्या मनास उल्लसित करणाऱ्या साधनांचा उपयोग केल्यानें श्रमाचा अपहार होऊन कार्यक्षमता वाढते हें निर्विवाद आहे, व अशा प्रकारच्या साधनांचा उपयोग करण्यांत आंग्लजनपद फारच तत्पर असतात. तर मग हाइडपार्क सारख्या ठिकाणीं यांचा संचार कां नसता याचें उत्तर काय? याचें मलाही गूढ होतें; परंतु चौकशीअंतीं असें कळून आलें कीं या उपवनांत प्रदोषसमय अतिक्रांत झाल्यानंतर असभ्य अशा नरनारी जनांची रहदारी असते, व सर्व भागांत, व विशेष करून कृत्रिम नदीच्या तीरप्रांतीं व प्रछाय वृक्षवाटिकांमध्यें, या लोकांचा संचार फार असतो, व शिष्टजन अशा जनांच्या संसर्गाचा दोष टाळण्याकरितांच या स्थलीं प्रदोष समयानंतर येत नाहींत. याप्रमाणें जरी शंकासमाधान झालें तथापि कांहीं गोष्टी मला फार विसंवादक वाटल्या. शहराच्या ज्या भागांत या उद्यानभूमिका आहेत तो भाग उच्च प्रतीच्या लोकांचें निवासस्थान आहे; असें असतां रात्रींच मात्र असभ्य लोकांस तेथें जाण्यास सवड कशी मिळते ही एक गोष्ट; व दुसरी ही कीं होत असलेला अनाचार जर सर्व ज-

नांस मह्शूर आहे तर त्यास प्रतिबंध करण्यासाठीं अधिकारि जनांकडून तजवीज कां होत नाहीं. या दोन गोष्टींचा मात्र उलगडा झाला नाहीं. मीं असें ऐकिलें कीं उघड रीतीनें अश्लील वर्तन करणाऱ्या स्त्रीजनांस पोलिसचे शिपाई बाहेर घालवून देतात. परंतु एका दरवाजानें बाहेर घालविलें असतां दुसऱ्या दरवाजानें त्या आंत येतात. मिळून प्रतिबंध केला आणि न केला सारखाच होतो. सारांश जें स्थळ अपराण्हीं व प्रदोषसमयीं आनंदजनक व नयनांस कृतार्थ करणारा असा दृग्विषय असतें तेंच स्थल रात्रीं अनाचारदूषित असतें व असभ्य जनांच्या संकेताचें स्थान होतें. यासंबंधानें विशेष पाल्हाळ लावण्याचा माझा विचार नाहीं. परंतु या गोष्टीचा मुळींच उल्लेख न करणें ह्मणजे या उद्यानांच्या यथार्थ वर्णनांत वस्तुस्थितीचा अपलाप केल्यासारखें होईल ह्मणून केवळ दिङ्निर्देश मात्र केला आहे.

प्रसंगविशेषीं या उद्यानांत सेनानिरीक्षणाचे समारंभ होत असतात. वसंतऋतूमध्यें चार घोड्यांच्या गाड्या (कोचेस) एकत्र जमून या उपवनामधून जातात, त्या वेळेस दिदृक्षुजनांची गर्दी बरीच असते. श्रीमंत लोक शोकासाठीं अशा गाड्या बाळगितात हें मागें सांगितलेंच आहे व या गाड्या कोणत्या प्रकारच्या असतात याचाही निर्देश पूर्वीं केलाच आहे. अशा गाड्यांच्या मालकांचे कांहीं समूह (क्लब्स) आहेत व वसंतऋतूमध्यें यांची मिरवणूक निघते, तेव्हां मोठमोठे लार्ड वगैरे उच्चप्रतीचे लोक स्वतः गाड्या हांकतात. मी तेथें असतांना हा समारंभ एकदां झाला होता तो मीं पाहिला, परंतु मला त्यांत कांहीं विशेष वाटलें नाहीं. गाड्या चांगल्या खुरेस होत्या व घोडे ऐटदार होते.

या उद्यानांचा दुसरा आणखी विशेष महत्वाचा उपयो आहे. प्रजाजनांमध्यें कांहीं राजकीय किंवा सामाजिक प्रकरणासंबंधीं संक्षोभ उत्पन्न झाला ह्मणजे या स्थलीं हजारों लोक जमतात व आपल्या नायकांचीं भाषणें ऐकून कार्यप्रवृत्त होतात. त्यांस अधिकाऱ्यांकडून प्रतिबंध होतो; परंतु लोक

त्याला जुमानीत नाहींत व हातघाईवर येतात. अशा प्रकारच्या जंगी सभा अनेक प्रसंगीं झाल्या आहेत. १८६६ सालीं एक फार मोठा समाज जमला होता तेव्हां लोकांनीं उद्यानाभोंवतालचें शलाकांचें आवरण मोडून टाकिलें होतें व अडीचशें शिपायांस जखमी केलें होतें. आयरिश कोअर्शन बिलासंबंधीही १८८७ सालीं एक जंगी सभा येथेंच भरली होती.

याप्रमाणें या उपवनाची हकीकत आहे. येथें कांहीं वेळ सहल करून आह्मी घरीं परत आलों. आमचें निवासस्थान निकट असल्यामुळें अनेक प्रसंगीं आह्मांस उपवनांत जाऊन सुखोपभोग घेण्यास संधि मिळत असे.

तारीख ७ मे रोजीं मी घरीं एकटाच होतों; तेव्हां स्वतंत्रपणें फिरण्यास ही संधि बरी आहे असें वाटून मी बाहेर निघालों. कै० श्रीपाद बाबाजी ठाकूर हे त्यासमयीं सकुटुंब लंडन शहरीं रहात होते, परंतु त्यांचा नक्की पत्ता मला ठाऊक नव्हता. माझा त्यांचा तेव्हां विशेष परिचय नव्हता. तथापि परदेशांत स्वदेशीयांची भेट झाल्यानें मनास फार समाधान वाटेल असा ग्रह होऊन मी त्यांच्या शोधार्थ निघालों. लंडनसारख्या अफाट नगरांत नामांकित मंडळींचीही “ किस गल्लीमे गलबला ” अशी स्थिति असते. तर तेथें साधारण माणसाचा शोध कसा लागावा ? ही अडचण मनांत आणून मी नार्थब्रूक इंडियन क्लबमध्यें जाण्याचा विचार केला. आपल्या इकडील लोकांच्या सोयीसाठीं ही संस्था मुद्दाम नार्थब्रूक साहेबांनीं हिंदुस्थानांत व इंग्लंडांत द्रव्य जमा करून स्थापिली आहे; परंतु हिची स्थिति फारशी भरभराटीची आहे असें मला दिसलें नाहीं. व्हाइट हॉल गार्डन्स नामक, पार्लमेंटसभागृहें व इंडिया आफिस वगैरे सरकारी कार्यगृहांनजीकच्या, प्रांतांत एक लहान तीन मजली इमारत आहे तेथें मी गेलों. दाराशींच उजव्या हाताला एक लहानशी खिडकी होती तेथें एक नोकर उभा होता. या नोकरानें आस्थापूर्वक चौकशी केली, परंतु त्याला अपेक्षित माहिती देतां आली नाहीं; कारण कीं रा० ठाकूर हे त्या क्लबाचे स-

भासद् नव्हते. दुसरे कोणी सभासद् तेथें असल्यास त्यांस माहिती विचारावी असें मनांत आलें. परंतु तेथें त्या वेळेस कोणीच हजर नव्हते. या गृहांत थोडया लोकांस रहाण्याची सोय असते, व वेळीं सूचना दिल्यास वाटेल तितक्या सभासदांची नेमलेल्या वेळीं खाण्यापिण्याची सोय होते. येथें जेवणाखाणाची सर्व व्यवस्था तळमजल्यावर आहे. दुसऱ्या मजल्यावर वाचनगृह व पुस्तकालय आहे व खेळण्यासवरण्यासाठीं एक निराळी खोली आहे. तिसऱ्या मजल्यावर रहाण्याची सोय आहे. स्वदेशीय मंडळींची गांठ पडण्याचें हें चांगलें साधन आहे; परंतु वर्गणी बरीच जबर असल्यामुळें सर्व लोक सभासद् होत नाहींत. नगरवासिजनांस वर्षाची वर्गणी सुमार चाळीस रुपये आहे, व बाहेरगांवच्या लोकांस तीस रुपये आहे. शिवाय चहापाण्याचा व जेवणाखाण्याचा खर्च. आणखी एका प्रसंगीं मी या गृहीं गेलों होतों तेव्हां तेथें सारे पांच सहाच लोक होते. ते सर्व तेथें भोजन करीत होते. माझ्याविषयीं आस्था फारशी कोणीच दाखविली नाहीं ! परदेशांत स्वदेशीयांनीं आपला अनादर करावा व परदेशीयांनीं आपलें अत्यादरपूर्वक स्वागत करावें हें नवलच ! असो.

या ठिकाणीं ठाकूरसाहेबांचा पत्ता न लागल्यामुळें मी पंचाइतींत पडलों; परंतु केवळ यत्न करून पहाण्याच्या इरादानें माझ्याजवळ जो अपुरा पत्ता होता त्या पत्त्याचा शोध लावण्याचा मी निश्चय केला. प्रथम एका पोस्ट आफिसांत गेलों. तेथें पोस्ट मास्तराचें काम करणारी एक तरुण व सुंदर युवती होती. स्त्रियांचा प्रवेश विशिष्ट प्रकारच्या कार्यगृहांत झालेला आहे हेंवढें ऐकिलें होतें, परंतु या गोष्टीचा अनुभव पूर्वी न आल्याकारणानें मला फारच नवल वाटलें व त्या स्त्रीशीं बोलण्याचा मला धीर होईना. आपण वाट चुकून भलत्याच ठिकाणीं आलों असा माझा प्रथम तर्क झाला; ह्मणून मी इकडे तिकडे पाहूं लागलों तों एका बाजूस एक पुरुष दृष्टीस पडला. त्याजवळ पोस्ट आफिसाची चवकशी केली. त्यानें कसली माहिती पाहिजे

ह्मणून विचारलें व पत्त्याबद्दल दोघांनींही तपास करून कांहीं थांग न लागल्याबद्दल खेद प्रदर्शित करून मला वाटेस लाविलें. तेथून दुसऱ्या एका आफिसांत मी गेलों. तेथें अमुक ठिकाणीं कांहीं हिंदुस्थानी लोक रहातात अशी बातमी मिळाल्यावरून मी तिकडे गेलों, व एका घराचें दार ठोकूं लागलों. इतक्यांत एक कृष्णवर्ण गृहस्थ साहेबी पोषाक करून व पंचपात्रीसारखी टोपी घालून बाहेर आले. त्यांच्या वर्णावरून मात्र ते हिंदुस्थानी असावे असें वाटलें. इकडून तिकडे गेलेली सर्व मंडळी याप्रमाणें पोषाक करितात. याचें इंगित काय असेल कोण जाणे. त्यांस असें करण्यांत भूषण वाटतें कीं काय न कळे. असें सर्वस्वीं आंग्लदेशीयांचें अनुकरण केल्यानें त्या लोकांत आपला मान व आपली प्रतिष्ठा जास्त होते असें ह्मणावें, तर माझा अनुभव अगदीं विरुद्ध होता. अनेक प्रसंगीं आपल्या रीतिरिवाजांचें आपण अवलंबन केल्यानेंच ते लोक आपल्याविषयीं अधिक आदर दाखवितात, असें माझ्या प्रत्ययास आलें होतें. व असें अनुकरण करणाऱ्याविषयीं तिरस्कारबुद्धि प्रकट केलेली माझ्या लक्षांत आली होती. परंतु आपल्या मंडळींचा ग्रह अगदीं विपरीत आहे. मीं आपल्या तऱ्हेचा पोषाक केल्याबद्दल ते मला दूषण देत व ह्मणत कीं, अशा पोषाकानें तुह्मीं रस्त्यांत गेलां तर लोक तुमची टर उडवितील; परंतु याचा मला कधींच अनुभव आला नाहीं. इतकें खरें कीं वाटेनें लोक आपल्याकडे टकमक पाहूं लागतात व लहान पोरें व हलकट लोक प्रसंगीं दुरून आपली चेष्टाही करितात. पण हें साहाजिकच आहे. ज्या देशांत जो रिवाज आहे त्याहून भिन्न कोणतीही गोष्ट असली ह्मणजे त्याचें लोकांस आश्चर्य वाटतें; परंतु विस्मयप्रदर्शनापलीकडे मजल गेलेली माझ्या पाहण्यांत आली नाहीं. कधीं ह्मणजे माझ्या भोंवताली लोक जमून त्यांनीं माझ्यावर गर्दी केली असें माझ्या अनुभवास आलें नाहीं. असो. " भिन्न रुचिर्हि लोकः " या उक्तीप्रमाणें रुचिवैचित्र्य असल्यास त्याबद्दल दोष देण्याचा अधिकार मला नाहीं. तथापि हा प्रकार मला प्रशस्त वाटला नाहीं, येवढें सांगितल्यावांचून मला राहवत नाहीं.

जे गृहस्थ मला भेटले ते जातीचे मुसलमान होते, व ते बॅरिस्टरची परीक्षा देण्यासाठीं तेथें राहिले होते. त्याच सुमारास ठाकूरसाहेबांनींही बॅरिस्टरची परीक्षा दिली होती, ह्मणून त्यांची व यांची मुलाकत 'इन्स आफ कोर्टस्' येथें होत असे व ठाकूरसाहेबांचा पत्ता यांस ठाऊक होता. खास पत्ता मिळाल्यावर घर सांपडण्यास बिलकुल उशीर लागला नाहीं. थोड्या अवकाशांत त्यांच्या दाराशीं जाऊन दार ठोकीत मी उभा राहिलों. एका परिचारिकेनें दार उघडल्यावर ठाकूरसाहेब घरांत आहेत किंवा नाहींत याची चौकशी केली व आहेत असें कळल्यावर माझ्या नांवाची चिठी आंत पाठविली. त्यांनीं मला आंत बोलाविलें व कुशल प्रश्न विचारल्यावर कांहीं वेळ आह्मीं स्तब्ध बसलों. त्यांची मुद्रा मला साशंक दिसली व माझ्या भेटीपासून त्यांस आनंद झाला असें दिसलें नाहीं, तेव्हां मला फारच वाईट वाटलें. त्यांस भेटण्यांत माझा कांहीं विशेष हेतु नसतां त्यांस माझ्याबद्दल शंका यावी याचें मला आश्चर्य वाटलें, व तसाच उठून येणार होतों इतक्यांत कांहीं इतर प्रश्नांवरून त्यांस माझी ओळख जास्त पटली व त्यांची मुद्रा एकदम बदलली. ते आपल्या आईकडे मला घेऊन गेले व कांहीं काल शिळोप्याच्या गोष्टींमध्यें आनंदानें गेला. नंतर मला घरीं पोंचविण्याकरितां ते माझ्या बरोबर आले व लंडन शहरासंबंधीं कांहीं उपयुक्त माहितीही त्यांनीं मला दिली. हा दिवस माझा फारच सुखाचा गेला. हिंदुस्थान सोडल्यापासून नुसतें मराठी बोलण्याचाही प्रसंग आला नव्हता व स्नेही कोणी न भेटल्यानें मन उत्कंठित झालें होतें; तें या प्रसंगीं शांत व स्थिर झालें व पुढील कालक्रमणेविषयीं अधिक उत्साह आला.

वरील कथानकावरून दोन तीन गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. घराचा नंबर, रस्त्याचें नांव व प्रांताचें नांव, इतकें पक्कें ठाऊक असल्याशिवाय लंडन शहरांत पत्ता लागणें कठीण. पत्ता लागण्याचें दुसरें एक साधन असतें, त्याचाही याच स्थलीं उल्लेख केला असतां अप्रासंगिक होणार नाहीं. मध्यम स्थितीच्या बहुतेक लोकांचे व आपल्या हिंदुस्थानांत नोकरी करणाऱ्या साहेब लोकांचे गुमास्ते असे कांहीं पेढीवाले लोक

असतात; तर अशा पेढीवाल्यांकडे गेलें असतां त्यांच्या गिऱ्हाइकांच्या पत्त्याचा शोध लागतो. अशा पेढीवाल्यांचीं ठळक अशीं आठ दहा ठिकाणें आहेत. याच साधनानें मला दुसऱ्या कांहीं लोकांचा शोध लागला; परंतु आपल्यापैकीं इकडून तिकडे जाणाऱ्या लोकांमध्यें अशा प्रकारच्या पेढीवाल्यांशीं संबंध कितीकांचा असतो याचा संशयच आहे. असो. दुसरी गोष्ट अशी कीं, आपल्यास माहिती देण्यांत तेथील लोक फार दक्ष व आस्थेवाईक असतात. तिसरी अशी कीं, आपण परदेशांत गेलों म्हणजे आपला जीव सहजच आपल्या लोकांकडे ओढतो. पण तेथें असलेल्या आपल्या लोकांस आपला कंटाळा येतो व आपली पीडा वाटते. परकी लोकच आपलें विशेष स्वागत करतात व आपल्यास मदत करण्यास झटतात. हें जरी आश्चर्य वाटण्यासारखें आहे, तरी अनुभवसिद्ध आहे.

तारीख १० मे रोजीं मी '**क्यूगार्डन्स**' नामक उद्यानभूमिका पहावयास गेलों. या भूमिका रमणीय तर आहेतच, परंतु रमणीयतेपेक्षां त्यांच्या शास्त्रीय उपयोगाची जास्त प्रख्याति आहे. लंडनशहराच्या पश्चिमप्रांतगत उपनगरांपैकीं एका नगरांत हा बाग आहे. हा टेम्स नदीच्या दक्षिण तीराला लागूनच आहे. या स्थलीं जलमार्गानें किंवा दोन्ही प्रकारच्या आगगाड्यांनीं किंवा आम्निबस व ट्रामवे या साधनांनीं जातां येतें. मी घरून निघाल्यानंतर कांहीं वेळ आम्निबसमध्यें बसून लंडनशहराच्या हद्दीपर्यंत गेलों व नंतर ट्रामवेंत बसलों. लंडनशहराची या बाजूची वस्ती बरीच पातळ होती व शहराचा भाग संपल्यावर पुढें तर अगदींच विरळ आढळली; परंतु वस्ती गलिच्छ नसून रस्ते चांगले, लोक सभ्य, व घरें सुरेख दिसलीं. क्यू-बागेजवळ टेम्स नदीवर एक पूल आहे; त्या पुलाच्या पायथ्याशीं ट्रामवेचा रस्ता संपतो. ट्रामवेंतून उतरून पुलावरून पायानेंच जावें लागतें, ही गोष्ट मला सुखावहच झाली; कारण कीं पायीं चालल्यानें जी नदीच्या पात्राची शोभा दृग्गोचर झाली, तिची प्रतीति गाडींत बसून गेल्यानें आली नसती; शिवाय याच ठिकाणीं वळण असल्यानें समग्र पात्र दिसण्यांत येत नव्हतें. नदीचें पात्र फार

रुंद नव्हतें. पाणी शांत व स्वच्छ दिसत होतें. दुरून लहान लहान लांकडी व लोखंडी धक्के दिसत होते त्यांना लागून लहान लहान होडया उभ्या होत्या. कांहीं नौकांमध्यें शोकी लोक बसले होते व स्वतः वल्हीं हातांत घेऊन मोठ्या झपाट्यानें नौका चालवीत होते. त्यांनीं डोक्याच्या टोप्या काढल्या होत्या, अंगरखे टाकून दिले होते व सद्र्यांच्या अस्तन्या वर चढवून मोठ्या आवेशानें ते स्वकार्यव्यग्र होते. नदीच्या पात्रास तीरावर असणारे वृक्ष व लतासमूह यांच्या योगानें सौन्दर्य प्राप्त झालें होतें. पुलाच्या पलीकडे हिरव्यागार गवताचें असें एक मैदान दिसत होतें व बाजूनें एक सरळ रस्ता गेला होता, त्यावरून ट्रामवेच्या गाडया जात येत होत्या. एकंदरीनें दृग्विषय बराच आल्हादजनक भासला म्हणून अल्पकालपर्यंत मी पुलावरच उभा राहिलों.

पूल वलांडून गेल्यावर उजव्या हाताकडे एक रस्ता वळतो, त्या रस्त्यानें गेलें म्हणजे समोरच बगीचा लागतो. येथें प्रवेश होण्यासाठीं कांहीं एक द्यावें लागत नाहीं. बगीचांत सर्व ठिकाणीं व्यवस्थितपणें सर्व प्रकारच्या वृक्षांचा संग्रह आहे असें सांगतात; परंतु मजसारख्या प्राकृत जनाच्या दृष्टीस ती व्यवस्था कशी समजणार ? म्हणून वृक्षपरीक्षणाच्या भानगडींत न पडतां केवळ निरीक्षणाचेंच काम पतकरून इतस्ततः अल्पकाल पर्यंत भ्रमण केलें. या भूमिकांच्या भिन्न भिन्न प्रांतीं चार संग्रहालयें आहेत, तेथें सर्व जातींच्या काष्टांचे तुकडे सुरेख रीतीनें ठेविलेले आहेत. त्या सर्वांवर सुवाच्य अशीं नांवें घातलेलीं आहेत. येथें एक विचित्र प्रकारचा वेल दृष्टीस पडला. त्याचें खोड बरेंच जाड असून त्याचा पीळ फारच चमत्कारिक तऱ्हेचा दिसत होता. उद्यानभूमिका व नदीचें पात्र यांच्या दरम्यान एक विस्तीर्ण क्रीडाकानन आहे. त्याचें क्षेत्रफळ २०० एकर आहे. या काननांत स्थलीं स्थलीं लतागृहें व वृक्षवाटिका आणि प्रशस्त व परिष्कृत असे मार्ग आहेत. या काननाच्या दक्षिणेच्या टोंकास एक देऊळ आहे. त्याची उंची १६५ फूट असून त्याचा शिरोभाग बारा मजली आहे. देवळांत जाण्याची हल्लीं मनाई आहे.

याप्रमाणें या भूमिकांचें निरीक्षण आटपून मी परत निघालों. ह्या भूमिका मुख्य नगराच्या बाहेर असल्यामुळें येथें नेहमीं गर्दी नसते. सणावाराच्या दिवशीं मात्र येथें फार लोक जमतात. मी गेलों त्या दिवशीं पांचपन्नास लोक तर होतेच. जवळपासचीं लहान मुलेंही दिसण्यांत आलीं. एकंदरीनें या स्थलाविषयीं माझा असा अभिप्राय झाला कीं, हें प्राकृत जनास आल्हादप्रद असें ठिकाण नव्हे. एकांतवासाची ज्यास आवड असेल किंवा ज्यास वनस्पतिशास्त्राचें ज्ञान असेल त्यासच हें विशेष सुखकर; परंतु माझ्यासारख्या वैदेशिकास यापासून कर्मणूक न होतां उद्वेगच झाला. असो.

बागेंतून बाहेर पडलेली मंडळी बहुधा सर्व जवळ असलेल्या विश्रान्तिगृहांत जाऊन खाद्य व पेय वस्तूंचा समाचार घेऊन श्रमाचा निरास करीत होती.

तारीख ११ रोजीं आमच्या बरोबरचा एक सोबती मरण पावला. या गोष्टीविषयीं मागें उल्लेख केलाच आहे. स्नेह्याच्या मरणानें आह्मी सर्वजण व्यथित झालों होतों, तथापि दुःखाचाच ध्यास घेऊन त्याची वृद्धि न करितां त्याचें विस्मरण व्हावें ह्मणून मनोविनोदाचे उपाय आह्मीं योजूं लागलों. तारीख १३ रोजीं दोनप्रहरीं इजिप्शिअन् हॉलमध्यें जादूगिरीचा खेळ पहाण्यास आह्मी गेलों. प्रयोग फारच मनोवेधक व चमत्कृतिजनक झाला. दिवसाची वेळ असतांही दिवाणखान्यांत उज्ज्वल असा विद्युत्प्रकाश केला होता. प्रकाशाची शोभा अधिकतर भासण्यासाठीं अर्थात् सर्व दारें बंद केलीं होतीं.

अशा प्रकारची व्यवस्था शीत प्रदेशांतच सुखावह होऊं शकेल. आपल्या देशांत असल्या व्यवस्थेनें उष्णतेची पराकाष्ठा होऊन प्रेक्षकांना सुख न होतां दुःख व उद्वेगजनक स्वेद यांचा परिचय व्हावयाचा ! या स्थलीं एक मोठें चमत्कारिक वाद्य दृष्टीस पडलें. हें पियानोसारखेंच होतें, परंतु त्यांत स्वरांच्या आरोहावरोहाची व ते स्वर विलक्षण तऱ्हेनें उमटविण्याची कांहीं विशेष योजना होती, त्यामुळें साधारण वाद्यांपेक्षां त्यांत मजा विशेष होती.

पार्लमेंट सभागृहें.

याच दिवशीं रात्रीं पार्लमेंटचे सभासद मि० किंग यांच्या निमन्त्रणावरून मी 'हाऊस आफ् कामन्स' पहावयास गेलों. ही सभागृहांची इमारत कोठें आहे व इची बाहेरून आकृति कशी आहे याचें, व इच्या आसमन्ताद्भागांचें वर्णन मागें आलेंच आहे. प्रस्तुत प्रसंगीं मुख्य मुख्य अभ्यंतर कक्षांविषयीं थोडीशी माहिती दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें.

या इमारतींनीं एकंदर आठ एकर जमीन व्यापिली आहे. येथें ११ चौक, १०० जिने, व १,१०० दालनें आहेत, व एकंदर इमारतीवर तीन कोट रुपये खर्च झाले आहेत. या तपशिलावरून इमारतीच्या विशालतेची कल्पना सहज होण्यासारखी आहे. इमारतीचा बाह्य भाग जसा भव्य व सुंदर आहे त्याचप्रमाणें अभ्यंतर भागही प्रचंड व मनोहर आहेत. सर्व स्थलीं नक्षीचें काम अतोनात असून विपुल द्रव्यव्ययाचा प्रत्यय जागजागीं येतो.

हीं सभागृहें पहाण्याची दर शनिवारीं १० वाजल्यापासून ४ वाजतपर्यंत सवड असते. मात्र लार्ड चेंबरलेन यांचे कचेरीतून परवाना मिळवावा लागतो. या स्थलीं दिवसा जाण्याची आम्हांस कधींच संधि मिळाली नाहीं, त्यामुळें इमारतीचे सर्व भाग आमच्या पहाण्यांत आले नाहींत. इमारतीच्या दक्षिण भागास राणीसाहेबांचीं खास दालनें आहेत व त्यांस लागूनच हाऊस आफ् लार्डसचीं दालनें आहेत; परंतु ज्या ज्या वेळीं आम्ही गेलों त्या त्या वेळीं हीं उघडीं नसल्यामुळें तीं आमच्या अवलोकनांत आलीं नाहींत. आम्हीं इमारतीच्या पश्चिम बाजूस वेस्टमिन्स्टर हॉल आहे त्यामधून प्रवेश केला. हा दिवाणखाना फार प्राचीन असून इतिहासांत प्रसिद्ध आहे. या स्थलीं भिन्न भिन्न राजांच्या कारकीर्दींत सदा स्मरणीय अशा गोष्टी घडल्या आहेत व त्यामुळें यास विशेष महत्व आलें आहे. या दालनांतून आम्ही सेंट स्टीफन्स् हॉलमध्यें गेलों. हें दालनही फार प्राचीन असून पूर्वकालीं

त्यांत हाऊस आफ् कॉमन्सच्या सभा भरत असत. येथें दक्षिण व उत्तर अशा दोन्ही भिंतींस लागून नामांकित पुरुषांचे शुभ्र मर्मरीपलाचे पुतळे उभे केले आहेत, त्यामुळें फार शोभा आली आहे. दक्षिण बाजूस हॉम्डन, सेल्डन, सर राबर्ट वाल्पोल, लार्ड चॅथॅम, पिट व आयरिश वक्ता ग्राटन, यांचे पुतळे आहेत, व उत्तर बाजूस लार्ड क्लॅरेंडन, लार्ड फॉकलंड, लार्ड सॉमर्स, लार्ड मॅन्सफील्ड, फॉक्स, व बर्क यांचे आहेत. दरवाजांजवळ कोनाड्यांत कांहीं राजगणांचे पुतळे आहेत. या दिवाणखान्याच्या पूर्वेस एक प्रशस्त अशी सोपानपरंपरा आहे व ती चढून वर गेलें ह्मणजे "सेंट्रल हॉल" लागतो. हें दालन सर्व इमारतीच्या मध्यभागीं आहे. याच्या दक्षिणेस हाऊस आफ् लार्ड्स, उत्तरेस हाऊस आफ् कॉमन्स, पूर्वेस 'हॉल-आफ् धी-पोएट्स' व पश्चिमेस वर निर्दिष्ट केलेला सेंट स्टीफन्स् हॉल आहे. या दालनाचा परीघ ६० फूट व उंची ७५ फूट आहे. याचें छत प्रस्तरमय असून त्यामध्यें भिन्न वर्णांचे काचखंड बसविलेले आहेत, व त्यांच्या योगानें प्राचीन राजवंशांचीं द्योतक अशीं विशिष्ट चिन्हें केलीं आहेत. दरवाजांच्या बाजूच्या कोनाड्यांत प्राचीन राजांच्या व त्यांच्या राण्यांच्या प्रतिकृति ठेविल्या आहेत. या दिवाणखान्याच्या उत्तरेस एक अरुंद असें दालन आहे. त्यांतून गेलें ह्मणजे "कॉमन्स लॉबी" नांवाचें दालन लागतें. तेथें आह्मीं प्रवेश केला तों मंडळीची बरीच गर्दी दृष्टीस पडली. या दालनांत लार्ड जॉन रसेल यांचा एक पुतळा आहे. या दालनाचे उत्तरेचे बाजूस हाऊस आफ् कॉमन्सचें प्रवेशद्वार आहे, व ईशान्य टोंकास एक लहान जिना आहे, त्या जिन्यानें आंत ज्या अलिंदभूमिका आहेत त्यांमध्यें जाण्यास परवानगी असते. या सभागृहांत काम चालत असतां सभासदांच्या परवानगीशिवाय कोणत्याही दरजाच्या प्रेक्षकास प्रवेश करण्याची मनाई आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या जिन्यानें आह्मी वर चढलों; परंतु मधल्या जागा सर्व भरून गेल्या असल्यामुळें आह्मांस बाजूला बसावें लागलें, त्यामुळें दोन्हीं बाजूंचा देखावा चांगला दृष्टीस पडला नाहीं. तथापि एकंदर सभागृहाचे सर्व भाग स्थूलमानानें

दृग्गोचर झाले, व कल्पना व प्रत्यक्ष यांच्यामध्यें विसंवाद अनुभवास आल्याकारणानें मनास विषाद उत्पन्न झाला. चित्ताची नेहमीं अशी प्रवृत्ति असते कीं, कोणत्याही वस्तूचें वर्णन वाचलें किंवा ऐकिलें ह्मणजे तद्विषयक एक कल्पना ठरवून त्या कल्पनेच्या आधारावर अनुषंगिक गोष्टींचा मेळ बसवावयाचा. याच न्यायानें माझ्याही मनांत या सभागृहाविषयीं जंगी कल्पना उद्भूत झाली होती. उन्नत दशेस पोंहोचलेल्या राष्ट्रवर्गांत अग्रासनाचा अधिकार ज्याच्याकडे, अशा राष्ट्राच्या राजधानींतील उच्चतम असें कार्यविवेचनगृह इतकें संकुचित असेल अशा कल्पनेस चित्तांत अवकाश कसा मिळावा? ज्या पुण्यपत्तनांत एकसमयावच्छेदेंकरून दहा दहा हजार माणसें बसण्यासारख्या इमारती आहेत त्याच पत्तनांतील मुख्य सभागृहांत निवडलेल्या सभासदांसही बसण्यापुरतीं आसनें नसतील अशा क्षुद्र तर्कास अवसर कसा मिळावा? ज्या कार्यगृहांत सर्व प्रकारच्या महत्वाच्या गोष्टींचा उहापोह चालावयाचा, त्या ठिकाणीं शेंपन्नास प्रेक्षकगणांहून जास्त लोकांस प्रवेश मिळत नसेल असें अनुमान सहजरीत्या कसें संभवेल? तें कसेंही असो. वस्तुस्थितीचें परिमार्जन कल्पनाशक्तीच्या जोरानें होणें नाहीं, व दोहोंचा संग्राम झाल्यास वस्तुस्थितीचा जय होणें स्वाभाविकच आहे, मग त्याचा मनावर परिणाम सुखसंवेदक होवो किंवा दुःखजनक होवो. माझी स्थिति फारच चमत्कारिक झाली; दृढ अभ्यासानें बळावलेली कल्पना एकाएकीं दूर होईना व प्रत्यक्ष अनुभवास येत असलेल्या स्थितीबद्दल मनाचें समाधान होईना. या वेळीं वर्डस्वर्थ कवीनें 'यारो' नदीचा रम्य प्रदेश पहाण्यास न जाण्याचीं जीं कारणें आपल्या एका कवितेंत उत्कृष्ट व मार्मिक रीतीनें वर्णिलीं आहेत त्यांचें मला स्मरण झालें व 'हेंच तें हाऊस ऑफ् कॉमन्स काय?' असा प्रश्न साहजिकपणें माझ्या मनांत वरचेवर घोळूं लागला असो; कल्पना व प्रत्यक्ष यांनीं उत्पन्न केलेल्या द्वैधी भावाच्या अवस्थेंत कांहीं काल गेल्यावर वस्तुस्थितीचा परिचय ठाम झाला व नंतर मीं इतर वस्तूंचें सूक्ष्म निरीक्षण करूं लागलों.

या सभागृहांची लांबी ७५ फूट, रुंदी ४५ फूट, व उंची

४१ फूट आहे. सर्व भिंती ओक झाडाच्या काष्ठफलकांनीं मढविलेल्या आहेत. बारा रंगीबेरंगी अशा कांचेच्या खिडक्या असून त्यांवर पार्लमेंट संस्थेच्या संबंधाचीं कांहीं चिन्हें आहेत. सभेचें काम नेहमीं पांच वाजल्यानंतर सुरू होतें व कधीं कधीं पहाटेचे चारपांच वाजतपर्यंतही चालतें. अशा प्रकारची व्यवस्था कितपत सुखावह आहे याविषयीं लोकांत व वर्तमानपत्रांत प्रसंगविशेषीं चर्चा होत असते, परंतु तिचें परिवर्तन घडण्याइतकें प्रतिकूल मत अजून कायम होत नाहीं असें वांटतें. निरनिराळ्या धंद्यांचे लोक या सभेंत आहेत त्यामुळें त्या सर्वांस स्वकार्याचा निर्वाह करून सार्वजनिक कृत्याकडे खर्च करण्यास दुसरा वेळ नाहीं हें खरें; परंतु सभेचें काम बंद करण्याच्या वेळेविषयीं कांहीं तरी निर्बंध असावा असें पुष्कळ लोकांचें म्हणणें आहे. दुसरें असें कीं, कालाचा नियम नसल्याकारणानें सर्व सभासदांचें अवधान जितकें एकाग्र असणें जरूर आहे तितकें नसतें. पुष्कळ सभासद सभागृहांच्या आसपास असण्याची मात्र तजवीज ठेवितात, ह्मणजे सभासद मोजण्याचा प्रसंग आल्यास त्यांस तावडतोब हजर रहातां येतें, परंतु चालू असलेल्या कामाकडे त्यांचें मुळींच लक्ष नसतें. त्या इमारतींतच खाण्यापिण्याची, लिहिण्यावाचण्याची, व निजण्याबसण्याची सर्व सोय आहे, तेव्हां सभागृहांतच तिष्ठत बसण्याची पंचाईत कोण करतो ? सभेचें काम चाललें असतां कोणी मध्येंच उठून जातात, कोणी दुसऱ्याचे शेजारीं जाऊन बोलत बसतात. अशा प्रकारची स्थिति मला मोठी शोचनीय वाटली; बरें, सभेचें काम तरी नेहमीं चांगलें व्यवस्थितपणें चालतें असें नाहीं. कधीं कधीं कोणी सभासद उच्छृंखलपणानें वागतात व निरर्गल प्रलापांचा मासला प्रेक्षकांस देतात. सभागृहांच्या व्यवस्थेसाठीं ठिकठिकाणीं कामगार उभे असतात, परंतु त्यांचा अधिकार प्रेक्षकगणावर जारी असतो. प्रेक्षकांनीं हूं का चूं केलें तर लागलीच हे अधिकारी आपल्या अधिकाराचा त्यांस परिचय देतात. परंतु सभासदांवर यांचा दाब नसतो. सभेचे अध्यक्ष [ज्यांस स्पीकर ह्मणतात] यांचा मात्र अधिकार अव्याहत असतो व हे नेहमीं सभास-

दांच्या अत्याचाराचें पारिपत्य करण्यांत दक्ष असतात; परंतु हजर असलेल्या सभासदांनीं सभागृहांतच काम सुरू असे तोंपर्यंत बसावें अशी मात्र शक्ति त्यांस करितां येत नाहीं. सभेचें काम आठपासून नऊ वाजत तोंपर्यंत बंद असतें. त्यावेळीं अध्यक्ष व इतर कामगार आपले भोजनादि विधि उरकतात.

या सभागृहांच्या उत्तरेच्या टोंकास अध्यक्षांचें आसन आहे. याच्या तीन बाजूंस एक कठडा आहे व शिरोभागीं सुंदर कोरींव नक्षीदार लांकडाचें छत असून त्यावर चार लहान लहान शृंगें आहेत. अग्रभागीं जीं दोन शृंगें आहेत त्यांच्या मध्यस्थानीं ब्रिटिश राष्ट्राचें चिन्ह (कोट आफ् आर्म्स) आहे. अध्यक्षांच्या उजव्या व डाव्या बाजूस बाकांच्या पांच पांच रांगा आहेत. या बाकांवर मृदु अशा गाद्यांचें आस्तरण असून पृष्ठभागही त्याच नमुन्याचा आहे. पृष्ठांच्या शिरोभागीं लहान लहान चौकटी बसविलेल्या आहेत. त्या सभासदांच्या नांवांचीं तिकिटें बसविण्यासाठीं असाव्यात असें वाटतें, परंतु अशा चौकटींच्या योगानें निर्दिष्ट केलेलीं आसनें ४७६ च आहेत व सभासदांची संख्या तर ६७० आहे; तेव्हां नामनिर्देश करून आसनें व्यक्तिविशेषासाठीं राखून ठेवणें सोईचें होत नसेल असा अजमास आहे. अध्यक्षांच्या उजव्या बाजूस राज्यकर्त्या पक्षाकडील मंडळी बसतात व त्या पक्षाचे अग्रणी पहिल्या बाकावर बसतात. अध्यक्षांच्या डाव्या बाजूस विरुद्ध पक्षाचे लोक असतात व त्यांचे नायकही त्या बाजूच्या पहिल्याच बाकावर बसतात. अध्यक्षांच्या आसनाजवळच समोरच्या बाजूस एक मेज असतें त्यावर अध्यक्षांच्या अधिकाराचें चिन्ह जी गदा [मेस] ती असते. याच मेजावर कामाकाजाचे कागद व पुस्तकें ठेविलेलीं असतात व बाजूला कारकून मंडळी बसलेली असते.

अध्यक्षांच्या आसनाच्या वरच्या बाजूस रिपोर्टर लोकांकरितां एक ग्यालरी आहे व तिच्याही वरती एक ग्यालरी स्त्रियांकरितां आहे. सभागृहांच्या दक्षिण बाजूस व अध्यक्षांच्या आसनासमोर प्रेक्षकजनांचीं आसनें आहेत. या आस-

नांत दोन वर्ग आहेत. पाठीमागील रांगांस "स्ट्रेंजर्स ग्यालरी" ह्मणतात व येथें सभासदांच्या परवानगीनें प्रवेश होऊं शकतो. पुढल्या रांगांस "स्पीकर्स ग्यालरी" म्हणतात व या ठिकाणीं प्रवेश होण्यास सभासदांमार्फत अध्यक्षांची परवानगी मिळवावी लागते. या ग्यालरींतील जीं अग्रासनें आहेत तीं अमीरउमराव व नामांकित अशा परकीय लोकांसाठीं राखून ठेविलेलीं असतात. सभागृहांच्या पूर्वपश्चिम बाजूस दोन ग्यालऱ्या आहेत; त्या केवळ सभासदांच्या उपयोगासाठीं आहेत. तळमजल्यावर कांहीं जागा परराष्ट्रांचे प्रतिनिधि व वकील व त्यांच्याच दर्जाच्या इतर लोकांकरितां ठेविल्या आहेत. सभागृहांच्या पूर्व व पश्चिम बाजूस बाहेरच्या अंगास एक लहानसें दालन आहे, त्यास डिव्हिजन लॉ बी ह्मणतात. जेव्हां कोणत्याही प्रश्नासंबंधानें मतांचा निर्णय करण्याचा प्रसंग येतो तेव्हां विवक्षित सूचनेस अनुकूल ज्यांचें मत असेल ते सभासद पश्चिम बाजूच्या दालनांत जातात व ज्यांचे प्रतिकूल मत असेल ते पूर्वेकडील दालनांत जातात. सभागृहांत हवा व प्रकाश चांगल्या तऱ्हेनें यावा अशा प्रकारच्या कांचेच्या छताची योजना केलेली आहे. रात्रीं सर्व प्रकाश छतामधूनच येतो. दीपसमूह कोठेंही दृग्गोचर होत नाहीं, परंतु प्रकाश अतिउज्वल असून चांद्रिकेप्रमाणें सुखकर असा भासतो.

या दिवशीं आयरिश् बिलासंबंधानें कमिटीचें काम चाललें होतें. हीली, ग्लाडस्टन, ओब्रायन वगैरे मंडळीचें बोलणें झालें, परंतु चांगलें स्पष्ट असें एकाचेंही ऐकूं आलें नाहीं. ग्लाडस्टन साहेबांस भाषण करतां करतां एकदोन वेळ खालींही बसावें लागलें. याशिवाय आणखी एक वेळ मी येथें गेलों होतों, परंतु दोन्ही प्रसंगीं विशेष गंमत वाटली नाहीं व मनाचें समाधान झालें नाहीं.

सुमार आठ वाजत तोंपर्यंत आम्ही चाललेली मजा पहात बसलों होतों. इतक्यांत किंग साहेबांनीं येऊन आह्मांस बोलावून नेलें. आह्मांस पुस्तकालय दाखवून नंतर खालच्या मजल्यावर घेऊन गेले. आम्ही एका कोंदट दालनांत गेलों

तों तेथें ठिकठिकाणीं लहान लहान मेजांभोंवतीं भोजनसामग्रीचा समाचार घेत बसलेली पुष्कळ मंडळी नजरेस पडली. नोकरचाकर लोकांची एकच गर्दी उडून गेली होती. जिकडेतिकडे भिन्न स्वरांच्या ध्वनींचा कलकलाट ऐकूं येत होता, व जागेच्या संकोचामुळें समागत जनांमध्यें अंगस्पर्शही होत असे. येथें सर्व पुरुष मंडळी होती व स्त्रिया बिलकुल नव्हत्या. किंग साहेबांनीं नोकरांकडून एक स्वतंत्र मेज मांडवून तेथें आह्मांस बसविलें व मेजवानीस आरंभ होण्यापूर्वीं सर जॉन गार्स्ट, सर जेम्स फर्ग्युसन व आणखी एक गृहस्थ यांचा आमचा परिचय करून दिला, परंतु त्यांचें आमचें उपचारावेंच तेवढें भाषण झालें.

या स्थलीं एका गोष्टीचा खुलासा करण्याची जरूर आहे. आह्मी परक्या देशांत गेलों तेव्हां तेथील लोकांशीं स्नेह संपादणें, त्यांच्या रीतिरिवाजांचें ज्ञान मिळविणें व त्यांच्या सामाजिक स्थितीचा परिचय करून घेणें हें आमचें कर्तव्यच होतें. प्राचीन ग्रंथकारांनीं षड्विध जें प्रीतीचें लक्षण सांगितलें आहे त्यांत " भुंक्ते भोजयते चैव " याचा समावेश केलेला आहे, परंतु हा व्यवहार आमचा त्यांचा कसा जमावा ? त्यांचे व आमचे आचार अगदीं भिन्न, तेव्हां त्यांचा मेळ कसा पडावा ? बरें, आचारभेदामुळें अशा व्यवहारास बिलकुल बहिष्कार घालावा तर संघट्टन होण्याचा जो मुख्य मार्ग तोच बंद झाला ह्मणावयाचा; तेव्हां आह्मीं एक तोड काढिली. ती अशी : आम्हीं जीं अगत्यपूर्वक आमंत्रणें येतील त्यांचा स्वीकार करण्याचा निश्चय केला, परंतु खाद्य व पेय वस्तूंविषयीं जे आमचे आचार ते कायम ठेवण्यासाठीं आह्मी केवळ मेवामिठाई, फळफळावळ व दूध लोणी यांचेंच सेवन करीत होतों, यामुळें सर्व हेतु सिद्धीस जाऊन पंचाइतीचा उलगडा झाला. असो.

वर निर्दिष्ट केलेला भोजनविधि उरकल्यावर आह्मी गच्चीवर गेलों. टेम्स नदीला लागूनच पार्लमेंट सभागृहें आहेत हें वर सांगितलेंच आहे. नदीकडील बाजूची लांबी ९४० फूट आहे. या बाजूला पहिल्या वुइलियमपासून हल्लींच्या महाराणी साहेबांप-

र्यंत सर्व राजांचे व राज्ञींचे पुतळे मांडलेले आहेत. मध्यभागीं एक विस्तीर्ण गच्ची आहे व या गच्चीला नदीच्या बाजूकडे एक कमरेइतकी उंच भिंत आहे. येथें आसनें टाकून कांहीं लोक मोकळ्या हवेचा उपभोग घेत बसले होते. आह्मीही एका बाजूला जाऊन बसलों. नदीचें पात्र धूसरवर्ण असून त्यामध्यें आसमन्ताद्भागाचा दीपसमूह प्रतिफलित झाल्याकारणानें नक्षत्रविभूषित अशा नभोवितानाची शोभा पावत होतें. मधून मधून अल्प वेगानें जाणाऱ्या नौकांचा शब्द श्रुतिगोचर होत होता. मृदु पवन आपल्या मंद गतीनें आरामाभिलाषी जनांस सुखवीत होता. पात्रापलीकडील दृग्विषय आपल्या सौम्यतेनें व शांततेनें चित्तास होत असलेल्या समाधानास पुष्टि देत होता. जवळ असलेल्या वेस्टमिन्स्टर पुलाच्या कमानी विशेष सुंदर भासत होत्या व पुलावरील दीपराजि आपल्या उज्ज्वल प्रकाशानें नयनोत्सव करीत होत्या. अशा स्थितींत कांहीं वेळ सुखास्वाद अनुभवून आह्मी परत निघालों. वाटेंत सर रिचर्ड टेंपल साहेबांची गांठ पडली. कुशल प्रश्न होऊन आह्मी त्यांची रजा घेऊन ११ च्या सुमारास घरीं आलों.

एक उपहार समारंभ.

तारीख १५ रोजीं दुपारीं आह्मी एका गृहस्थाकडे उपहारास गेलों. हे गृहस्थ पूर्वी हिंदुस्थानांत पोलिटिकल खात्यांत मोठ्या हुद्याच्या जाग्यावर होते व यासमयीं पेन्शन घेऊन सुखवस्तु लंडन शहरांत रहात होते. यांचा व आमच्या महाराजांचा पूर्वीचा परिचय असल्यामुळें त्यांनीं फारच आदरपूर्वक निमंत्रण केलें तेव्हां त्याचा आम्हांस अव्हेर करतां येईना. हे गृहस्थ खाऊनपिऊन सुखी होते. हे अविवाहित असून यांच्याजवळ त्यांच्या वृद्ध मातुःश्रीशिवाय दुसरें आंतड्याचें असें माणूस कोणी नव्हतें. मातुःश्रीचें वय सुमारें सत्तरावर होतें तथापि घरांतल्या घरांत हळूहळू हिंडण्याफिरण्या इतकी ताकद त्यांच्यामध्यें होती. यांस दोघी तिघी बहिणी होत्या. त्या विवाहित असून पोक्त वयाच्या होत्या. त्याही त्या दिवशीं अतिथिसत्कार करण्यासाठीं आपल्या भावाच्या

घरीं आल्या होत्या. त्यांपैकीं एकीचा भ्रतारही आलेला होता. या गृहस्थाचें घर शहराच्या बाहेरच्या बाजूस एका उपनगरांत होतें. हें उपनगर उंचवट्यावर असून तेथें हवा स्वच्छ व रस्ते साफ होते. घर लहानच परंतु टुमदार व सुरेख होतें. त्याच्या अग्रभागीं एक छोटीशी बाग होती, त्यांत झाडें फार व्यवस्थितपणें लाविलीं होतीं व कुंडया ठेविल्या होत्या. घरांत नीटनेटकेपणा व टापटीप यांचा प्रत्यय सर्व ठिकाणीं येत होता आमची गाडी दाराशीं येतांच यजमानानें आमचें अतिप्रेमानें स्वागत केलें व आम्हांस बसावयाच्या खोलींत नेलें. ही बसावयाची खोली मागच्या बाजूस होती. दाराजवळच डाव्या हाताला एक खोली होती तेथें उपहाराची सर्व तयारी केलेली होती. घराला माडी नव्हती, व आह्मीं ज्या दोन खोल्या पाहिल्या त्यांशिवाय आणखी दोन तीनच दालनें असतील असा तर्क झाला. आह्मी आंत गेल्यावर यजमानांनीं प्रथम वृद्ध मातुःश्री व नंतर इतर मंडळी यांचा आमचा परिचय करून दिला व नंतर आह्मीं ठिकठिकाणीं मांडलेल्या तऱ्हेतऱ्हेच्या आसनांवर बसलों. यजमानांचें माझें थोडें बोलणें झाल्यावर त्यांची एक बहीण माझ्याजवळ येऊन बसली व मला प्रथम कुशल प्रश्न विचारून नंतर इकडील चालीरीती, आचारविचार या संबंधानें थोडीशी चवकशी करून कांहीं निमित्त काढून उठून गेली. मी एकटाच बसलों आहें असें पाहून दुसरी बहीण माझ्याजवळ आली व पहिलीप्रमाणेंच कांहीं संभाषण करून गेली. याप्रमाणें उपहाराचा समय होई तोंपर्यंत आह्मीं काल घालविला. सर्व पुरुष व स्त्रिया मन मोकळें करून, आढेवेढे न घेतां व ऐट न मिरवितां आमच्याशीं स्वच्छंदपणें बोलतचालत होतीं त्यामुळें आह्मांस अननुभूतपूर्व असें समाधान वाटलें. आंग्लसमाजांतील मध्यम प्रतीच्या कुटुंबांतील व्यवस्थेचें रूप पाहण्याचा हा पहिलाच प्रसंग व तो फारच सुखप्रद झाला यांत संशय नाहीं. तरी या कुटुंबांत यजमानीण बाई व मुलेंबाळें नव्हतीं. तीं असतीं तर याहीपेक्षां अधिक मजा वाटली असती यांत संशय नाहीं. उपहाराची सर्व तयारी झाल्यावर यजमानांनीं आमची हात धुण्याची वगैरे

व्यवस्था लाविली व नंतर भोजनागारांत चलण्याविषयीं सर्वांस विनंति केली. आंग्ल लोकांत अशी चाल आहे कीं अभ्यागत पुरुष मंडळी घरच्या स्त्रीजनाच्या हातांत हात घालून भोजनास जातात. असें करणें हा अतिथीचा मोठा मान गणला जातो. एक स्त्री व एक पुरुष अशा जोड्या यजमान ठरवितो व त्या जोड्या आपल्या पायरीप्रमाणें भोजनास जातात. या घरांत सर्व संमाननीय व वयोवृद्ध अशी यजमानांची मातुःश्री होती, व अभ्यागत जनांमध्यें आमचे महाराज श्रेष्ठ होते तेव्हां यजमानांनीं आपल्या मातुःश्रीस भोजनास घेऊन जाण्याविषयीं महाराजांस विनंति केली. दिलेल्या मानाचा आदरानें स्वीकार करून महाराज वृद्ध मातुःश्रीसह भोजनागाराकडे गेले. त्याचप्रमाणें यजमानांच्या वडील बहिणीस एक इराणचे नबाब भोजनास आले होते त्यांनीं नेली. दुसऱ्या बहिणीबरोबर आमच्या बरोबरचे एक सरदार गेले. माझ्यावर असला प्रसंग न येईल तर बरा असें मला मनापासून वाटत होतें; कारण कीं त्यांच्या चालीरीतीचा परिचय नसल्यामुळें कोणत्या प्रकारचा प्रमाद माझ्या हातून घडेल अशी मला धास्ती वाटत होती; परंतु मी या पेंचांतून सुटलों नाहीं. प्रसंग तर आलाच. यजमानांनीं आपल्या तिसऱ्या बहिणीची व माझी सांगड घातली. त्या बाईचा हात कसा धरावयाचा याचीच प्रथम पंचाईत पडली. अल्पकालपर्यंत माझी मोठी त्रेधा उडाली. बाईच्या हाताला हिसका बसेल कीं काय, तिच्या झग्यावर पाय पडेल कीं काय अशा विवंचनेंत एकदाचा मी भोजनालयांत गेलों. तेथें एका प्रशस्त मेजाव रसफेद कपडा घालून त्यावर दहा पात्रांची तयारी केली होती. ठिकठिकाणीं सुंदर अशा कांचपात्रांत मनोहर अशा पुष्पांचे गुच्छ ठेविले होते. कांहीं सामान कांचेचें, कांहीं चिनीमातीचें व कांहीं रुप्याचा मुलामा दिलेलें असें होतें. एकंदर देखावा फारच रमणीय व समाधानकारक असा होता. मेजाच्या एका टोंकास यजमान व एका टोंकास त्यांची वृद्ध मातुःश्री अशा बसल्या. माझ्याजवळ मी बरोबर आणलेल्या बाई बसल्या. सर्व मंडळी आसनासीन झाल्यावर उपहाराचे पदार्थ वाढण्यास सुरवात

झाली. यजमानांच्या दोन बाजूंस दोन स्वच्छ कपडे घालून त्यांवर गळ्यापासून कमरेपर्यंत सफेद कपडा अडकवलेल्या अ-शा दोन परिचारिका होत्या. त्या सर्व पदार्थ यजमानाजवळ आणून देत व यजमान आपल्या हातांनीं पाहुण्यांना वाढीत. यजमान आपल्या जागेवरून उठत नसत. पाळीपाळीनें पाहु-ण्यांचीं ताटें त्या दोघी दासी यजमानापुढें ठेवीत व वाढून झाल्यावर परत जागच्या जागीं नेऊन ठेवीत. याप्रमाणें प्रत्ये-क मुख्य वाढपाचे वेळीं होत असे. चटण्या कोशिंबिरी, भा-जीपाला वगैरे वाढावयाचा तो दासीच स्वतः सर्वांजवळ नेत व त्यास हवा असल्यास विचारीत. उपहारास सुरुवात होण्या-पूर्वी वृद्ध मातुःश्रींनीं उभें राहून ईश्वराची प्रार्थना केली व त्या-चा आशीर्वाद मागून खालीं बसल्या. नंतर भोजनास सुरुवात झाली.

चालीप्रमाणें भोजनविधि आटपण्यास एक तास लागला. जेवतांना थट्टामस्करी, संभाषण, व विनोद बराच होत होता. माझ्याजवळ बसलेल्या बाईस माझ्या डोक्याला असलेल्या पुण्याच्या रेशमी पगडीचें मोठें कौतुक वाटलें, व त्यांनीं इतकी उत्सुकता दर्शविली कीं फराळ करतां करतांच डोक्याची पगडी काढून त्यांस दाखविणें मला भाग पडलें. त्याचप्रमाणें अंगावरील जरीकांठी उपरण्याचीही त्यांस अति मौज वाटली. आमच्या पोषाकासंबंधी तसेंच आमच्या स्त्रियांच्या पोषाका-संबंधी त्या बाईचें माझें बरेंच बोलणें झालें. सर्व मंडळींत कोणीही मुखस्तंभ नसून जो तो आपापल्या तऱ्हेनें प्रसंग साजरा करण्यांत गुंग होता, त्यामुळें वेळ केव्हां गेला तें सम-जण्यांत आलें नाहीं, व समारंभ चांगला वठला म्हणून यजमा-नांस आनंद व अतिथिजनांस समाधान झालें. या प्रसंगीं एक गोष्ट मात्र मला फार अनभिमत झाली. यजमानांची एक बहीण सभर्तृका आली होती हें वर सांगितलेंच आहे. हे गृ-हस्थ फारच गरीब व साधे असून वयानें वृद्ध म्हटलें असतां ही चालण्यासारखे होते. यांचे मेव्हणे व मेव्हण्या यांनीं यांची थट्टा करण्याचा उपक्रम केला. ह्यांत कांहीं विशेष वावगें झालें नाहीं. आपल्या समजुतीला स्त्रियांनीं पोक्त व वडील नात्या-

च्या पुरुषाची टर उडवावी हें अप्रशस्त खरें; परंतु आंग्लसमाजांत स्त्रियांस फार स्वतंत्रता आहे ह्या गोष्टीच्या अनुरोधानें पाहिलें असतां कदाचित् आपणास जो प्रमाद वाटतो तो प्रमाद नसेल. तथापि ज्या बाईच्या नवऱ्याची टर चालली होती, त्या बाईनीं रोष न दाखवितां आपणही त्यांत सामील व्हावें हें मला फार गर्हणीय वाटलें. मला या गोष्टांची फारच चीड आली, परंतु प्रसंगाशिवाय त्या मनोविकाराचें आविष्करण करणें अयोग्य वाटून मौन धारण केलें. ही गोष्ट सांगण्यांत माझा असा हेतु नाहीं कीं, या एका उदाहरणावरून सर्व आंग्ल स्त्रियांवर दोषारोप करावयाचा. गोष्ट घडून आली ती यथातथा सांगितली आहे. उपहार समाप्त झाल्यावर अल्पकाल आह्मीं विश्रांति घेतली व नंतर सर्वांची रजा घेऊन घरीं परत आलों.

रीजन्ट्स पार्क.

याच दिवशीं सायंकाळीं आह्मी " रीजन्ट्स पार्क " नामक उद्यानभूमिकांमध्यें फिरावयास गेलों व तेथें असलेला (" झुआलॉजिकल गार्डन्स ") जनावरखाना आह्मीं पाहिला. हें उद्यान अतिविस्तीर्ण आहे. याचें एकंदर क्षेत्रफळ ४७२ एकर आहे. यांच्या आवारांत पुष्कळ खासगी बंगले आहेत, व वर सांगितलेल्या झुआलॉजिकल गार्डन्स असून बॉटानिकल गार्डन्स (वनस्पतिसंग्रहोद्यान) हीं आहेत. सर्व बगीच्याभोंवतीं एक प्रशस्त रथ्या आहे, व बागेमध्यें मागें वर्णन केलेल्या हाईडपार्कमधील सौंदर्यजनक व सौंदर्यपोषाक सर्व वस्तूंचा समावेश केलेला आहे; परंतु हाईडपार्कसारखीं विस्तीर्ण पटांगणें येथें नाहींत. झाडांची गर्दी अधिक आहे व तऱ्हाही जास्ती आहेत. अमीरउमराव वगैरे श्रीमंत लोकांची येथें हाईडपार्कसारखी रहदारी नाहीं.

येथील जनावरखाना बराच विस्तीर्ण आहे. सकाळीं ९ वाजल्यापासून तों अस्तमानपर्यंत तो खुला असतो. रविवारीं झुऑलाजिकल सोसायटीच्या सभासदांच्या परवानगीशिवाय प्रवेश होत नाहीं, सोमवारीं सहापेन्स द्यावे लागतात

व इतर दिवशीं एक शिलिंग द्यावा लागतो. पहाण्यास उत्तम समय म्हटला ह्मणजे तीनप्रहर दिवसानंतर. त्या वेळेस सर्व जनावरांची खाण्याची वेळ असते. तेव्हां ते सुस्त नसून हुशार असतात. सर्व प्रकारचीं जनावरें येथें आहेत. उत्तर बाजूच्या दरवाजानें आंत शिरलें म्हणजे प्रथम पक्षिशाला लागते. येथें दोनशें प्रकारचे पक्षि आहेत व ते मुख्यत्वेंकरून आस्ट्रेलिया, इंडियन आर्चिपेलेगो, व दक्षिण अमेरिका या प्रदेशांतून आणिलेले आहेत. नंतर बगळे व करकोच पक्षि पाहून पुढें गेलें ह्मणजे वानरशाला लागते. येथें तऱ्हेतऱ्हेचे वानर, माकडें, नीळ वगैरे आहेत. याच शाळेंत एका बाजूस पाकोळ्या, व वडवाघुळें ठेविलीं आहेत. या स्थळीं बराच दुर्गंध आहे, परंतु प्रेक्षक जनास त्यांची बाधा न व्हावी ह्मणून फुलझाडें लाविलीं आहेत. तेथून उंदीर, डुकरें वगैरे पाहून जलविहार करणाऱ्या पक्ष्यांसाठीं दीर्घिका केलेल्या आहेत तेथें गेलों. तेथून मेषशाला पाहून जलसिंह पहावयास गेलों. तेथून सिंहशालेकडे वळलों. तेथें सिंहाचीं दोन चार जोडपीं दृष्टीस पडलीं, व शिवाय चित्ते व वाघही होते. तेथून मृगशालेकडे जाऊन मग अस्वलांची मजा पाहिली व नंतर तरस व लांडगे पाहिले. नंतर उंट, लामा, वगैरे पाहून सर्पगृहापाशीं आलों. या गृहामध्यें सर्व तऱ्हेचे साप, पाली, घोरपडी, मगर व सुसरी आहेत, तेथून मासे पहाण्यास गेलों. नंतर वाटेवरच एक विश्रांतिगृह लागलें तें टाकून पुढें गेलों. गरुडपक्षी पाहून मग कांसवें पाहिलीं व नंतर कीटकगृहाकडे वळलों. तेथें नानातऱ्हेचे किडे, बेडूक, सरडे वगैरे प्राणि होते. तेथून मोर वगैरे पाहून हत्ती, गेंडे, हिपापोटेमस, जिराफ, झीब्रा, शहामृग, टर्की, क्यांगारु वगैरे पाहिले. एके ठिकाणीं एका विस्तीर्ण पंजरांत सुमारें शंभर तऱ्हेचे राघू होते. सर्व जनावरांची व्यवस्था फारच चांगल्या तऱ्हेची ठेविली होती, त्यांचा अनुक्रमही शास्त्ररीत्या लाविलेला होता. कांहीं कांहीं दिवशीं तिसरे प्रहरीं हत्ती व उंट यांस सजवून बागेमधून फिरवितात, व पैसे घेऊन प्रेक्षकजनांस वर बसवितात. त्या प्रांतांत अशा प्रकारचा देखावा इतर ठिकाणीं सुलभ नसल्यामुळें त्या लोकांस

तो चमत्कारिक वाटतो. आणखी एका प्रसंगीं मी एका स्नेह्याबरोबर येथें गेलों होतों. येथें लोकांची रहदारी बरीच असते.

लंडन शहरांतील घरें व तेथें मिळणारे जिन्नस.

तारीख १६ मेपासून ३१ मेपर्यंत.—लंडन शहरांत गेल्यावर पहिला पंधरवडा आह्मीं पथिकाश्रमांत काढिला हें वर सांगितलेंच आहे. या आवकाशांत आह्मीं रहाण्यासाठीं कांहीं घरें पाहिलीं व एक ठरविलें. हें घर हाईड्पार्कनजीक व मोठ्या रस्त्यावरच होतें. याचें दहा आठवड्यांचें सहा हजार रुपये भाडें कबूल केलें होतें. हें घर लहानच होतें, परंतु स्वतंत्र होतें. यास चार मजले असून शिवाय तळघर होतें. या शहरांत सर्व घरांस तळघरें असतात. जागेचा संकोच व महार्घता असल्यामुळें जितकी जागा आकाशांत व जमिनींत घेववेल तितकी घेण्याचा लोक यत्न करितात. तथापि येथें चार पांच मजल्यापेक्षां अधिक मजले बांधण्याची चाल नाहीं. मग त्याचें कारण काय असेल तें असो. कदाचित् झंझावाताचा उपद्रव येथें असल्याकारणानें अति उंच इमारतींच्या सुरक्षिततेविषयीं लोकांस शंका येत असेल. नवीन घर बांधावयाचें ह्मणजे जमीन पुरुषभर खोल खणून त्या जागेमध्यें एक मजला रचावयाचा. पुढल्या दाराच्या बाजूस थोडी जागा मोकळी ठेवून त्या बाजूस एक खिडकी ठेवावयाची व रस्त्यावर जाण्यास एक जिना ठेवावयाचा. याच जिन्यानें चाकरमाणसांनीं घरांत यावयाचें व बाहेर जावयाचें. याचप्रमाणें मागील दारींही थोडी खुली जागा ठेवून तेथें गोठा करावयाचा व त्या बाजूनेंही तळघरास खिडकी असावयाची. याप्रमाणें पुढच्या व पाठीमागच्या बाजूस सोय झाली, परंतु मधल्या दालनांत प्रकाशाची सोय काय? याचा निर्वाह फार खुबीनें केलेला असतो. ठिकठिकाणीं तक्तपोशींत जाड कांचा बसविलेल्या असतात व त्या कांचांमधून वरच्या मजल्यावरून प्रकाश येतो. स्वयंपाकघरावर तर सर्वच छत कांचेचें असतें, त्यामुळें पाकनिष्पत्तीस उत्तम सोय होते. याच्या वरच्या बाजूस दालन

केलेलें नसून जागा तशीच रिकामी ठेविलेली असते. आमच्या तळघरांत चार पांच खोल्या होत्या. एक खोली नौकरांस निजण्याबसण्यासाठीं, एक भांडीकुंडी ठेवण्यासाठीं, एक सामानसुमान ठेवण्यासाठीं, एक स्वैंपाकासाठीं, व एक रिकामीच होती. याशिवाय कांहीं घरांत दारूच्या बाटल्या ठेवण्यासाठीं एक दालन असतें, त्यास ' सेलर ' म्हणतात. पहिल्या मजल्यावर दोनच दालनें होतीं. दरवाजाजवळच्या दालनांत बसण्याउठण्याची वहिवाट असे व मागल्या बाजूचें दालन जेवण्यासाठीं असे. दोन दालनांच्या दरम्यान माडीवर जाण्याचा जिना होता व त्या जिन्यावर कांचेच्या छतांतून प्रकाश पडत असे. दुसऱ्या मजल्यावरही दोन दालनें होतीं. एक दिवाणखाना होता तेथें कोणी मोठे लोक भेटण्यास आल्यास त्यांस पानसुपारी होत असे, व दुसरें दालन होतें त्यांत ' बिलियर्ड ' खेळण्याचें मेज होतें. तिसऱ्या मजल्यावर व चौथ्या मजल्यावर दोन दोन दालनें होतीं, तीं सर्व निजण्यासाठीं उपयोगांत येत. सर्व घरभर ठिकठिकाणीं धुराचे दिवे असून प्रत्येक मजल्यावर पायखान्याची सोय होती. स्नानगृहांची सोय तळमजल्यावर व तिसऱ्या मजल्यावर होती. दिवाणखान्यांत उंची तसबिरी लाविल्या होत्या व लहान लहान मेजांवर तऱ्हेतऱ्हेच्या सुंदर जिनसा ठेविल्या होत्या. दोन चार ठिकाणीं कुंड्यांत झाडेंही ठेविलीं होतीं. निजण्याच्या खोल्यांमध्यें एक एक दोन दोन पलंग, दोन दोन कपडे ठेवण्याचीं कपाटें, लिहिण्यासवरण्यासाठीं एक मेज, एक मोठा आरसा, एका मेजावर तोंड धुण्याचीं भांडीं, एक उंच चिंचोळें कपाट व त्यामधील लहान खणांत लघवी करण्यासाठीं एकदोन चिनी मातीचीं पात्रें, व एका भिंतीच्या बाजूला एक शेगडी. हें सर्व सामान घरवाल्याचेंच होतें. आपल्या इकडल्यासारख्या मोऱ्या तिकडे नाहींत. मोऱ्या नसल्याकारणानें जमिनीस ओल व दुर्गंधी नसते. याचप्रमाणें तेथील शौचकुपांचीही व्यवस्था चमत्कारिक तऱ्हेची होती. भंगी येऊन त्यानें साफ करण्याची जरूर कधींच लागत नाहीं. प्रत्येकानें बाहेर येतांना कळ फिरविली ह्मणजे विपुल जल-

संचार होतो व सर्व मल साफ होऊन नळाच्या मार्गानें मोठ्या गटारांत सामील होतो. स्वयंपाकघरांतही सांडपाणी वगैरे जमिनीवर न पडतां गटारांत जातें. सर्व खोल्या व पायखाने साफ ठेवण्याचें काम मोलकरणीचें असतें. आमच्या घरांत घरवाल्याचीच मोलकरीण होती. सर्व खोल्यांमधून घंटा वाजवावयाचें एक यंत्र होतें त्या योगानें नोकरास बोलावतां येत असे. लंडन शहरांत सर्व ठिकाणीं अशी चाल आढळली कीं, घराची बाहेरील दारें सदा बंद असावयाचीं; परंतु दार उघडण्यासाठीं आरडाओरड करण्याची अवश्यकता नसते. पुढील दाराजवळ एक यंत्र असतें. बाहेरून येणारानें तें यंत्र ओढावें म्हणजे गडीमाणसें दार उघडतात. असें एक यंत्र आमच्या घराच्या दरवाजाजवळही होतें. या सर्व यंत्रांचा संबंध तळघरांत एका खोलींत एका भिंतीशीं कांहीं घंटा होत्या त्यांच्याशीं असे. कोणती घांट कोणत्या ठिकाणची हें नोकर लोकांस माहीत असे, व त्याठिकाणीं ते जाऊन हजर होत. सर्व खोल्यांचीं दारें नेहमीं बंद असावयाचीं असा साधारण नियम आहे. दार उघडें असो किंवा बंद असो; तें प्रथम ठोठावण्याची चाल आहे, व आंत असलेल्या माणसानें ' या ' म्हटल्याशिवाय प्रवेश करणें म्हणजे अडाणीपणा समजला जातो. खोलींत कोणी नसलें म्हणजे मोलकरीण येऊन झाडून साफसूफ करते. कांहीं कांहीं घरांच्या पुढल्या दाराजवळ घंटा वाजवावयाचें यंत्र नसून नुसतीच दरवाजाच्या फळीवर एक जाड कडी असते ती आपटून आवाज करण्याची चाल आहे. आमच्या घराच्या दारासही कडी होती. शिवाय दाराच्या फळींत एक फट ठेवून आंतल्या बाजूस एक पेटी जोडली होती. टपालाचा शिपाई आमचीं पत्रें या फटींतून टाकी व कडी मोठ्यानें आपटी म्हणजे नोकर लोक येऊन पत्रें घेऊन जात. वंगी वगैरे असली म्हणजे तळमजल्यावर जाऊन देत असे. तळमजल्यासाठींही बाहेरच्या जिन्याजवळ एक घांट असे. जिन्नसपान्नस घेऊन येणारे लोकही घंटा वाजवीत म्हणजे त्यांची दाद आंत लागे. लंडन शहरांत फळफळावळ, फुलें, भाजिपाला यासुद्धां सर्व जिनसा घरीं आणून देतात. ज्या जिनसा लागावयाच्या त्या त्या व्यापा-

त्यास एकदां खातें घालून दिलें म्हणजे तो आपला माणूस पाठवून माल पोंचता करवितो. या व्यापाऱ्यांजवळ एक खातेंवही असून शिवाय एक एक चोपडी माल घेणाराजवळ असते, त्यामुळें फरक पडण्याचा संभव कमी असतो. दर आठवड्यास हिशेबाचा निकाल करण्याची चाल आहे. बहुतेक व्यापाऱ्यांच्या जिन्नस पोंहोचविण्यासाठीं मुद्दाम केलेल्या हलक्या एक घोड्याच्या व दोन चाकांच्या गाड्या असतात त्यांतून जिन्नस घरीं पोंचवितात. घरासमोर गाडी उभी करून गाडीवान खालीं उतरून तळघराची घंटा वाजवितो व दार उघडलें म्हणजे हवातेवढा जिन्नस झटपट देऊन दुसरीकडे जातो. वेळ बिलकुल गमावीत नाहीं. त्याची ती टापटीप पहाण्यासारखी असते. इतर सर्व लोकांचीही व्यवहारांत अशीच व्यवस्था असते. कामाशिवाय कोणी कोठें जावयाचा नाहीं, उगीच जास्ती कमी बोलावयाचा नाहीं, व जरुरीपेक्षां जास्त वेळ खर्च करावयाचा नाहीं.

लंडन शहरांत आपल्या इकडील बहुतेक सर्व प्रकारचा जिन्नस मिळतो. तांदूळ, डाळ, गव्हाचें पीठ, भाजीपाला, उत्तम गाईचें दूध, लोणी वगैरे जिनसा तेथें मिळतात. आपल्या लोकांची तेथें उपासमार होण्याचें कारण नाहीं. हवेसंबंधीं जो नड आहे ती मात्र दुस्तर आहे. तथापि इतकें म्हणतां येईल कीं, व्यवस्थितपणें रहाणारास मांसाहार व मद्यपान न करतां रहाणें शक्य आहे. प्रकृतीला मात्र फार जपलें पाहिजे. उघडें बसणें किंवा अंगाला वारा लागूं देणें तेथें बिलकुल खपावयाचें नाहीं. या कारणानें सोंवळ्याओंवळ्याच्या दुराग्रहाच्या समजुती मात्र बाजूला ठेवल्याच पाहिजेत; नाहीं तर प्रकृति बिघडून प्राणास मुकण्याचा प्रसंग यावयाचा. हवा फार येण्याच्या भीतीनेंच तिकडील घरांस खिडक्या कमी असतात. घरें एकाशीं एक लागलेलीं असल्यामुळें बाजूनें खिडक्या असण्याचा संभवच नाहीं, परंतु ज्या श्रीमंत लोकांच्या घरांस सर्व बाजूंनीं खिडक्या करण्याची सवड असते, तेही खिडक्या कमी ठेवितात; व ज्या असतील त्या नेहमीं बंद ठेवितात. खिडक्यांस बहुतेक कांचेचीं तावदानें असतात.

लांकडी दारें नसतात. कांहीं कांहीं ठिकाणीं लांकडी पट्ट्यांचे पडदे असतात. शिवाय कापडी पडदे असतात. प्रकाश नको असला ह्मणजे या दोन्ही पडद्यांचा उपयोग करतात. जागेचा संकोच असल्यामुळें प्रांगणभूमिकांतून वृक्ष व लता लावून बागशाई करण्याची सोय नाहीं, ह्मणून खिडक्यांपुढाल सज्जांमधून लांकडी कुंड्यांतून फुलझाडें लावण्याची चाल आहे. अशा प्रकारच्या फुलझाडांची व्यवस्था ठेवणारे स्वतंत्र व्यापारी आहेत. ते हीं झाडें लावून नियमित कालानें तीं दुरुस्त करितात. रोज पाणी घालण्याचें काम मात्र गडीमाणसांनीं करावें. याशिवाय मागीलदारींही फुलझाडें लावण्याची चाल आहे. ही लंडन शहराची गोष्ट झाली. उपनगरांत व बाहेरगांवीं पुढील दारीं व मागीलदारीं खुली जागा असतेच तेथें फुलें व भाजीपाला लावतात. गरीबांच्या घरांत यांची व्यवस्था बायकांकडे असते.

लंडन शहरांत सर्व जिनसांचे मोठमोठे बाजार आहेत. भाजीपाला, फुलें, पानें व फळफळावळ हीं सर्व एका बाजारांत मिळतात. किराण्या जिनसांचा एक बाजार आहे; मत्स्यमांसादिक सामुग्रीचा निराळाच. हे बाजार जरी मोठे व जिन्नस घेण्यास सोयीवार आहेत, तथापि अशा अफाट शहरांत एकाच ठिकाणाहून माल सर्वांनीं आणविणें म्हणजे दुष्कर आहे, म्हणून निरनिराळ्या प्रांतीं लहान लहान बाजार आहेत. तेथें मोठ्या बाजारांतून माल येतो; व शिवाय गल्लोगल्लीं व रस्तोरस्तीं सर्व प्रकारचीं दुकानें आहेत तेथेंही सर्व प्रकारचा जिन्नस मिळतो. मोठमोठ्या रस्त्यांवरदेखील या दुकानांची मुळींच शिस्त नसते. एखाद्या पुस्तकविक्याच्या दुकानाशेजारींच खाटकाचें दुकान असतें व अत्तरविक्याच्या दुकानापाशींच मासेविक्याचें असतें. आतां इतकें खरें कीं हीं सर्व दुकानें नीटनेटकीं असतात. त्यांस कांचेचीं तावदानें लावलेलीं असतात व मालाचा दुर्गंध पसरूं नये ह्मणून नानातऱ्हेच्या तजविजीही केलेल्या असतात. तथापि माझ्यासारख्याला या गोष्टीची मोठी किळस येई व ही व्यवस्था अप्रशस्त वाटे.

याप्रमाणें तिकडील घरांची, तेथें मिळणाऱ्या वस्तूंची व

बाजाराच्या व्यवस्थेची हकीकत झाली. स्वतंत्र घरांत आल्यामुळें आम्हांस फार सुख झालें परंतु गडीमाणसां संबंधानें थोडी गैरसोय वाटली. पथिकाश्रमांत होतों तेव्हां पुष्कळ नोकरांची संवय पडल्यामुळें सहजच प्रथम थोडेंसें कठीण गेलें. घरच्या मोलकरणीशिवाय आह्मीं तीन नोकर ठेविले होते. यांचा रोजमुरा आठवड्यास दहा शिलिंगापासून वीस शिलिंग होता. हे नोकर घरीं काम करून बाहेरही बरोबर येत असत. हे मोठ्या लोकांकडे वहिवाटलेले होते त्यामुळें यांची चालरीत चांगली होती. नव्या घरांत आह्मी तारीख १६ रोजीं आलों. सकाळचा वेळ सर्व व्यवस्था लावण्यांत गेला. दोन प्रहरीं आह्मी 'टॉवर ऑफ लंडन' पहावयास गेलों.

टॉवर ऑफ लंडन.

ही इमारत फार प्राचीन आहे. प्रथमतः या इमारतीचा उपयोग राजवाड्याप्रमाणें होत असे. परंतु कालांतरानें प्रासादाचें कारागृह झालें व सर्व मोठ्या दर्जाच्या बन्दीजनांचें वसतिस्थान ही इमारत झाली. ऐतिहासिकदृष्ट्या ही इमारत फारच मनोरंजक आहे. या स्थलीं कारागृहवास भोगलेल्या स्त्रीपुरुषगणांत नामांकित राजे, राजपत्न्या, मुत्सद्दी व पुरोहित यांचीं नांवें आढळतात. कोणी राजकीय कारणामुळें, कोणी धर्माग्रहामुळें व कोणी इतर कारणांमुळें, या दुर्गांत प्रथम एकांतवास भोगून कृतान्तकटकाकडे प्रयाण केलें आहे. कोणाचा शिरच्छेद, कोणाचा श्वासावरोध, कोणाचें सुरामज्जन, याप्रमाणें नानाविध उपायांनीं मृत्युकुंडांत येथें बळी दिले गेले आहेत. ज्यांस आंग्लदेशाच्या इतिहासाचा थोडासा परिचय आहे, त्यांस हें स्थल जितकें मनोरंजक तितकेंच भयप्रद वाटतें. प्राक्कालीन वृत्तांचें स्मरण होऊन मनाला तिटकारा येतो व कालान्तरानें झालेले स्थितीचें परिवर्तन लक्षांत आलें म्हणजे चमत्कार वाटतो. ही इमारत टेम्स नदीच्या तीरावर असून लंडनशहराच्या पूर्वप्रांतीं आहे. सांप्रतकाळीं येथें शस्त्रास्त्रसंग्रह असून दारुगोळाही सांठविलेला आहे. शिवाय येथें एक जवाहीरखाना आहे. त्यामध्यें कांहीं सुवर्णरत्नाचे मुकुट असून

शिवाय राज्याभिषेकासंबंधीं देशरीतीप्रमाणें लागणारीं सर्व सुवर्णमय पात्रें आहेत. या इमारतीस चार दरवाजे आहेत. पैकीं एक मुख्य आहे त्यास सिंहद्वार म्हणतात. या दरवाजास हें नांव पडण्याचें कारण असें आहे कीं तेथें पूर्वी सिंहशाला होती. ही इमारत दररोज १०-४ पर्यंत खुली असते. शनिवार व सोमवार या दिवशीं सर्वांस सर्व भाग पहाण्याची मोकळीक असते म्हणून या दिवशीं गर्दी फार असते. इतर दिवशीं शस्त्रसंग्रह व जवाहीरखाना हीं पहाणें झाल्यास सहा सहा पेन्स द्यावे लागतात. या इमारतीची ऐतिहासिक माहिती व येथील वस्तुसंग्रह यांविषयीं छापलेलीं पुस्तकेंही येथें विकत मिळतात.

प्रवेश करतांनाच प्रथम द्वारपालांचा चमत्कारिक वेष पाहून मौज वाटते. यांचीं शरीरें रक्तवस्त्रानें अवगुंठित असून त्यांच्या शिरोभागीं गोंड्याच्या टोप्या व हातांत उच्चदंड होते; व कटिप्रदेशीं एक रुंद पट्टा होता. हे सर्व नोकर वृद्ध असून सैनिक वर्गांतले होते. यांस 'येोमेन ऑफ् धी गार्डस्' ह्मणतात. आंत गेलें ह्मणजे खंदकावरील पूल लागतो व पूल वलांडून गेलें म्हणजे एक पटांगण लागतें. येथून निरनिराळ्या बुरुजांकडे रस्ते फुटतात. पटांगणाच्या मध्यभागीं एक चौकोनी बुरुज आहे त्यास 'व्हाइट् टॉवर' ह्मणतात. इमारतीचा हा भाग फार प्राचीन आहे. आलफ्रेड् धी ग्रेट राजानें बांधलेल्या बुरुजाच्या पायावर पहिल्या वुइलियम राजानें हा बुरुज रचिला होता. दुसऱ्या रिचर्डचा राज्यत्याग, तिसऱ्या रिचर्डनें आपल्या दोघा पुतण्यांचा केलेला खून, व सर वॉल्टर रॅले यांचा कारागृहवास या सर्व गोष्टींचा संबंध याच स्थलाशीं आहे. हें स्थल पाहून आम्ही प्राचीन शस्त्रसंग्रहाकडे वळलों. हें दालन बरेंच विस्तीर्ण आहे. मध्यभागीं कांहीं जागा आंखून तिच्या भोंवती कठडा घातलेला आहे. या कठड्याला एकसारख्या तऱ्हेतऱ्हेच्या तरवारी लटकाविलेल्या आहेत, व कठड्याच्या आंतही नानातऱ्हेचीं शस्त्रें मांडलीं आहेत. बाजूच्या जागेंत चिलखतें घातलेले शिपाई व घोडेस्वार उभे केले आहेत. पहिल्या एड्वर्ड राजाच्या वेळेपासून दुसऱ्या जेम्स राजाच्या वेळेपर्यंत चिलखतांची तऱ्हा कसकशी बदलत गेली हें स्पष्ट दि-

सावें अशा हेतूनें येथें व्यवस्था लावलेली आहे. एका स्थलीं इलिझाबेथ राणीचा अश्वारूढ पुतळा आहे. लॉर्ड डड्ले व इतर प्रसिद्ध पुरुषांचीं चिलखतेंही येथें आहेत. शिवाय इट्रस्कन, रोमन व ग्रीक चिलखतें येथें ठेविलेलीं आहेत. धनुष्य, बाण, भाले, बरच्या, कुऱ्हाडी वगैरे सर्व तऱ्हेच्या शस्त्रास्त्रांचा संग्रह येथें आहे. चीन, इराण, जपान व आफ्रिका या देशांतील शस्त्रेंही येथें आढळतात. आपल्या देशांतील शस्त्रेंही येथें आहेत. लखनौच्या बादशहाच्या वेळची शिरच्छेद करण्याची एक कुऱ्हाड येथें आहे. त्याचप्रमाणें श्रीरंगपट्टणच्या लढाईंत हस्तगत झालेली टिपूसुलतानाची तरवार, शिरस्त्राण व घोड्याचें जीन येथें आहेत. चौकोनी बुरुजाच्या बाहेर एक जुन्या तोफांचा संग्रह आहे. तेथें विशाल मुखाच्या तोफा दृष्टीस पडतात. बुरुजाच्या उत्तरेस दोन विस्तीर्ण सैनिकगृहें असून नूतन शस्त्रसंग्रह आहे. येथून आम्ही जवाहिरखान्याकडे वळलों. हा जवाहिरखाना एका लहान प्राचीन बुरुजांतच आहे. मध्यभागीं एक काचमय कोष आहे व आसमन्ताद्भागीं लोहशलाकांचें आवरण आहे. मध्यकोषांत अनेक मुकुट ठेविले असून शिवाय राज्याभिषेकाचीं पात्रें आहेत व प्रसंगविशेषीं प्रजाजनांकडून नजर मिळालेल्या चमत्कारिक वस्तूही आहेत. पहिल्या चार्लसाच्या वधानंतर जी अव्यवस्था झाली त्या अव्यवस्थेंत सर्व प्राचीन जवाहिर विकलें गेलें; व दुसऱ्या चार्लसाची राज्यप्रतिष्ठा झाल्यावर प्राचीन वस्तूंच्या नमुन्याच्या नव्या जिनसा बनविण्यांत आल्या व त्यांचाच संग्रह केला आहे. येथें एक व्हिक्टोरिया राणीसाहेबांचा मुकुट आहे, तो फारच सुंदर आहे. व त्यावर सुवर्णकारानें नक्षीची कमाल केली आहे. या मुकुटाला २७८३ हिरे लाविलेले आहेत; मध्यभागीं जें माणिक आहे तें आजिंकोर्टच्या लढाईमध्यें पांचव्या हेन्री राजानें आपल्या शिरोभागीं धारण केलें होतें. पंजाबच्या रणजितसिंगाकडून मिळविलेला कोहिनूर हिरा हल्लीं वुइंडसर कॅसल येथें राणीसाहेबांजवळ आहे; त्याचीच प्रतिमा या जवाहिरखान्यांत ठेविलेली आहे. याचा आकार मोठा असून तेज फार आहे व वजन १६२ क्यारट आहे असें सांगतात. मध्य-

कोषाजवळच दुसरे लहान कोष आहेत त्यांमध्यें 'बाथ,' 'गार्टर,' 'स्टार ऑफ् इंडिया,' वगैरे आंग्ल उपपदांच्या चिन्हांचे निदर्शक असे पदार्थ ठेविले आहेत. या सर्व जवाहिरांची किंमत तीन कोट रुपये आहे असें म्हणतात.

तारीख १७ रोजीं तिसऱ्या प्रहरीं आह्मी 'रॉयल ऑकेरियम' पहाण्यास गेलों. ही इमारत ६०० फूट लांब असून तिच्या शिरोभागीं कमानदार असें कांचमय छत आहे, त्यामुळें अभ्यंतर कक्षांत प्रकाश विपुल असून त्यास सौंदर्यही अधिक आलें आहे. येथें भिन्नभिन्न स्थलीं मधुर व क्षार जलांत विहार करणाऱ्या प्राण्यांचा लहान लहान दीर्घिकांमध्यें व काचमय कोषांमध्यें संग्रह केला आहे, व यावरूनच या स्थलास 'ऑकेरियम' हें नांव पडलें आहे; परंतु याशिवाय दुसऱ्याही पुष्कळ प्रेक्षकजनांच्या मनास विनोद करणाऱ्या अशा वस्तूंचा संग्रह येथें आहे. येथें सुंदर पुष्पलतायुक्त अशीं अल्पोद्यानें, नाटकगृह, संगीतशाला, चित्रशाला, वाचनगृह, विश्रांतिगृह वगैरे नानाप्रकारचे करमणुकीचे प्रकार आढळतात. शिवाय दिनविशेषीं कुत्र्यांचा बाजारही येथें भरत असतो, व कधीं कधीं तालीम, कसरत, तिरंदाजी व गोळीबार यांचेही प्रयोग येथें होत असतात. इमारतींत गेलें ह्मणजे तीन चार तास सहज मौजेंत घालवितां येतात.

१९ व्या तारखेस सकाळीं आह्मी लॉर्ड रिपन साहेबांच्या भेटीस गेलों. या सत्पुरुषानें ह्या देशांत असतांना केलेलीं पुण्यकृत्यें व त्याच्या गमनप्रसंगीं लोकांनीं दर्शविलेली कृतज्ञताबुद्धि यांचा ठसा पूर्णपणें हृत्पटावर उमटलेला असल्याकारणानें त्याच्या दर्शनाविषयीं मला बरीच उत्कंठा झाली होती, परंतु भेटीअंतीं अपेक्षित समाधान झालें नाहीं. हे गृहस्थ गर्भश्रीमंत आहेत हें सर्वांस विदित आहेच, तेव्हां त्यांच्या श्रीमंतीच्या मानानें त्यांचें ऐश्वर्य होतें हें सांगणें अनावश्यकच आहे. दरवाजापाशीं दोन नोकर उभे होते त्यांच्या गुडघ्यापर्यंत लाल रेशमी चोळणे होते व खालीं सफेद मोजे असून पायांत नुसता अग्रभाग झाकण्यापुरते तकतकीत बूट होते. सर्व अमीरउमरावांच्या घरीं विशिष्ट प्रकारच्या परिचारकांस

असा वेश देण्याची चाल आहे. हा वेश प्राचीन तऱ्हेचा असावा असें दिसतें. भेटीची वेळ पूर्वीच ठरलेली असल्यामुळें आम्हांस प्रतीक्षा करण्याचें कारण पडलें नाहीं. नौकरानें आह्मांस दिवाणखान्यांत नेलें; तेथें लॉर्डसाहेब सपत्नीक उभे होते. त्या दोघांचेही कपडे अगदीं साधे व मळकट म्हटल्यासही हरकत नाहीं असे होते. मग कदाचित् सकाळची वेळ असल्याकारणानें स्नान वगैरे झालें नसून लगबगीनें भेटीसाठीं आले असतील म्हणून असा प्रकार आढळला असेल तर कोण जाणें. उभयतांनीं सर्वांशीं हस्तस्पर्श करून आम्हांस बसावयास सांगितलें व महाराजांस कुशल प्रश्न विचारून आम्हांस रजा दिली. आमच्या आगमनाबद्दल विशेष आदर किंवा आतिथ्य कांहीं दिसण्यांत आलें नाहीं. माझ्यासारख्याच्या दृष्टीला ही गोष्ट फारच अप्रशस्त वाटली. पानसुपारी, अत्तरगुलाब, हारतुरे वगैरे सांप्रदायिक गोष्टींचा येथें पूर्ण अभाव असल्याकारणानें मनाला फार खेद झाला. मेजवानी वगैरे असली ह्मणजे खाण्यापिण्याची व्यवस्था असते. चहाचें बोलावणें असलें म्हणजे चहापाण्याची तजवीज असते; परंतु एरव्हीं भेट म्हणजे कांहीं नाहीं. असो. एकंदरीनें या प्रसंगीं माझा ग्रह चांगला झाला नाहीं. मग कारण कांहीं असो.

याच दिवशीं संध्याकाळीं लार्ड डार्बी यांजकडे चहाचें आमंत्रण होतें. सायंकाळीं पांच वाजण्याचे सुमारास आम्ही तेथें गेलों. आमचें आदरातिथ्य फारच चांगलें झालें. लॉर्ड व लेडी यांनीं अगत्यपूर्वक सर्व प्रकारची चौकशी करून इतर अभ्यागत जनांचा आमचा परिचय करून दिला. लॉर्ड नार्थब्रूक, ड्यूक ऑफ बेडफर्ड, सर हेन्री रालिन्सन, सर आर्थर रसेल वगैरे मोठमोठ्या मंडळींचें आमचें बोलणेंचालणें झालें. पांच पांच मिनिटें प्रत्येकाशीं याप्रमाणें सर्वांची पाळी झाल्यावर मी एकटाच एका बाजूला बसलों. कारण कीं आपल्याजवळ कोणी आल्याशिवाय आपण उठून दुसऱ्याजवळ जाणें परक्या माणसास कसें साधणार ? तेव्हां लेडी डार्बी मजजवळ आल्या व मोठ्या अगत्यानें माझा हात धरून आपल्या मुलींमध्यें मला घेऊन गेल्या. तेथेंही पूर्वीप्रमाणेंच मौज झाली.

दोघीचौघींनी ठराविक प्रश्न विचारल्यावर मी उगीच वेड्यासारखा उभा राहिलों. एकीनें मला चहा आणून दिला. एकीनें मला नानातऱ्हेचीं फळें खावयास दिलीं-झालें-नवी ओळख असल्याकारणानें जेवढे प्रश्न तेवढेच जबाब देण्याच्या पलीकडे मला जास्त बोलतां येईना म्हणून माझी अडाण्याची अवस्था झाली. बरें, यांत दोष कोणाचा ? घरच्या माणसांचाही नाहीं, व अभ्यागत जनांचाही नाहीं. हा प्रकार नवीन असल्याकारणानें सहजच मला त्यापासून सुख झालें नाहीं. अशा प्रकारचे प्रसंग फारच श्रेयस्कर अशी आंग्ल समाजाची समजूत आहे, व ही समजूत खरीही असेल; परंतु माझ्या मतें नव्या माणसाला यापासून सुख होत नाहीं. यजमान व यजमानीण बाई यांनीं अतिशय अगत्य दाखविलें ही गोष्ट निर्विवाद होती, म्हणून मनाला फार समाधान वाटलें.

अशा प्रकारचे प्रसंग नूतन परिचय होण्यास किती सहायभूत होतात या मुद्यावर आमच्यासमोर असलेल्या साहेबांचें व माझें बोलणें झालें. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, आंग्ल समाजव्यवस्थेंत ज्या कांहीं अतिप्रशस्त गोष्टी आहेत त्यांपैकीं ही एक आहे. अशा प्रसंगीं वर्तमानपरिचय दृढ होतो व नूतन परिचय जडतो. अंतःकरणप्रवृत्तींचा संकोच नाहींसा होऊन त्या प्रसन्न होतात व संसाराच्या कष्टमयतेचें तात्कालिक विस्मरण होतें. दुसऱ्याची सानंद मुद्रा पाहून स्वतांस सुख मानून घेण्याची स्फूर्ति होते. संभावितांचें सौजन्य, नूतन उदय पावलेल्या अरेरावाचें औद्धत्य, विचित्रवेशविभूषित अंगनांचे ललिताभिनय, व त्यांवर आसक्त असलेल्या तरुण जनांचे तच्छंदानुवर्तन, इत्यादि गोष्टींच्या अवलोकनानें व्यावहारिक ज्ञान जास्त होत असेल खरें, परंतु अशा प्रसंगीं झालेला परिचय कालगत्या दृढ झाला असा अनुभव आह्मांस आला नाहीं. आतां आह्मी त्यांच्या समाजाच्या बाहेरचे ह्मणून आमचा असा विपरीत अनुभव असण्याचा संभव आहे. तें कसेंही असलें तरी तात्पर्य येवढेंच कीं, अशा प्रसंगांपासून आमच्या लोकांस अपेक्षित लाभ होत नाहीं.

तारीख २० रोजीं रात्रौ आह्मी ' लायसियम ' नाटकगृहांत

गेलों. सुविख्यात नाट्यकलाविशारद अर्व्हिंग याचे प्रयोग प-हाण्याची मला फार दिवसांपासून उत्कंठा होतीच, व त्या उत्कं-ठेचें समाधान होण्याचा प्रसंग आला ह्मणून चित्तवृत्ति फारच चमत्कारिक झाली. हें नाटकगृह या गृहस्थांचे मालकीचें असून वसंत व ग्रीष्म ऋतूंमध्यें हे स्वतःचे प्रयोग येथें करतात. त्यांचे सर्वच प्रयोग प्रशंसार्ह आहेत, परंतु सर्वांत विशेष नांवाजलेला 'फाउस्ट' नाटकाचा प्रयोग आहे. हें नाटक 'गटी' नांवाच्या जर्मन ग्रंथकारानें रचिलेलें असून तें फारच चांगलें साधलेलें आहे अशी ख्याति आहे. त्याचें आंग्ल भाषांतर झालें आहे तेंही सुचक वठलें आहे. त्यांत (मेफिस्टोफेलिस) पि-शाच्यानें नायक व नायिकेला नरकाकडे नेलें आहे असा क-थानकाचा भाग आहे. अगोदर ग्रंथरचना सुरेख व त्यामध्यें अर्व्हिंगसारख्या नटाग्रणीचा अभिनय व लेखनकलापटु अशा आलेखकानें बनविलेली रंगसज्जा! मग काय विचारावयाचें! अशा समुदित गुणगणाच्या निरूपणाचा प्रसंग पहाण्याची स-र्वांस इच्छा असणारच. तेव्हां जागा मिळण्यासाठीं महिना-महिना खटपट करावी लागते तरी जागा मिळत नाहीं. आम्हांस प्रवेश होण्याची पंचाईत पडली. शेवटीं एका ड्यूक साहेबानें आपली खासगी राखून ठेविलेली खोली आमच्या स्वाधीन केली तेव्हां आमची सर्व व्यवस्था लागली. आरंभापासून अ-खेरपर्यंत प्रयोग इतका चित्ताकर्षक होता कीं, जागेवरून हाल-ण्याचीही कोणाची माझा नव्हती. पिशाचाची भूमिका अ-र्व्हिंग साहेबांकडे असते. ते आपल्या कामाची कमाल करून सोडितात. त्यांची ती उच्चावच स्वराची ठेवण, दृष्टिप्रेरणेची शिताबी, व अंगविक्षेपाची शैली अवर्णनीय आहे. माझ्यासार-ख्या नेभळ्या कलमबहाद्दरानें त्याचें वर्णन करण्याचा यत्न करणें ह्मणजे त्या नटरत्नाचा अपमान होय, म्हणून मी लेख-णीस उगीच शीण देऊं इच्छित नाहीं. आणखी एका प्रसंगीं यांचाच 'लुई धी फोर्टीन्थ' नांवाचा प्रयोग मीं पाहिला. त्यां-तही त्यांच्या कर्तृत्वाविषयीं अनुकूल झालेला ग्रह अति दृढ झाला.

तारीख २१ रोजीं राणीसाहेबांच्या लेव्हीचा (धूळभेटीचा)

समारंभ झाला. दरवर्षी या दिवसांत हा समारंभ होत असतो; व तो जरी राणीसाहेबांच्या नांवानें होत असतो तरी मलिका खुद्द तेथें हजर नसतात. त्यांच्या वतीनें त्यांचे वडील चिरंजीव प्रसंग साजरा करितात, व चिरंजीवाचें दर्शन झालें ह्मणजे राणीसाहेबांच्याच भेटीचा सन्मान मिळाला असें प्रसिद्धपणें सर्वांस जाहिर करण्याचीही चाल आहे. हा समारंभ बहुधा 'सेंटजेम्सेस' नामक प्रासादांत होत असतो. हा महाल ज्या स्थलीं आहे त्या स्थलीं प्राचीनकालीं महारोगग्रस्तालय होतें. आठव्या हेन्रीनें ही इमारत काढून टाकून तिच्या जागीं विस्तीर्ण राजमहाल बनविला. क्वीन मेरी याच वाड्यांत मरण पावली व वधाच्या पूर्वदिवशीं पहिला चार्लस याच वाड्यांत निजला होता. तिसऱ्या वुइलियमपासून चवथ्या जार्जाच्या वेळेपर्यंत सर्व राजे याच प्रासादांत रहात असत. १८०९ सालीं प्राचीन इमारतीचा पूर्वेकडील भाग दग्ध झाला व तेव्हांपासून अशा प्रकारच्या समारंभासाठींच या इमारतीचा उपयोग होत असतो. येथील दालनांत सामानसुमान फार उंची असून येथें नामांकित चित्रसंग्रह आहे.

हा समारंभ दोन प्रहरीं झाला. या प्रसंगीं गाड्यांची इतकी गर्दी होती कीं, अर्धा तास प्रवेश होण्यास लागला. गाड्यांची अशी व्यवस्था असते कीं, एका रांगेंत सर्व गाड्या चालतात, व पुढची गाडी हलल्याशिवाय मागच्या गाडीला मधूनच बाहेर जाऊं देत नाहींत. त्यांतही खासगी गाड्या व भाड्याच्या गाड्या यांच्यांत आवडनिवडीचा प्रकार असतो. भाड्याच्या गाड्या थेट आंतील दरवाजापर्यंत जाऊं देत नाहींत. खासगी गाड्या आंत जाऊं देण्याबद्दल देखील चिठ्या केलेल्या असतात व त्या चिठ्या ज्यांच्याजवळ असतील त्यांसच विवक्षित जागीं जाऊं देतात. गाड्या उभ्या करण्याच्या देखील नेमलेल्या जागा असतात व तेथेंही चिठ्ठीशिवाय गाडी उभी करूं देत नाहींत. एकदां त्या रथांच्या मालिकेंत गाडी गुंतली ह्मणजे क्रम येईल तेव्हांच ती दृष्टीस पडते. समारंभास जाणाऱ्या मंडळीचे दोन विभाग असतात. वरच्या प्रतीचे लोक निराळ्याच द्वारानें प्रवेश करितात. आम्हांस याच द्वारानें जा-

ण्याची परवानगी होती. प्रवेश झाल्यावर जिना चढून आह्मी वर गेलों. जिन्याच्या टोंकापासून तो तहत समारंभस्थानापर्यंत एक एक हाताच्या अंतरावर एकवस्त्र परिधान केलेले व हातांत उंच बंदुका, भाले व दंड धारण केलेले असे पुरुष उभे होते. इमारत पुरातन असल्याकारणानें मलिन दिसत होती व सर्व दालनें नेहमींच्या वहिवाटींतलीं नसल्याकारणानें, भयाण दिसत होतीं. अभ्यागतजनांचा संमर्द समारंभशालेकडे लोटत होता. या दालनास दोन दारें होतीं. एका दारानें आंत गेल्यावर पलीकडल्या टोंकाशीं जावें लागलें व तेथें कांहीं वेळ मार्गप्रतीक्षा करावी लागली. प्रिन्स ऑफ वेल्स भिंतीच्या बाजूला उभे होते. त्यांच्याजवळ लार्ड चेंबरलेन व इतर कामगार उभे होते. अभ्यागतजनांच्या नांवाच्या दोन पत्रिका हजर कराव्या लागतात. नामोच्चार झाला ह्मणजे अभिवंदन करावयाचें व त्या अभिवंदनाचा स्वीकार प्रदर्शित करण्यासाठीं प्रिन्स मान लववितात म्हणजे सर्व विधि संपला. कांहीं अगत्याच्या लोकांस कुशल प्रश्नही विचारण्याची चाल आहे. विधि आटपून दुसऱ्या दाराकडे बाहेर जाण्यासाठीं आह्मी वळलों. या दाराजवळ भिंतीशीं लार्ड सालिसबरी वगैरे प्रधानवर्गांतील सर्व मंडळी आपले दरबारी पोषाख घालून रांगेनें उभी होती. लार्ड क्रॉस यांनीं आम्हांस जातांना पाहून असें सुचविलें कीं, मर्जी वाटल्यास त्याच दालनांत उभें राहण्यास हरकत नाहीं; ह्मणून आह्मी तेथेंच कांहीं वेळ उभे राहिलों. महाराज कोणाशीं बोलत उभे राहिले व मी वेशवैचित्र्याचें सूक्ष्म निरीक्षण करण्याच्या इराद्यानें दृष्टीची इतस्ततः प्रेरणा केली. सर्वांमध्यें सैनिक वर्गांतील लोकांच्या पोषाखाची तऱ्हा पाहून फारच मजा वाटली. कोणाच्या शिरोभागीं अस्वलाच्या चामड्याची टोपी, कोणाच्या डोक्यावर भाराभर पिसें, कोणाच्या मस्तकावर तुरे, याप्रमाणें नानातऱ्हा अवलोकनांत आल्या. शिवाय चिनी, जपानी, इराणी, पार्शी, काठेवाडी, कच्छी, ब्रम्ही वगैरे सर्व प्रकारचे लोक स्वदेशरीतीप्रमाणें पोषाक केलेले दृष्टीस पडले. या समारंभास स्त्रियांस येण्याची परवानगी नाहीं.

तारीख २३ रोजीं आम्ही वूलिच येथील तोफखाना पहा-

च्यास गेलों. वूलिच हें गांव टेम्स नदीच्या कांठीं असून लंडनशहरापासून साडेचार कोस आहे. येथें जलमार्गानें नौकांमधून, किंवा भूमार्गानें अग्निरथांतून जातां येतें. मंगळवारीं व गुरुवारीं प्रेक्षकजनांसाठीं हा तोफखाना खुला असतो, परंतु प्रवेश होण्यासाठीं युद्धकार्यगृहांतून (वार आफिसांतून) अनुज्ञा पत्रिका मिळवावी लागते. परंतु अशा पत्रिका केवळ तद्देशीयांसच मिळतात. परदेशीयांस त्यांच्या प्रतिनिधीमार्फत परवानगी मिळवावी लागते. येथें तीन कारखाने आहेत. तोफा करण्याचा, गोळे व गोळ्या करण्याचा व तोफांच्या गाड्या करण्याचा. एकंदर कारखाना मिळून ३३३ एकर जमीन व्यापिली गेली आहे. येथें चौदा हजार मजूर लोक आहेत व त्यांच्या मजुरातीसाठीं दर आठवड्यास वीस हजार पौंडांचा खर्च आहे. या कारखान्यास लागून व टेम्स नदीच्या तीरप्रांतीं एक मैलभर युद्धसामुग्रीनें भरलेल्या अशा वखारी आहेत.

आह्मी कारखान्यांत गेलों तेव्हां तेथील अधिकाऱ्यांनीं आमचें चांगल्या प्रकारें स्वागत करून आह्मांस सर्व प्रकारचीं यंत्रें दाखवून त्यांच्याकडून होत असलेल्या कार्याचा स्पष्टपणें समज करून दिला. सर्व कारखान्यामधून जाणारा असा एक फारच अरुंद लोहमार्ग होता व त्यावर लहान लहान डबे होते. त्यांत बसून आह्मी सर्व कारखान्याभर फिरलों. तोफा ओतून बनवीत नाहींत, तर पोलादाचे पत्रे एकावर एक असे बसवून त्यांस अग्निप्रयोगानें संयुक्त करितात. पत्रे बरोबर बनले आहेत किंवा नाहींत हें पहाण्याचीं फारच सूक्ष्म अशीं यंत्रें आहेत. त्याचप्रमाणें गोळा भरून तोफा उडविण्यासाठींही स्वतंत्र जागा केली आहे. नदीच्या बाजूला वाळूचा एक उंच धक्का बनविलेला आहे. या धक्क्यांत गोळे जाऊन घुसतात. पोलादाचा रस करण्याची भट्टी व पाण्याच्या जोरानें आघात करणारा घण हीं पहाण्यासारखीं आहेत. त्याचप्रमाणें तोफेस तोंडें पाडून त्यांमधून भोंवऱ्यासारख्या रेषा खोदण्याचीं यंत्रेंही चमत्कारिक आहेत. सर्व कारखाना पहाणें झाल्यावर तेथें होत असलेल्या सर्व जिनसांचा संग्रह पहाण्यास आह्मी गेलों. येथें लहान बंदुकीच्या गोळीपासून मोठ्या तोफेच्या गोळ्यापर्यंत सर्व प्रकार

काष्टफलकावरून ठेविलेले आहेत. शिवाय त्यांची आभ्यंतररचना समजण्यासाठीं त्यांचे छेदही ठेविलेले आहेत. या कारखान्याच्या पश्चिमेच्या बाजूस कांहीं सैनिकगृहें आहेत. त्यांच्यासमोर क्रायमियांत व हिंदुस्थानांत लढाईंत मिळविलेल्या कांहीं तोफा ठेविलेल्या आहेत; त्यांमध्यें १६७७ सालीं औरंगझेब बादशाहासाठीं बनविलेली व भरतपूरच्या लढाईंत लुटून नेलेली साडेसोळा फूट लांबीची एक तोफ आहे.

तारीख २४ मे हा राणीसाहेबांचा जन्मदिवस असल्याकारणानें त्या दिवशीं सर्व कार्यगृहें बंद असतात व आबालवृद्ध सर्व प्रजा ख्यालीखुशाली व मौजमजा यांमध्यें कालक्रमण करून आपली राजनिष्ठा व्यक्त करितात. या दिवशीं प्रातःकाळीं प्रिन्स ऑफ वेल्स हे सैन्यनिरीक्षणाचा समारंभ व्हाइट्‌ हॉल जवळच्या मैदानांत करितात, त्या प्रसंगीं लोकांची फारच गर्दी होते. मैदानाच्या बाजूच्या कार्यगृहांतून अधिकारिजन आपल्या स्त्रीजनासमवेत येऊन बसतात. शिवाय शिष्ट अशा अभ्यागतांची सोयही तेथें करितात. ज्यांस अशा प्रकारची सोय उपलब्ध नसते ते मैदानाजवळ राखून ठेविलेल्या मोकळ्या जागेंत उभें राहण्याची परवानगी मिळवितात. बाकीचे लोक आजूबाजूच्या सर्व रस्त्यांवरून व सांपडेल त्या मोकळ्या जागेंत उभें राहतात. इतकी गर्दी असते तरी स्त्रिया बेलाशक मधून घुसून मार्ग करितात व आपलें कौतुक पुरवून घेतात. जनसंमर्दाच्या मौजेपलीकडे या समारंभांत प्रेक्षणीय असें मला कांहीं वाटलें नाहीं. याच दिवशीं आमच्या महाराजांस प्रिन्स साहेबांच्या तैनातींत ए. डि. कां. चा मान मिळाला व महाराज या समारंभांत प्रिन्सबरोबर होते.

याच दिवशीं लॉर्ड लिटन्‌ साहेबांच्या भेटीस आह्मी गेलों, व संध्याकाळीं सर ग्रांट डफ साहेबांकडे चहा घेण्यास गेलों. लेडी ग्रांट डफ यांच्या नातेवाइकांपैकीं कांहीं बायका तेथें आल्या होत्या, त्यांच्याशीं बोलणेंचालणें झालें व ग्रांट डफ साहेबांनींही कांहीं विचारपूस केली. यांचें घर आमच्या घराशेजारींच होतें. हें यांचें खासगी घर असून बरेंच नीटनेटकें होतें. लंडन

शहरांत अशा प्रतीच्या लोकांचीं देखील विस्तीर्ण व प्रशस्त अशीं घरें नसतात.

तारीख २५ रोजीं लॉर्ड लिटन् साहेब परत भेटीला आमच्याकडे आले होते. औपचारिक गोष्टींपलीकडे विशेष सांगण्यासारखें कांहीं या प्रसंगीं अवलोकनांत आलें नाहीं. संप्रदाय व उपचार यांचें प्राबल्य पाश्चात्य देशांत बरेंच आहे याविषयीं पूर्व लेखांत उल्लेख वारंवार आला आहेच; परंतु जेव्हां जेव्हां नवीन कांहीं आचारांचा कथाप्रसंग येतो, तेव्हां त्या विषयाची पुनरुक्ति करणें आवश्यक होतें. परत भेटीचा विषय निघाला तेव्हां त्यासंबंधीं एक मोठी मौजेची गोष्ट सांगितलीच पाहिजे. नांवाच्या चिठ्ठ्या छापण्याची चाल या देशांत सर्वांस महशूर झाली असेलच. अंशतः ती चाल आपल्या लोकांतही पडत चालली आहेच, परंतु त्या प्रांतांत ही चाल केवळ सार्वजनिक आहे. मोठ्या अमीरउमरावापासून तों लहानसहान दुकानदार व नोकरचाकरापर्यंत सर्व लोक आपल्या नांवांच्या चिठ्ठ्या छापवितात. चिठ्ठ्यांच्या मध्यभागीं नांव व डाव्या बाजूच्या खालच्या कोपऱ्यांत पत्ता लिहिण्याची चाल आहे. कोणाकडे भेटीला गेलें किंवा नांव व पत्ता सांगण्याचा प्रसंग आला असतां एक चिठ्ठी दिली ह्मणजे सर्व कार्यभाग होतो. यजमान घरीं नसले ह्मणजे दिलेली चिठ्ठी नोकर नेमलेल्या जागीं ठेवितो म्हणजे यजमानास अमुक गृहस्थ भेटण्यास आले होते असें समजतें. नोकराजवळ निरोप सांगण्याची गरज नाहीं व त्याच्या स्मरणशक्तीची परीक्षा घेण्याचीही अवश्यकता नाहीं. असो, येथवर सर्व व्यवस्था सुबोध आहे. यापलीकडे मात्र माझा तर्क कधीं गेला नाहीं. आम्ही बाहेरून आल्यावर कधीं कधीं मी अशा नामपत्रिका पहात असे. त्यांत लॉर्ड, अर्ल, ड्यूक वगैरे बड्या बड्या लोकांचीं नांवें आढळत व मला नवल वाटे कीं इतकी मंडळी भेटीसाठीं येऊन परत गेली; परंतु हा माझा केवळ भ्रम होता व कांहीं कालानें त्याचा निरास झाला. नामपत्रिका आल्या म्हणून तितके लोक स्वतः आले असें होत नाहीं. तेथें असा रिवाज आहे कीं, ज्यांची आपली ओळख झाली असेल त्यांपैकीं पाहून पाहून कांहीं लोकांच्या

घरीं समक्ष जावयाचें व बाकीच्यांच्या घरीं आपल्या माणसाबरोबर चिठ्ठ्या तेवढ्या पोंचत्या करावयाच्या. अशा चिठ्ठ्या पोंचविण्याचा काय अर्थ हें अजूनही मला गूढ आहे. पांच महिने हिंदुस्थानाबाहेर राहूनही या आचाराचें तत्व कळण्याइतकी संस्कृत माझी मति झाली नाहीं हें आश्चर्य ! "माझी तुमची ओळख आहे हो !" येवढेंच जाहीर करावयाचें असेल तर मात्र गोष्ट निराळी; परंतु यापलीकडे या आचारापासून स्नेहवृद्धि कशी होत असेल हें सांगवत नाहीं. इतकें सांगावयाचें राहिलें कीं या चिठ्ठ्या टपालांतून पाठवावयाच्या नाहींत. त्या माणसाबरोबरच दिल्या पाहिजेत.

याच दिवशीं दोन प्रहरीं आम्ही 'डार्बी' च्या शर्यती पहाण्यास गेलों. इंग्लंड देशांत घोडे फार सुरेख उत्पन्न होतात, व वळू तयार करून चांगल्या चांगल्या जाति निर्माण करण्याचा तिकडील धनाढ्य व अमीरउमराव लोकांस शोक आहे. या कामीं लाखों रुपये खर्च होतात. शर्यतीसाठीं तयार केलेल्या घोड्यांची किंमत फारच मोठी असते. दहा दहा वीस वीस हजार रुपयांचे घोडे म्हणजे कांहीं विशेष नाहींत. कधीं कधीं पन्नास हजारांपर्यंतही त्यांची किंमत चढते. डार्बीच्या शर्यती म्हणजे लंडन शहरांत एक वार्षिक उत्सव गणला जातो. या शर्यतींचा उपक्रम अर्ल ऑफ् डार्बी यांनीं १७८० सालीं केला, म्हणून त्यांस डार्बी हें नांव पडलें आहे. लंडन शहराच्या बाहेर कांहीं अंतरावर या शर्यती होत असतात. येथील चर्याभूमीच्या वर्तुळाची लांबी दीड मैल आहे. या उत्सवाविषयीं लोकांची इतकी आस्था आहे कीं, सर्व शहरांतील लोकसमुदाय तेथें लोटतो. लोहमार्गानें व रथमार्गानें, आबालवृद्ध, स्त्रीपुरुष, विपन्नसंपन्न, उद्योगशील व निरुद्योगी, असे सर्व प्रकारचे जन वार्षिकमहोत्सवाची संभावना करण्यासाठीं तेथें गमन करितात. कोणी सुखानुभवासाठीं, कोणी वाणिज्यासाठीं, कोणी अश्वविषयक द्यूत करून द्रव्यार्जन करण्यासाठीं, कोणी भैक्ष्यवृत्तीसाठीं, कोणी हौशी लोकांचें मनोरंजन करून अर्थप्राप्ति करून घेण्यासाठीं, कोणी स्नेहीजनांच्या सहवासापासून होणाऱ्या आनंदाचा आस्वाद

घेण्यासाठीं, कोणी असंख्य जनसमाजाचें अवलोकन करण्यासाठीं, कोणी एकंदर दृश्याचा चमत्कार पहाण्यासाठीं, असे नानाविध जन भिन्नभिन्न हेतूंनीं प्रेरित होऊन तेथें जमतात, व तो महोत्सव प्रेक्षणीय व स्मरणीय करण्यास कारणीभूत होतात. या शर्यती दोन चार दिवस चालतात, परंतु मुख्य दिवशीं (ज्यास डार्बी ह्मणतात) जनसंमर्द भयंकर असतो व पार्लमेंटचें काम सुद्धां बंद असतें. पार्लमेंटचें काम बंद राहूं नये याविषयीं वारंवार सूचना करण्यांत येतात, परंतु लोकाग्रह इतका जबर आहे कीं, त्या कधींच सफल होत नाहींत. येथें जाण्याला दोन लोहमार्ग आहेत. परंतु एका मार्गानें अगदीं जवळ जातां येतें व जनसमुदाय बहुतेक त्याच मार्गानें जातो. प्रिन्स ऑफ् वेल्स वगैरे राजकुटुंबांतील मंडळी स्पेशल ट्रेनमधून जातात. याच गाडींत आमचीही सोय केली होती. परंतु आगगाडीपेक्षां रथमार्गानें जाण्याची मौज जास्त आहे. श्रीमंत लोक चार घोड्यांच्या कोचांत बसून जातात. अशीं कोचें भाड्यानेंही मिळतात. अशा कोचांतून गेलें ह्मणजे आसमन्ताद्भागाची शोभा दिसून शिवाय जनसमाजाची मजा विशेष चांगली दिसते. या कोचांची रचना कशी असते हें पूर्वी सांगितलेंच आहे. यांत उपहाराची सर्व सामुग्री बरोबर घेतां येते व आठ दहा माणसें बसण्याची सोय असते. त्यामुळें बायकामाणसें, स्नेहीसोबती, नोकरचाकर वगैरेसह जाऊन कोणत्याही प्रकारची गैरसोय न होतां सर्व तऱ्हेचा आनंद प्राप्त होतो. अशा प्रकारच्या गाड्या शर्यतीच्या जागेच्या बाजूस उभ्या करण्याची सोय असते व गाड्यांतून न उतरतां सर्व मजा दृष्टीस पडते. दोन घोड्यांची चार माणसें बसण्याची गाडी भाड्यानें ठरविली तर सुमारें शंभर रुपये द्यावे लागतात, व एक घोड्याची दोन माणसांची क्याब केली तर त्याच्या निम्में भाडें पडतें. शर्यतीचा शेवट ज्या जागीं व्हावयाचा त्या जागीं व्यवस्थापक मंडळीसाठीं एक मंडप घातलेला असतो व घोड्यांच्या व्यवस्थेसाठीं तंबू मारलेले असतात, व दोहोंबाजूंस काष्ठफलकनिर्मित अशीं प्रेक्षक जनांसाठीं उच्च आसनें केलेलीं असतात. यांचें भाडें बरेंच जरब असतें.

कांहीं जागेंत नुसतें उभें राहण्याची सोय असते. तेथेंही भाडें दिल्याशिवाय प्रवेश होत नाहीं. या आंखलेल्या जागेपलीकडे सर्व इतर जन उभे रहातात. शर्यतींत कोणता घोडा पुढें धावेल याविषयीं पैज मारण्याचा एक धंदाच आहे. या धंद्याचे लोक एकसारखे आक्रोश करीत असतात व घोड्यांचीं नांवें घेऊन बाजूच्या लोकांस पैज मारण्यास उद्युक्त करितात. एकीकडे कोणी तमासगीर वेडावांकडा पोषाक करून विचित्र स्वरानें लोकांचें चित्त आपल्याकडे वेधण्याचा यत्न करितो. कोणी उंच उंच काठ्यांवर उभे राहून स्खलनशील अशा गमनानें जनांस हंसवितात. कोणी वृद्ध मनुष्य वाद्याची पेटी वाजवून आपली टोपी काढून याञ्चाव्यग्र असतो. कोणी ग्रामबालिका वामहस्तांत पुष्पकरंडक अर्पण करून सव्यहस्तांत सपल्लव अशा पुष्पकलिका घेऊन तरुणजनांपुढें जात असते व तरुणजन तिचा आदर करून पुष्पगुच्छ आपल्या उरोभागीं लटकावीत असतात. कोणी प्रौढवयस्क दारिका आपल्या अंध पित्यास बरोबर घेऊन दीनवत्सलांच्या हृदयांत अनुकंपा उत्पन्न करून त्यांपासून द्रव्याचें हरण करीत असते. ग्रामयुवती आपल्या अव्याजमनोहर रूपानें अल्लड नागरिकांस चटका लावून सलीलगतीनें एकाद्या ग्राम्यजनाबरोबर परिक्रमण करीत असते. कोणी उद्दाम प्रमदा कांहीं निमित्त करून आपल्या ज्ञातिजनापासून दूर जाऊन आपल्या वल्लभसमागमाचा संकेत पाळण्यासाठीं मोठ्या संभ्रमानें जात असते. कोणी पुरंध्री आपल्या परिवारांत मग्न होऊन आपल्या मुलांस इकडील तिकडील मौज दाखविण्यांत व्यग्र असते. विश्रांतिगृहामध्यें तर एकच गर्दी उडालेली असते. कोणी चहा मागतो, कोणी मिठाई, कोणी मद्य, कोणी कागदाच्या विड्या, कोणी चिरूट; याप्रमाणें ग्राहकांच्या भिन्न भिन्न अपेक्षांचें समाधान करण्यांत दुकानदार व त्यांचे नोकरचाकर यांची धांदल झालेली असते. अशा प्रकारची सर्व व्यवस्था चालली असतां घंटानाद श्रुतिगोचर होऊन सर्व शांत झालें. सर्व माणसें आपापल्या स्थानीं जाऊन बसलीं. शर्यतीच्या मंडलामधून चालत असलेला जनप्रवाह बंद झाला. दुसऱ्यानदा घंटा वाजली. शर्यतीचे घोडे सुटले, लोक तटस्थ होऊन अश्वगतीशीं

तन्मय झाले. सर्व दृग्विषय चित्रार्पित भासूं लागला. जसे अवसानभूमीजवळ घोडे येत चालले तशी प्रेक्षकांची उत्कंठा पराकाष्टेप्रत पोंचली. कोणी " चाबूक " " चाबूक " असा शब्द करीत स्वाभिमत अश्वाच्या स्वाराचें प्रोत्साहन करूं लागले. इतक्यांत घोड्यांच्या टापा जवळ जवळ ऐकूं येऊं लागल्या. जंगी टाळ्यांचा गजर झाला व शर्यतीचा निकाल झाला. यशस्वी घोडा व घोडेस्वार मोठ्या दिमाखानें परत फिरले. घोड्याचा मालक जवळ येऊन मोठ्या ममतेनें पाठ थोपटूं लागला. वर्षभर मेहनत केल्याचें सार्थक झालेसें पाहून त्यास कृतकृत्यता वाटली. पराजित लोकांच्या उत्साहाचा भंग झाला, व त्यांच्या घोड्यावर ज्यांनीं पैज मारिली त्यांचें मधल्यामध्येंच नुकसानही अर्थात् झालेंच. मग फिरून कोलाहल सुरू झाला व दुसऱ्या शर्यतीची तयारी चालली. याप्रमाणें ठरलेल्या सर्व शर्यती झाल्यावर जनसमाज अपसृत झाला व अवलोकन केलेल्या गोष्टीबद्दल गप्पा मारीत मारीत लोक घरीं गेले.

या शर्यतींत एकासमयीं पंधरा पंधरा वीस वीस घोडे सुटतात. इनामाची रक्कम पन्नास साठ हजार रुपयांवर असते व प्रसंगविशेषीं तिच्यांत अधिक भरही पडते.

शर्यतींच्या सर्व घोड्यांचें जन्मटिपण व त्यांच्या वंशावलीची हकीकत लिहून ठेवण्याची चाल आहे. जो घोडा जिंकतो त्या घोड्यासंबंधीं या प्रकारची सर्व हकीकत दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांत येते.

मला स्वतःला शर्यतीचा फारसा शौक नाहीं यामुळें तद्विषयक गोष्टीकडे माझें फारसें लक्ष नव्हतें. मला विचित्र जनसमाज व चमत्कृतिजनक दृग्विषय यांचीच मौज वाटली व हा समारंभ अवश्य प्रेक्षणीय आहे अशी खात्री झाली.

शर्यतीच्या दिवशींच रात्रीं लेडी गोल्डस्मिड यांजकडे " ईव्हिनिंग पार्टी " चा समारंभ होता तेथें आम्ही गेलों. लंडन शहरांत गेल्यापासूनें अशा समारंभास जाण्याचा हा पहिलाच प्रसंग. असे समारंभ वसंत व ग्रीष्म ऋतूंमध्यें अमीरउमराव लोकांच्या घरीं एकेकदां होण्याचा संप्रदाय आहे. आमंत्रणाच्या

छापील चिठ्ठया पाठवितात व आमंत्रणाचा स्वीकार केला किंवा नाहीं याबद्दल उत्तर मागविण्याची चाल आहे. समारंभ भोजनोत्तर उत्तर रात्री करण्याचा परिपाठ आहे. सर्व स्त्रीपुरूष " इव्हिनिंग ड्रेस " घालून येतात. या वेषांत स्त्रियांचा उरोभाग व बाहुयुगुलें अनावृत्त असतात हें पूर्वी सांगितलेंच आहे. लेडी गोल्डस्मिड यांचा वाडा बराच प्रशस्त असून भरवस्तींत आहे. दाराशीं नोकर लोक उभे होतेच. आंत गेल्यावर डाव्या हाताला एक खोली होती तेथें ओव्हरकोट काढून ठेवण्यासाठीं आह्मी गेलों. येथें दोनतीन माणसें होतीं तीं सर्व ओव्हर-कोट व्यवस्थेनें लावून ठेवीत व त्यांवर अनुक्रमसूचक अशीं चिन्हें घालून त्या चिन्हाचें एक पदक अभ्यागतांस देत. अशा व्यवस्थेमुळें परत जातांना गोंधळ न होतां ज्याचे कपडे त्यास मिळत. ओव्हर-कोट काढून ठेवून आम्ही जिना चढून माडीवर गेलों; तेथें यजमानीण बाई स्वागत करण्यास उभ्या होत्या. हस्तस्पर्शविधि झाल्यावर आह्मांस दिवाणखान्यांत जावयास त्यांनीं सांगितलें व आपण तेथेंच उभ्या राहिल्या. दिवाणखाना बराच मोठा होता; परंतु हळूहळू लोकांची इतकी गर्दी झाली कीं एका भागांतून दुसऱ्या भागांत धक्काबुक्की केल्याशिवाय जाणें मुष्कील होऊं लागलें. झुंबरें ठिकाठिकाणीं असल्याकारणानें प्रकाश उज्ज्वल होता. भिंतीच्या बाजूनें मधून मधून खुर्च्या व कोचें ठेविलीं होतीं, परंतु गर्दीमुळें त्यांची अडचण वाटूं लागली. कांहीं पोक्त व अशक्त स्त्रिया खेरीज करून बाकी सर्व मंडळी उभी होती. आह्मीही एका कोपऱ्यांत उभे राहिलों. मधून मधून कोणी आमच्या जवळ येऊन दोन शब्द बोलत व निघून जात. तरुण पुरूष व तरुण स्त्रिया यांस असा प्रसंग मोठा अभिमत असतो. परिचित प्रियजनांशीं समागम होण्याचा प्रसंग तरुणजनांस सुखप्रद कां होणार नाहीं ? आपल्या प्रियतमेचा आपल्याविषयीं ग्रह चांगला करण्याची ही योग्य संधि असें वाटून कामिजन अश्रांत परिश्रम करितात. तिच्या इच्छेप्रमाणें वर्तन, तिच्या मनाचें रंजन, तिला अभिमत अशा खाद्य व पेय वस्तूंचें समानयन इत्यादि प्रकारांनीं प्रेयसीछंदानुवर्तनांत

तें व्यग्र असतात. मध्यम वयस्क स्त्रीपुरुष शांत वृत्तीनें ओळखीच्या लोकांशीं संभाषण करीत असतात, व यांपैकींच कांहीं केव्हां केव्हां आमच्याकडे वळत. मला अशा स्थितींत उभें राहण्याचा कंटाळा आला; परंतु नाइलाजामुळें दोन तास तसे घालविले. बारा वाजावयाचे सुमारास आम्हीं दिवाणखान्यांतून निघून खालीं उतरलों तों कांहीं मंडळी एका दालनांत उपहार करीत होती. सर्व विधि उभ्यानेंच चालला होता. आम्हांस तिकडे जाण्याविषयीं कोणी सुचविलें नाहीं व आम्हीही तिकडे गेलों नाहीं. अशा प्रसंगीं अभ्यागत जनांनीं स्वच्छंदानें लागेल तें मागून घ्यावें, खावें व प्यावें अशी चाल आहे. त्यांस तसें करण्यास आग्रह करण्याची किंवा निदान सूचना किंवा विनंति करण्याची चाल त्या देशांत नसावी असें वाटतें. आम्ही आपले ओव्हर-कोट घेऊन दाराशीं जाऊन आमच्या नोकरास खूण केली तेव्हां तो गाडी आणावयास गेला. जसजशा गाड्या दाराशीं येत तसतशी त्यांच्या मालकांचीं नावें कांहीं लोक पुकारीत, म्हणजे यजमान पुढें जात. ही व्यवस्था ठेवणारे लोक भाड्यानें मिळतात व शिवाय लोकांकडून त्यांस द्रव्यप्राप्ति होते. आम्ही निघालों तेव्हां समाज विरल होऊं लागला नव्हता. या प्रकारचा समारंभ एकदोन वाजेपर्यंत चालतो. नाच असला म्हणजे मात्र प्रभातसमय होईतोंपर्यंत मौज चाललेली असते.

तारीख २८ रोजीं मी ‘ ब्रिटिश्म्युझियम ’ नामक प्रसिद्ध संग्रहालय पाहण्यास गेलों. ही इमारत लंडन शहराच्या पश्चिम भागांत आहे; तथापि रहदारीच्या रस्त्यापासून दूर असल्याकारणानें तो प्रांत शांत व भयाण असा वाटतो. शिवाय इमारतीचें उग्र स्वरूप या ग्रहास पुष्टी देतें. इमारतीच्या पुरोभागाची लांबी ३७० फूट असून तो भाग ऊंच व भव्य अशा कोरलेल्या स्तंभांनीं विभूषित आहे. हे सर्व स्तंभ एका रांगेनें नाहींत. मध्यभागीं कांहीं स्तंभ असून त्यांना लागून एक अल्प सोपानपरंपरा आहे. दोन बाजूंस दोन पार्श्वभाग आहेत त्यांच्या पुरोभागींही स्तंभ आहेत. हे स्तंभ इमारतीच्या एकंदर ऊंचीपर्यंत पोंचलेले आहेत, त्यामुळें विशाल दिसतात व बहु-

कालपर्यंत परिष्कृत नसल्याकारणानें त्यांस आलेला कृष्ण वर्ण उग्रता आणण्यास कारणीभूत होतो. या इमारतीची रचना ग्रीक शिल्प पद्धतीची आहे. पायऱ्या चढून वर गेलें म्हणजे खांबाच्या दोन रांगा लागतात त्यांच्या मधून मधून प्रस्तर निर्मित अशा प्रतिमा ठेविलेल्या आहेत. उजव्या बाजूस मानव जातीच्या उत्कर्षाची निदर्शक अशी एक प्रतिमा आहे व डाव्या बाजूस गणित, नाट्य, काव्य, संगीत व पदार्थविज्ञान या शास्त्रांच्या निदर्शक अशा मूर्ती आहेत.

या इमारतींत जो वस्तुसंग्रह आहे तो अद्वितीय म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. या संग्रहाचा आरंभ १७५३ वर्षी झाला. सर हॅान्स स्लोन नांवाच्या गृहस्थांनीं आपल्या मृत्युपश्चात आपला पन्नास हजार पौंड किमतीचा पुस्तकसंग्रह सरकारास वीस हजार पौंडास देण्याविषयीं लिहून ठेविलें होतें. या देणगीचा स्वीकार करण्यासाठीं एक नवा कायदा करण्यांत आला. या गृहस्थांनीं दिलेलीं पुस्तकें व इतर वस्तु व सर जॉन कॉटन व रॉबर्ट हार्ले यांनीं दिलेल्या वस्तु एकत्र करून या सर्वांचा एक सार्वजनिक संग्रह बनविण्यांत आला. १८०१ सालीं तिसऱ्या जॉर्ज राजानें कांहीं मिसर देशीय प्राचीन वस्तु नजर दिल्या; व १८१३ सालीं चवथ्या जॉर्ज राजानें सर्व खासगी पुस्तकें या संग्रहास देऊन टाकिलीं. यापुढेंही इतर गृहस्थांनीं वेळोवेळीं पुष्कळ वस्तु येथें पाठविल्या. वस्तूंचा संग्रह उत्तरोत्तर इतका वाढला कीं त्यासाठीं निराळी इमारत बांधणें जरूर झालें. व ही इमारत १८५२ सालीं तयार झाली. हल्लीं असलेल्या सर्व वस्तुजाताचे सात विभाग आहेत. (१) छापील पुस्तकें; (२) हस्तलिखित लेख; (३) नकाशे; (४) पूर्व देशांतील वस्तु; (५) ब्रिटिश व मध्ययुगीय वस्तु; (६) ग्रीक व रोमन पुरातन वस्तु; (७) नाणीं, मुद्रा वगैरे. पूर्वी प्राणिशास्त्र वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र व खनिजपदार्थशास्त्र या वर्गचतुष्टयासंबंधीं वस्तुसमुदायही येथेंच असे; परंतु हल्लीं केन्सिंगटन येथील संग्रहालयांत त्यांचा समावेश झाला आहे.

ही इमारत रविवार खेरीजकरून बाकी सर्व दिवशीं सकाळचे दहावाजल्यापासून खुली असते. बंद होण्याचा स-

मय ऋतुमानाप्रमाणें बदलत असतो व तो संध्याकाळच्या ४ पासून ८ वाजेपर्यंत असतो. कांहीं भागांत नियमित दिवशीं विद्यार्थिजनांशिवाय इतरांस येण्याची परवानगी नसते. प्रवेश होण्यासाठीं कांहीं द्यावें लागत नाहीं. छत्र्या व काठ्या मात्र आंत नेण्याची मनाई आहे. त्या ठेवण्यासाठीं अलाहिदा तजवीज केलेली आहे.

या संग्रहालयांतील सर्व वस्तूंचें अवलोकन करण्यास कांहीं महिने किंवा कांहीं वर्षें लागतील. मला अवकाश थोडाच होता. मी एकंदर दोन वेळ कायतो येथें गेलों होतों, व दोन दोन तीन तीन तासांपेक्षां जास्त वेळ मला नव्हता. तेव्हां केवळ विहगदृष्टीनेंच निरीक्षण करून मला समाधान करून घ्यावें लागलें. दुसरी एक गोष्ट सांगणें अवश्यक आहे ती ही कीं, येथील सर्व संग्रह शास्त्रीय दृष्ट्या अमोलिक आहेत. विशिष्ट शास्त्राचा ज्यांस शौक असेल किंवा ज्यांस अभ्यास करणें असेल, त्यास या संग्रहापासून जितका आनंद होईल तितका प्राकृत जनास होणें शक्य नाहीं. आथेन्स व रोममधील मूर्तिसमुदाय पाहून एखाद्या शिल्पशास्त्र्यास, चित्रशाळेंतील प्राचीन व अर्वाचीन चित्रसंग्रहाचें परीक्षण करून लेखनकलाभिज्ञास, मिसर देशीय पुरातन वस्तूंचें अवलोकन करून प्राक्कालीनविषयकोविदास, प्राचीन मुद्रासंग्रहाच्या दर्शनानें ऐतिहासिकास जसा आनंद, जसा उल्हास व जशी आस्था वाटेल त्या प्रकारचा आनंद, त्या प्रकारचा उल्हास व त्या प्रकारची आस्था असंस्कृत जनास कशी वाटावी ! तेव्हां अर्थातूच येथील वस्तुजाताची खरी किंमत व त्याचें खरें वर्णन करण्यास मी योग्य नाहीं, ह्मणून तपशीलवार माहिती देण्याच्या भरीस न पडतां केवळ स्थूलदृष्ट्या संग्रहीत वस्तूंची हकीकत देऊन दुसऱ्या विषयाकडे वळूं.

ही इमारत दुमजली असून शिवाय तळघरांतही कांहीं दालनें काढलेलीं आहेत. तळमजल्याच्या मध्यभागीं एक विस्तीर्ण वाचनगृह असून त्याच्या सभोंवतीं पुस्तकांचा संग्रह आहे व बाजूच्या खोल्यांमधून ग्रीक, रोमन, इजिप्शियन, आसीरियन, इफीशियन वगैरे प्राचीन वस्तूंचा संग्रह आहे.

पूर्वेच्या कोंपऱ्यांत हस्तलेखांचा संग्रह आहे व जवळच त्यांचें परीक्षण करणाऱ्या लोकांच्या सोयीसाठीं एक स्वतंत्र खोली आहे. या दालनांच्या उत्तरेस प्राचीन मुद्रित लेखांचा संग्रह आहे.

हस्तलेखामध्यें आंग्लदेशीय व इतर प्राचीन कवि, कादंबरीकार, धर्मगुरु, मुत्सद्दी, शास्त्री व राजे यांचे लेख आहेत, व माग्नाचार्टासारखे प्रसिद्ध कौलकरार व दस्तऐवज यांचे अस्सल लेख आहेत. लेखनकला कसकशी सुधारत गेली याचे नमुने कालक्रमाप्रमाणें एका ठिकाणीं लावून ठेविलेले आहेत, व एका स्थलीं संस्कृत, पाली, सिंगालीस, आरबी, फारशी इत्यादि प्राच्य भाषांतील लेख ठेविलेले आहेत.

मुद्रितलेखसंग्रहही असाच चमत्कारिक आहे. मुद्रणकलेच्या उद्भवापासून फरक कसकसे होत गेले याचे निदर्शक असे लेख येथें व्यवस्थित रीतीनें ठेविले आहेत. शिवाय भिन्न भिन्न देशांत या कलेचा प्रचार कोणत्या रूपानें झाला याचा स्फुट प्रत्यय येथें मिळतो.

पश्चिमच्या टोंकास प्राचीन मूर्तिसंग्रह आहे. पहिल्या दालनांत रोमन मूर्ति आहेत. जूलिअस सीझर, ऑगस्टस व इतर रोमन बादशाह, डिमास्थेनीज आणि एपिक्यूरस यांच्या ऊर्ध्वकाय प्रतिमा आहेत. एका दालनांत ग्रीक व रोमन देवतांच्या प्रतिमा आहेत. यांपैकीं कांहीं अस्सल असून कांहीं नकला आहेत. एका दालनांत एशियामायनर प्रांतांतील प्राचीनवस्तु आहेत. एफीसस येथील डाएनाच्या देवालयाचे मोडकेतोडके कांहीं भाग येथें आहेत. लार्ड एल्जिनसाहेबांच्या नांवाचें एक दालन आहे, त्यांत आथेन्स येथील पार्थेनन देवालयासाठीं फिडियस नांवाच्या तक्षकानें कोरलेलें कांहीं दगडी सामान ठेविलेलें आहे. १८०१–३ सालीं लार्ड एल्जिन साहेब कान्स्टांटिनोपल येथें प्रतिनिधि होते; तेव्हां त्यांनीं हें सामान सत्तर हजार पौंड देऊन हस्तगत केलें व नंतर १८१६ सालीं इंग्रज सरकारास निम्मे किंमतीला विकलें. दुसऱ्या एका दालनांत आथेन्स खेरीज करून ग्रीस देशांतील बाकी सर्व ठिकाणच्या प्राचीन प्रतिमांचा संग्रह आहे. तेथून पुढें

असीरियन वस्तूंचीं तीन दालनें आहेत. प्राचीन निनेव्हे व निमरुड शहरांतील अडीच हजार वर्षांपूर्वीचीं नाणीं, दगडी सामान, प्रतिमा, अलंकार, नक्षीचें काम या सर्वांचा महाप्रयासानें सर हेन्री लेअर्ड साहेबांनीं केलेला संग्रह येथें ठेविलेला आहे. त्याचप्रमाणें फिनिशिया, पालेस्टाइन, कार्थेज व सायप्रस येथील प्राचीन वस्तु व लेख हेही येथेंच आहेत. इजिप्शियन दालनांत ख्रिस्ती शकापूर्वी तीन हजार वर्षांपासून त्या शकाच्या सहाशें वर्षांपर्यंतच्या सर्व वस्तु कालक्रमानें लाऊन ठेविल्या आहेत. इजिप्शियन लोकांच्या देवता, त्यांची लिपि, त्यांच्या कला, त्यांचें शिल्पशास्त्र, त्यांचीं नाणीं, त्यांचे राजे या सर्वांसंबंधीं फारच मोठा वस्तुसंग्रह येथें आढळतो. असा संग्रह खुद्द इजिप्त देशांत देखील उपलभ्य नाहीं. तळमजल्यावरून वरच्या मजल्यावर जाण्याकरितां जो मुख्य जिना आहे, त्या जिन्याच्या बाजूनें भिंतीवर जुन्या तऱ्हेच्या पातळ कागदावर लिहिलेले इजिप्शियन लिपीचे नमुने आहेत. या लिपीचे ' हायरॉग्लिफिक, ' ' हायरॅटिक, ' व ' डेमॉटिक ' असे तीन प्रकार आहेत. वरच्या मजल्यावरही कांहीं दालनांत इजिप्शिअन वस्तु आहेत. बाकी राहिल्यापैकीं कांहीं दालनांत ख्रिश्चियन कालांतील कारागिरीच्या निदर्शक अशा वस्तु आहेत. दोन दालनांमध्यें प्राचीन नाण्यांचा संग्रह आहे. एकांत फ्रेंच, डच, जर्मन व इटालियन पदकें आहेत, व दुसऱ्यांत इंग्लिश, स्कॉटिश, आयरिश, व अमेरिकन नाणीं आहेत. चार दालनांत नानातऱ्हेचीं मातीचीं व दगडाचीं पात्रें ठेविलेलीं आहेत. दोन दालनांत ब्रॉन्झ धातूचीं भांडीं व पुतळे आहेत. एका दालनांत सुवर्णालंकार व मूल्यवान् रत्नांचा संग्रह आहे. हा संग्रह सर्व यूरोपांत अतिउत्तम आहे अशी ख्याति आहे. या दालनांत सर्वांस जाण्याची परवानगी नाहीं. एका दालनांत व्हेनिस, जर्मनी, इराण, डमास्कस, ऱ्होडूस, इटली व सिसिली व स्पेन या देशांतील कांचेचीं व मातीचीं भांडीं आहेत. बाकी राहिलेल्या चार दालनांपैकीं एकांत आंग्लोसॅक्सन, एकांत आंग्लोरोमन, एकांत मेडीव्हल, व एकांत एशियाटिक प्राचीन वस्तु आहेत. एशियाटिक दालनांत बौद्ध, हिंदु व जैन

धर्मसंबंधी वस्तु आहेत, व शिवाय इकडील तऱ्हेचीं भांडीं व चिनी, जपानी; हिंदुस्थानी व इराणी कारागिरीचे नमुने आहेत. पूर्वेच्या बाजूस एक विस्तीर्ण दिवाणखाना आहे, तेथें सर्व पृथ्वीवरील सुधारणेचा संस्कार न झालेल्या लोकांच्या चालीरीति, त्यांचे वेश, त्यांची युद्धपद्धति, त्यांचे धंदे, त्यांचीं शस्त्रास्त्रें, यांच्या निदर्शक अशा जिनसा आहेत.

या संग्रहालयांतील वस्तुसंग्रह पाहणारांची संख्या दरवर्षीं पांच लक्षांवर असते.येथें कधीं कधीं व्याख्यानेंही होत असतात.

येथवर स्थूलमानानें वस्तुजाताचें दिग्दर्शन झालें. आतां येथील वाचनगृहाबद्दल दोन शब्द लिहिले म्हणजे हा विषय आटपला. या सर्व इमारतींत मला या संस्थेची जितकी मौज वाटली तितकी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची वाटली नाहीं.

हें वाचनगृह तळमजल्यावर आहे हें वर सांगितलेंच आहे. संग्रहालयाच्या पिछाडीला पुस्तकालयाशेजारींच याची योजना केलेली आहे. याची रचना १८५२–५७ सालीं झाली व यावर पंधरा लक्ष रुपये खर्च झाले आहेत. अशा प्रकारचें वाचनगृह पृथ्वीवर इतर ठिकाणीं नसेल. याची विशालता, याची व्यवस्था व याची रचना केवळ अद्वितीय आहे. ज्ञानेच्छुजनांच्या उपयोगासाठीं अशा प्रकारची संस्था या लंडन शहरांत आहे हेंचे एक राष्ट्राच्या उन्नतीचें व उत्कृष्टावस्थेचें सबळ प्रमाण आहे, व या संस्थेचा उपयोग लोक सतत करितात ही गोष्ट त्या प्रमाणाची पोषक आहे. येथील पुस्तकालयांत सुमारें १५ लक्ष पुस्तकें आहेत व प्रतिवर्षीं तीस हजार पुस्तकांची भर पडत असते. सकाळीं ९ वाजल्यापासून रात्रीं ७–८ वाजतपर्यंत हें गृह खुलें असतें व सरासरीनें प्रतिदिवशीं ६०० लोक तेथें येऊन लिहीत व वाचीत बसतात, व सरासरीनें तीन हजार पुस्तकांचा रोज उपयोग करितात.

ही भव्य इमारत वर्तुलाकार असून इच्या शिरोभागीं वर्तुलाकार असें कांचमय छत आहे. इचें क्षेत्रफळ ४८००० फूट आहे. सर्व इमारत लोखंडी असून सभोंवतीं २७–३० फूट जागा मोकळी सोडलेली आहे, यामुळें सर्व बाजूंनीं स्वच्छ हवा व प्रकाश आंत येतो व आसमंताद्भागाच्या इमारतींसंबंधानें

अग्नीच्या बाधेची भीति कमी होते. घुमटाचा व्यास १४० फूट आहे व उंची १०६ फूट आहे; यावरून असें होतें कीं व्यासासंबंधानें हा घुमट रोम येथील पॅान्थियन खेरीज करून जगांतील इतर घुमटांपेक्षां मोठा आहे. इमारतीच्या छतामध्यें दूषित हवा बाहेर घालविण्याची व स्वच्छ हवा आंत घेण्याची योजना केली आहे. येथें एकसमयावच्छेदेंकरून ३६० लोकांची वाचण्याची व लिहिण्याची सोय आहे. प्रत्येक माणशीं चार फूट तीन इंच जागा आंखून दिली आहे, व पलीकडला मनुष्य दिसूं नये म्हणून मेजाच्या आग्रभागीं उंच फळ्या जोडलेल्या आहेत, व त्या फळ्यांना पुस्तकें ठेवण्यासाठीं लहान लहान कपाटें जोडलेलीं आहेत. दोन मेजांच्या मधील जागेंत दऊत व लेखण्या ठेवण्याची तजवीज असते; व वरच्या बाजूला टोपी ठेवण्यासाठीं एक खुंटी असते. सर्व मेजें लोखंडी असून त्यांच्या खालच्या व वरच्या भागास नळ्या आहेत. त्या नळ्यांमधून हवा जाण्याची व येण्याची सोय आहे. पाय टेंकण्यासाठींही नळ्याच असतात व गरज लागेल तेव्हां या नळ्यांमधून ऊन पाणी घालून पायांस ऊब देतां येते. गृहाच्या मध्यभागीं लहानशी वर्तुलाकार जागा आंखलेली आहे, तेथें सुपरिंटेन्डन्ट व त्यांच्या हाताखालील कारकून बसतात. या वर्तुलाच्या बाहेर आणखी थोडी वर्तुलाकार जागा आंखलेली आहे, तेथें मेजें मांडलेलीं आहेत. त्यांवर तेथें असलेल्या सर्व पुस्तकांच्या, वर्तमानपत्रांच्या व हस्तलेखांच्या यादी ठेविल्या आहेत. या यादींच्या पुस्तकांचे सुमारें २००० भाग आहेत. या शिवाय येथें लहान लहान पत्रिकाही ठेविलेल्या आहेत. पत्रिकांवर एका अंगास वाचनगृहाचे नियम लिहिलेले आहेत व दुसऱ्या अंगास पुस्तकें मागणें झाल्यास लिहून देण्याचा नमुना नमूद केलेला असतो. या वर्तुलाच्या बाहेरील जागेमध्यें पाठक जनांचीं आसनें आहेत. हीं आसनें वर निर्दिष्ट केलेल्या दोन वर्तुलांपासून तीं अखेरपर्यंत सरळ रांगांनीं ठेविलेलीं आहेत. त्यामुळें तीं आंतील वर्तुलें व बाजूचीं आसनें हीं चक्राचा मध्यभाग व त्यास नेमीशीं जोडणारा अरसमूह यां सारखीं दिसतात. कांहीं आसनें स्त्रियांसाठीं स्वतंत्र ठेविलीं आ-

हेत. कांहीं मोठीं व प्रशस्त अशीं केलेलीं आहेत व यांवर ज्यास साधारण पुस्तकाच्या आकृतीपेक्षां मोठीं पुस्तकें घेऊन वाचणें किंवा लिहिणें असेल त्यास बसण्याची परवानगी असते.

आसनांच्या सभोंवतीं पुस्तकांनीं भरलेलीं अशीं लोखंडी कपाटें आहेत. तळमजल्यावर भिंतीच्या बाजूला एक रांग लागलेली असून वरच्या बाजूला एकीवर एक अशा दोन अलिंदभूमिका काढिलेल्या आहेत त्यांवरही पुस्तकें ठेवण्याची व्यवस्था केली आहे. लोखंडी खांब उभे करून त्यांस लोखंडी पट्ट्या जोडून त्यांवर पुस्तकें ठेविलेलीं आहेत. या लोखंडी पट्ट्या वर खालीं करण्यासाठीं विशेष योजना केली आहे. पुस्तकांस सर्व बाजूंनीं स्वच्छ हवा लागावी अशी तजवीज आहे. वर जाण्याकरितां चाळीस फुटांच्या अंतरावर जिने केले आहेत. हीं कपाटें एकाशीं एक जोडलीं तर यांची एकंदर लांबी तीन मैल होईल असा अजमास आहे.

या वाचनगृहांत एकंदर दृग्विषय फारच मौजेचा दिसतो. सर्वजन स्वकार्यव्यग्र असून दुसऱ्यास उपद्रव करीत नाहींत. व्यवस्था उत्तम, प्रकाश उज्ज्वल, सोयी सर्व प्रकारच्या, पुस्तकसामुग्री विपुल, मन स्वस्थ रहाण्याला आवश्यक अशी शांतता, या कारणसमवायामुळें अध्ययनशीलजनांस उत्तेजन येतें व त्यांचें उद्दिष्ट कार्य अव्याहत सिद्धीस जातें. आगंतुक जनांस आंत जाण्याची परवानगी नसते, म्हणून दाराशींच उभा राहून मीं आंतील सर्व तऱ्हा सूक्ष्म रीतीनें पाहिली, तेव्हां मला मोठा चमत्कार वाटला. अगोदर इमारत सुरेख, त्यांतून आंतल्या बाजूनें नक्षी व सोनेरी मुलाम्याची रेलचेल, व तशांत सुंदर आभ्यंतर रचना व त्यांतही टापटिपीची, नीटनेटकेपणाची व शांततेची भर! मग काय विचारावें! मन तिकडे अगदीं वेधून राहिलें व कांहीं वेळ जागेवरून हालवेना.

या वाचनगृहाचा ज्यास उपयोग करावयाचा असेल त्यानें मुख्य अधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागतो. अर्जांत नांव, पत्ता व धंदा लिहून शिवाय एकाद्या सभ्य घरंदाजाची शिफारस मिळवावी लागते. अर्जदाराचें वय २१ वर्षांचे आंत असतां कामाचें नाहीं. एकाच्या नांवानें मिळालेला परवाना

दुसऱ्यास उपयोगी पडत नाहीं. आगंतुक जनासही प्रवेश-पत्रिका मिळतात परंतु आसनांमधून जाण्याची मनाई असते. तळमजल्यावर भिन्न भिन्न भाषांचे कोश व त्याच प्रकारचीं वाचतांना व लिहितांना लागणारीं इतर पुस्तकें आहेत. या पुस्तकांची संख्या सुमारें वीस हजार आहे, व हीं घेणें झाल्यास कोणासही विचारावें लागत नाहीं; परंतु इतर पुस्तकांसाठीं बरेंच सव्यापसव्य करावें लागतें. वर निर्दिष्ट केलेल्या पत्रिकेवर स्वतःचें व पुस्तकाचें नांव व आसनाचा क्रम लिहावा लागतो. शिवाय यादीमध्यें पुस्तकाच्या नांवासमोर लिहिलेला कपाटाचा क्रमही लिहावा लागतो. मग ही पत्रिका एका टोपलींत टाकितात व टोपलींतून ती अधिकाऱ्याकडे जाऊन मग नोकर लोकांकडून पुस्तक पोंचतें होतें. पुस्तकें वर चढविण्यासाठीं दोन ठिकाणीं यंत्राची योजना केलेली आहे. कोणत्या बाजूच्या कपाटांत कोणतीं पुस्तकें आहेत हें दाखविण्याकरितां रंगीत नकाशे आहेत व ते जागजागीं पसरलेले असतात. रात्रीं या इमारतीमध्यें विपुल विद्युत्प्रकाश असतो.

वर निर्दिष्ट केलेल्या अलिंदभूमिकांवर जो पुस्तकसंग्रह आहे त्याशिवाय वाचनगृहाच्या पूर्वेस व दक्षिणेस त्याला लागूनच दोन तीन दालनें आहेत, त्यांतही पुस्तकसंग्रह मोठा आहे.

अध्ययनाच्या सोयी व अध्ययनाला अनुकूल अशी व्यवस्था, नोकर लोकांची कार्यपरता वगैरे जशा या गृहांत आढळतात तशा दुसऱ्या देशांमध्यें थोड्याच ठिकाणीं सांपडतील असें लोक सांगतात.

मिस मॉनिंग.

तारीख ३० मे रोजीं मी. मिस् मॉनिंग बाईकडे गेलों. लंडन शहरांत नॅशनल इंडियन असोसिएशन नांवाची एक सभा आहे, त्या सभेच्या या बाई चिटणीस आहेत. या सभेचा मुख्य उद्देश आपल्या देशांतील लोकांच्या सामाजिक व नैतिक सुधारणेस उत्तेजन देण्याचा आहे व या उद्देशाच्या अंगभूत असलेलीं एकदोन कामें फारच उपयुक्त आहेत. एक हें कीं, 'इंडियन मॅगझीन' नांवाचें एक मासिक पुस्तक या सभेच्या दे-

खरेखी खालीं नियत असतें. या पुस्तकांत राजकीय व धर्मविषयक बाबती खेरीज करून सर्व प्रकारचे हिंदुस्थान-देशासंबंधीं लेख येत असतात. कांहीं लेख या देशाची ज्यास माहिती आहे अशा आंग्ल लोकांचे असतात, परंतु एतद्देशीय लोकांचे विचार या पुस्तकांत यावे याविषयीं मिस् मॅानिंग व इतर व्यवस्थापकांची फार उत्सुकता असते. तेव्हां ऐन राजधानीमध्यें आपल्या लोकांचे विचार प्रदर्शित करण्यास हें एक साधन या सभेच्या आश्रयानें उपस्थित झालें आहे ही सामान्य गोष्ट नव्हे. दुसरें काम हें कीं आपल्या देशांतून इंग्लंडांत जाणाऱ्या लोकांची सर्व प्रकारची तजवीज या सभेच्या मार्फत होण्यासारखी आहे. परदेशांत वैदेशिकास नानाप्रकारच्या अडचणी येतात व तशांतूनही केवळ विद्याभ्यासासाठीं अल्पवयांतच जे आपल्या मातापितरांपासून व बंधुवर्गांपासून दूर रहाण्याचा हिय्या करितात त्यांस तर व्यावहारिक ज्ञान कमी असल्यामुळें संकटें जास्तच येतात; तेव्हां अशा लोकांची व्यवस्था लावणें व त्यांजवर देखरेख ठेवणें यासारखें श्रेयस्कर काम दुसरें काय असावयाचें ? या सर्व कामांत मिस् मॅानिंग बाईचे श्रम, त्यांची व्यवस्था, त्यांचा पोक्तपणा, त्यांचे प्रौढ विचार, त्यांचा उपदेश यापासून आपल्या लोकांस अत्यंत मदत होते.

या बाईचा माझा परिचय कोणी करून दिला नाहीं. आमच्या येथें एक गृहस्थ आले होते त्यांनीं या बाईविषयीं माहिती सांगितली त्यावरून त्यांस भेटण्याची उत्कंठा मला झाली. लंडन शहराच्या वायव्य टोंकास एका शांत व रमणीय अशा प्रदेशांत यांचें लहानसें घर आहे. यांचें वय पन्नाशीच्या जवळजवळ असून या अविवाहित आहेत. यांच्या मातुःश्रीही हिंदुस्थान देशाविषयीं कळकळ बाळगीत होत्या व त्यांकडूनच मुलीस हें बाळकडू मिळालें होतें. यांचा स्वभाव गरीब, मुद्रा शांत व सौम्य, भाषण सरळ, व वागणूक सभ्य व परिचित जनांमध्यें पूज्य बुद्धि उत्पन्न करणारी आहे व कोणी केव्हांही गेला तरी त्याचें आस्थापूर्वक स्वागत करून त्याची सर्व प्रकारची व्यवस्था लावण्याविषयीं या फार तत्पर असतात. लागेल त्या कामाची माहिती देऊन चांगल्या चांगल्या लोकांच्या ओळखी करवून वैदेशि-

काचा विदेशवास सुखकर करण्यास त्या झटत असतात. कधीं कधीं एतद्देशियांस एकत्र मिळवून त्यांस बाहेरगांवीं एखादें प्रेक्षणीय स्थळ दाखविण्यासाठीं त्या घेऊन जातात. सारांश, या बाई आपल्याकडून होईल तितकी मदत करण्यास मागेंपुढें पहात नाहींत. अशा उदारचरितेचा परिचय व्हावा अशी इच्छा होणें साहजिकच आहे. मी गेलों तेव्हां या बाई एकट्याच कांहीं कामांत होत्या; तथापि माझ्या नांवावरून मी कोणीतरी परदेशीय आहें असें जाणून त्यांनीं मला एकदम आंत बोलाविलें व सुमार अर्धा तास माझी विचारपूस करण्यांत घालविला. शेवटीं निघतांना त्यांनीं मला तीन पत्रें दिलीं. एक सर एड्विन आर्नल्ड यांच्या नांवाचें, दुसरें डाक्तर रॉस्ट, व तिसरें मिस्तर फिच यांच्या नांवाचें. प्रथम निर्दिष्ट केलेले गृहस्थ ह्या देशांत पूर्वीं असून कांहीं दिवसांपूर्वीं येथें आले होते, व त्यांचें नांव बहुतेक सर्वांस महशूर आहेच. दुसरे गृहस्थ प्राच्यभाषाकोविद असून संस्कृत भाषेंत विशेष प्रवीण आहेत. व इंडिया आफिसांतील पुस्तकसंग्रहाचे अधिपति आहेत. तिसरे गृहस्थ शिक्षण खात्यांतील अधिकारी आहेत. सर एड्विन् आर्नल्ड हे डेलि टेलिग्राफ नांवाच्या प्रत्याहिक वर्तमानपत्राचे चालक आहेत व प्राच्य विषयाचे शोकी आहेत, तेव्हां त्यांच्या अल्प सहवासानें मला कांहीं फायदा व्हावा असा मिस् मॉनिंग बाईचा हेतु होता. त्याचप्रमाणें फिच साहेबांच्या मार्फत तिकडील शाळांतील शिक्षणक्रम, शिक्षणपद्धति, व्यवस्था वगैरे गोष्टींची माहिती व्हावी अशी त्यांची इच्छा होती. डाक्तर रॉस्ट हे संस्कृतज्ञ एवढ्यासाठीं त्यांची ओळख करून दिली. हीं पत्रें घेऊन मी निरोप घेतला. या प्रसंगानें माझ्या मनावर या बाईविषयीं चांगलाच ग्रह झाला व पुढें कधीं कधीं त्यांच्याकडे मी जात असें.

क्रिस्टल पॉलेस.

तारीख ३१ मे रोजीं आह्मीं ' क्रिस्टल पॉलेस ' पाहण्यास गेलों. ही इमारत हल्लीं सिडेनम नांवाच्या लंडन शहराच्या एका उपनगरांत आहे. १८५१ सालीं जें प्रथम औद्यो-

गिक प्रदर्शन झालें त्यासाठीं सर जोजेफ पॅक्स्टन नांवाच्या शिल्पकारानें एक केवळ कांचेची व लोखंडाची इमारत बांधिली होती, व प्रदर्शन आटपल्यानंतर १८५४ साली त्याच सामानाची हल्लींची इमारत बनविण्यांत आली. इमारती सभोंवतीं विस्तीर्ण उपवन आहे. जमिनीची किंमत धरून इमारतीस एकंदर दीडकोट रुपये खर्च झाला आहे. हल्लीं ही सर्व इमारत एका मंडळीच्या ताब्यांत असून तिचा उपयोग केवळ ऐषआराम व करमणूक याकरितां होत असतो. ही इमारत लंडन शहरापासून सात मैल दूर असून तेथें जाण्याकरितां आगगाड्यांची सोय आहे. भूपृष्ठावरून व भूगर्भामधून गेलेल्या लोहमार्गानें दर पंधरा मिनिटांनीं येथें गाड्या जात असतात; त्यामुळें जाण्यायेण्याची सोय उत्तम आहे. ही इमारत व आनुषंगिक वस्तूंचें केवळ विहगदृष्ट्या अवलोकन करणें झालें तरी अर्धा दिवस मोडतो, व यथास्थित सावकाश निरीक्षण करणें असल्यास एक दिवस घालविला तरी पुरत नाहीं.

ग्रीष्म ऋतूमध्यें चंद्रिकेचा समय असला ह्मणजे दिवस रात्र येथें घालविणारे शेंकडों लोक आहेत, व येथें सर्व प्रकारच्या सोयी अनुकूल असल्यामुळें तसें करणें सुखावहही होतें. कांहीं प्रसंगीं येथें दीपोत्सव होत असतो व समयविशेषीं दारुकामही सुटतें. अशा प्रसंगीं व कांहीं नियमित सणांच्या दिवशीं येथें जनसम्मर्द विशेष असतो.

ही इमारत सोमवारीं सकाळीं नऊ वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत खुली असते. इतर दिवशीं सकाळीं दहा वाजतां उघडते. प्रवेश होण्यासाठीं शनवारीं अडीच शिलिंग व इतरवारीं एक शिलिंग द्यावा लागतो. विशेष प्रसंगीं हे दर वाढविण्यांत येतात.

ही इमारत बाहेरून फारच मौजेची दिसते. इचें आवरण काचमय असल्या कारणानें सूर्यकिरणें त्यावर पडून चमत्कृतिजनक असा देखावा दृग्गोचर होतो. इचा विस्तार मोठा व उंची पुष्कळ आहे व आसमन्ताद्भागीं प्रशस्त अशा भूमिका आहेत, त्यांमुळें इमारतीच्या सौंदर्यास पुष्टि मिळते व तिचा भव्यपणा अधिकतर भासतो. रुंदी पायऱ्यांशीं अधिक आहे

व वरच्या प्रत्येक मजल्याला कमी कमी होत गेली आहे; त्यामुळें बाह्य आकृती एका विस्तीर्ण सोपानपरंपरेसारखी आहे. शिरोभाग अर्धवर्तुलाकार असून वरपासून खालपर्यंत एकंदर सात मजले चढविल्यासारखे बाहेरून दिसतात, परंतु आभ्यंतर कक्षांत गेलें ह्मणजे मध्यभागीं एक लांबच्या लांब सात मजल्यांच्या उंचीचा दिवाणखाना असून बाजूनें विस्तीर्ण दालनें व अलिंदभूमिका काढलेल्या दिसतात. मुख्य इमारतीस बाजूनें त्याच घाटाच्या परंतु लहान अशा इमारती जोडलेल्या आहेत.

प्रवेशद्वारें दोन आहेत. एक उंच व एक सखल आहे. सखल बाजूकडे आगगाडीचें स्टेशन व इमारत यांच्या दरम्यान एक ७२० फूट लांबीचा काचेच्या छताचा मार्ग आहे. या मार्गानें गेलें ह्मणजे दक्षिणेकडील दालनांत आपण जातों. या दालनांतून एकंदर इमारतीच्या आभ्यंतर रचनेचा देखावा सुरेख दृष्टीस पडतो. इथल्यापेक्षां वरच्या ग्यालरींत गेलें ह्मणजे विशेष मजा दिसते. इमारतीच्या मध्यभागीं एक विस्तीर्ण व उंच असा दिवाणखाना आहे. याची लांबी १६०८ फूट आहे. बाजूनें प्रशस्त दालनें आहेत. यांपैकीं मध्यदालनाची लांबी ३९० फूट, रुंदी १२० फूट, व उंची १७५ फूट आहे. दक्षिण दालनाची लांबी ३१२ फूट, रुंदी ७२ फूट व उंची ११० फूट आहे. दोन बाजूला दोन वाटोळे मनोरे आहेत त्यांची उंची २८२ फूट आहे. दिवाणखान्यामध्यें सौन्दर्यजनक व सौन्दर्यपोषक अशा वस्तूंचा विलक्षण संग्रह आहे. अगोदर इमारत विशाल, त्यांतून ती काचमय, त्यामुळें प्रकाशाचें वैपुल्य व तशांत अशा वस्तूंचा संग्रह, मग नेत्रांस चमत्कार, चित्तास विस्मय, हृदयास आल्हाद वाटेल यांत नवल काय ? इमारतीच्या बाह्य आकृतीच्या दर्शनानें तिच्या आभ्यंतर विशालतेची कल्पना उद्भूत झालेलीच असते. त्यामुळें आभ्यंतर वैभव पाहून संमोह उत्पन्न होत नाहीं. जर एखाद्याला एकदम आंतच उभें केलें तर मात्र त्याची त्रेधा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. ते उच्च लोहस्तंभ व त्यांवर ठिकठिकाणीं चढत गेलेल्या विचित्र लता, तें अर्धवर्तुलाकार काचमय छत व

बाजूच्या सुंदर अलिंदभूमिका, तो शुभ्रमृत्तिका व मर्मरोपल निर्मित प्रतिमासमूह, तो नेत्रांस सुख देणारा असा उज्वल प्रकाश, स्थलीं स्थलीं विचित्र पीठांवर व पुतळ्यांच्या शिरोभागीं ठेविलेलीं पुष्पलतांचीं व तालवृक्षांचीं पात्रें, मधून मधून असलेल्या दीर्घिका व त्यांस सनयन करणारीं उत्फुल्ल कमळें, अल्पजलतुषारांचा सेक करणारीं उद्गारयंत्रें, त्यांतून कांहीं काचमय व कांहीं प्रस्तरमय, दीर्घिकांच्या स्वच्छ जलांत पडलेलें आसमन्ताद्भागाचें प्रतिबिंब, त्याचप्रमाणें तेथें असलेल्या भिन्न वर्ण हंसांचा कलरव, परिष्कृत व सुरेख असे पथ, बाजूला असलेलीं लहान लहान दुकानें व त्यांवर देखरेख करणाऱ्या रूपवती युवती, त्यांचे नेत्रकटाक्ष, सलील विभ्रम, व मंदपादविक्षेप, प्रेक्षकजनसमूहाची साल्हाद मुद्रा—अशा एकंदर विषयजालाच्या योगानें चित्तास परिच्छेदातीत व अवर्णनीय असा आनंद होतो, मनोवृत्ति चंचल होतात व शिल्पकाराच्या कर्तृत्वाची धन्यता वाटते.

अशा प्रकारची चित्तवृत्ति झाली असतां आह्मीं कांहीं वेळ उभे राहिलों व प्रथम संस्काराची तीव्रता कमी झाल्यावर क्रमानें सर्व दालनांचें व वस्तुजाताचें निरीक्षण करण्यास आरंभ केला. दक्षिण दालनाच्या मध्यभागीं व्हिक्टोरिया राणीसाहेबांचा एक सुंदर अश्वारूढ पुतळा आहे व भिंतीच्या बाजूला इतर आंग्ल राजांच्या शुभ्र मृत्तिकेच्या प्रतिमा आहेत. थोड्या अंतरावर एक काचेचें जंगी कारंजें आहे. हें सुंदर जललतांनीं सुशोभित केलें आहे. याच दालनांत व याजवळील दिवाणखान्याच्या भागांत अर्वाचीन प्रतिमांचे नमुने आहेत व उत्तरेच्या बाजूस प्राचीन पुतळ्यांचे नमुने आहेत. मध्यदालनांत एका बाजूस एक विस्तीर्ण वादनशाला (ऑर्चेस्ट्रा) आहे. येथें एक प्रचंड वाद्य आहे त्यांत यंत्रानें वारा भरून मग तें वाजविण्यांत येतें. या वाद्यांत साडेचार हजार नळ्या आहेत व याची किंमत साठ हजार रुपये आहे. या शालेमध्यें चार हजार श्रोतृजनांची सोय आहे. दोन प्रहरच्या समयीं येथें वादनाचा प्रयोग होत असतो. दुसऱ्या बाजूस एक नाटकगृह आहे व जवळच एक गायनशाळा आहे. येथेंही प्रयोग सुरू असतात.

दिवाणखान्यामध्यें जागजागीं पुतळे मांडलेले आहेत. लोखंडी खांबावरून लता चढविलेल्या आहेत. मधून मधून कारंजीं आहेत व त्यांच्या सभोंवतीं पाण्यानें भरलेलीं अशीं तळीं आहेत. दिवाणखान्याच्या दोहों बाजूस दालनें काढलेलीं आहेत. त्यामध्यें सुधारलेल्या देशांतील शिल्प व तक्षण यांचे मासले कालक्रमाप्रमाणें ठेविलेले आहेत. इजिप्शियन दालनांत प्राचीन कालच्या देवालयांचे व इतर इमारतींचे हुबेहुब नमुने ठेविलेले आहेत. ख्रिस्ती शतकाचे पूर्वीं तिनशें वर्षांचें टालेमि राजाच्या वेळचें एक देवालय इजिप्ट देशांत आहे त्याची प्रतिकृति येथें आहे. ग्रीक दालनांत आथेन्स येथील ऑक्रॉपोलिसाचा नमुना असून ब्रिटिश म्युझियममध्यें असलेल्या कांहीं पुतळ्यांच्या नकला आहेत. रोमन दालनामध्यें तद्देशीय प्राचीन वस्तूंचा संग्रह आहे, तेथील इमारतींचे नमुने आहेत व पांपिआय शहराचे देखावे आहेत. एक दालन ग्रानडा येथील ' अॅल हंब्रा ' प्रासादाच्या नमुन्याचें आहे ह्मणून त्यास तेंच नांव दिलें आहे. हीं दालनें वलांडून गेलें ह्मणजे दिवाणखान्याच्या उत्तरेच्या टोंकास आपण पोंचतों. दक्षिण बाजूप्रमाणें येथेंही जलोद्गारयंत्रें व पुष्पांची व लतांची गर्दी आहे. येथून एक लहानसा जिना उतरलें ह्मणजे एक जलाशय लागतो. त्यामध्यें नानातऱ्हेचे मासे आहेत. याच बाजूला एक ' स्केटिंग रिंक ' आहे. इंग्लंड देशांत व उत्तरध्रुवाकडील प्रदेशांत हिंवाळ्यामध्यें पाणी गोठतें व त्याचें बर्फ बनतें तेव्हां बर्फावरून चालण्यासाठीं एक प्रकारचे जोडे घालतात. त्यांस स्केट्स ह्मणतात. तोच प्रकार दाखविण्यासाठीं जीं गृहें असतात त्यांस स्केटिंग रिंक ह्मणतात. येथें होत असलेले प्रयोग मौजेचे असतात. दिवाणखान्याच्या पूर्वेच्या बाजूसही पश्चिमच्या बाजूप्रमाणें दालनें आहेत. या दालनामध्यें सहाव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतच्या इमारती व पुतळे यांचे नमुने आहेत. बायझांटाईन, जर्मन, फ्रेंच, इंग्लिश इत्यादि सर्व प्रकार येथें आढळतात. इटालियन दालनांत प्रसिद्ध चित्रकार राफेल व तक्षणकलाविशारद मायकेल आंजेलो यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणाऱ्या जिनसा आहेत. यापुढें कांहीं दालनांत विकाऊ अशा नानाप्रकारच्या वस्तु आहेत

एका दालनांत नानातऱ्हेचीं वस्त्रें, एकांत यंत्रें व पुस्तकें, एकांत चिनी मातीचीं व काचेचीं भांडीं, व एकांत नानातऱ्हेच्या गाड्या आहेत. एका दालनाचें नांव पांपियन कोर्ट. या दालनांत टायटस राजाच्या वेळेस रोमन लोकांच्या घरांची रचना व व्यवस्था कशी होती हें दाखविण्यासाठीं पांपिआय येथें खणून काढलेल्या एका प्राचीन गृहाचा हुबेहुब नमुना बनविलेला आहे.

यापुढें आणखीं तीन दालनें लागतात; त्यांपैकीं एकांत गायनवादन यंत्रें आहेत; एकांत वाफेचीं यंत्रें आहेत व एकांत सर्व प्रकारची लेखनसामुग्री, कोरीव काम, फोटोग्राफ व उत्तम बांधणीचीं पुस्तकें आहेत. मध्यदालनांतून वर जाण्याकरितां एक जिना आहे तो चढून गेलें ह्मणजे ऑइल पेंटिंग्जचा (रंगांत तेल घालून त्यानें काढलेल्या तसबिरींचा) संग्रह दृष्टीस पडतो व पलीकडल्या बाजूला वॉटर कलर्सच्या (ह्मणजे रंगांत पाणी घालून त्यानें काढलेल्या) तसबिरी आहेत. येथें एका ठिकाणीं चित्रसंग्रह आहे, त्यांत सर्व राष्ट्रांतील प्रसिद्ध पुरुषांच्या प्रतिकृति आहेत. कांहीं अलिंदभूमिकामध्यें मुलांचीं खेळणीं, मेवामिठाई, कपडालत्ता वगैरे जिनसांचीं दुकानें आहेत.

वर निर्दिष्ट केलेल्या वस्तुजाताशिवाय येथें इतर करमणुकीचे मार्गही बरेच आहेत. जादूचे खेळ, कसरत, मृत पशुपक्ष्यांचा संग्रह, अंधकारांत दिसणारे चमत्कारिक चित्रप्रयोग, वगैरे नानातऱ्हेच्या मौजा येथें सदा मौजूद असतात. त्याचप्रमाणें आसमन्ताद्भागाच्या पटांगणांत घोड्यांचें सर्कस असतें. पाणबुड्यांचें कसब दाखविण्यासाठीं एक विहीर आहे. त्या विहिरीजवळ पाणबुडे नेहमीं तयार असतात व प्रेक्षक तेथें गेले म्हणजे तोंडावर आवरण घालून सज्ज होतात व आंत उडी घालितात. आंत स्वच्छ हवा पोंचविण्याची व दूषित हवा बाहेर काढण्याची नळ्या लावून तजवीज केलेली असते. प्रसंगविशेषीं या प्रासादांत फळांचें व पुष्पांचें प्रदर्शन होतें व कुत्र्यांचा व मांजरांचा बाजार भरतो. वर निर्दिष्ट केलेल्या सर्व तमाशाच्या ठिकाणीं जाणें असल्यास प्रत्येक जागीं निराळे पैसे द्यावे लागतात हें सांगणें नकोच.

येथील उद्यानभूमिका फार विस्तीर्ण व रमणीय आहेत. त्यांचें एकंदर क्षेत्रफळ २०० एकर असून भूमिभाग इटालियन व इंग्रजी तऱ्हांप्रमाणें नतोन्नत केलेले आहेत; त्यामुळें शोभा विशेष दिसते. स्थलीं स्थलीं तऱ्हेतऱ्हेचे फुलांचे गालिचे मोठ्या खुबीनें बनविलेले आहेत; लहानमोठ्या लता व्यवस्थेनें लाविलेल्या आहेत. प्रशस्त व सुंदर अशीं जलोद्गार यंत्रें ठिकठिकाणीं केलेलीं आहेत. कृत्रिम वारिप्रपात कुशलतेनें काढलेले आहेत, व सुरेख प्रस्तरप्रतिमा जागजागीं बसविलेल्या आहेत. प्रासादांतील वस्तुजाताचें निरीक्षण करून परिश्रांतजनाला विश्रांति देण्यासाठीं स्थळीं स्थलीं आसनें आहेत. येथील कारंजीं सर्व जगामध्यें अत्युत्तम आहेत असें ह्मणतात. दोन मोठ्या कारंज्यांतील पाणी २८० फूट वर उडत असतें व दुसऱ्या एका कारंजाचें १५० फूट उडतें. प्रसंगविशेषीं या सर्व यंत्रांत पाणी सोडतात तेव्हां दर मिनिटास १२०००० ग्यालन पाणी वर उडतें असा अजमास काढलेला आहे. असे प्रसंग फारच क्वचित् असतात. या भूमिकांमध्यें जी अत्युच्च आहे तिच्यावर २६ सुंदर पुतळे बसविलेले आहेत हे पुतळे सर्व पृथ्वीवरील मोठमोठे देश व शहरें यांचे निदर्शक आहेत. या भूमिकेवरून आसमन्ताद्भागाचा देखावा फारच मनोहर व हृदयंगम दिसतो. उत्तरेच्या टोंकास जो मनोरा आहे त्यावरून तर याहीपेक्षां मौज जास्त दिसते. टेम्स नदीचा सर्व प्रवाह व तीरावरील प्रदेश स्पष्ट दृग्गोचर होतो. प्रासादाजवळ क्रिकेट व लॉनटेनिस खेळण्याचीं-हीं विस्तीर्ण व प्रशस्त पटांगणें आहेत, व एक लहानसा जनावरखाना आहे, तेथें अस्वलें, माकडें, वानर व पुष्कळ प्रकारचे पक्षि आहेत. एका स्थलीं उंच झोंपाळे टांगले आहेत. उघड्या हवेंत तालीम करण्यासाठीं व तिरंदाजी करण्यासाठीं कांहीं जागा निराळी ठेविली आहे.

येथवर येथील वस्तुजाताचें वर्णन झालें. आतां प्रेक्षकसमूहाकरितां येथें काय काय सोयी आहेत त्यांचें अल्प कथन करून हें आख्यान आटपूं.

येथें सर्व प्रकारच्या सोयी आहेत. उत्तम, मध्यम, कनिष्ट अशीं तीन प्रकारचीं भोजनगृहें आहेत. तेथें ज्याच्या त्याच्या

ऐपतीप्रमाणें समाचार घेतला जातो. शिवाय, भिन्न भिन्न जागीं विश्रांतिगृहें आहेत. तेथें खाद्य व पेय सामुग्री मिळते. येथें पुस्तकालय व वाचनगृह आहे. लखोटे टाकण्यासाठीं पेट्या आहेत. शौचविधि, मुखमार्जन, स्नान वगैरेची उत्तम प्रकारची सोय आहे. श्मश्रू करण्याचीं दुकानें आहेत. बूट साफ करणारे लोक आहेत. आगगाड्यांचीं वेळापत्रकें कांहीं ठिकाणीं लावलेलीं आहेत. परंतु सर्वांत मोठी चमत्कारिक सोय ही कीं, प्रेक्षकास थकवा आल्यास येथें भाड्यानें एक माणूस बसण्याजोग्या गाड्या मिळतात व त्या गाड्यांत बसून फिरतां येतें. या गाडीचें व ती ओढण्यासाठीं हमालाचें भाडें तासाला दीड शिलिंग आहे.

टंकसाळ.

तारीख १ जूनपासून १५ जूनपर्यंत—तारीख २ जून रोजीं सकाळीं आह्मीं टंकशाला पहावयास गेलों. तेथील अधिकाऱ्यांनीं आमचें स्वागत करून आम्हांस धातूचा रस करण्यापासून तों नाण्यास झिलई देण्यापर्यंत सर्व प्रयोग दाखविले. हे प्रयोग फारच मौजेचे होते व यंत्रें फार सूक्ष्म होतीं. येथें सोनें, रुपें, व तांबें या धातूंचीं नाणीं पाडितात. एक पौंड व अर्धा पौंड अशीं सोन्याचीं दोनच प्रकारचीं नाणीं प्रचलित आहेत. रुप्याच्या नाण्यांपैकीं पांच शिलिंगाचा क्रौन हल्लीं प्रचारांत नाहीं. अडीच शिलिंगाचा हाफ क्रौन, दोन शिलिंगाचा फ्लॉरिन, शिलिंग, अर्धा शिलिंग म्हणजे सहा पेन्स, व तीन पेन्स इतकीं रुप्याचीं नाणीं चालू आहेत. तांब्याचीं नाणीं म्हटलीं म्हणजे पेनी, अर्धा पेनी व फार्दिंग; परंतु फार्दिंग हल्लीं फारसा उपयोगांत येत नाहीं. सोन्याच्या नाण्यामध्यें थोडें तांबें घालतात. त्याचप्रमाणें रुप्याच्या नाण्यांतही भेळ असते. वजन करण्याचीं यंत्रें फार सूक्ष्म असतात. त्यांच्या योगानें यत्किंचितही फरक नजरेस येतो. आह्मीं गेलों तेव्हां जुबिली संबंधानें नवीं पदकें व नवीं नाणीं पाडण्याचें काम जारीनें सुरू होतें. एका दालनामध्यें आजपर्यंत पाडलेल्या सर्व पदकांचे व नाण्यांचे नमुने होते. पांच पौंडांचीं व दोन पौंडांचीं नाणीं एकदां

पाडिलीं होतीं; परंतु तीं व्यवहारांत आणिलीं नव्हतीं. हल्लीं पांच पौंडांपासून पुढें नोटी वापरण्यांत येतात.

या शालेच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यांच्या नांवामध्यें सर आयझॅक न्यूटन व सर जॉन हर्शेल यांचीं नांवें आढळतात.

साधारण जनांसाठीं नियमित दिवशीं शाळा खुली असते व प्रवेशपत्रिका देण्यांत येतात.

यासमयीं लंडन शहरांत येऊन आम्हांस एक महिना होऊन गेला होता व मुंबई सोडल्यास दोन महिने होऊन गेले होते, त्यामुळें चित्तवृत्ति किंचित् अस्वस्थ होऊं लागली होती. आप्तजनांचा सहवास अंतरला तर खराच; परंतु स्वदेशीयांचें दर्शन सुद्धां न होणें म्हणजे केवळ दुःसह आहे. लंडन शहर मोठें खरें व तेथें करमणुकीचीं साधनें असंख्य खरीं; परंतु त्या सर्वांचा अनुभव घेण्यास अनुकूल अशी चित्तवृत्ति असल्याशिवाय सर्व व्यर्थ आहे. मन उद्विग्न झालें म्हणजे रम्य वस्तूंचें दर्शन व मधुर शब्दांचें श्रवण सुखोत्पादक न होतां दुःखजनक होतें. तशी माझी स्थिति होण्यास आरंभ झाला होता. व अस्वस्थता अशीच बळावत गेली असती तर अवशिष्ट परदेशवास आनंदमय न होतां कष्टमय झाला असता. परंतु तो प्रसंग स्नेहिजनांच्या समागमानें टळला. ह्या गोष्टीचा उल्लेख येथें करणें ओघानेंच आलें. याच सुमारास श्रीमंत होळकर सरकारांची स्वारी आंग्लद्वीप महायात्रेसाठीं येथें आली त्यांच्या बरोबर माझे दोन स्नेही आले. त्यांच्या अल्प सहवासानें मनोवृत्तींत फार बदल झाला. काम करण्यास उल्हास येऊन कालक्रमणेविषयीं मनांत विचार उद्भूत झाले व यायोगानें मजल शेवटास गेली.

या अनुषंगानें माझ्या विलायतेच्या यात्रेसंबंधीं एक गोष्ट सांगितल्याशिवाय मला राहवत नाहीं. हल्लींचे श्रीमंत होळकर सरकार गादीवर बसल्यानंतर मी माझ्या एका स्नेह्याच्या भेटीसाठीं एकदां इंदुरास गेलों होतों. त्या प्रसंगीं महाराजांची भेटही झाली होती व त्यांच्या पदरीं नोकरी पत्करण्याविषयींही कथाप्रसंग आला होता. कांहीं कारणांमुळें तो विषय परिणत झाला नाहीं; परंतु सांगण्याचा भाग एवढाच कीं, नोकरी पत्करण्यांत माझा मुख्य उद्देश हा होता कीं, पुढेंमागें महाराज विला-

यतेस गेल्यास आपल्यास यात्रेचा लाभ व्हावा. ती गोष्ट तितकीच राहिली खरी परंतु दैवगतीनें महाराजांच्या अगोदर कांहीं दिवस मला यात्रा घडली या गोष्टीचा मला वारंवार चमत्कार वाटतो. असो.

ईटन पाठशाळा.

तारीख ४ जून रोजीं आह्मी ईटन येथें गेलों होतों. हें गांव टेम्स नदीच्या कांठीं असून लंडन शहरापासून सुमारें २५ मैल आहे. हें आगगाडीच्या रस्त्यावर असल्यामुळें जाण्यायेण्याची सोय चांगली आहे. येथें १४४० सालीं सहाव्या हेन्रीनें एक पाठशाळा स्थापिली तिच्या योगानें हें गांव फार प्रसिद्ध आहे. या पाठशाळेंत राजकुलांतील, अमीरउमरावांच्या घराण्यांतील व इतर संपन्न गृहस्थांचीं मुलें विद्याभ्यासासाठीं असतात. पाठशाळेमध्यें ७० विद्यार्थी राहण्याची सोय आहे. शिवाय, ९०० वर विद्यार्थी आसपासच्या घरांत राहतात. परंतु सर्वांवर पाठशाळेच्या अधिकाऱ्यांची सक्त देखरेख असते. येथें मुलांची राहण्याची, खाण्यापिण्याची व शिक्षणाची व्यवस्था ठेवण्याचा धंदाच करणारे असे कांहीं गृहस्थ आहेत. ते कांहीं सडे व कांहीं सकुटुंब राहतात. यांच्याजवळ मुलें ठेवण्यास खर्च जास्त लागतो. परंतु तजबीज नीट राहते ह्मणून ज्यांस ऐपत असेल ते यांचा उपयोग करून घेतात. पाठशाळेंत राहणारे विद्यार्थी एक काळा झगा घालतात. एकंदर शाळेंतील विद्यार्थ्यांचा पोषाख ठरीव आहे. अंगांत कमरेपर्यंत अंगरखा, गळ्याला रुंद सफेद गळपट्टी व उंच टोपी असा त्यांचा पोषाख असतो.

पाठशाळेची इमारत फार प्राचीन असल्याकारणानें मलिन दिसते. इच्यामध्यें दोन चौक आहेत व दोहोंस जोडणारा असा एक कमानदार रस्ता आहे. या कमानीच्या शिरोभागीं घड्याळ लावलेलें एक शृंग आहे. बाहेरच्या चौकांत सहाव्या हेन्रीचा एक धातूचा पुतळा आहे व दिवाणखान्यांत आंग्लराजे व या पाठशाळेंत शिकलेल्यांपैकीं प्रसिद्ध पुरुषांच्या ऊर्ध्वकाय प्रतिमा आहेत. यामध्यें चॅथॅम, फॉक्स, कॅनिंग, पील व

वेलिंगटन यांच्या प्रतिमा आहेत. आंतील चौकांत पुस्तकालय आहे. त्यांत प्राच्य व पाश्चात्य प्राचीन हस्तलेखांचा संग्रह मोठा आहे.

या शाळेंतील वार्षिक समारंभ या महिन्यांत होत असतो व तो मोठ्या थाटाचा होतो. त्या समयीं बहुतेक छात्रगणांची मातापितरें त्याचप्रमाणें शाळेंतील पूर्वीचे विद्यार्थी आपल्या आगमनानें उत्सवाची संभावना करितात. सकाळीं साडे दहाच्या सुमारास समारंभ सुरू होतो. आह्मी गेलों तेव्हां समारंभ सुरू झाला होता. निरनिराळ्या वर्गांतील विद्यार्थी इंग्रजी, लॅटिन, फ्रेंच, व जर्मन भाषेंतील वाक्यें पाठ ह्मणतात व यांतच सुमारें दोन तास मोडतात. कांहीं भाषणें फार सुरेख झालीं पण कांहीं फारच गचाळ झालीं. नंतर कांहीं वेळानें माध्यंदिन उपहार सर्वजण करितात व मग शाळेजवळील पटांगणांत क्रिकेट वगैरे खेळ खेळण्याची सुरुवात होते. तीन प्रहर दिवस उलटल्यानंतर नदीवर नौकांच्या शर्यती होतात. जनसमाज बराच मोठा असतो व या कारणानें बरीच मौज होते. बाकी या समारंभांत मला विशेष गंमत वाटली नाहीं. शाळा व त्यांतील मुलें व अध्यापकवर्ग यासंबंधानेंही कांहीं विशेष ग्रह मनावर झाला नाहीं.

लॉर्ड व लेडी रोजबरी;—एक वनगृह.

तारीख ५ जून रोजीं आह्मी लॉर्ड व लेडी रोजबरी यांच्या निमंत्रणावरून 'मेंटमोर' नांवाच्या त्यांच्या वनगृहीं गेलों. या देशांत सर्व अमीरउमराव व संपन्न लोकांचीं मुख्य शहरांत घरें असून शिवाय एकांतवासाचीं अशीं स्थलें असतात, व तेथें विश्रांतीच्या प्रसंगीं मुलामाणसांसुद्धां व मित्रमंडळीबरोबर जाण्याचा त्यांचा संप्रदाय असतो. प्रस्तुतचें वनगृह नामानुरूप नसून एक भव्य व सुंदर असा प्रासादच आहे. आसमन्ताद्भागीं पांचपन्नास एकर जमीन खुली असून मध्यें उंच ठिकाणीं हें गृह आहे. नैसर्गिक व कृत्रिम अशा सौन्दर्याचें संमीलन येथें दृग्गोचर होतें. उच्च व प्रच्छाय वृक्ष, हरिततृणाच्छादित विस्तीर्ण क्षेत्रें, मंद गतीनें जाणारे स्वच्छ जल-

प्रवाह, अच्छोदकांनीं भरलेलीं अल्पपल्वलें--या नैसर्गिक वस्तूंनीं वनश्रीची शोभा नेत्रांस आनंददायिनी होते. त्याचप्रमाणें गृहाच्या निकटवार्ति प्रांतामध्यें दृग्विषयीभूत होत असलेल्या उद्यानलता, पुष्पस्तबक, चित्रविचित्र पात्रें, प्रस्तरप्रतिमा, परिष्कृतपथ, सुंदर जलयंत्रें—इत्यादि कृत्रिम वस्तुजाताच्या योगानें भिन्न प्रकारचा आल्हाद होतो. हें वनगृह पाहून सर वॉल्टर स्कॉट याच्या ग्रंथामध्यें वारंवार येत असलेल्या वर्णनाचें मला स्मरण झालें. या गृहाच्या जवळपास गांव दिसण्यांत आलें नाहीं. लॉर्ड साहेबांच्या जमिनी लागवड करणारे व त्यांचे नोकरचाकर यांचीं घरें असतील, परंतु तीं नजरेंत येण्यासारखीं नव्हतीं. या सर्व प्रांताचे अधिपति लॉर्ड साहेब व बाकीचे लोक त्यांची केवळ प्रजाच, अशा तऱ्हेचा व्यवहार दिसण्यांत आला. प्राचीन काळीं फ्यूडल पद्धत सुरू होती तेव्हां अशा प्रकारचें आधिपत्य विशेष गाजत असे; परंतु ती पद्धत मोडून बरेच दिवस झाले, व हल्लीं त्या पद्धतीच्या अनुरोधानें जरी अधिपति व त्यांचीं कुळें यांच्यामधील बंधनें नसतात, तरी संपत्ति व अधिकार यांची सत्ता अप्रतिहत असल्यामुळें उच्चावचभाव व सेव्यसेवकभाव रहावयाचाच, व तशाच प्रकारची स्थिति हल्लीं आहे.

आमच्या मंडळीशिवाय दुसरी कांहीं मंडळी लॉर्ड रोजबरी यांनीं बोलाविली होती. कच्छचे राव, हैदराबादचे कोणी नबाब, पूर्वींचे हिंदुस्थानचे सेनापति सर फ्रेडरिक हेन्स व हल्लीं झांझिबार येथें असलेले नुकतेच 'नाइट' चा किताब मिळविलेले सर यूअन स्मिथ हेही तेथें आले होते. स्टेशनावर आमच्यासाठीं दोन घोड्यांची गाडी उभी होती; तिच्यामध्यें बसून आह्मी वनगृहाकडे निघालों. वाटेनें क्षेत्रसमूहाचा व वनश्रीचा देखावा रमणीय दिसला. सर्व बाजूंस गारीगार दिसत होतें. रुक्षतेस अवकाश बिलकुल नव्हता. रस्ते साफ असून बाजूंनीं वृक्षराजींनीं मर्यादित होते. याप्रमाणें सुमारें एक कोस पथ आक्रमण केल्यावर एक द्वार लागलें. द्वाराची रचना आसमन्ताद्भागाच्या वन्यदृग्विषयास अनुरूप अशी होती. या द्वारानें प्रवेश केल्यावर सुमारें पाव कोसपर्यंत गर्द

झाडी व हरिततृणक्षेत्रें होतीं व नंतर वनगृहाचा शिरोभाग दृग्गोचर झाला. हें वनगृह उच्चपीठावर आपल्या भव्यतेच्या गर्वातच जणूं स्थिर झाल्यासारखें भासत होतें. तसें नसतें तर कदाचित् आमच्यासारख्या दूरदेशीय प्राघूर्णकाचा सत्कार करण्यासाठीं शिरश्चालनाची प्रवृत्ति त्यांस झाली असती, ह्मणजे मात्र कठिण प्रसंग होता. यजमानास अतिथींचें अभिनंदन न करितां निंदनच करावें लागलें असतें, परंतु तसा प्रसंगच आला नाहीं. वृक्षराजींनीं आपल्या पल्लवांनीं आह्मांस आव्हान केलेंच होतें व पुष्पलतांनीं आतां पुष्पगुच्छांच्या प्रकंपनानें आमचें स्वागत केलें. घरीं पोंचल्यावर लॉर्ड व लेडी यांनीं आमचा चांगला सत्कार केला. लॉर्ड साहेब अल्पवयी असून त्यांची मुद्रा तेजस्वी पण शांत आहे. शरीराची ठेवण सुरेख असून बांधा मजबूत पण ठेंगणा आहे. डोळे घारे व मिशा काढलेल्या असल्यामुळें चेहरा एक प्रकारचा गमतीचा दिसतो. त्यांची वृत्ति आनंदी व बेफिकिर अशी दिसली. हे घरचे संपन्न असून स्कॉटलंड देशांत यांची स्थावर मालमत्ता बरीच आहे. हे लिबरल पक्षाकडील अग्रगण्य मंडळींत मोडतात. लेडी रोजबरी याही श्रीमंत कुलांतील असून स्वभावानें गरीब अशा होत्या. यांचा चेहरा किंचित् बोजड असा दिसत असे व या अंगानें किंचित् स्थूल असल्यामुळें वयानें होत्या त्यापेक्षां मोठ्या दिसत होत्या. लॉर्डसाहेब हे वयानें आहेत त्यापेक्षां लहान दिसतात, ह्मणून हें जोडपें चांगलें शोभत नसे; परंतु दोघांचाही स्वभाव मिळता होता. त्यांस मुलें व मुली मिळून चारपांच अपत्यें आहेत. तीं दोघांच्या जवळ असलीं ह्मणजे मौज फार विलक्षण दिसे. लेडी रोजबरी यांस महाराणीसाहेबांच्या तैनातींत एक सन्मानाची नेमणूक असे व त्यांची सर्व मोठ्या लोकांत फार चहा असे. या बाई कांहीं दिवसांपूर्वीं स्वर्गवासी झाल्या. ह्यांच्या गमनानें लॉर्डसाहेबांच्या संसाराची वाताहत झाली असेल व त्यांच्या चित्तवृत्तीस व्यथा पोंचली असेल हें निर्विवादच आहे; परंतु आमच्यासारख्या अल्पपरिचित जनासही त्यांच्या मरणानें वाईट वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

त्यांचें सरळ वर्तन, त्यांची उल्हासी चित्तवृत्ति, त्यांचा मोकळा स्वभाव इत्यादि गुणांनीं प्रथम परिचयाच्या प्रसंगींच मनुष्याचा ग्रह फार चांगला होई. असो.

प्रथम औपचारिक प्रश्नोत्तरें झाल्यानंतर लॉर्ड व लेडीसाहेब व त्यांची लहान लहान, नीटनेटकीं, सुस्वरूप, क्रीडाशील मुलें यांच्या बरोबर आम्ही सर्व घरभर हिंडलों. येथील दालनें प्रशस्त, सुपरिष्कृत व विभूषित अशीं होतीं. एका दालनांत दुर्मिळ असा चित्रसंग्रह होता. एका दालनांत पुस्तकें व लेखनसामुग्री होती. ठिकठिकाणीं तऱ्हेतऱ्हेच्या जिनसा नजरेस पडत होत्या. कांहीं खोल्या अभ्यागतांसाठीं मुद्दाम निराळ्या ठेविल्या होत्या. तळघरांत नेऊन सैंपाकघर व मद्याचें भांडारही त्यांनीं आम्हांला दाखविलें. एकंदर व्यवस्था पाहून मनाला आनंद झाला व तद्देशीय श्रीमंत लोकांच्या रहाण्याची तऱ्हा एतद्देशीयांना अनुकरणीय आहे, असें वाटलें. घर पाहून झाल्यावर आम्हीं बगीच्यांत गेलों. तेथेंही स्वच्छता व टापटीप वर्णनीय होती. पुष्पलता व वृक्ष यांची व्यवस्था प्रेक्षणीय होती. एका काचगृहामध्यें उष्णप्रदेशांत होणारे वृक्ष व लता ठेविलेल्या होत्या. तशाच प्रकारच्या व्यवस्थेनें अंजीर, द्राक्षें वगैरे फळफळावळ तयार करण्याची तजवीज केलेली होती. एका बाजूला एक लहानसा पक्षिसंग्रह होता. लहान लहान लतागृहें ठिकठिकाणीं होतीं. स्थलीं स्थलीं आसनें मांडलेलीं होतीं व प्रतिमा बसविलेल्या होत्या. सारांश, नगरांत राहून श्रांत व उद्विग्न झालेल्या चित्तास आराम प्राप्त होण्याचीं सर्व साधनें येथें होतीं. अश्वशाला व गाडीखानाही आमच्या पहाण्यांत आला, व येथेंही इतर ठिकाणाप्रमाणेंच स्वच्छता व नीट व्यवस्था होती. इतकी सहल करीतोंपर्यंत मध्यान्हाचा समय अतिक्रांत झाला. घरीं परत येऊन कांहीं वेळ विश्रांति घेऊन सर्वजण ताजेतवाने झाल्यावर यजमानांनीं हात धुण्यास उठण्याची विनंति केली. आमच्यापैकीं प्रत्येकास एकेक निराळी खोली देण्यांत आली होती. खोलीमध्यें एक उंची पलंग, मोठा आरसा, दोन चार तसबिरी, कपडे ठेवण्यासाठीं कपाटें, तोंड धुण्याचें सामान, साबण, स्वच्छ

रुमाल, इतकी व्यवस्था होती. सर्वजण तयार झाल्यावर आह्मी भोजनगृहांत गेलों. हें दालन विस्तीर्ण असून त्याच्या मध्यभागीं एक लांब मेज होतें. त्यावर केलेली पुष्पांची व लतांची व फलांची रचना मनोहर व प्रेक्षणीय होती. यजमान व यजमानीण बाई मेजाच्या दोन टोंकांस बसल्या. मुलांच्या खाण्यापिण्याचा गोंधळ येथें नव्हता. आईबापानीं जवळ बोलाविल्याशिवाय मुलें जवळ येत नव्हतीं व त्यांनीं दिल्याशिवाय पदार्थ घेऊन खात नव्हतीं. नवराबायकोचें एकमेकांशीं सलगीचें वर्तन, मुलांचा मर्यादशीलपणा व सर्वांची समाधानवृत्ति पाहून आह्मांस फार संतोष झाला. सर्वांनीं उपहार केल्यानंतर आह्मी दिवाणखान्यांत गेलों. तेथें बाईसाहेबांनीं दऊतलेखणी व एक चोपडी आणिली. त्या चोपडीवर सर्वांनीं आपापलीं नांवें घातलीं. नंतर आमचें उत्तम रीतीनें स्वागत केल्याबद्दल त्या उभयतांचे आभार मानून आह्मीं त्यांची रजा घेतली. लॉर्डसाहेब स्टेशनापर्यंत पोंचवावयास आले होते. वाटेनें त्यांची दुसरी एक अश्वशाला होती ती त्यांनीं आह्मांस दाखविली. येथें वळू घोडे ठेऊन त्यांपासून चांगले शर्यतीचे घोडे तयार करण्याचा त्यांचा नेहेमींचा क्रम आहे. हे घोडे फारच सुरेख व तेजस्वी होते.

एकंदरींत हा दिवस फार सुखाचा गेला. लॉर्ड रोजबरीसारख्या गृहस्थानें आमची इतकी चांगली बरदास्त ठेविली व आढ्यता न धरितां आम्हा सर्वांशीं सलगीचें वर्तन केलें या गोष्टीनें तद्देशीयांविषयीं मनाचा ग्रह चांगला झाला.

ऑस्कट येथील शर्यती.

तारीख ६ जून रोजीं आम्ही ऑस्कट गांवीं गेलों. या गांवीं दरसाल या दिवसांत घोड्यांच्या शर्यती होत असतात. आमच्या महाराजांस शर्यतींचा विशेष शौक असल्यामुळें व लंडनशहराबाहेर कांहीं दिवस घालवावे या विचारानें आह्मीं या गांवीं एक स्वतंत्र घर भाड्यानें घेतलें. येथें आह्मी पांच दिवस राहिलों. हें गांव लहान असून लंडनशहरापासून फार दूर नाहीं. आगगाडीची सोयही येथून जवळच आहे, त्यामुळें

पुष्कळ लोक येथें राहून रोज लंडनशहरीं कामाकाजासाठीं जात असतात. या गांवावरून तिकडील खेड्यापाड्यांच्या वस्तीची थोडीशी कल्पना येण्यासारखी होती. तथापि लंडनशहरापासून दूर आभ्यंतर प्रदेशांत असणाऱ्या खेड्यांमध्यें व या खेड्यामध्यें फरक असलाच पाहिजे. स्टेशनावर भाड्यानें मिळत असलेल्या गाड्या मळकट, मोडक्यातोडक्या अशा होत्या: लोक दांडगे व असभ्य: रस्ते धुळीनें भरलेले व कचऱ्यानें व्यापलेले: घरें लहान बेताबाताचीं: जिन्नसपानस मिळण्याची सोय सुमाराचीं: अशी येथील स्थिति होती. आमचें घर दुमजली होतें, परंतु दोन्ही मजले ठेंगणें असल्यामुळें उंचींत एकाच मजल्याचा ऐवज होता; तथापि सोई सर्व प्रकारच्या होत्या व सामानसुमान बऱ्याच प्रकारचें होतें. अग्रभागीं झाडें वगैरे लावून एक लहानशी बाग केलेली होती. डाव्या बाजूला एक गल्लीचा रस्ता गेला होता. उजव्या बाजूस एक हिंडण्याफिरण्यासाठीं व खेळण्यासाठीं मोठें पटांगण होतें. त्यावर हिरवें गार गवत उगवलेलें होतें; तें कापून सारखें केलें होतें. परसांत भाजीपाला लावण्याची सोय होती व अगदीं पिछाडीला गोठा व तबेला होता. घरच्या नोकरांपैकीं ह्मटलें ह्मणजे एक माळी व एक मोलकरीण अशीं दोन माणसें होतीं. सांडपाणी व मलमूत्र यांचा निकाल लावण्याची मात्र लंडनशहरासारखी सोय नव्हती. त्यामुळें थोडी अस्वच्छता होती व कधीं कधीं दुर्गंध येत असे. घराभोंवतीं कुंपण झाडांचेंच होतें. प्रत्येक घराभोंवतीं बरेंच मोठें आवार असल्यामुळें घराजवळ घरें नसून दूर अंतरावर अशीं पसरलेलीं होतीं. ही सर्व तऱ्हा पाहून आंग्लकवि काउपर व ग्रे यांनीं वर्णन केलेल्या खेडेगांवांतील दृग्विषयांची आठवण झाली. आप्त इष्टमित्र जवळ असतील तर लंडनशहरापेक्षां अशा ठिकाणीं राहून जास्त आनंद वाटेल असा तर्क झाला.

येथील शर्यतींचा समारंभ चार दिवस चालतो. एक दिवस जास्त महत्वाचा असतो. त्या दिवशीं प्रिन्स ऑफ वेल्स आपल्या आगमनानें प्रसंग साजरा करितात. या दिवशीं जनसमाज मोठा असतो, परंतु डार्बीच्या शर्यतीइतकी गर्दी येथें

होत नाहीं व तिथल्यासारखी गंमतही येथें वाटत नाहीं. घोड्यांची संख्या व केवळ शर्यतींची मौज येथें जास्त असते असें ऐकण्यांत आलें, परंतु या बाबतींत मला फारसें ज्ञान नाहीं. मजसारख्या प्राकृत दृष्टीच्या माणसास गंमत झटली ह्मणजे बहुजनसमाज व आनुषंगिक गोष्टींची; व ती डार्बीच्या तोडीची येथें नव्हती हें खचित. पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें सर्व प्रकार येथेंही चालत होते. आह्मीं एक कोच भाड्यानें घेऊन अवसानभूमीजवळ उभें केलें होतें. त्यावर जाऊन आह्मी रोज बसत होतों. आमच्या जागेवरून आसमन्ताद्भागाची सर्व मौज आमच्या दृष्टीस पडत असे. तमासगीर लोक एकाच जागीं बसून तमाशा करीत नव्हते, तर सर्व चर्याभूमीवर हिंडून जेथें लोकांची गर्दी असेल तेथें जात असत. एका हातांत माकड व एका हातांत मुरली घेऊन फिरणारा तमासगीर, पादयष्टीवर चढून वेडेवांकडे चालणारे मुलगे व मुली, हातचलाखीचे खेळ करणारा गारोडी, नानातऱ्हेचे अंगविक्षेप करणारा कसरती, बाजाची पेटी वाजविणारा बुवा व त्याच्याबरोबरची तुतारी वाजविणारी मुलगी, पांढऱ्याचीं काळीं तोंडें करून सिद्दी बनलेले, डफऱ्या व फिडल वाजविणारे लोक,—असे नानातऱ्हेचे तमासगीर आपापल्या मतें प्रेक्षकांचें मनोरंजन व स्वतःसाठीं द्रव्यार्जन करण्यांत व्यग्र होते. उपहाराच्या सामुग्रीचीं दुकानें मांडवांत व तंबूंत लाविलेलीं होतीं. निमिषमात्रांत फोटोग्राफ काढणारे लोक गिऱ्हाईक जमविण्यांत गुंतलेले होते. तत्काल चित्र काढून त्यास चौकटींत बसवून पांच मिनिटांच्या आंत हे लोक सर्व तयारी करून देत असत. प्रसिद्ध घोडेस्वार व अनेक शर्यतींत जय मिळविलेला फ्रेड आर्चर व त्याचा मुलगा यांच्या तसबिरींचा खप जारीनें सुरू होता. द्यूत झपाट्यानें चाललेंच होतें. सर्व प्रकारचे भिक्षुगण दानशील लोकांचें आर्जव करीत होते. कोणी प्रेक्षक खात होते; कोणी पीत होते; अशी जिकडेतिकडे एकच धांदल व गडबड उडाली होती. इंग्रज लोकांची एकदम लक्षांत येण्याजोगी एक खोडी मला ही वाटली कीं, त्यांची वेळच्या वेळीं खाण्यापिण्याची व्यवस्था राहिलीच पाहिजे, त्याशिवाय ते जसे घाबरे होतात.

कितीही कष्ट होवोत व गैरसोय असो, होता होईल तोंपर्यंत खाण्याचा बेत चुकतां कामा नये, अशी त्यांची नेहमींची रीत आहे. वेळ झाली ह्मणजे सर्व कामें एकीकडे ठेऊन भीड न बाळगितां ते खाण्याचा धंद्दा उरकतात. ही गोष्ट फारशी गर्हणीय आहे असें नाहीं; परंतु या संवयीच्या अनुरोधानें कित्येक वेळा त्यांच्या हातून माझ्या मतें शिष्टजनसंप्रदायाचा अत्याचार होतो. जुबिलीसारख्या समारंभांत वेस्टमिन्स्टर आबेसारख्या समारंभांत पवित्र ठिकाणीं ईश्वरस्तवनासारख्या प्रसंगासाठीं जमलेल्या पोक्त व श्रीमंत बायका खिशांतून काढून कांहीं जिनसा खात बसलेल्या मीं प्रत्यक्ष पाहिल्या. त्याचप्रमाणें या शर्यतींच्या प्रसंगीं असलेल्या थोड्या ओळखीचा उपयोग करून आमच्या कोचावर येऊन उपहारास मागणारे किंवा अन्य रीतीनें त्या प्रकारची इच्छा प्रदर्शित करणारे पूर्वी हिंदुस्थानांत मोठ्या हुद्याचीं कामें केलेले असे लोक माझ्या पहाण्यांत आले. या त्यांच्या कृतीचें इंगित काय असेल तें असो. उपहाराच्या दुकानीं सामुग्री चांगल्या प्रकारची मिळत नाहीं. उंचीं दुकानें येथें येऊन बसत नाहींत; कारण कीं सर्व श्रीमंत लोक आपआपली तजवीज स्वतंत्र करीत असल्यामुळें त्यांच्या मालाचा खप होत नाहीं. ज्यास वाईट खाण्याची संवय नाहीं व स्वतंत्र तजवीज करण्यापुरती श्रीमंती नाहीं अशा प्रतीतला आमच्या अँग्लोइंडियन लोकांचा वर्ग आहे. यांपैकीं कांहीं लोक मंडळी मिळून जातात, तेव्हां त्यांची सर्व तजवीज असतेच. बाकीची मंडळी आमंत्रण लावून निर्वाह करितात. फराळाच्या वेळेला आमच्या कोचाजवळ अनेक प्रसंगीं कांहीं गृहस्थ येत व ' थोडा फराळ कराल काय ' असा प्रश्न केल्याबरोबर आनंदानें आमंत्रणाचा स्वीकार करीत. एक वृद्ध कर्नल साहेब तर चार दिवस नियमानें येत असत व यथेच्छ शांपेन पिऊन जात. मला ही गोष्ट फार अप्रशस्त वाटली. या मंडळीचा दुसरा एक हेतु असण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांत असतांना आपल्याशीं हे लोक नेहमीं ताठ्यानें वागतात, परंतु त्या देशांत फार सलगीनें असतात. साधारण लोकांपेक्षां राजेरजवाड्यांशीं त्यांचें वर्तन विशेष नम्रतेचें असतें. जे अमीर-

उमराव लोक या देशांत आलेले नसतात त्यांस हे राजेरजवाडे ह्मणजे लक्ष्मीचें माहेरघर व वैभवाचें आदिस्थान असें वाटतें; व ते सहजच त्यांस चांगल्या रीतीनें वागवितात. या लोकांत त्यांची चर्चा झाली ह्मणजे अँग्लो-इंडियन लोकांनीं नाकें मुरडून चालत नाहीं व तेही आपलें वर्तन बदलतात. राजेरजवाड्यां-ची आपली सलगी आहे असें दाखवून जनसमाजाच्या मनांत आपल्याविषयीं मानबुद्धि वाढावी अशाविषयीं ते खटपट क-रितात व कदाचित् याच बुद्धीनें वर निर्दिष्ट केलेले गृहस्थ आमच्या येथें येऊन आमच्याशीं सहवास करीत असतील. केवळ दोषैकदृष्टीनें या गोष्टीचा मीं येथें उल्लेख केला आहे असें नाहीं. या लोकांचे गुणदोष काय आहेत हा स्वतंत्र विषय आहे व त्याचें विवेचन या प्रकरणाच्या अखेर करण्यांत येईल, परंतु प्रस्तुतप्रसंगीं ओघानें गोष्ट आली ह्मणून माझ्या लक्षांत आलेल्या अल्प दोषाचा निर्देश केला आहे.

तारीख ११ रोजीं आह्मी वुइंडसर कॅसल नामक महाराणी-साहेबांचा महाल पाहण्यास गेलों. महाराज ऑस्कट गांवाहून घोड्यावरून गेले व मी आगगाडीनें गेलों. ऑस्कट व वुइंडसर यांच्या दरम्यानचा प्रदेश फार रमणीय आहे. परंतु आगगाडी-तून त्या सौंदर्याची फार अस्फुट प्रतीति येते. राणीसाहेबांची रहाण्याची मुख्य तीन ठिकाणें आहेत. स्कॉटलंडमध्यें 'बालमोरा-ल', आइल ऑफ वाईट नांवाच्या बेटांत 'आस्बोर्न' व वुइंडसर कॅसल.—लंडन शहरांत बकिंगहॅम पॅलेस येथें त्या कधीं कधीं प्रसंगानिमित्त रहातात, परंतु त्यांचा बहुतेक काल वुइंडसर ये-थेंच जातो. येथील प्रासाद फार सुंदर व विस्तीर्ण आहे. वुइंडसर हा गांव टेम्स नदीलगत आहे. हा गांव पूर्वी एडवर्ड धी कन्फेसर राजानें वेस्टमिंस्टर आबे येथील मठाधिकाऱ्यांस इनाम दि-ला होता तो वुइलियम धी कॉंकरर राजानें विकत घेतला. या गांवाच्या मध्यभागीं एक लहानशी टेंकडी आहे. तिच्यावर या राजानें एक किल्ला बांधिला. तिसऱ्या एडवर्ड राजानें हा किल्ला मोडून त्याच्या जागीं नवा किल्ला उठविला. इतर राजांच्या कारकीर्दींत या इमारतींत कांहीं फेरफार झाले. शे-वटीं चवथा जॉर्ज राजानें बरेच फेरफार करण्यास आरंभ केला

व तें काम हल्लींच्या राणीसाहेबांच्या कारकीर्दींत संपलें. यानिमित्त नव्वद लक्ष रुपये खर्च झाले. व सांप्रतकाळीं या इमारतीची सर्व जगांतील उत्तम राजमहालांत गणना होत असते.

वुइंडसर गांव लंडनशहरापासून वीस बावीस मैल आहे. आगगाडीनें एक तासाच्या आंत तेथें जातां येते. आगगाडीचे दोन कंपन्यांचे दोन स्वतंत्र रस्ते आहेत. या गांवीं तीन चार पथिकाश्रम आहेत त्या सर्वांत ' व्हाईट हार्ट ' नांवाचा उत्तम आहे.

वुइंडसर कॅसल ही इमारत गांवाच्या पूर्वेस आहे. तिचा विस्तार पूर्वपश्चिम आहे. उत्तरेच्या व दक्षिणेच्या बाजूस दोन मोकळीं पटांगणें आहेत. पूर्वेच्या बाजूस पटांगण असून त्याच्या खालीं बगीचा आहे. पश्चिमेच्या बाजूस गांवांतील रस्ता आहे व याच बाजूनें सार्वजनिक प्रवेशमार्ग आहे. इमारतीच्या पश्चिमेच्या बाजूस व उत्तर बाजूच्या कांहीं भागाभोंवतीं उंच तट आहे. तटाचा अग्रभाग नतोन्नत असून अंतरा अंतरावर लहान लहान बुरुज आहेत. एकंदर रचना बरीच नूतन असल्याकारणानें बांधकाम नीटनेटकें दिसतें, परंतु पुरातन इमारत पाहिल्यानें जो मनावर एक प्रकारचा ग्रह होतो तो या किल्ल्याच्या दर्शनानें होत नाहीं. इमारतींत दोन चौक आहेत. खालच्या व वरच्या चौकाच्या दरम्यान एक गोल मनोरा आहे त्याला ' राउंड टॉवर ' ह्मणतात. खालच्या चौकांत सेंट जॉर्जेस चॅपेल, आल्बर्ट चॅपेल, तीन बुरुज व कांहीं किरकोळ इमारती आहेत. वरच्या चौकांत राणीसाहेबांचा खासमहाल, दरबाराची जागा, अभ्यागतांसाठीं राखलेल्या खोल्या, वगैरे दालनें आहेत. हे नुसते चौक व उत्तरेकडील पटांगण हीं सर्व लोकांना पहातां यावीं ह्मणून नेहमीं खुलीं असतात. पूर्वेकडील पटांगण मात्र राणीसाहेब किल्ल्यांत नसतील तेव्हां शनवारीं व रविवारीं मोकळें असतें. दरबारचीं दालनें राणीसाहेब नसतील तेव्हां सोमवार, मंगळवार, गुरुवार, व शुक्रवार या दिवशीं खुलीं असतात. जाण्यास सोईचे दिवस ह्मटले ह्मणजे गुरुवार व शुक्रवार. कारण या दिवशीं बहुतेक दालनें खुलीं असतात. दरबारचीं दालनें

पहाण्यासाठीं किल्ल्यांतच लॉर्ड चेंबरलेन यांचें कार्यगृह आहे तेथून परवाना मिळवावा लागतो. राणीसाहेबांचे खासमहाल सुद्धां लॉर्ड चेंबरलेन यांच्या परवानगीशिवाय पाहाण्यास मिळत नाहींत. व ही परवानगी फार क्वचित् देण्यांत येते. आह्मांस ही मिळाली होती.

आह्मीं प्रथम गोल मनोरा पाहिला. याच्या शिरोभागावरून आसमन्ताद्भागाचा दृग्विषय अप्रतिम मनोहर दिसतो. ज्या वक्रगतीचा वुइंडसर या नांवाच्या व्युत्पत्तीशीं संबंध आहे तिचा पूर्ण प्रत्यय देणारी टेम्स नदी सन्निध दिसत होती. ईटन वगैरे जवळचे गांव आपल्या अल्प भवनराजींनीं सौम्य रीतीनें नेत्रास आकर्षण करीत होते. रेडिंगसारखीं अधिक संपन्न नगरें आपल्या कारखान्यांतील धूमनिर्गमयंत्रांतून बाहेर येणाऱ्या धूमप्रवाहानें आपलें अस्तित्व प्रख्यापित करीत होतीं. दक्षिण बाजूस एक विस्तीर्ण अरण्य दृग्गोचर होत होतें. पूर्व दिशेस वर निर्दिष्ट केलेला बगीचा आपल्या सौंदर्याच्या झोंकांतच मंद पवनानें आंदोलित अशा वृक्षांच्या प्रकंपनानें उद्भूत झालेल्या अस्फुट व इतक्या उंचीवरून अश्राव्य अशा स्वनानें आव्हान करीत होता. याप्रमाणें भिन्न दिशांकडून भिन्न प्रकारच्या दृग्विषयाची प्रतीति येत होती. व एकदम सर्वतः दृष्टीची प्रेरणा केली ह्मणजे त्यांचें संमीलन होऊन नेत्रांस चमत्कार वाटे व चित्तास आनंद होई. हवा चांगली व स्वच्छ असली ह्मणजे या मनोऱ्यावरून आसपासच्या सुमार बारा परगण्यांचे भाग दृष्टीस पडतात. येथें एक घंटा आहे तिचें वजन १७ हंड्रेडवेट आहे. ही सिबॅस्टपल येथून आणिली होती. मनोऱ्याच्या पायथ्याशीं पूर्वेस एक दुसऱ्या चार्ल्स राजाचा ब्रॉंझ धातूचा पुतळा आहे.

मनोरा पाहून आह्मी दरबारी दालनें (स्टेट अपार्टमेंट्स) पाहण्यास गेलों. वरच्या चौकांत उत्तरेस हीं दालनें आहेत. पूर्वेस खासमहाल आहेत व दक्षिणेस नामांकित अभ्यागतांसाठीं मुद्दाम निराळीं ठेविलेलीं दालनें आहेत. दरबारी दालनें एकंदर १६-१७ आहेत. या सर्वांमध्यें उंची तऱ्हेचें सामान, नक्षी, सोनेरी मुलामा, नानाप्रकारच्या लहानमोठ्या तसबिरी,

रंगीबेरंगी काचेचे दिवे व मोठमोठीं झुंबरें, सोनेरी व रुपेरी खुर्च्या व कोंचें, त्यांवर मखमूच्या गाद्या व तक्ये--सारांश सर्व वस्तु उत्तम, सुंदर, मनोहर, निर्मळ व नेत्रोत्सवकारक अशा होत्या. या सर्वांचें वर्णन न करितां विशेष नजरेंत भरण्यासारख्या वस्तूंचा उल्लेख करण्याचा विचार आहे.

सेंटजॉर्जेस हॉल नामक एक दिवाणखाना आहे त्याची लांबी २०० फूट व रुंदी ३४ फूट आहे. याच्या छतावर १३५० सालापासून झालेले ' नाइट ऑफ धी गार्टर ' यांचीं विशिष्ट चिन्हें रंगविलेलीं आहेत. भिंतीवर पहिल्या जेम्सपासून चवथ्या जॉर्जपर्यंत सर्व राजांचीं चित्रें काढलेलीं आहेत. पूर्वेच्या टोंकास ओक काष्ठाचें एक तक्त आहे. वेस्टमिन्स्टर आबेमध्यें असलेल्या तक्ताचा हा नमुना आहे. ' ग्रॅन्ड रिसेप्शन रूम, हें दालन चांगलें व विस्तृत आहे. येथें भिंतीवर खणाखणाच्या लांबीरुंदीच्या अशा प्राचीन चित्रयवनिका (कापडावर विणून तयार केलेले चित्रांचे पडदे) आहेत. अशा चित्रांची पूर्वकालीं फार चाल होती. परंतु हल्लीं त्यांचा फारसा रिवाज नाहीं हीं चित्रें कांहीं पौराणिक कथानकांचीं, कांहीं लग्नसमारंभांचीं व कांहीं युद्धप्रसंगाचीं निदर्शक अशीं होतीं. ' ग्रॅन्ड व्हेस्टिब्यूल ' नांवाच्या दालनांत तऱ्हेतऱ्हेचीं शस्त्रास्त्रें व ध्वजपताका आहेत. येथें श्रीरंगपट्टण येथें रणांत हस्तगत झालेल्या दोन ब्रान्झ धातूच्या तोफा आहेत, व टिपुसुलतानाची तलवार, त्याचें शिरस्त्राण व चिलखत हीं आहेत. बोर्निओ येथून आणलेली एक पितळेची तोफ आहे. नागाच्या आकृतीचें एक चमत्कारिक वृक्षाचें मूळ आहे. शिवाय अनेक वस्तुजाताचा संग्रह येथें आहे. ' गार्डचेंबर ' नांवाच्या दालनांत प्राचीन चिलखतें आहेत. हिंदुस्थान देशांतील चार तोफा आहेत. फ्रान्सचा राजा पहिला फ्रान्सिस यानें आठव्या हेन्रीला नजर दिलेली एक रुप्याची ढाल आहे. नेल्सन याची एक जंगी ऊर्ध्वकाय प्रतिमा आहे. ज्या जहाजावर त्या शूरपुरुषाचा अंत झाला त्या जहाजाच्या कूपदंडाच्या काष्ठाचा केलेला या प्रतिमेचा आधारस्तंभ आहे. शिवाय या दालनांत मार्लबरो याचीही ऊर्ध्वकाय प्रतिमा आहेत.

हीं दालनें पाहून झाल्यावर आम्हीं खासमहालाचा कांहीं

भाग पाहिला. या महालास त्याच्या रंगाप्रमाणें निराळीं नांवें आहेत. ' ग्रीनरूम ' मध्यें भितीला रंग हिरवा, पडदे हिरवे, सामानसुमान हिरवें, सर्व कांहीं हिरवें. त्याचप्रमाणें लाल, गुलाबी, पिवळ्या अशा तऱ्हेतऱ्हेच्या खोल्या आहेत. या सर्व दालनांतील खिडक्यांतून पूर्वपटांगण व सुंदर बगीचा दिसण्यांत येतो. भिंतीच्या पुढें आलेल्या अशा तीन दालनांत खिडक्या आहेत त्यांतून मौज जास्त दिसते. प्रासादालगत एक विस्तीर्ण पटांगण असून त्याच्या मध्यभागीं एक सोपानपरंपरा आहे. ती उतरून गेलें ह्मणजे विस्तीर्ण व सुंदर अशा पुष्पोद्यानांत आपण दाखल होतों. या उद्यानाच्या मध्यभागीं एक वर्तुलाकार दीर्घिका असून तिच्यामध्यें लहानसें कारंजें आहे. चार बाजूंनीं चार रुंद व परिष्कृत असे पथ काढलेले आहेत व यांच्या दरम्यान सुरेख व व्यवस्थित अशा भूमिका बनविलेल्या आहेत. त्यांचा भूमिभाग हरिततृणाच्छादित असून तेथें दूर अंतरावर बुंधापासून अग्रापर्यंत पल्लवमय असे लहानमोठे वृक्ष लावलेले आहेत. निरनिराळ्या भूमिकांमध्यें निरनिराळ्या उंचीचे वृक्ष आहेत व त्यांचा पल्लवविस्तार अशा रीतीनें कापिला आहे कीं, बुंधाशीं लहान व अग्रभागीं निमूळते असे सर्व वृक्ष दिसतात. पूर्वेच्या टोंकास कोपऱ्यावर उच्चपीठावर शुभ्रप्रस्तरनिर्मित असे दोन हत्ती आहेत. कांहीं कोपऱ्यांवर उंच अशीं चिनीमातीचीं पात्रें आहेत. त्यांत लहान झाडें लाविलीं आहेत. बाकीच्या ठिकाणीं सारख्या अंतरावर तऱ्हेतऱ्हेचे धातूंचे व दगडांचे पुतळे उभे केले आहेत. त्यामुळें उद्यानास शोभा विशेष आली आहे. परंतु इमारतींतून उपवनाची जी शोभा दिसते तिच्यापेक्षां उपवनांतून इमारतीची शोभा जास्त दिसते. प्रासादाच्या उत्तरेस व पूर्वेस एक चार मैल क्षेत्रफळाचें उपवन आहे त्यास ' होमपार्क ' ह्मणतात. या उपवनाच्या तीन बाजूंस टेम्स नदी वाहत गेली आहे. या उपवनाच्या दक्षिणभागीं महाराणीसाहेबांच्या मातुःश्री, त्यांचे भर्तार व प्रिन्सेस ऑलिस यांच्या समाधि आहेत. प्रिन्स आलबर्ट यांची समाधि फार प्रेक्षणीय आहे. इमारत लहानच आहे, परंतु सर्व काम पांढऱ्या संगमरवरी

दगडाचें असून रचना सुरेख व मनोहर आहे. मध्यभागीं समाधि असून तिच्या अग्रभागीं प्रिन्स आलबर्ट यांचा शुभ्रमर्मरोपलाचा निजलेला असा पुतळा आहे. या समाधीजवळ बसून राणीसाहेब नियमित वेळीं प्रार्थना करीत असतात. प्रासादाच्या दक्षिण बाजूस महाद्वार आहे. या द्वारानें केवळ राजकुलांतील लोकांच्याच गाड्या येतात. या द्वारासमोर तीन मैल लांबीचा सरळ असा एक दीर्घ पथ आहे. या मार्गाच्या दोन्ही बाजूंस एल्म नांवाच्या वृक्षविशेषाची गर्द झाडी आहे. या दीर्घ पथाच्या पूर्वेच्या बाजूस एक विस्तीर्ण अरण्य आहे. त्याचें क्षेत्रफळ १८०० एकर असून त्यांत श्वेतरक्तवर्णाचीं हरिणें आहेत.

याप्रमाणें या प्रासादाची हकीकत आहे. एकंदरीनें पाहतां हा प्रासाद व त्याची सर्व व्यवस्था आंग्ल राष्ट्राच्या वैभवाला अनुरूप आहे असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. शिल्पकारांचें कौशल्य, चित्रकारांची कळा, तक्षकांचे कर्तृत्व, व संपत्तीचा व्यय यांच्या योगानें होण्यासारखी कार्यसिद्धि जितकी म्हणून आहे तिचा बराच अंश येथें दिसण्यांत येतो.

ता० १२ रोजीं दोन प्रहरीं मी सर एड्विन आर्नोल्ड यांस भेटावयास गेलों. सर एड्विन आर्नोल्ड हे लंडनशहराच्या पश्चिमभागांत एका टोंकास रहातात. त्यांचें घर मोठ्या रस्त्यावर असून स्वतंत्र आहे. या गृहस्थांनीं माझें चांगलें स्वागत केलें व आपल्या पत्नींची व मुलींची माझी ओळख करून दिली. ही सर्व मंडळी घरच्या दिवाणखान्यांत बसली होती. लंडनशहरांत जागेची महर्घता व संकोच आहे या गोष्टीचा विचार केला ह्मणजे या गृहस्थांचें घर बऱ्या प्रतीचें होतें असें ह्मटलें पाहिजे. घरांत स्वच्छता व टापटीप होती हें सांगणें नकोच. दिवाणखाना लहान असून रस्त्याच्या बाजूला त्याला दोनच खिडक्या होत्या. माझी थोडीशी हकीकत व कुशलवृत्त विचारून झाल्यावर कांहीं संस्कृत ग्रंथांविषयीं बोलणें झालें व नंतर मीं निरोप घेतला. जातांना त्यांनीं 'डेली टेलिग्राफ' वर्तमानपत्राचा कारखाना पहाण्याची शिफारस केली व कारखाना मला दाखविण्याविषयीं एक चिट्ठी लिहून दिली

एकंदरीनें या गृहस्थांच्या भेटीपासून मला आनंद झाला. माझ्या कामामुळें यांच्याकडे वारंवार जाण्यास मला सवड झाली नाहीं. याच दिवशीं आणखी एका गृहस्थास मी भेटण्यास गेलों. हे गृहस्थ हिंदुस्थान देशांत मोठ्या हुद्यावर असून या समयीं रजेवर होते. हे माझ्यावर बराच लोभ करितात ह्मणून त्यांचें दर्शन घेण्याची मला इच्छा होती. अगोदर पुष्कळ दिवसपर्यंत यांचा पत्ता समजेना. मग शोध करितां करितां असें सुचलें कीं त्यांच्या गुमास्त्याकडे शोध करावा. किंग कंपनीकडे शोध लागेना, तेव्हां ग्रिंडले ग्रूम कंपनीकडे गेलों. मीं विचारल्याबरोबर माझा खोळंबा न करितां मला येथील अधिकाऱ्यांनीं अपेक्षित माहिती दिली. त्या पत्त्याच्या धोरणावर मी गेलों तेव्हां या गृहस्थाचें बिऱ्हाड सांपडलें. हे गृहस्थ भाड्याच्या जागेंत रहात होते. एका विस्तीर्ण इमारतीतील कांहीं खोल्या त्यांच्याकडे होत्या. मीं दार ठोकलें तेव्हां एक मोलकरीण दाराजवळ आली, परंतु तिनें सांगितलें कीं यजमान गांवाला गेले असून यजमानीणबाई घरांत आहेत; तेव्हां माझी नामपत्रिका यजमानीणबाईस दाखविण्यास सांगितली. त्यांनीं मला वर बोलाविलें, तोंपर्यंत मी दाराशींच उभा होतों.

वर गेल्यावर मी दिवाणखान्यांत बसलों. तेथें बाईनीं मला कुशल प्रश्न विचारून यजमान गांवाला गेल्याबद्दल सांगितलें व कांहीं उपहार करण्याविषयीं मला आग्रह केला. ज्या दालनांत आह्मी बसलों होतों त्यास दिवाणखाना हें नांव शोभण्यासारखें नव्हतें. दहापांच माणसें बसण्यासारखी ही एक खोली होती. आणखी एवढ्याच दोन तीन खोल्या यांच्याकडे असाव्या असा माझा तर्क झाला. एक मोलकरणीशिवाय नोकरचाकरही दिसण्यांत आले नाहींत. या देशांत असतांना दोनदोन घोड्यांच्या गाड्यांत मिरविणारे, गडीमाणसें, शिपाईप्यादे हाताखालीं वागविणारे अशा गृहस्थांची लंडनशहरांत काय स्थिति असते या गोष्टीचा अजमास या कथानकावरून करतां येण्यासारखा आहे. स्वतंत्र घर घेणें झाल्यास एखाद्या उपनगरांत मिळण्यासारखें असतें, परंतु गाड्याघोड्यांचें तर अशा स्थितीच्या लोकांस स्वप्नही पडावयास

नको. ऑम्निबस, आगगाडी व फार झालें तर क्याब यांशींच गांठ असते. दुसऱ्या एका प्रसंगीं मी या गृहस्थांस भेटण्यास गेलों तेव्हां यांची, यांच्या पत्नीची व यांच्या मुलीची भेट झाली. सर्वांनीं मला फार उत्तम रीतीनें वागविलें.

ता० १३ जून रोजीं दुपारीं मला बरीच फुरसत मिळाली म्हणून मी एकटाच जुन्या लंडनशहरांत फिरावयास गेलों. पोस्ट ऑफिस वगैरे पाहून रस्त्यांतील मजा पहात पहात हिंडत होतों, तों वाटेंत एका स्थलीं एक हजामाचें दुकान लागलें, तेथें मी गेलों. या दिवसापर्यंत मी अशा प्रकारच्या दुकानीं कधींच गेलों नव्हतों. व्हियेना व पॅरिसमध्यें हजामास घरीं बोलावून आणून दहा दहा रुपये दिल्याचें मागल्या भागांत लिहिलेंच आहे. तेव्हांपासून अशी चैन करण्याचें बंद केलें. मलाही अभ्यासानें हस्तकौशल्य बरेंच आलें होतें, तेव्हां रोज घरच्याघरींच खिजमतीची व्यवस्था होत असे. अर्थात् हा प्रकार दाढीपुरताच होता. डोक्यावर केंस वाढविण्याची संवय नाहीं, तेव्हां अस्वस्थता वाटत होती म्हणून केंस कातरून घ्यावे म्हणून मी पंधरा पंधरा दिवशीं क्षौरिकाकडे जात असे. प्रत्येक प्रसंगीं निरनिराळ्या भागांत जात असे त्यामुळें सर्व तऱ्हा माझ्या पहाण्यांत आल्या. उत्तम प्रतीचीं दुकानें पश्चिमपुरांत आहेत. ज्या दुकानीं मी या दिवशीं गेलों तें लहान असून त्यांत एकच खोली होती. रस्त्याच्या बाजूला दोन खिडक्या असून त्यांच्याजवळ भिंतीला लागून दोन पसरट तोंडाचीं जस्ती पात्रें होतीं व त्यांच्या वरच्या बाजूस दोन आरसे होते. आरशासमोर दोन खुर्च्या होत्या. त्या खुर्च्यांच्या पृष्ठभागास वरखालीं करण्यासारखा एक लोखंडी गज होता व त्या गजाच्या अग्रभागीं अर्धचंद्राकार अशी एक पट्टी होती. ज्यास हजामत करावयाची असेल त्यास या खुर्चीवर बसवून त्याच्या मानेजवळ ही पट्टी येईल अशा तऱ्हेनें तो गज वरखालीं करून मग त्यास स्क्रू पिळीत. म्हणजे तो हालत नसे. हजाम पाठीमागें उभा राहून आपलें काम करितो. प्रथम दाढी करून मग केंस कातरावयाचे. नंतर डोकें धुवावयाचें व नंतर यंत्रानें फिरणारा असा एक वाटोळा ब्रश डोक्यावर फिरवून केंस साफ करा-

वयाचे ह्मणजे झालें. दुकानाबाहेरच एक लांब फळी लाविलेली होती, तिच्यावर सर्व दर लिहून ठेविलेले होते. दाढी करविण्याबद्दल तीन पेन्स, केश कातरण्याबद्दल तीन पेन्स, व ' शांपूइंग ' ह्मणजे संवाहन अथवा चंपीबद्दल सहा पेन्स. संवाहनाचा प्रकार काय असतो याबद्दल मला प्रथम अंदेशा आला होता. मला वाटलें कीं हातपाय वगैरे रगडीत व चेपीत असतील. नाहीं तर " शांपूइंग " कसलें ? परंतु तसें कांहीं नाहीं. केशसंस्कारासंबंधाचें संवाहन निराळेंच आहे. त्याची आपल्या इकडच्या लोकांस कल्पना करतां येणार नाहीं; अथवा तसा प्रकार जरी थोडाबहुत आपल्यामध्यें असला तथापि त्यास संवाहन किंवा चंपी असलें प्रौढ नांव देण्याची आपल्याकडे चाल नाहीं. माझे केश कातरून झाल्यावर मला हजामानें ' शांपूइंग ' करावयाचें काय म्हणून विचारलें. मला सर्व प्रकार समजण्याची जिज्ञासा होतीच म्हणून मी हो म्हणून सांगितलें; तेव्हां त्यानें डोकें प्रथम ऊन पाण्यानें धुतलें, त्यावर कांहीं सुगंध अर्काचा सेक करून फेंस उत्पन्न केला व नंतर फिरून कोरडें करून एक प्रकारचें तेल लाविलें. येवढ्यानें झालें ' शांपूइंग ' ! कां कशी आहे मौज ? असो. येथें दोनच खुर्च्या असल्या कारणानें कांहीं मंडळीस उमेदवारी करावी लागत असे. त्यांच्यासाठीं बाजूला एक लहानसें मेज होतें त्यावर एक दोन वर्तमानपत्रें टाकिलेलीं होतीं. सर्व काम टापटिपीनें, जलदीनें व स्वच्छपणानें होत होतें. सर्व हिशेब चुकवितांना नोकरास पेनी दोन पेन्स देण्याची चाल आहे. आणखी एका प्रसंगीं मी पश्चिमपुरांत बॉन्डस्ट्रीटमध्यें एका दुकानांत गेलों. हें दुकान फार विस्तीर्ण असून उंच प्रतीचें होतें. बाहेरच्या दालनांत सर्व प्रकारचीं सुगंधीं तेलें व अर्क विकावयास ठेविलेले होते. तेथून पुढें गेलों तों एका मेजाजवळ एक बाई बसलेली होती तिनें एक तिकिट दिलें व पुढें जाण्यास सांगितलें. पुढें गेलों तों अर्ध वर्तुलाकार अशी मध्यें जागा असून बाजूनें एकसारख्या वीस पंचवीस खोल्या होत्या. मधल्या जागेंत एक मेज होतें त्यावर वर्तमानपत्रें पडलेलीं होतीं व बाजूनें खुर्च्या होत्या. प्रत्येक खोलीला एकेक पडदा असून आंत आरसे, खुर्च्या, तोंड धु-

ण्याचें सामान, ऊन व थंड पाण्याच्या तोट्या, साबण वगैरे जिनसा होत्या. वरच्या बाजूस एक पंखा टांगलेला असून त्याची दोरी एका कप्प्यावरून दुसऱ्या खोलींत नेलेली होती. ज्या खोलींत माणूस नसेल त्या खोलीचा पडदा बाजूला सारून ठेविलेला असे. मला बाईनें जें तिकिट दिलें होतें त्यावर खोलीचा नंबर घातला होता. त्या खोलींत मी गेलों. तेथें एक हजाम हजर होता; त्यानें सर्व व्यवस्था यथास्थित लाविली. हजामत करण्याच्या अगोदर गळ्याभोंवतीं एक रुमाल टाकीत असतात, परंतु केश कातरले ह्मणजे ते आंत जाऊन खुपावयास लागतात व त्यामुळें त्रास होतो. याचा परिहार करण्यासाठीं कित्येक ठिकाणीं रुमालाच्या टोंकास रबराचें वळें जोडलेलें असतें त्यामुळें रुमाल गळ्याला चिकटून बसतो व केश आंत जात नाहींत. उंच प्रतीच्या दुकानांत गेलें ह्मणजे दहा पांच शिलिंग द्यावे लागतात. मध्यम प्रतीच्यांत शिलिंग दोन शिलिंग व कनिष्ट प्रतीच्यांत अर्ध्या पाव शिलिंगांत काम होतें. या क्षौरिकवर्गांतील मंडळी मोठी हुषार, चौकस व जिज्ञासु असतात. रोजचीं वर्तमानपत्रें वाचून जगांत काय घडामोड चालली आहे तिचा त्यांना चांगला परिचय असतो. दोन तीन ठिकाणीं हजामांशीं संभाषण करण्याचा मी मुद्दाम उपक्रम केला, तेव्हां माझ्या असें अनुभवास आलें कीं राजकीय विषयांचीसुद्धां या लोकांस साधारण माहिती असते. लिबरल व कान्सर्व्हेटिव या पक्षांच्या तारतम्याबद्दल, सालसबरी, ग्लाडस्टन वगैरे प्रमुख मंडळींच्या वर्तनाची सदोषता व निर्दोषता यांविषयीं, आयर्लंडांत चाललेल्या प्रजासंक्षोभाविषयीं, हिंदुस्थान देशांतील लोकांच्या राजनिष्टेविषयीं कोणत्या तरी प्रकारचा अभिप्राय देण्यास हे तयार असून पूर्वपक्ष उत्तरपक्ष करण्यास व भवति न भवति चालविण्यास उत्सुक असतात. यावरून त्यांस विद्येचा बराच संस्कार असावा असें दिसतें. ही गोष्ट तद्देशीय लोकांच्या उन्नतावस्थेची निदर्शक आहे असें म्हटलें असतां सत्यातिक्रम होईल असें वाटत नाहीं.

याच दिवशीं मी फोटोग्राफ काढण्यास गेलों. लंडन शहरांत इकडल्यापेक्षां फोटोग्राफ मात्र स्वस्त दरानें काढतात. शिवाय

येथें फोटोग्राफ खराब होऊं नये म्हणून त्यावर कांहीं पदार्थ लावतात त्यामुळें तकतकी येऊन चित्र चांगलें रहातें. या क्रियेस 'एनामलिंग' म्हणतात. ज्या ठिकाणीं मी गेलों तेथील कार्यगृहांत सर्व बायका होत्या. नांव टिपून घेण्यापासून तों अखेरच्या कामापर्यंत सर्व कामें स्त्रियाच करीत होत्या. मागें एका पोस्ट आफिसांत एक स्त्री होती म्हणून सांगितलेंच आहे; व वर एका केशसंस्काराच्या दुकानांतही स्त्री होती ह्मणून लिहिलें आहे, व फोटोग्राफच्या कार्यगृहांतही स्त्रिया आढळल्या; यावरून सवड असेल तेथें स्त्रियांस कामास लावण्याचा प्रघात जारीनें सुरू आहे हें लक्षांत येण्यासारखें आहे. लंडनशहरांत अविवाहित स्त्रिया पुष्कळ व त्या पुरुषापेक्षां कमी वेतनानें मिळूं शकतात व काम करण्यास तयार असतात, तेव्हां त्यांचा उपयोग हल्लींच्या जीवनकलहाच्या कालांत कां करून घेऊं नये !

ता० १२ जून रोजीं मी सेंट पॉल्स क्यार्थाड्रल नामक प्रार्थनालय पाहण्यास गेलों. सर्व लंडन शहरांत ही इमारत अत्युच्च असून प्राचीन नगराच्या मध्यभागीं लहानशा उंचवट्यावर अधिष्ठित आहे. ज्या स्थलीं हल्लींची इमारत आहे त्यास्थलीं फार प्राचीन कालापासून लहानमोठीं देवालयें होतीं. हल्लींच्या इमारतीची रचना सर क्रिस्टोफर रेन यांच्या देखरेखीखालीं १६७५ सालीं सुरू झाली होती. १६९७ सालीं ही इमारत उपयोगांत आली व १७१० सालीं पूर्ण झाली. इच्यासाठीं सुमार पाऊणकोट रुपये खर्च झाला. या इमारतीची आकृति रोम येथें असलेल्या प्रसिद्ध सेंटपीटर्स प्रार्थनालयासारखी आहे; परंतु सेंटपीटर्सपेक्षां सेंटपाल्स बरेंच लहान आहे. आकृति लॅटिनक्रॉस सारखी आहे. पूर्वपश्चिम लांबी ५०० फूट असून पूर्वेच्या व पश्चिमेच्या टोंकाकडील कांहीं भागाची रुंदी ११८ फूट आहे. मधल्या भागाची रुंदी २५० फूट आहे. क्रॉसचा आकार येण्यासाठीं लांबीरुंदीचें असें प्रमाण धरिलें आहे. ज्या भागाची रुंदी जास्त आहे त्याच्यामध्यें एक घुमट आहे त्याची उंची आंतून २२५ फूट आहे व बाहेरून ३६३ फूट आहे. सर्व ख्रिस्तभजनालयांत सेंटपॉल्सचा तिसरा नंबर लागतो. वरचे

दोन नंबर रोम येथील सेंटपीटर्स व मिलन येथील क्याथीड्रल यांचे लागतात.

शहरच्या ज्या भागांत इमारत आहे तेथें रस्त्यांची व घरांची अतिशय गर्दी आहे त्यामुळें इमारतीच्या अवयवांचें स्थौल्य व त्याची शोभा नेत्राकर्षक होत नाहीं. इमारतीच्या बाजूस मोकळी जागा असती ह्मणजे तिची भव्यता डोळ्यांत जास्त भरली असती. ब्लॅकफ्रायर्स ब्रिज वगैरे स्थलांवरून या इमारतीच्या घुमटाची आकृति व त्याचें सौंदर्य चांगलें दृग्गोचर होतें. मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेच्या बाजूस असून त्याच्या समोर अॅन राणीचा एक उंच पुतळा आहे, व पायाजवळ इंग्लंड, फ्रान्स, आयर्लंड व अमेरिका या चार देशांच्या निदर्शक अशा प्रतिमा आहेत. या बाजूची रुंदी १८० फूट असून आरोहणासाठीं एक मर्मरोपलाची विस्तीर्ण सोपानपरंपरा आहे. पायऱ्या चढून वर गेलें ह्मणजे पन्नास फूट उंचीची बारा स्तंभानीं विभूषित अशी एक अलिंद्भूमिका लागते व इच्या अग्रभागीं आठ खांबांची दुसरी अलिंद्भूमिका आहे. या स्तंभराजींच्या योगानें इमारत भव्य व सुरेख दिसते. वरच्या अलिंद्भूमिकेच्या शिरोभागीं सेंटपॉलचा उभा पुतळा आहे. याच्या उजव्या बाजूस सेंटपीटर्स व डाव्या बाजूस सेंट जेम्स यांचे पुतळे आहेत. पश्चिम बाजूस दोन कोनावर २२२ फूट उंचीचे दोन मनोरे आहेत. उत्तर बाजूच्या मनोऱ्यावर १२ लहान लहान घंटा आहेत व एक मोठें घड्याळ आहे; दक्षिण बाजूच्या मनोऱ्यावर १६ टन वजनाची एक प्रचंड घंटा आहे. या देवालयाचें महाद्वार बहुधा बंद असून प्रेक्षकांसाठीं उत्तरेच्या बाजूस एक द्वार खुलें असतें. सकाळीं नऊ वाजल्यापासून सायंकाळीं पांच वाजेपर्यंत ही इमारत उघडी असते. प्रवेशासाठीं कांहीं द्यावें लागत नाहीं परंतु पुस्तकालय, घड्याळ, अलिंद्भूमिका, घुमट व भुयार हीं पहाणें झाल्यास अर्ध्या शिलिंगापासून दीड शिलिंग द्यावा लागतो. उत्तरेच्या दरवाजानें प्रवेश केला व थोडें पुढें गेलें म्हणजे घुमटाचा आभ्यंतर भाग दृग्गोचर होतो. एकंदर दृग्विषय उज्ज्वल नसून मलिन व रूक्ष असा दिसतो. स्तंभांच्या उच्चत्वामुळें व घुमटाच्या विस्तारामुळें भय वाटतें व

मन रममाण होत नाहीं. डाव्या बाजूला वेदिका व एक प्रचंड वादनयंत्र (ऑर्गन) दिसतें. मध्यभागीं आसनें मांडलेलीं आहेत. बाजूनें अधिकारि जन व गुरुजन यांसाठीं नक्षीचीं आसनें दिसतात. घुमटाच्या आंतल्या बाजूस सेंटपॉलच्या चरित्रांतलि कांहीं भागासंबंधीं आठ चित्रें आहेत परंतु तीं खालून दिसण्यांत येत नाहींत. शिवाय दोन कोपऱ्यांत इसाया व सेंट-माथ्यूज यांचीं नानावर्णांच्या काच खडांनीं बनविलेलीं चित्रें आहेत. वर जें वादनयंत्र निर्दिष्ट केलें आहे त्याचे दोन भाग आहेत एक भाग उत्तरेच्या भितीला व दुसरा भाग दक्षिणेच्या भितीला लागून आहे. व जमिनीखालून दोन भागांस जोडणाऱ्या अशा नळ्या नेलेल्या आहेत. यंत्राच्या पृष्ठभागावर फार सुरेख व विचित्र असें नक्षीचें काम केलेलें आहे. इमारतीच्या सर्व भागांत ठिकठिकाणीं नामांकित पुरुषांच्या स्मारक अशा वस्तु आहेत. यांत बहुतेक पुतळे फौजेच्या व आरमाराच्या अधिकाऱ्यांचे आहेत. इतर वर्गांतील पुरुषांमध्यें साम्युअल जान्सन, हेन्री हॉलम, जान हावर्ड, सर जाशुआ रेनल्ड्स यांचीं स्मारकें आढळतात. अशा प्रकारच्या स्मारकांची येथें फारच गर्दी झाली आहे, व जागा संकुचित असल्यामुळें त्यांच्या योगानें शोभा न येतां तीं सौन्दर्यविघातक झालीं आहेत. पुतळे वगैरे खेरीज करून जमिनीवर बसविलेले असे प्रस्तर खंड बरेच आहेत. इमारतीच्या दक्षिण बाजूच्या दालनांतून वरच्या भागास जाण्याचा जिना आहे. सुमार ११० पायऱ्या चढून वर गेलें ह्मणजे एक अलिद्भूमिका लागते तिच्या टोंकास पुस्तकालय आहे. दीडशें पायऱ्या चढून आणखी वर गेलें ह्मणजे घुमटाला लागूनच एक वर्तुलाकार अलिद्भूमिका आहे तिचें नांव व्हिस्परिंग ग्यालरी. एका बाजूला भितीशीं शब्द उच्चारला असतां समोरच्या बाजूला आवाज स्वच्छ उमटतो अशी येथें चमत्कारिक योजना आहे. मी पहावयास गेलों त्यावेळेस इमारत बंद होण्याचा समय होता ह्मणून मला या गोष्टीचा अनुभव घेतां आला नाहीं. आपल्या इलाख्यांत विजापूर मुक्कामीं असलेला गोल घुमज ज्यांनीं पाहिलेला असेल त्यांस या गोष्टीचा अनुभव आलाच असेल.

गोलघुमजापेक्षां सेंटपॉल्सची इमारत ज्यास्त लांब व उंच आहे. परंतु गोलघुमज येथें जो घुमट आहे त्याचा व्यास व घेर सेंटपॉल्सपेक्षां मोठा आहे इतकेंच नाहीं तर तेथें प्रकाश वगैरे संबंधाची तजवीज जास्त सोईची व सुखाची आहे. सेंटपॉल्स येथील वर निर्दिष्ट केलेल्या अलिंदभूमिकेजवळ घुमटाचा व्यास १०८ फूट आहे व घेर ३२० फूट आहे. गोलघुमज येथें जी अलिंदभूमिका आहे तेथें घुमटाचा व्यास १३५ फूट आहे व घेर ४०० फूट आहे. असो.

या अलिंदभूमिकेंतून आणखी एक जिना वर जातो त्यानें घुमटाच्या बाहेरून पायथ्याशीं व बाजूनीं असलेल्या ग्यालरींत जातां येतें. घुमटाच्या शिरोभागीं आणखी एक ग्यालरी आहे. या दोन्ही स्थानावरून शहराचा देखावा फारच सुरेख दिसत असेल यांत संशय नाहीं. वरच्या ग्यालरीच्या आंतून कांचा लाविलेल्या आहेत त्यांतून प्रकाश येण्यासारखा आहे. या काचकोशावर एक वाटोळा गोळा आहे व एक क्रॉस (त्रिशूल) आहे. घुमटाच्या पायथ्यापासून वर कांहीं अंतरापर्यंत एकसारखे वाटोळे खांब आहेत त्यांमुळें शोभा चांगली दिसते.

इमारतीच्या खालीं भुयार आहे त्यांत वेलिंग्टन्, नेल्सन व इतर महापुरुषांच्या समाधि आहेत.

येथें रोज प्रार्थना होत असते. रविवारच्या दिवशीं जनसमाज मोठा असतो. येथील गायन व वादन ऐकण्यासरखें असतें असें ह्मणतात.

तारीख १४ रोजीं मी इंडिआ आफिसांत डाक्टर रास्ट यांच्याकडे गेलों होतों. हें कार्यगृह व्हाइटहालनामक भागांत आहे. ह्या व दुसऱ्या अनेक कार्यगृहांसाठीं या भागांत जंगी इमारती आहेत. बाह्यस्वरूपांत या सर्व एकसारख्या आहेत. डाक्टर रॉस्ट यांची भेट झाली परंतु यांच्याशीं संभाषणानें मला फारसें समाधान झालें नाहीं. हे गृहस्थ बरेच वृद्ध असून आंग्लदेशीय नाहींत असें वाटलें, त्यांनीं मला फारसें अगत्य दाखविलें नाहीं. कदाचित् कार्यव्यापृततेमुळें त्याचें असें वर्तन माझ्या अनुभवास आलें असेल. कसेंही असो मला यांच्या भेटीस गेल्याबद्दल पश्चात्ताप झाला. आमचें संभाषण चाललें असतां सर मॉ·

नियर वुइलियम्स तेथें दाखल झाले यांचीही तऱ्हा मला अभिमत झाली नाहीं. रॉस्ट साहेबांनीं माझी त्यांची ओळख करून दिली परंतु ते माझ्याशीं फारसे बोलले नाहींत. पुढें एक दोन प्रसंगीं मॉनियर वुइलियम्स साहेबांकडून मला ईव्हनिंग पार्टीचें बोलावणें आलें होतें परंतु मी गेलों नाहीं.

तारीख १५ रोजीं सकाळीं आह्मीं आक्सफर्ड येथें गेलों. आह्मी जाणार ह्मणून एका गृहस्थानीं तेथील एका विद्यालयांतील अधिकाऱ्यास सूचना पाठविली होती. या अधिकाऱ्यानीं आमची सर्व व्यवस्था उत्तम ठेविली. स्टेशनावर ते स्वतः गाडी घेऊन आले होते. व तेथून परस्परच आह्मी गांवांत फिरावयास गेलों. सेंट जॉन्स, बेलिअल, क्राइस्टचर्च व न्यू कालेज हीं विद्यालयें पाहून आह्मीं एका उंचवट्यावर एका गृहस्थाची बाग आहे तेथें जाऊन सर्व आक्सफर्ड शहराचा देखावा पाहिला. गांव लहानच आहे परंतु टुमदार, सुरेख व स्वच्छ आहे. इमारती मोठ्या, सुंदर, नक्षीदार वगैरे येथें नाहींत हें खरें परंतु या बाह्य उपाधींशिवायच या स्थलास शोभा आलेली आहे. विद्याविलासाविषयीं हें स्थल प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे व हेंच त्याच्या रमणीयतेचें आदिकारण आहे. ज्या पाठशालांनीं नामांकित अशा पुरुषांस जन्म दिला, त्या पाठशालांत मन रममाण होण्याला बाह्यसौन्दर्य किंवा विशाल विस्तार कारणीभूत होत नाहींत. या स्थलांची किंमत आनुषंगिक गोष्टींवर अवलंबून असते. पाठशालांच्या बहुतेक इमारती जीर्ण असून त्या जीर्णत्वानें येणारी शोभा राखण्यासाठींच कीं काय त्यांस दुरुस्ती किंवा परिष्कार यांचा संसर्ग लागलेला दिसत नाहीं. सर्व इमारतींत एक एक विस्तीर्ण पटांगण असून क्वचित् ठिकाणीं आजूबाजूनेंही प्रशस्त अशा प्रांगणभूमिका आहेत. यांच्या योगानें शोभा अधिक दिसते व विद्यार्थ्यांची सोय होते. या सर्व पाठशालांत व्यवस्था व नियम यांचा अंमल जारी आहे व शिष्ट पद्धतीच्या उल्लंघनास शासनही जरब आहे. येथें रहाणाऱ्या छात्र वर्गावर गुरुजनांची सक्त नजर असते. गुरु व शिष्य या दोघांसाठीं निराळ्या तऱ्हेचे पोषाक ठरविलेले आहेत. पाठशालेंत तसा पोषाक घातल्याशिवाय जा-

ण्याची सोय नसते. मुलांच्या अंगावर एक अघळपघळ अंगरखा असतो. त्याच्या पाठीवर पुष्कळ चुण्या असून बाह्या शिवलेल्या नसतात. डोक्यावर बसकी टोपी असते तिच्या अग्रभागीं एक चौकोनी तकट जोडलेलें असतें व त्याच्या मध्यभागीं एक गोंडा असतो. येथील सर्व तऱ्हा पाहून माझ्या आयुःक्रमांतील अध्ययनकालाचें मला स्मरण झालें. विद्याव्यासंगाची स्फूर्ति उत्पन्न झाली व त्या स्थलीं निवास करून पुस्तकांची संगति जोडावी असा संकल्प होऊं लागला. मी एकटा असतों तर खचित बराच काल अशा आनंदाच्या लहरींत घालविला असता. परंतु माझ्या बरोबरच्या मंडळीच्या उद्बोधनानें मी त्या मनोराज्यापासून च्युत झालों व विषण्ण होऊन मार्ग क्रमूं लागलों. समानशील अशा स्नेह्यांशिवाय कोणत्याही गोष्टींत आनंद वाटत नाहीं. या संस्थानिकांबरोबर मलाही महायात्रा घडली खरी; परंतु त्यांचें माझें शील एक नसल्यामुळें अनेक प्रसंगीं मला खेद होई. कित्येक प्रसंगीं वस्तूंचें अवलोकन मला त्यांच्या नेत्रांनीं करावें लागे. ज्या गोष्टींचा त्यांस शोक त्यांचा मला नाहीं व ज्यांची मला आवड त्यांची त्यांना नाहीं. ते पडले धनी; मी पडलों चाकर. तेव्हां अर्थात् त्यांची इच्छा बलवत्तर. एवढें सांगणें जरूर आहे कीं, यासंबंधानें मी आमच्या महाराजांस दोष मुळींच देत नाहीं. त्यांनीं माझी आपल्या मुलाप्रमाणें काळजी घेतली व त्यांच्याकडून झालें तितकें त्यांनीं मला सुख दिलें; परंतु माझें त्यांचें शील समान कसें व्हावें? त्या गोष्टीस त्यांचा काय इलाज? स्वतःच्या पैशानें मित्राबरोबर जाण्याचा योग येईल तर त्यासारखी दुसरी मौज नाहीं; परंतु 'अकरणान्मंदकरणं श्रेयः' या न्यायानें माझ्यासारखी कोणास यात्रा घडेल तर त्यानें करून घ्यावी. दुसरीही गोष्ट येथें सांगितली पाहिजे ती ही कीं, संस्थानिकांबरोबर जाण्यानें ज्या कांहीं गोष्टी पहाण्यास सांपडतात व ज्या लोकांची स्थिति अवलोकनांत येते त्या गोष्टी व ती स्थिति आपण एकटे किंवा सारख्या सारख्या स्नेह्यांबरोबर गेलें असतां पहावयास सांपडत नाहींत. दोन्ही प्रकारांत गुणावगुणांचें तारतम्य आहेच. असो. पाठशाला पाहून शिवाय बॉड्लियन लायब्ररी

व इंडियन इन्स्टिट्यूट या संस्था आह्मीं पाहिल्या. बॉडलियन लायब्ररींत पुस्तकांचा संग्रह चांगला असून तेथें कांहीं चमत्कारिक प्राचीन लेख ठेविलेले आहेत. इंडियन इन्स्टिट्यूटमध्यें नानातऱ्हेच्या भारतवर्षीय वस्तूंचा संग्रह केलेला आहे; परंतु येथें सर्व वस्तु अव्यवस्थित रीतीनें पडल्या होत्या. त्यांच्यावर चांगल्या तऱ्हेची देखरेख नसावी असें दिसलें.

येथील युनिव्हर्सिटीची तऱ्हा आपल्या इकडल्याप्रमाणें नाहीं. आपल्या देशांत युनिव्हर्सिटीकडे केवळ परीक्षा घेण्याचें काम आहे. तेथें सर्व प्रकारची शिक्षणसंबंधींही व्यवस्था युनिव्हर्सिटीकडे आहे. निरनिराळ्या विषयांचे अध्यापक असून त्यांचीं व्याख्यानें होतात. त्या व्याख्यानांस कोणत्याही पाठशालेच्या विद्यार्थ्यांस जातां येतें. व्याख्यानास गेलेंच पाहिजे असा कांहीं निर्बंध नसतो असें ऐकिलें.

गांवांत सहल करून व वर निर्दिष्ट केलेल्या स्थलांचें अवलोकन करून आह्मी आमच्याबरोबर जे गृहस्थ होते त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों. हे गृहस्थ एका पाठशाळेंतच रहात होते. त्यांनीं दुसऱ्या एकदोन अधिकाऱ्यांस तेथें बोलाविलें होतें. त्यांची आमच्या उपहाराच्या वेळीं गांठ पडली. माझ्या शेजारींच दोन बाजूस दोन गृहस्थ होते त्यांशीं माझें संभाषण झालें. त्यांच्या बोलण्यांत त्यांनीं हिंदुस्थानदेशांतील मुलांची तीव्र बुद्धि व ग्रहणशक्ति व अध्ययनशीलता यांविषयीं फार स्तुति केली, ती ऐकून मला समाधान वाटलें. त्यांच्या बोलण्याचा भाग असा होता कीं, या देशांतील मुलें त्या देशांतील मुलांपेक्षां कोणत्याही बाबतींत कमी नाहींत. याशिवाय आपल्या विवाहपद्धतीविषयींही त्यांनीं बोलणें काढलें. त्यावरून त्यांचा या विषयासंबंधीं बराच गैरसमज होता असें दिसण्यांत आलें.

तारीख १६ जूनपासून ३० जूनपर्यंत.—तारीख १७ जून रोजीं आह्मी इस्लिंगटन उपनगरांत ॲग्रिकल्चरल हॉल नामक इमारतींत युद्धकौशल्याचे कांहीं प्रयोग पाहण्यास गेलों. युद्धप्रसंगीं ज्या प्रयोगांच्या ज्ञानाची अवश्यकता असते ते सर्व प्रयोग युद्धकला शिकविण्यासाठीं ज्या संस्था आहेत त्यांत शिकविले जातात, व सर्व सैनिकांस त्यांचें ज्ञान असतें; परंतु

अभ्यासानें तें ज्ञान जागृत रहावें यासाठीं वारंवार असे प्रसंग योजण्यांत येतात, व यांपासून निःसंशय फायदा होतो. अशा प्रसंगीं जे लोक आपलें काम बरोबर करितात त्यांना इनाम देण्यांत येतें. यामुळें सैनिकवर्गांत ईर्षा उत्पन्न होऊन सर्वजण प्रयोगनिपुणता यावी ह्मणून झटत असतात. प्रकृतस्थळीं एक विस्तीर्ण मंडप घातलेला होता व त्याच्या तीन बाजूंनीं प्रेक्षकजनांसाठीं आसनें मांडलेलीं होतीं. मध्यभागीं एक लांब असें पटांगण मोकळें सोडलें होतें, व त्यावर मृदु मृत्तिकेचें आस्तरण केलें होतें. सैनिकांच्या बायकामुलांसाठीं कांहीं जागा निराळी राखून ठेविली होती तिकडे नजर गेली ह्मणजे मोठी मौज वाटे. कांहीं बायका आपल्या मुलांस स्तनपान करवीत होत्या, कांहींचीं मुलें रडून रडून त्यांस भंडावीत होतीं म्हणून मुलांस उंच करून त्यांस त्या हलवीत होत्या. कुतूहलवश झाल्यानें त्यांस स्थान सोडून जाण्याचें जिवावर येई; परंतु बालकांच्या रुदनानें इतर प्रेक्षकांस त्रास होईल याविषयींही त्यांच्या मनांत काळजी असे. अशा चित्तवृत्तीच्या द्वैधीभावाच्यासमयीं त्यांची मुद्रा विलक्षण दिसे. या बहुतेक बाया गरीब स्थितींतल्या होत्या असें दिसलें. त्यांचे कपडे साधे पण स्वच्छ होते. त्यांच्या तोंडावर ऐट व उद्धामपणा नसून त्यांच्या गरिबी स्थितीचीं चिन्हें त्यांच्या चेहेऱ्यांवर स्पष्ट दिसत होतीं. असा प्रकार आपल्या देशांत फारसा दिसण्यांत येत नाहीं म्हणून त्याची मला विशेष मौज वाटली. येथील साहेबलोकांच्या बायांचा थाट, त्यांचा दिमाख व त्यांची अरेरावी लक्षांत आणली ह्मणजे अशा आंग्लस्त्रिया पाहिल्या असतां प्रथमदर्शनीं तरी मनाला चमत्कार वाटल्याशिवाय रहात नाहीं. असो.

येथें एकंदर वीस प्रकारचे प्रयोग झाले. निशाण मारणें, भाल्यानें नेम धरणें, तंबू ठोकणें, तरवारीनें लिंबू कापणें वगैरे नानाप्रकार भरधांव घोड्यावरून करण्यांत आले होते. शत्रु कल्पून त्याशीं सामना करण्याची सर्व तयारी करणें, किल्याच्या भिंतीवरून चढून हल्ला करणें व ध्वज उभारणें. नदी किंवा नाला वाटेंत आल्यास त्यावर एकदम पूल करणें व आपलें से-

न्य पलीकडे निघून गेल्यावर शत्रूस त्याचा उपयोग होऊं नये ह्मणून तो पूल मोडून टाकणें, इत्यादि सर्व प्रयोग फार शिताफीनें, मोठ्या कुशलतेनें व अति शीघ्रतेनें करण्यांत आले. हा सर्व प्रकार पाहून माझी चित्तवृत्ति विलक्षण झाली. अविरत परिश्रम करून युद्धकला किती पूर्णदशेस त्या लोकांनीं पोंचविली आहे याविषयीं आश्चर्य वाटलें. अशा प्रकारचे ज्यांचे परिश्रम, असें सूक्ष्म व विस्तृत ज्यांचें ज्ञान, त्यांनीं आमच्यासारख्या निश्चेष्ट, दुर्बल व हतवीर्य लोकांवर राज्य करावें हें योग्यच आहे असा ग्रह झाला. आह्मांस हल्लीं शस्त्र ह्मणजे मोठा बाऊ होऊन बसला आहे. मर्दुमकीचे खेळ आह्मांस नकोसे झाले आहेत. आमचें वीर्य अस्तास गेलें आहे. त्यास प्रोत्साहन नाहीं ह्मणून त्यास जागृतिही नाहीं. प्रलयकालीन गाढ निद्रेमध्यें त्याचा लय झाला आहे. आह्मी कोण ही ओळख आह्मीं विसरलों. आह्मीं निःसत्व, निस्तेज, निरभिमान, निर्धन, निरुत्साह, निरुद्योगी; युरोप देशांतील लोक ससत्व, सतेज, साभिमान, सधन, सोत्साह व उद्योगी. तेव्हां सृष्टीच्या नियमाप्रमाणें राष्ट्रांच्या शर्यतीमध्यें ते पुढें आह्मी मागें, ते भाग्यशाली आह्मी भाग्यहीन, ते राजे आह्मी प्रजा, ते प्रभू आह्मीं दास, असें होणें साहजिकच आहे. अशा प्रकारच्या विचारतरंगाच्या कल्लोळांत मी कांहीं काल निमग्न झालों. अनेक प्रसंगीं त्या लोकांची ऐषआरामाविषयीं प्रवृत्ति पाहून मला त्यांच्याविषयीं तिरस्कार वाटे. परंतु आजचा हा प्रकार पाहून अशी खात्री झाली कीं त्यांच्या सर्व व्यवहारांत सर्व प्रकारच्या वृत्तींचें संमेलन असतें. उद्योग व ऐषआराम, व्यवसाय व सुखविलास यांचें अवलंबन यथावकाश व यथान्याय करण्याविषयीं त्यांचा यत्न असतो. मनोरंजन व मनःशिक्षण यांचा संबंध जुळेल तेव्हां घालण्याविषयीं त्यांचा कटाक्ष असतो ह्मणूनच त्यांचा राज्यशकट अप्रतिहत वेगानें च ाा आहे व त्यांची सत्ता भूपृष्ठावर अबाधित संचार करीत आहे.

तारीख १८ जून रोजीं सकाळीं लक्ष्मीनारायण नांवाचे गृहस्थ आमच्या येथें आले. लंडन शहरांत पंडित दयानंद सरस्वती यांनीं स्थापिलेल्या आर्यसमाजाची एक शाखा आहे, त्या

शाखेचे हे गृहस्थ चिटणीस होते. त्यांच्या सांगण्यावरून तेथें असलेल्या समाजाची स्थिति साधारण बरी आहे असें दिसलें. परदेशामध्यें अशा संस्थांची फारशी ऊर्जितदशा असण्याचा संभव नाहीं. कांहीं वर्षें या संस्थेचा तेथें टिकाव लागला आहे हें सुचिन्ह समजावयाचें. सभासदांमध्यें कांहीं एतद्देशीय व कांहीं आंग्ललोक आहेत. लक्ष्मीनारायण हे गृहस्थ बारिस्टरच्या परीक्षेसाठीं त्या वेळीं तेथें होते. हल्लीं ते पंजाब प्रांतांत वकिलीचा धंदा करीत असावे असा माझा समज आहे. यांच्याशीं माझें जें संभाषण झालें त्यावरून गोरक्षण विषयासंबंधीं इंग्लंड देशांत कांहीं लोकांमध्यें आस्था उत्पन्न झाली आहे असें दिसलें. धर्मदृष्ट्या त्या विषयाची चर्चा न करितां अर्थशास्त्रदृष्ट्या त्याचा उहापोह व्हावा म्हणजे त्या लोकांचें लक्ष तिकडे लागेल असा त्यांचा तर्क होता. त्या दृष्टीनें पाहिलें असतां बैल अगदीं निरुपयोगी ठरतात, कारण कीं त्या देशांत शेतीकडे त्या जनावरांचा उपयोग न करितां त्यांच्या ऐवजीं घोड्याचा उपयोग होत असतो. तेव्हां आरंभीं गाईचें रक्षण करण्याचें सुसाध्य आहे तें उरकून घ्यावें असा त्यांचा पक्ष होता. त्यानंतर या विषयाची परिणति कशी झाली आहे हें मात्र मला ठाऊक नाहीं. त्यांच्या संभाषणांत दुसरा भाग असा आला होता कीं एतद्देशीय लोक त्या देशांत जाऊन मद्यपानासक्त होऊन व व्यभिचारिणी स्त्रियांच्या नादीं लागून द्रव्याची, शरीराची व अब्रूची हानि करून घेतात. याबद्दल त्यांनीं बरीच खरमरीत टीका केली. यांत किती तथ्यांश असेल कोण जाणे. मला त्या सर्व बोलण्यांत परनिंदा व आत्मश्लाघा यांचें मान बरेंच दिसलें. एखाद्याची तशी स्थिति असेल; परंतु एकदोन उदाहरणांवरून सामान्य सिद्धांत ठरविणें हें जितकें दोषास्पद तितकेंच अनर्थमूलक आहे. अशा गृहस्थांची परनिंदेची प्रवृत्ति ही एत[illegible]यांस हानिकारक होण्याचा संभव आहे.

याच दिवशीं दोन प्रहरीं आह्मी क्षावर साहेबांकडे चहा घेण्यास गेलों. क्षावर साहेब पार्लमेंटचे सभासद असून ग्लॅडस्टन साहेबांचे अनुयायी आहेत. हे संपन्न आहेत. यांची विद्वत्तेविषयीं किंवा वाक्पटुत्वाविषयीं ख्याति नाहीं. परंतु लिब-

रळ पन्नास यांचें साहाय्य मोठें आहे. वयानें चाळीशीच्या सु-माराचे असून त्यांचा चेहेरा सुरेख आहे. मुद्रा चंचल आहे. मनोवृत्ति आनंदी असून स्वभाव निष्कपटी व थट्टेखोर आहे. लंडनशहरांत त्यांचें स्वतःचें घर आहे. हें हाइडपार्कच्या ईशान्य टोंकास भररस्त्यावर आहे. याप्रसंगीं कच्छचे राव व दुसरी कांहीं बडी मंडळी येथें आली होती. त्यांमध्यें कांहीं स्त्रिया व कांहीं पुरुष होते. पुरुषांमध्यें सर रिचर्ड टेंपल व मन्त्रो फ-र्ग्युसन हे होते. आह्मी तेथें गेल्यावर यजमान व यजमानीण बाईंनीं आमचा आदरसत्कार केला व इतर अभ्यागतांचा परि-चय करून दिला. नंतर नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें कांहीं स्त्री-पुरुषांशीं औपचारिक संभाषण होऊन मी स्वस्थ उभा राहिलों होतों तेव्हां मन्त्रो फर्ग्युसनसाहेब मजजवळ आले. हे गृहस्थ अल्पवयी असून पार्लमेंटचे सभासद आहेत. हे फार चौकस असून सर्व प्रकारची माहिती मिळविण्याची यांस फार उत्कंठा आहे. यांच्या चेहेऱ्यावरून हे बुद्धिमान् दिसतात. हे पूर्वी लॉर्ड रोझबरीसाहेबांबरोबर हिंदुस्थानांत आले होते व आपल्या इलाख्यांतील पुणें व मुंबई शहरांत त्यांनीं अल्पवास केला होता, त्यामुळें त्यांस इकडील थोडी माहिती होती. माझें त्यांचें बराच वेळ बोलणें झालें. या देशांतील त्यांचा अल्प-वास फार सुखकर झाला, असें त्यांनीं बोलून दाखविलें व पुण्याच्या ब्राह्मणांच्या बुद्धिमत्तेविषयीं व राजकीय खटपटी-विषयीं त्यांनीं फार तारीफ केली. पुण्यास ज्या मंडळींची त्यां-ची मुलाखत झाली त्या सर्वांमध्यें सीतारामपंत चिपळूणकर यांची त्यांस चांगली आठवण राहिली होती, व त्यांच्या चौकसपणाची व तीव्रमतित्वाची त्यांनीं बरीच वाहवा केली. या गृहस्थाशीं जें संभाषण झालें त्यापासून मला फार समाधान वाटलें. नंतर सर रिचर्ड टेंपल साहेबांचीही भेट झाली. त्यांनीं हस्तस्पर्श वगैरे करून कांहीं विचार-पूस केली. परंतु त्यांच्याशीं माझें फारसें बोलणें झालें नाहीं; त्यांस माझ्याशीं बोलण्याची फारशी इच्छा दिसली नाहीं. फ्रावरसाहेबांच्या येथें सुमारें तास दीडतास आम्हीं बऱ्याच मौजेंत घालविला. नंतर आम्हीं, कच्छचे राव, फ्रावरसाहेब

व फर्ग्युसनसाहेब हे सर्व मिळून ग्लॅड्स्टनसाहेबांकडे गेलों. ग्लॅडस्टनसाहेबांचें नेहमींचें रहाणें लंडनपासून दूर हवार्डन येथें असतें. परंतु पार्लमेंट सभेंत काम असलें म्हणजे ते लंडन-शहरांतच रहातात. शहराच्या वायव्य टोंकास डॉलिग्जहिल नांवाच्या प्रांतांत लिबरलपक्षाकडील एका श्रीमंत गृहस्थाचा एक बंगला आहे तो बंगला त्यांनीं ग्लॅड्स्टनसाहेबांसाठीं नेमून दिला आहे. तेथें ते यासमयीं होते. पार्लमेंट सभा-गृहांत ग्लॅड्स्टनसाहेबांचें एकदां दर्शन झालें होतें; परंतु त्यां-ची समक्ष भेट होण्याची संधि मिळाली नव्हती, ती आतां प्राप्त झाली म्हणून मनाला फारच समाधान वाटलें. ज्या सत्पु-रुषाची कीर्ति सर्व पृथ्वीभर अजरामर झाली आहे, ज्यानें आपल्या आयुःकालाचा बराच भाग प्रजाजनांच्या हितासाठीं खर्च केला आहे, ज्याची विद्वत्ता, कार्यनिष्ठा वाक्पाटव व अविरत परिश्रम यांचा प्रत्यय सर्व समंजस लो-कांस गेल्या पन्नास साठ वर्षांच्या जगाच्या इतिहा-सांत स्पष्टपणें मिळतो, ज्याची स्वधर्म, नीति व राज्य-प्रकरण या सर्वांविषयीं सारखी निष्ठा आहे, अशा पुरुषाचें के-वळ दर्शन नव्हे तर अल्प सहवास होण्याची संधि मिळाल्याब-द्दल कोणास आनंद व धन्यता वाटणार नाहीं ? ज्या प्रांतांतून आह्मी गेलों तो प्रांत उजाड होता; तेथें वस्ती अगदीं विरळ व मार्ग धूलिमय होते. मोठ्या रस्त्यापासून दूर अंतरावर आंत हा बंगला होता. गृहाच्या अग्रभागीं व पार्श्वभागीं वि-स्तीर्ण प्रांगणें होतीं. अग्रभागीं असलेल्या प्रांगणांत लता व वृक्ष होते व पार्श्वप्रांगण केवळ हरिततृणाच्छादित होतें. या प्रांगणांत आसनें मांडलेलीं होतीं व एका बाजूस कांहीं मेजा-वर उपहारसामुग्री होती. आह्मी गृहाच्या द्वाराशीं गाडींतून उतरलों. आंत गेल्यावर उजव्या बाजूस एक दालन होतें तेथें ग्लॅड्स्टन साहेब उभे होते. त्यांनीं सर्वांचें स्वागत करून सर्वांशीं हस्तस्पर्श केला. नंतर बोलत बोलत त्याच दालनांतून वर निर्दिष्ट केलेल्या प्रांगणांत आह्मी सर्वजण गेलों. तेथें गेल्यावर ग्लॅड्स्टनसाहेबांच्या पत्नीशीं सर्वांचा परिचय झाला. या समयीं ग्लॅड्स्टनसाहेबांचें वय सुमारें ७८ वर्षांचें

होतें. त्यांच्या पत्नीही त्यांच्या बरोबरीच्या, किंबहुना जास्त उतार दिसत होत्या. साहेबमहशुर्फांचा चेहरा एकदां पाहिला कीं चांगला ध्यानांत रहाण्यासारखा आहे. शिरोभाग मोठा असून तोंडावळा रुंद व वाटोळा असा आहे. नाक बोजड, दृष्टि भेदक व सतेज, कपाळ भव्य व विशाल आहे; मुखपृष्ठावर सुरकुत्या पडलेल्या आहेत, व कपाळावरही रेघा स्वच्छ दिसण्यासारख्या आहेत. तथापि एकंदर मुद्रा निश्चयव्यंजक व कार्यक्षमतासूचक दिसते. त्या विस्तीर्ण मुखपृष्ठावर केश बिलकुल नसल्याकारणानें कांहीं विलक्षण रूप आलें आहे. कानाजवळ व हनुवटीखालीं विरल केश आहेत. मस्तकावरही थोडे थोडे केश असून ते कानांवर लोंबत असतात. एकंदर मुद्रा या पुरुषाच्या कीर्तीला अनुरूप अशीच आहे. त्यांचा स्वर गंभीर व मांसल आहे, वर्णोच्चार स्फुट व प्रकंपरहित आहे, व इतका वयोभार आहे तरी शरीरयष्टि वक्र झालेली नाहीं. शरीर स्थूलही नाहीं व कृशही नाहीं. यांच्या पोषाखांत नोकझोक मुळींच नाहीं. यांची गळपट्टी उंच व हनुवटीपर्यंत येऊन पोंचलेली असतें. व तिच्यावर बांधलेलें वेष्टन सरासरी गुंडाळलें असतें; बाकी सर्व पोषाक याच मासल्याचा असून त्यांच्या पोक्तपणाला शोभण्यासारखा असतो. घरामध्यें सामानसुमान ऐषआरामाचें नसून अवश्यक तेवढेंच दिसलें. या महापुरुषाचा हा साधेपणा पाहून विशाखदत्त कवीनें वर्णन केलेल्या चंद्रगुप्त राजाधिराजाचा मंत्रिवर्य चाणक्य याच्या स्थितीचें स्मरण झालें. असे महापुरुष बाह्योपाधिनिरपेक्ष व स्वसुखनिरभिलाष असावयाचेच. असो.

कांहीं काल संभाषणांत गेल्यावर कांहीं मंडळी उपहार करण्यांत गुंतली व नंतर ग्लॅड्स्टनसाहेबांच्या पत्नींनीं एक चोपडी काढून तिच्यावर हिंदुस्थानी अभ्यागतांच्या सह्या घेतल्या. अशा प्रकारच्या सह्या घेण्याची पुष्कळ ठिकाणीं चाल आढळली. मग कां हा अगत्य दाखविण्याचा एक प्रकार आहे, किंवा केवळ कौतुक व मौज यांचा हा प्रकार आहे कोण जाणें. पुस्तकांतून वगैरे ज्या उर्ध्वकाय प्रतिमा मुद्रित होतात.

त्यांच्याखालीं नांवाची सही हुबेहुब दस्तूरखुद्दप्रमाणें बनविलेली मुद्रित करण्याची त्यांच्याकडे चाल आहे. त्याचप्रमाणें प्रसिद्ध कवी वगैरेंच्या ग्रंथांपैकीं ज्यांच्यावर त्यांची स्वदस्तूरची सही असते त्यांस विलक्षण किंमत येते. असो. याप्रमाणें ग्लॅड्स्टनसाहेबांच्या भेटीचा प्रसंग झाला.

तारीख १९ जून रोजीं आह्मी फ्लावरसाहेबांच्या आमंत्रणावरून ट्रिंग मुक्कामीं त्यांचें वनगृह आहे तेथें गेलों. आगगाडीपासून सुमार दोन मैल लांब हें गृह आहे. मार्गांत कांहीं खेडीं लागलीं; तेथील लोक रस्त्यावर उभे राहून टाळ्या वाजवूं लागले. कांहीं गरीब लोकांचे कपडे स्वच्छ नसून फाटकेही होते, परंतु गांव फार व्यवस्थित दिसले. घरें मजबूत व नीटनेटकीं, रस्ते निर्मळ, व क्षेत्रें शस्ययुक्त होतीं. या प्रांतांत वनश्रीची शोभा दृग्गोचर झाली नाहीं. कांहीं लहानमोठीं झाडें दिसत होतीं, परंतु एकंदर दृग्विषयांत चित्ताकर्षक असें सृष्टिसौंदर्य नव्हतें. वनगृह सुरेख असून बरेंच विस्तीर्ण होतें. फ्लावरसाहेबांनीं कच्छचे राव व कांहीं त्यांच्या स्नेह्यांपैकीं मंडळी बोलाविली होती. या मंडळीमध्यें सर्व तरुण असून कांहीं पार्लमेंटचे सभासद होते. आह्मी सर्व पुरुष मंडळी होतों. स्त्रिया मुळींच नव्हत्या. त्यामुळें संभाषण, परिहास, विनोद वगैरे सर्व प्रकार निरर्गल चालले होते व मौज फार झाली. ही सर्व मंडळी आमच्याशीं अगदीं मोकळेपणानें, आढ्यता न धरितां व सलगीनें वागत होती त्यामुळें आह्मांस येथें संकोच मुळींच वाटला नाहीं. त्यांतून फ्लावरसाहेबांचा स्वभाव फारच विनोदशील आहे त्यामुळें सर्वांसही तद्रूप होण्याची स्फूर्ति होई व एकंदर आनंदांत भर पडे.

फ्लावरसाहेबांनीं व्यवस्था फार उत्तम ठेविली होती. घरीं पोंचल्याबरोबर सर्वांनीं आपले ओव्हरकोट काढून ठेविले व घरांतील कांहीं दालनांचें निरीक्षण करण्यास आरंभ केला. यजमान संपन्न तेव्हां सर्व सामग्री तदनुरूप होती हें सांगणें नकोच. अभ्यागतांसाठीं निराळीं स्वतंत्र दालनें होतींच. घरांत फिरणें झाल्यावर आह्मी बाहेर पडलों व उपवनांत सहल करूं लागलों. बंगल्याच्या पिछाडीस एक ल-

ह्मनसा सुंदर तंबू ठोकिला होता व तेथें कांहीं फळफळावळ व मेवामिठाईची तजवीज केली होती. कांहीं वेळ सहल करून मंडळी तेथें गेली व ताजीतवानी होऊन पुनः बाहेर पडली व पार्श्वभागीं एक क्रीडाकानन होतें तेथें गेली. या काननांत मोठमोठे वृक्ष होते व एक लहान जलप्रवाह होता. या दिवशीं हवा फार स्वच्छ, थंडी कमी व उष्णता जास्त होती. इतस्ततः परिक्रमणानें अंगांत उष्णता वाढली होती व घर्मस्राव सुरू झाला होता; ह्मणून जलप्रवाहाच्या दर्शनानें कांहीं जनांस सुभग सलिलावगाहाची इच्छा झाली. ज्यांची स्नान करण्याची मनीषा तेवढ्यांसच तेथें सोडून बाकीची मंडळी दुसरीकडे वळली. तेथें मजा पहाण्यास कां उभी राहिली नाहींत याचें कारण इतकेंच कीं, त्या लोकांत नग्न होऊन जलावगाह करण्याचा प्रचार आहे. तेव्हां ज्यांस स्नान करणें नसेल त्यांनीं जवळ उभें न रहातां दूर जावें हाच शिष्टसंप्रदाय. गृहाजवळ हरिततृणावृत विस्तीर्ण प्रांगणें आहेत; रमणीय उद्यानभूमिका आहेत व त्यांत पुष्पलता व फलवृक्षांचा संग्रह आहे. द्राक्षें, अंजीर, चेरी, स्ट्राबरी वगैरे सर्व मधुर फळांच्या वृक्षांची येथें उत्तम व्यवस्था होती. अश्वशाळेंत चांगले चांगले घोडे होते. या सर्वांचें अवलोकन करून मंडळी परत आली व उपहारासाठीं एका दालनांत जमली. उपहारानंतर कांहीं वेळ विश्रांति घेतली. या अवकाशांत कांहीं लोक गंजिफा खेळत असले, कांहींनीं बिलियर्ड सुरू केले, कांहीं लोळत पडले, व कांहींनीं गप्पाष्टक आरंभिलें. कांहीं काळ असा घालविल्यानंतर आह्मी सर्वजण शेजारींच रॉथ्सचाइल्ड नामक प्रसिद्ध घराण्यांतील एका गृहस्थाचा बंगला होता तो पहाण्यास गेलों. हा बंगला यासमयीं रिकामा होता म्हणून स्वच्छंदानें सर्वांस सर्व दालनें पहाण्यास सांपडलीं. हें केवळ नांवाचें वनगृह होतें. परंतु त्याचा आकार, त्याची रचना, त्याचें सौंदर्य, त्यांत दृग्गोचर होत असलेलें नक्षीचें काम, आभ्यंतर कक्षांतील सोनेरी मुलाम्याची रेलचेल, संग्रहीं असलेलें उंची व निवडक सामान, सुखोपभोगाचीं सर्व प्रकारचीं साधनें, इत्यादि सर्व गोष्टींचा विचार केला ह्मणजे हें वनगृह न-

सून एक राजप्रासादच आहे असें ह्मणावें लागतें. रॉथ्स-चाइल्ड या घराण्याची संपत्ति कुबेरासारखी आहे. तेव्हां त्यांस कोणतेंच अशक्य नाहीं. परंतु या व्यवस्थेवरून एवढें स्पष्ट होतें कीं या घराण्यांतील पुरुषांस उपभोगक्षमता व उपभोगस्पृहा आहे. प्रासादाच्या पिछाडीस विस्तीर्ण भूमिका आहेत. त्यांत स्थलीं स्थलीं कुंज व लतागृहें आहेत. सर्व ठिकाणीं विद्युत्प्र-काशाची योजना आहे. जलोद्धारयंत्रावरही विद्युद्दीप आहेत. उपवनाची व्यवस्था सुंदर आहे हें सांगणें नकोच. अशा स्थलीं आह्मी एक दोन तास मोठ्या मौजेंत घालविले यांत काय नवल ? चमत्कार, कौतुक, आनंद, व आश्चर्य यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही वृत्तीचा अनुभव त्या कालांत आला नाहीं. हें वनगृह पाहून आह्मी परतलों व सायंकालीं फ्रावरसाहेबांची रजा घेऊन अनुभूत आल्हादाचें मनन करीत करीत लंडनांत दाखल झालों.

तारीख २१ जून–हा दिवस आंग्लराष्ट्राच्या इतिहासांत सोनेरी अक्षरांनीं लिहिण्यासारखा आहे. या दिवशीं मलिकामाआझमा यांत राज्यारूढ झाल्यास पंचाशत् वर्षें पुरीं झालीं. आंग्लरा-ज्यव्यवस्था जरी त्रिपाद् आहे, व त्या तीन पादांपैकीं राज-रूपपाद् जरी कार्यभारनिर्वाहास फारसा समर्थ नाहीं, तरी प्रजाजनांमध्यें राजनिष्ठा, भक्ति व प्रेम अतुल व अवर्णनीय आहेत, व वस्तुतकालीं राजपदावर विराजमान होत असले-ल्या महाराज्ञीविषयीं त्यांच्या हृदयांत केवळ मातृवात्सल्य वसत आहे. अशी प्रजाजनांची मनोवृत्ति होण्यास राणीसा-हेबांचे गुण कारण आहेत. त्यांचा सदाचार, त्यांचें सर्वस-मवर्तन, त्यांचा दयाशील स्वभाव, त्यांची प्रजाजनाविषयीं आस्था, कळकळ व योगक्षेमचिंता, यांच्या योगानें त्यांस जन-पदांच्या हृदयांत अचलस्थान मिळालें आहे. अशा राज्ञीचा अंमल पन्नास वर्षें अव्याहत चालला, व त्या कालांत आंग्ल-राष्ट्र जगांतील राष्ट्रांच्या मालिकेंत उच्चपदास पावलें. संप-त्तीची वृद्धि झाली, सामन्तचक्र वाढून वाणिज्याचा विस्तार झाला, सर्व प्रकारच्या विद्या व कला यांचा उत्कर्ष झाला, नवीन शोध लागले, व प्राचीन शोधांची मीमांसा होऊन

त्यांच्या सत्यासत्यतेचा निर्णय झाला. याप्रमाणें हें अर्धशतक सुखसंपत्ति व आनंद यांच्या उपभोगांत गेलें. तेव्हां त्या अर्धशतकाच्या समाप्तीच्या उत्सवाची संभावना आंग्ल प्रजेसारख्या राजनिष्ठ प्रजेकडून विलक्षण रीतीनें व अननुभूतपूर्व अशा गौरवानें व आडंबरानें व्हावी यांत काय आश्चर्य? आपल्या हिंदुस्थान देशांत हा महोत्सव या दिवसापूर्वीच झाला होता हें सर्वांस विदित आहेच, व एतद्देशीय प्रजेनें तो प्रसंग कसा साजरा केला याबद्दलची हकीकत सर्वांस अवगत आहे; परंतु आंग्ल राजधानीमध्यें कसा थाट उडाला याची माहिती आंग्लभाषाभिज्ञांखेरीज इतरांस मिळण्याचा संभव नाहीं हें लक्षांत आणून तद्विषयक विस्तृत लेख लिहिण्याचा विचार आहे. आमच्या यात्राप्रसंगाचा हेतु या मंगलसमयीं महाराज्ञीचें अभिनंदन करणें हा होता, व इतर सर्व गोष्टी केवळ आनुषंगिक होत्या, ह्मणून या प्रधान विषयास अनुरूप असें स्थान या प्रवासवृत्तांत मिळालें पाहिजे हें उचित आहे. आतां हें खरें आहे कीं, अशा पर्वणीचें वर्णन मजसारख्या लेखनकलेंत अलब्धकौशल्य अशा मनुष्यास सुदुष्कर आहे. माझी स्थिति महाकवि कालिदासांनीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें

'क्व सूर्यप्रभवो वंशः क्व चाल्पविषया मतिः'

अशी आहे; परंतु अंगीकृत कार्याचा यथामति निर्वाह कर्तव्य जाणून अधिक प्रस्तावना न करितां उद्दिष्ट लेखास आरंभ करितों.

जुबिलीचा समारंभ आंग्ल लोकांस फार अपूर्व होता. तन्निमित्त तयारी बहुतकालापासून चालली होती. देशोदेशीचे लोक लंडनशहरांत येऊन दाखल होत होते. आपल्या हिंदुस्थानांतून श्रीमंत होळकर, कच्छचे राव, मार्वी, गोंडल व लिंबडीचे ठाकूर, जोधपूरचे सर प्रतापसिंग, कुचबहारचे महाराज, हैद्राबादच्या निजामाच्या वतीनें सर आस्मानजाह व दुसरे अमीरउमराव, भरतपूरच्या महाराजांच्या वतीनें कर्नल गंगाबक्ष व दुसरे कांहीं अधिकारी, गायकवाडांच्या तर्फें रावसाहेब संपतराव व धामणस्कर, ही महाराज्ञीच्या सामंतचक्रांतील मंडळी एकामागून एक येत होती. सांडविच द्वीपासारख्या दूर

प्रदेशांतून हवाई मुलुखाची राणी आपल्या एका आप्त स्त्रीजना-समावेत तेथें विराजमान झाली होती. अमेरिकेंतूनही पुष्कळ लोक आले होते. दूरदेशीयमंडळी या प्रसंगाची सवड साधून इतर कांहीं देशांत प्रवास करावा व इंग्लंड देशांतही दीर्घवास करितां यावा म्हणून समारंभाच्या अगोदर पुष्कळ दिवस लंडनशहरांत मुक्काम करून राहिली होती. राणीसाहेबांच्या आप्तवर्गांतील युरोपियन राजपुत्र व राजकन्या आपल्या लवाजम्यासह जुबिलीच्यापूर्वीं थोडेच दिवस राजपत्तनांत झळकूं लागल्या. इंग्लंडांतील भिन्नभिन्न प्रांतांतील प्रजेच्या वतीनें प्रतिनिधि मानपत्रें घेऊन हजर झाले. इतर आंग्ल व परदेशस्थ सुखवस्तु लोक समारंभाचा थाट अवलोकन करण्यासाठीं पथिकाश्रमांत वास करून राहिले. अगोदरच शहराची लोकसंख्या असंख्य, व तशांत या प्रसंगीं तर तीस पूरच आला होता. सर्व प्रतींचे पथिकाश्रम भरून गेले. कांहीं लोक आपलीं खासगी घरें भाड्यानें देऊन उपनगरांत चालते झाले. सर्व प्रकारच्या वणिग्जनांची द्रव्यप्राप्ति वाढली. हिंदुस्थानासारख्या सुवर्णभूमीकडून सामन्तौघ तेथें लोटला, तेव्हां महार्घ अशा वस्तुजातांच्या क्रय होईल अशा आशेनें कांहींचें चित्त वेधून गेलें, व त्यांचे गुमास्ते त्या सर्वांच्या घरीं घिरट्या घालूं लागले. कांहींनी पत्रद्वारा याञ्चा करण्याचा उपक्रम केला. घरांचें भाडें वाढलें, मालाची किंमत चढली, गाड्या महाग झाल्या, घोड्यांस दर आला, अशा प्रकारें सर्वच स्थिति बदलून गेली.

अभ्यागतांची सर्व व्यवस्था कशी लागली होती याबद्दल दोन शब्द लिहिणें अवश्य वाटतें. आपल्या येथें पाहुणा आला म्हणजे त्याची सर्व बरदास्त आपण ठेविली पाहिजे हा शिष्टाचार जगांतील सर्व देशांत आढळून येईल, व इंग्लंड देशांत त्याचा अभाव आहे असें नाहीं. साधारणपणें त्याचें अवलंबन सर्व प्रकारचे लोक करितात असें दिसण्यांत येतें, परंतु हिंदुस्थानांतून गेलेल्या अभ्यागतांसंबंधानें तो आचार अमलांत आलेला दिसला नाहीं. यूरोपियन राजपुत्र व राजकन्या यांची व्यवस्था राजवाड्यांमधून लागली. हवाईची राणी अलेक्झांड्रा पथिकाश्रमांत उतरली होती, तिचाही सर्व कच्चा खर्च सर-

कारांतून होत होता व तिच्या तैनातीस दोनचार शिपायांचा पहारा होता. परंतु आमच्या मंडळीची तजवीज ज्यांची त्यांनींच लाविली. मात्र असें ऐकण्यांत आलें होतें कीं, होळकरसरकारांचा पथिकाश्रमांतील खर्च सरकारतिजोरींतून देण्यांत आला होता. असें असेल, परंतु त्यांच्या तैनातीला पहारा वगैरे कांहीं नव्हता. ज्या दिवशीं आपले राजेरजवाडे लंडनशहरांत दाखल होत, त्या दिवशीं सरकारतर्फे इंडिया ऑफिसांतील पोलिटिकल ए. डि. कॅ. त्यांचें स्वागत करण्यास हजर असत व ते तेथें असत तोंपर्यंत अधिकारिजनांच्या त्यांच्या भेटी करविण्याची व त्यांस कांहीं सरकारी संस्था पहाण्याची इच्छा असल्यास त्या दाखविण्याची तजवीज होत असे. परंतु यापलीकडे कोणत्याही प्रकारची बरदास्त ठेवण्यांत येत नसे. त्यांच्या रहाण्यासवरण्याची, जेवणाखाणाची, हिंडण्याफिरण्याची, नौकरचाकरांची सर्व तजवीज ज्यांची त्यांनींच करून घेतली. प्रत्येकाबरोबर एक एक पोलिटिकल आंग्ल अधिकारी होताच. तो सर्व प्रकारची संस्थानिकांच्या खर्चानें व्यवस्था लावी. आतां हें खरें कीं या सर्व अभ्यागतजनांची मनःपूर्वक अशीच इच्छा होती कीं, त्यांच्या संबंधानें कोणत्याही प्रकारचें ओझें आंग्लराष्ट्रावर पडूं नये, व सरकारानें ज्या पद्धतीचें अवलंबन केलें तिच्यापासून त्यांस खेद न होतां उलटें समाधानच वाटलें; परंतु मजसारख्या तिऱ्हाईत मनुष्यास ही गोष्ट मोठी चमत्कारिक वाटली. सार्वभौमसत्तेचा अधिकार, विपुल संपत्ति, शिष्टसंप्रदायनैपुण्याविषयीं कीर्ति, भारतवर्षीय सामंतचक्राविषयीं विश्रुत प्रेमबुद्धि, प्रसंगाचा महिमा, या सर्व गोष्टींचा विचार केला असतां असें ह्मणणें भाग येते कीं, सरकारचें वर्तन केवळ संकुचित मनोवृत्तीचें द्योतक होतें. हिंदुस्थानांतून समारंभाकरितां कांहीं शंपन्नास संस्थानिक गेले होते असें नाहीं. दहापांचांची सर्व सोय लावणें सरकारास अनुकूल नव्हतें असें नाहीं. बरें तसें नाहीं तर नाहीं, संस्थानिकांच्या खर्चानें कां होईना, परंतु सरकारानें त्यांच्या खाण्यासवरण्याची, नौकरचाकरांची, गाड्याघोड्यांची व तैनातीची व्यवस्था ठेवणें अवश्य होतें. असें केल्यानें अभ्यागतजनांचें मन संतुष्ट

झालें असतें, त्यांस सार्वभौम पादशाहतीविषयीं अधिक आस्था व प्रेम वाटलें असतें, व परस्परसंबंध जास्त समाधानकारक झाला असता. माझ्या मतें ही एक मोठी चूक झाली. प्रसंग असा होता कीं, या वेळेस होईल त्या प्रकारानें या लोकांची उत्तम व्यवस्था ठेवून त्यांचीं मनें ओढून घेतां आलीं असतीं. त्यांच्या मानमरातबाप्रमाणें व दर्ज्याप्रमाणें त्यांची बरदास्त ठेविली असती तर त्यांस आंग्लदेशाची संपत्ति, आंग्ललोकांचे शिष्टाचार, त्यांचें आतिथ्य, यांचा पूर्ण अनुभव मिळून त्यांच्या मनांत तद्राज्यविषयक पूज्यबुद्धि दृढ झाली असती. असो.

अशा उत्सवाच्या प्रसंगीं जनमनोविनोदाचे सर्व प्रकार अविरत चालले होते. सर्व नाटकगृहांत गायन, नृत्य व नाट्य यांचे प्रयोग सुरू होते. इंद्रजाल व हस्तकौशल्य यांसंबंधीं क्रियांचें निरूपण कांहीं स्थलीं चाललें होतें. कांहीं ठिकाणीं घोड्यांच्या शर्यती व घोड्यांवरची कसरत होती. कुठें चित्रांचें प्रदर्शन, कुठें पुत्तलिकांचें, कुठें कुत्र्यांचें, मांजरांचें व पक्ष्यांचें, कुठें पुष्पांचें व फलांचें, अशीं नानातऱ्हेचीं प्रदर्शनें प्रेक्षकजनांस आकर्षित होतीं. सर्व प्रकारचीं संग्रहालयें खुलीं असून विशेषतः वैदेशिक जनांस विचित्र वस्तुजाताच्या योगानें विस्मयाविष्ट करीत होतीं. शिवाय राजवाड्यामध्यें व अमीरउमराव, शेटसावकार यांच्या घरोघर नाच, ज्ञियाफती, मेजवान्या यांची गर्दी चालली होती.

अशा तऱ्हेची सर्व व्यवस्था होती. परंतु या अवाढव्य शहरांतील कृष्णवर्ण व उग्र भवनसमूहास बाह्यपरिष्कृतीच्या योगानें उज्ज्वल करण्याचा यत्न कुठेंच दृग्गोचर झाला नाहीं. आपल्या प्रदेशांत वार्षिक दिवाळीच्या सणानिमित्त देखील लोक घरांस रंग लावतात व विशेष उत्सवाच्या प्रसंगीं तर अधिकच थाट करण्यांत येतो; परंतु लंडनशहरांत असा प्रकार बिलकुल आढळण्यांत आला नाहीं. अशा अपूर्व महोत्सवाच्या प्रसंगीं ध्वजसमूहाव्यतिरिक्त प्रशस्त रस्त्यांमधील भवनराजींस दुसऱ्या प्रसाधनविधीचा संस्कार न व्हावा हें मला फार चमत्कारिक वाटलें; परंतु तेथील हवामानाचा विचार केला असतां हा प्रकार फारसा विस्मयकारक नाहीं. वृष्टि व भूमिका

यांचा अनियमितपणा व अविरत धूम्रप्रवाहाच्या योगानें येत असलेलें मालिन्य हीं लक्षांत आणिलीं ह्मणजे तन्नगरस्थ जन आपलीं गृहें उज्ज्वल करण्याचा यत्न करीत नाहींत, याचें फारसें नवल वाटत नाहीं. कारण सयुक्तिक खरें, परंतु माझ्या-सारख्याच्या दृष्टीस त्यापासून समाधान झालें नाहीं. दीपो-त्सवासाठीं जिकडेतिकडे तयारी चालली होती, परंतु अशा रुक्ष, उग्र व कृष्णवर्ण भवनराजींमध्यें दीपसमूहाचें तेज चां-गलें कसें वठावें ? असो.

अशा प्रकारची सर्व स्थिति असतां उत्सवाचा दिवस प्राप्त झाला. ज्या दिवसासाठीं दूरदेशस्थ जन लंडनपत्तनांत दाखल झाले होते, ज्या दिनानिमित्त सिद्धता करण्यासाठीं अविरत श्रम घेण्यांत येत होते, ज्या दिवसाकडे सोत्कंठ राजनिष्ठ प्रजाजनांचे नयन लागले होते, तो तारीख २१ जूनचा दिवस येऊन पोंचला. प्रभातसमय होण्यापूर्वींच सर्व शहरांत कोला-हल सुरू झाला. प्रातर्विधि उरकून महोत्सवाची संभावना करण्यास लोक सज्ज झाले. पुरुषजन आपला उत्तम वेष परिधान करून स्त्रीजनाची प्रतीक्षा करीत उभे राहिले. युव-तींनीं आपले केशकलाप भिन्नभिन्न प्रकारांनीं बांधले. पुर-न्ध्रींनीं आपली साधी चट्टीपट्टी आटपली. वृद्ध स्त्रियांनींही कार्यभाग कसाबसा उरकला. शरीरप्रसाधनाचे सर्व प्रकार युवतीजनांनीं योजिले. चित्रविचित्र शिरोवेष, महामूल्य अशीं वस्त्राभरणें यांचें परिधान करून श्रीमंत लोकांच्या ललना सिद्ध झाल्या. गरीब स्थितींतल्या स्त्रियांनींही आपआपल्या स्थि-त्यनुरूप तयारी केली. बालजनांची तर धांदल अवर्णनीय होती. शैशवस्वभवानुरूप औत्सुक्यवश होऊन मातृजनांनीं त्वरा करण्याविषयीं कांहींनीं आग्रह धरला. कांहीं सिद्ध हो-ऊन प्रतीक्षमाण अशीं उभीं राहिलीं व त्यांनीं आगामी उत्स-वाबद्दल असंबद्ध अशा कल्पनातरंगाचा वाग्रूपानें प्रवाह सुरू केला. याप्रमाणें श्रीमंतापासून गरीबापर्यंत सर्व प्रतीचे पुरुष व स्त्रिया व स्तनंधयापासून स्वतंत्रपणें फिरणाऱ्या मुलांपर्यंत सर्व बालकगण घरांतून निघून उत्सवस्थानाकडे प्रभातसमया-पासून लोटूं लागले.

या महोत्सवाच्या दिवशीं मुख्य विधि वेस्टमिन्स्टर आबे नामक प्रार्थनालयांत जाऊन प्रार्थना करण्याचा होता, व हा विधि फारच बहारीचा व प्रेक्षणीय असा झाला. अशासमयीं ईश्वरस्तवनास प्रधान स्थल मिळालें हें मला फार योग्य वाटलें. वेस्टमिन्स्टर आबे हें प्रार्थनालय फार प्राचीन आहे. याची प्रथम स्थापना एडवर्ड-धी-कन्फेसर या राजानें केली. येथें राजघराण्यांतील प्रेतें पुरण्यासाठीं भूगर्भगत शाला आहेत व प्रसिद्ध पुरुषांचीं स्मारकें आहेत. आंग्लराष्ट्राचें हें स्थान केवळ कीर्तिमंदिरच आहे, असें मानण्यांत येतें, व हें सयुक्तिक आहे; कारण कीं ज्यांनीं आपल्या यशानें सर्व दिगन्त व्यतिकरित केले आहेत अशा महापुरुषांस या स्थलीं और्ध्वदेहिक संस्कारासारखा दुसरा सन्मान गणला जात नाहीं. हें मंदिर लाटिन-क्रासाच्या आकृतीचें आहे. लांबी ५१३ फूट आहे. मध्यभागाची रुंदी २०० फूट आहे व अग्रभागाची आणि पश्चाद्भागाची रुंदी ७५ फूट आहे. उंची २२५ फूट आहे. व पश्चिम भागीं दोन शृंगें आहेत, त्यांची उंची १०० फूट आहे. इमारत चिंचोळी असल्याकारणानें हीं उच्च शृंगें शोभत नाहींत. मुख्य प्रवेशद्वार पश्चिम बाजूस आहे. शिवाय उत्तरेच्या व पूर्वेच्या बाजूनेंही प्रवेशमार्ग आहेत. इमारतीच्या मध्यें जो अधिक रुंद भाग आहे, त्याच्या दक्षिण बाजूस 'पोएट्स कॉर्नर' ह्मणजे महाकविस्थान आहे. येथें आंग्लकवींचे स्मारक असे प्रस्तर-खंड भूपृष्ठावर बसविलेले आहेत. कांहीं कवींचे पुतळे आहेत व कांहींच्या उर्ध्वकाय प्रतिमा आहेत. या स्थानीं ऑलिव्हर गोल्डस्मिथ, शेक्सपियर, बर्न्स, साउदे कोलरिज, मिल्टन, स्पेन्सर, बटूलर, बेन्जॉन्सन, चॉसर, काउले, ड्रायडन वगैरे महापुरुषांचीं स्मारकें दृग्गोचर होतात. कविस्थानाला लागूनच जें दक्षिण दालन आहे, त्यांत इतिहासकार ग्रोट, नाट्यकलाविशारद डेव्हिड गॅरिक, निबंधकार ॲडिसन, कादंबरीकार थॅकरे, अर्वाचीन इतिहासकार मेकॉले वगैरे प्रसिद्ध पुरुषांच्या प्रतिमा आहेत. उत्तरेकडील दालनांत वुइलियम पिट, क्यानिंग, लॉर्ड बीकन्सफील्ड, लॉर्ड पामर्स्टन, सर जॉन मालकम, सर रॉबर्ट पील, फॉक्स वगैरे प्रसिद्ध मु-

त्सही, जानपदपक्षपाती रिचर्ड काब्डेन, गुलामांच्या व्यापाराचा शत्रु बुइल्बरफोर्स, गणितशास्त्रज्ञ सर आयझॅक न्यूटन, पदार्थविज्ञानी चार्ल्स डार्विन इत्यादि महाजनांचीं स्मारकें आहेत. या दालनाच्या पलीकडे भिन्नभिन्न कालीं भिन्नभिन्न नृपांनीं बनविलेलीं अशीं मंदिरें आहेत. त्या सर्वांमध्यें सातव्या हेन्रीनें केलेलें चापेल फार सुंदर आहे. या सर्व मंदिरांमध्येंही राजविशेष, राज्ञीविशेष व तत्संबंधीं आप्तजनांचीं स्मारकें आहेत. त्याचप्रमाणें भूगर्भगतही कांहीं स्मारकें आहेत.

अशा या प्रसिद्ध व प्राचीन मंदिरांत हा अद्वितीय समारंभ झाला हें योग्यच झालें. अभ्यागत जनांच्या सोईसाठीं तजवीज सवडीप्रमाणें करण्यांत आली होती. इमारत विस्तीर्ण नसल्या कारणानें खालीं व वर मिळून सुमारें दोन हजार आसनें तयार केलीं होतीं. महाद्वारांतून प्रवेश केल्यानंतर जें लांबट दालन लागतें, त्याच्या उत्तर बाजूस भारतवर्षीय राजेरजवाड्यांसाठीं आसनें ठेविलीं होतीं व दक्षिणबाजूस यूरोपियन संस्थानिक व इतर मानकरी लोकांसाठीं तजवीज केली होती. दक्षिणबाजूकडील आसनांवर एक अलिंदभूमिका आहे, तेथें प्रेक्षकजनांची सोय केली होती. वर निर्दिष्ट केलेल्या दालनाच्या पूर्वेच्या टोंकास दक्षिणोत्तर दोन्ही बाजूंस एकावरएक अशीं आसनें मांडलेलीं होतीं व त्यांवर एकसारखा पोषाख केलेलीं मुलें बसविलीं होतीं. या मुलांकडून कांहीं पद्यें गावयाचीं होतीं म्हणून तीं ऑर्गन यंत्राजवळच बसविलेलीं होतीं. यापुढें एक आडवें दालन लागतें, त्याच्या दक्षिणटोंकास हाउस ऑफ् लॉर्डस सभेच्या लोकांसाठीं आसनें होतीं, व उत्तरेच्या टोंकास हाउस ऑफ् कॉमन्स सभेच्या लोकांसाठीं आसनें होतीं. मध्यभागीं राजपुत्र व राजकन्या, व राणीसाहेबांच्या जवळचीं नातलग मंडळी यांसाठीं आसनें होतीं. या आसनांच्या पुढच्या बाजूस सिंहासन होतें व त्याच्यापुढें आर्चबिशप वगैरे उपाध्यायमंडळासाठीं आसनें होतीं. याप्रमाणें या मंदिरांतील व्यवस्था झाली.

याप्रमाणें या मंदिरांतील जागा संकुचित असल्यामुळें अल्पजनसमाजासच तेथें प्रवेश मिळाला हें उघड आहे. ज्यांच्या

जागा राखून ठेविलेल्या होत्या असे लोक थोडेच होते, व हे मात्र निर्दिष्ट कालापूर्वी थोडा वेळ आले. बाकी सर्व मंडळी अग्रासनें मिळण्याच्या इच्छेनें दोन दोन तीन तीन तास पूर्वी प्रार्थनालयांत दाखल झाली. प्रेक्षकांकरितां जीं आसनें होतीं त्यांच्या दोन चार अग्रपंक्ति खेरीजकरून बाकी आसनांवरून समारंभाची मौज दिसण्यासारखी नव्हती, तथापि तत्रस्थ लोक केवळ प्रवेशमात्रानेंच संतुष्ट होऊन आसनासीन झाले होते, व दृग्विषयांत जें येईल तेवढ्याचेंच अवलोकन करीत होते, व मधून मधून जेव्हां प्रसिद्ध किंवा लोकप्रिय अशा पुरुषांची संभावना तालिकाप्रहारानें अग्रपंक्तींतील लोक करीत तेव्हां कुतूहलवश होऊन ही मागील मंडळी उभी रहात व उद्दिष्ट हेतु न साधल्यामुळें प्राप्त झालेल्या खिन्नतेचें आविष्करण न करण्याच्या हेतूनें व्याजहर्ष दाखवून तालिकाप्रहार करूं लागत. याप्रमाणें निर्दिष्ट काल होईतोंपर्यंत एकसारखी मौज चालली होती. आंग्ल पुरुषजनांचा पोषाख सर्व साधारणच होता. मात्र न्यायमूर्तिमंडलांत कृत्रिम केशावरणें व धर्ममूर्तिमंडलांत आपादलंबी वसनें यामुळें एकतानतेचा भंग होत होता. स्त्रीजनांच्या वेषांत नानाप्रकार दृग्गोचर होत होते. द्रव्याचा व्यय व वेषकारांचें कर्मपाटव या योगानें जेवढें सौंदर्य, जेवढी उज्ज्वलता, जेवढें रंगवैचित्र्य येण्यासारखें होतें, तेवढें येथें दृष्टीस पडत होतें; परंतु या सर्व जनसमाजांत आपल्या भारतवर्षीय सामन्तचक्राची शोभा अप्रतिरूप होती. त्यांचे भिन्न भिन्न वेष, महामूल्याभरणमंडित त्यांचे कंठप्रदेश व वक्षःस्थळें यामुळें दृग्विषयास वैचित्र्य प्राप्त झालें होतें. असो.

याप्रमाणें प्रार्थनालयांतील प्रकार होता. आतां आपण बाहेरचा प्रकार काय होता याचें थोडें निरूपण करूं. उत्सवाच्या अगोदर बरेच दिवस कार्यक्रम ठरला होता व सर्व व्यवस्था जाहिर झाली होती. या व्यवस्थेंत असें ठरलें होतें कीं, उत्सवाच्या मुख्य दिवशीं प्रातःकालीं दहा वाजण्याच्या अमलांत वेस्ट मिनिस्टर ॲबे या प्राचीन मंदिरांत प्रार्थना व्हावी. त्या प्रसंगीं सर्व अभ्यागतजन, मंत्रिमंडल, प्रतिनिधिमंडल यांनीं विवक्षित क्रमानें मंदिरांत दाखल व्हावें, व सर्वांमागून राणी-

साहेबांनीं लवाजम्यासुद्धां गमन करावें. बकिंगहॅम महालांतून निघून हाईडपार्कच्या कोंपऱ्यावरून पिकाडिली, पेलमेल व पार्लमेंट स्ट्रीटच्या रस्त्यांमधून राणीसाहेबांची स्वारी जावयाची असें ठरलें होतें; तेव्हां या रथ्यांच्या पार्श्ववर्तिगृहामध्यें स्थल मिळविण्याची प्रेक्षकजनांची खटपट जारीनें सुरू झाली. कांहीं लोकांनीं जागा मक्त्यानें घेऊन तेथें आसनें मांडलीं व तीं आसनें भाड्यानें देऊन हजारों रुपयांची कमाई केली. कांहीं कांहीं ठिकाणीं एका आसनासाठीं २५-५० रुपयेपर्यंत देण्यांत आले होते. सर्व गृहांच्या तळापासून तों शिखरापर्यंत एक तिळमात्रही जागा रिकामी नव्हती. शिवाय ज्यास पैसे खर्च करण्याची ऐपत नव्हती व वशिला पोंचविण्यासारखी ज्यांची स्थिति नव्हती असे सहस्रावधि लोक रस्त्यांमधून जेथें अवकाश मिळाला तेथें उभे राहिले होते. मुख्य पत्तन व उपनगरें यांतील सर्व लोक दोन तीन रस्त्यांवर जमा झाल्यावर समाज असंख्य व अदृष्टपूर्व होईल यांत काय नवल ! अशा स्थितींत जनसंमर्द किती दुर्भेद्य झाला असेल हें कल्पनेवरच सोंपविलें पाहिजे; परंतु आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं, जनसमाज इतका सुव्यवस्थित होता कीं कोणत्याही प्रकारचा दंगाधोपा झाला नाहीं. येवढेंच नव्हे तर त्या समूहामध्यें स्त्रिया व मुलें असतांनाही त्यांची आबळ न होतां त्यांस उद्दिष्ट हेतु साधतां आला. अशा प्रसंगीं पोलीस अम्मलदारांची तारीफ करावी तितकी थोडीच ! परंतु राजनिष्ठ प्रजाजनांची प्रवृत्ति प्रशांत होती ह्मणून त्यांचें कार्य सुकर झालें. यासमयीं एकंदर दृग्विषय मोठ्या बहारीचा होता. पार्श्ववर्ति सजीव गृहराजींकडे नेत्रांची प्रेरणा केली ह्मणजे सानंद चमत्कृतीचा अनुभव येई. रथ्यावर्ति जनसमूहाच्या योगानें बनलेली सजीव भित्तिका पाहून जीव दडपून जाई व राज्ञीदर्शनाविषयीं सोत्कंठ अशी त्यांची मुद्रा अवलोकन करून महाराणीचें भाग्य व प्रजेची प्रेमबुद्धि याविषयीं आल्हाद व आश्चर्य वाटे. असा हा अपूर्व प्रसंग निर्विघ्नपणें शेवटास कसा जाईल याविषयीं सर्वांस अत्यंत काळजी होती; परंतु सर्वांपेक्षां राणीसाहेबांस त्या गोष्टीची विशेष चिंता होती; प्रजाजनांशीं त्यांचें प्रेमबंधन

दृढ होतेंच; परंतु हें च बंधन अशा प्रसंगीं दृढतर न होतां मात्सर्य दोषानें कलुषित झालेल्या अंतःकरणांत तद्विषयक अनुदार कल्पना उद्बुद्ध होऊन व त्या कल्पनांचा संस्कार इतर मध्यस्थ जनांवर होऊन शिथिल होईल की काय, अशी शंका त्यांस येई. यावरून त्या उदारचरितेचें विशुद्ध अंतःकरण व्यक्त होतें. या प्रसंगीं राणीसाहेबांनीं मुकुट धारण करावा अशी लोकांची इच्छा होती; परंतु साधेपणांतच विशेष गौरव आहे हा जो त्यांचा बाणा त्याचेंच त्यांनीं अवलंबन करून प्रजाजनांची निराशा केली. असो.

याप्रमाणें प्रार्थनामंदिरांतील व बाह्य प्रदेशांतील व्यवस्था होती. निर्दिष्ट समय प्राप्त झाल्याबरोबर लोकांचे नेत्र राणीसाहेबांकडे लागले. बकिंगहॅम पॅलेसमधून वेस्टमिन्स्टर येथें येण्याला अवधि जास्त लागला त्यामुळें मंदिरस्थ जन विशेष सचिन्त झाले. अखेरीस तालिकाप्रहारांचा अस्फुट ध्वनि दूर अंतरावरून कर्णपथावर आला. तेव्हां असें अनुमान झालें कीं, स्वारी मार्गस्थ असून प्रजाजनांच्या प्रेमदर्शनाचा प्रत्यय घेत आहे. असें होतां होतां स्वारी मंदिराजवळ येऊन पोंचली. मंदिराबाहेर टाळ्यांचा गजर कानठाळ्या बसविण्यासारखा जोरानें सुरू झाला. अल्प कालानें हा ध्वनि शांत झाला. महारथ महाद्वारासमोर उभा राहिला. राणीसाहेबांची स्वारी रथांतून उतरली. प्रवेश झाल्याबरोबर त्यास सर्वांनीं खडी ताजीम दिली व अधिकारिजनांनीं रिवाजाप्रमाणें मुजरे केले. सर्वांच्या अभिवादनाचा सौम्य व गंभीर अशा मुद्रेनें शिरश्चालन करून महाराज्ञींनीं सत्कार केला. पुत्रपौत्रादिक मंडळीनें नमनपूर्वक हस्तचुंबन केलें. राणीसाहेब मुलींचें, सुनांचें व दुसऱ्या जवळच्या आप्त स्त्रीवर्गाचें चुंबन घेऊन स्वस्थानासीन झाल्या. त्यांचें आसन विशेष भव्य किंवा उज्ज्वल नव्हतें. त्यांच्या आसनाजवळच प्रिन्स ऑफ वेल्स व इतर जवळची आप्तलग मंडळी यांचीं आसनें होतीं. राणीसाहेब बसल्यानंतर इतर सर्व जन बसले. मंदिरांत सर्वत्र शांतता इतकी होती कीं, कोणत्याही प्रकारचा सूक्ष्म ध्वनीही श्रुतिगोचर झाला असता. नंतर आर्चबिशप ऑफ कॅन्टरबरी यांनीं उठून प्रार्थना वाचली.

या प्रसंगीं सर्व लोक उभे राहिले होते व राणी साहेबांनीं गुडघे टेंकिले होते. प्रार्थनेचा कांहीं भाग गद्यमय व कांहीं पद्यमय होता. पद्यमय भाग वर सांगितलेल्या बालक व बालिकागणांनीं सुस्वर अशा वाद्याच्या साह्यानें गाइला. एकंदर विधि कायतो प्रार्थनेचा व तो फार चित्तवेधक, गांभीर्ययुक्त व मनोहर असा वठला. या प्रसंगीं राणीसाहेबांची मुद्रा कांहीं विलक्षण प्रकारची दिसली. परमेश्वरानें असा सुदिन दाखविला ही त्याची कृपा व या उत्सवाच्या संभावनेसंबंधीं व्यक्त झालेली प्रजाजनांची भक्ति व त्यांचें प्रेम या दोन गोष्टींविषयीं कल्पना मनांत येऊन त्यांचें हृदय द्रवलें व नेत्रांतून अश्रुप्रवाह सुरू झाला. या वेळीं त्या सुशील माउलीची मुद्रा पाहून परक्याच्याही मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली असती. असो.

प्रार्थनाविधि आटपल्यावर राणीसाहेबांनीं आल्या मार्गानें गमन केलें व मार्गस्थ प्रतीक्षमाण जनांस आपल्या दर्शनानें संतुष्ट केलें. नंतर सर्वत्र गोंधळ सुरू झाला. उशीर बराच झाला असल्यामुळें सर्वांस क्षुधेनें व्याकुल केलें होतें व त्यांस घरीं जाण्याची घाई झाली. असा असंख्य जनसमाज व्यवस्थित रीतीनें व क्रमाक्रमानें जमलेला एकदम मोडावयास लागला ह्मणजे अव्यवस्था होणें साहजिक आहे. लोकांस रस्ता मिळणें मुष्किल झालें. गाड्या सर्व एका चक्रांत लाविलेल्या होत्या तेथून निघण्यास त्यांस रीघ मिळेना. गाड्यांची वाट पहात आह्मांस दोन तास तिष्ठत रहावें लागलें. असेरीस आमची गाडी लवकर मिळण्याचा संभव दिसेना, तेव्हां एका स्नेह्याच्या गाडीमध्यें आह्मी घरीं परत गेलों.

याच दिवशीं रात्रीं बकिंगहॅम पॅलेसमध्यें सर्व अभ्यागत जनांस आमंत्रण होतें, व शहरांत दीपोत्सव होता. प्राचीन लंडन शहरांत दीपसमूह मोठा होता व तेथें प्रेक्षकांस बरीच मौज वाटली; परंतु इतर भागांमध्यें सर्वत्र सारखा उज्ज्वल प्रकाश नसल्यामुळें अव्याहत असा नेत्रोत्सव अनुभवास येत नसे. सर्व प्रजाजनांनीं आपापल्या मगदुराप्रमाणें रोशनाई करण्याचा यत्न केला होता; परंतु एकंदर दृग्विषय विस्मयकारक व अविरतआनंदप्रद असा झाला नाहीं. जुबिलिनिमित्त मुंब-

ईमध्यें जो दीपोत्सव झाला, त्याच्या तुलनेला लंडनसारख्या शहरांतील रोशनाई येऊं नये ह्मणजे आश्चर्यकारक खरें, परंतु अनुज्ज्वल अशी भवनराजि व धूम्रप्रवाहकलुषित असें वातावरण यांचा विचार केला ह्मणजे या गोष्टीचा खुलासा होण्यासारखा आहे. आतां इतकें कबूल केलें पाहिजे कीं, तेथील दिवे आपल्या इकडल्यापेक्षां उंची प्रकारचे होते. तेलानें भरलेलीं उघडीं काचपात्रें तेथें दिसण्यांत आलीं नाहींत. तेथें धुराचे दिवे पुष्कळ असून विद्युत्प्रकाशही मधून मधून झळकत होता; परंतु साधारण दीपसमूह मेणबत्त्यांचे असून त्यास चित्रविचित्र व नानावर्ण अशीं काचेचीं आवरणें होतीं. दीपोत्सवाची मौज पाहण्याकरितां असंख्य जनसमाज इतस्ततः भ्रमण करीत होता. शहरामध्यें तर इतकी गर्दी झाली होती कीं पादचारिजनांशिवाय इतरांस जाण्यास अवकाश नव्हता; परंतु अशा गर्दीमध्यें स्त्रिया निःशंकपणें दिदृक्षेचें कौतुक पुरविण्याच्या हेतूनें संचार करीत होत्या याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. अशी गर्दी रात्रींचे दोन वाजतपर्यंत होती. नंतर समाज विरल होऊं लागला, व अनुभूत आनंदाच्या स्मरणानें जिवाची करमणूक करीत व महाराज्ञीच्या जुबिलीचा समारंभ निर्विघ्नपणें शेवटास गेल्याबद्दल तिचें भाग्य व ईश्वराची दया यांचा अनुवाद करीत सर्व जन विश्रांत झाले.

याप्रमाणें उत्सवाच्या मुख्य दिवसाची हकीकत झाली. यानंतर सुमारें पंधरा दिवसपर्यंत याच निमित्तानें पुष्कळ प्रसंग झाले, परंतु त्या सर्व प्रसंगांचें वर्णन याच स्थलीं न देतां यथाक्रम देण्याचा विचार आहे.

तारीख २२ जून रोजीं सकाळीं आमच्यापैकीं कांहीं मंडळी रेडिंग येथें 'ॲग्रिकल्चरल शो' पाहण्यास गेली. येथें शेतकीसंबंधीं सर्व प्रकारच्या आयुधांचें व आनुषंगिक वस्तूंचें प्रदर्शन होतें. शिवाय गवत कापण्याचें, दुधाची मलई काढण्याचें, लोणी तयार करण्याचें वगैरे नानाप्रकारचीं फार चातुर्यदर्शक व खुबीदार अशीं यंत्रें होतीं. हें प्रदर्शन पाहून या कामांत त्या लोकांचे परिश्रम किती आहेत, याचें आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

याच दिवशीं दोन प्रहरीं हाइडपार्कमध्यें जुबिलिनिमित्त मुलांचा मेळा होता. त्या विस्तीर्ण उद्यानभूमिकांपैकीं कांहीं भाग रज्जुवलयांनीं मर्यादित केला होता व त्यामध्यें स्थलीं स्थलीं तंबू ठोकलेले होते. कांहीं संभावित पुरुष व स्त्रियांनीं सर्व तजवीज ठेवण्याचें पतकरलें होतें व त्यांच्या निरनिराळ्या तुकड्या बनविलेल्या होत्या. प्रत्येक तुकडींतील अग्रगण्य अशा स्त्रीचें नांव त्या त्या तुकडीला व तंबूला दिलें होतें. लेडी रोजबरी यांच्या देखरेखीखालीं एक तुकडी होती व त्यांचें काम ज्या तंबूंत चाललें होतें तो तंबूही त्यांच्याच नांवानें ओळखला जात होता. याप्रमाणें इतर तुकड्यांचीही व्यवस्था होती. दोन प्रहर दिवस होण्यापूर्वींच मुलें जमा होऊं लागलीं होतीं. सर्वांचे पोषाक स्वच्छ व नीटनेटके होते. गरीब लोकांच्या अगदीं लहान मुलांबरोबर त्यांचीं मातापितरें किंवा इतर वडील आप्त माणसें होतीं. श्रीमंत लोकांच्या मुलांबरोबर नोकर चाकर होते. मुलांच्या करमणुकीसाठीं नानाप्रकारचे खेळ सुरू होते. गारोड्यांचा खेळ, बाहुल्यांचा तमाशा, बॅन्ड, विमान वगैरे सर्व प्रकार स्थलीं स्थलीं अव्याहत चालले होते. मुलांच्या खाण्यापिण्याचीही व्यवस्था केली होती. तो सर्व दृग्विषय आल्हादजनक व संतोषकारक होता. सर्व मुलें आनंदांत होतीं व त्यांच्या संसर्गानें प्रेक्षकजनांसही त्याच प्रकारची स्फूर्ति झाल्यावांचून राहिली नाहीं. सुमारें ३ पासून ४ वाजण्याच्या दरम्यान सर्व मुलांस तंबूमध्यें बोलावून प्रत्येकास एक एक राणीच्या मुखवट्याचें चकाकणारें असें पदक, एक चिनी मातीचें पात्र व मिठाईची पुडी अशा जिनसा देण्यांत आल्या. बालस्वभावानुरूप सौजन्य व कुतूहल यांच्या योगानें त्या सर्व मुलांस या अल्पमूल्य वस्तूंची मोठीच मौज वाटली. एकमेकांच्या वस्तूंची तुलना करण्यांत, वडील माणसांस त्या दाखविण्यांत व पुनः पुनः निरीक्षण करण्यांत सर्व शिशुगण कसा व्यग्र होऊन गेला होता. या प्रसंगीं त्यांची मुद्रा विलक्षण तऱ्हेची असून प्रेक्षणीय होती.

हा समारंभ पहाण्याकरितां राणीसाहेबांची स्वारी यावयाची होती, ह्मणून पांच वाजल्यापासून जिकडे तिकडे धामधूम

सुरू झाली. अमुक मार्गानें राज्ञी येणार याविषयीं कोणासही खात्रीलायक माहिती नसल्यामुळें जेथें दहा लोक जमले तेथें जास्त लोक जमा होऊं लागले. कांहीं वेळ एका भागांत उभें राहून नंतर दुसरीकडे जास्त चळवळ दिसल्यानें तिकडे जनसमाज लोटे. पुढल्या दोन तीन रांगांपर्यंत माणसांची गर्दी झाली म्हणजे मागची मंडळी अस्वस्थ होत. मग कांहीं झाडावर चढत. कांहीं खुर्च्यांवर उभे रहात. कोणत्याही रीतीनें राज्ञीचें दर्शन व्हावें अशी सर्वांची मनापासून इच्छा होती. बायका व मुलें हीं देखील बेलाशक पुरुषांमध्यें घुसून आपापल्याला जागा करून घेत. मी एका स्थलीं उभा राहिलों होतों. परंतु कांहीं बाया धक्काबुक्की करून माझ्यापुढें जाऊन उभ्या राहिल्या, तेव्हां मी मागें सरलों. हें पाहून जवळ एक गृहस्थ उभा होता त्यास वाईट वाटलें. त्यानें मी परकी आहें असें जाणून व राज्ञीदर्शनाविषयीं माझी उत्सुकता लक्षांत आणून आपली जागा मला दिली. पुष्कळ वेळ वाट पाहिल्यानंतर स्वारी उद्यानांत दाखल झाली. बरोबर लवाजमा मोठा नव्हता. चार घोड्यांच्या गाडींत राज्ञीसाहेब, प्रिन्स ऑफ वेल्स व आणखी दोघेजण होते. गाडीच्यापुढें हिंदुस्थानांतून जुबिलीसाठीं मुद्दाम गेलेले मुसलमान, गुरखे, शीख, परदेशी वगैरे रिसाल्याचे अधिकारी चालले होते. ही व्यवस्था राज्ञीसाहेबांचें हिंदुस्थानी लोकांवर प्रेम किती आहे याची व्यंजक होती असे पुष्कळ लोकांच्या तोंडचे उद्गार ऐकूं आले. हे सर्व स्वार मोठे ऐटबाज, धिप्पाड व सुरेख होते. ज्या भागांत हा मुलांचा मेळा भरला होता त्या भागाभोंवतीं राणीसाहेबांची गाडी गेली. सर्व लोकांनीं व मुलांनीं टाळिकाप्रहार करून आनंदघोष केला व राणीसाहेबांनीं मोठ्या सौम्य मुद्रेनें व हंसून शिरश्चालन करून त्यांस प्रत्युत्तर दिलें. स्वारी निघून गेल्यावर जिकडे तिकडे अव्यवस्था सुरू झाली व सर्व लोक स्वस्थानीं जाण्यास उद्युक्त झाले. मी उभा राहिलों होतों तेथें जवळच एक पोलीसचा शिपाई होता. तो पूर्वी हिंदुस्थानांत असल्यामुळें माझ्याशीं संभाषण करण्याची त्याची प्रवृत्ति सहजच झाली. जुबिली समारंभाव-

द्दल माझें मत त्यानें विचारिलें. एकंदर गम्मत हिंदुस्थानापेक्षां कमी असें मीं ह्मटलें तें त्यास संमत झालें. रावळपिंडी येथें काबुलच्या अमीरासाठीं जो दरबार झाला होता तो त्यानें पाहिला होता व त्या प्रसंगाच्या थाटाच्या मानानें लंडन शहरांतील जुबिलीचा समारंभ कांहींच नाहीं असें त्याचें मत होतें.

तारीख २३ रोजीं सकाळीं ऑल्डरशॉट येथें जुबिलीनिमित्त सैन्यनिरीक्षणाचा विधि झाला. याच दिवशीं लॉर्ड नार्थब्रुक साहेबांस मी भेटावयास गेलों होतों. आमच्या बरोबरच्या साहेबांजवळ बोलतांना लॉर्ड साहेबांनीं मीं त्यांस भेटावें अशी इच्छा प्रदर्शित केल्यावरून मी मुद्दाम गेलों. साहेब मह्रूम व त्यांची कन्या यांनीं माझें स्वागत चांगल्या प्रकारें केलें. त्याच वेळेस दुसरेही कांहीं लोक तेथें आले होते. त्यांमध्यें हिंदुस्थानी रिसाल्यापैकीं तेथें गेलेले कामगार हेही होते. लॉर्डसाहेब व त्यांची मुलगी हिंदुस्थानांत असतांना या कामदारांपैकीं कांहीं त्यांच्या तैनातीस होते. त्यांच्या भेटीनें लॉर्डसाहेबांस व त्यांच्या कन्येस फार आनंद झाला. त्या सर्वांचें स्वागत त्यांनीं फारच मनापासून केलें. लॉर्डसाहेबांचें घर हाईडपार्कच्या कोंपऱ्यावरच मोठ्या रस्त्यावर व चांगल्या वस्तींत आहे. आह्मी जेथें बसलों होतों तो दिवाणखाना फार मोठा नसून त्यांत तसविरी पुष्कळ होत्या. तेथें एका गृहस्थाशीं माझें संभाषण झालें त्यांत असें समजलें कीं, लॉर्डसाहेबांस चित्रकलेचा मोठा शोक आहे व त्यांच्या संग्रहीं अति मूल्यवान् व दुर्मिळ अशीं चित्रें आहेत. नेहेमींच्या रिवाजाप्रमाणें कांहीं वेळ गोष्टींत गेल्यावर मीं निरोप घेत होतों इतक्यांत उपहाराच्या तयारीची सूचना नोकरानें केली; तेव्हां उपहारासाठीं राहण्यास माझी हरकत आहे काय ह्मणून लॉर्डसाहेबांनीं प्रश्न केला. मीं नको म्हणून म्हटलें तेव्हां त्यांनीं विशेष आग्रहही केला नाहीं व मी घरीं परत आलों. झालेला वृत्तांत आमच्या बरोबरच्या साहेबांस सांगितला, तेव्हां त्यांनीं मीं ' नको ' कां ह्मटलें म्हणून प्रश्न केला. मीं उत्तर दिलें कीं मला पूर्वीं आमंत्रण केलेलें असून केवळ ' देखल्या दंडवत ' असा प्रकार झाला; तेव्हां

अशा आमंत्रणाचा स्वीकार करणें शिष्ट संप्रदायास विरुद्ध असें मला वाटल्यावरून मीं नकार केला. त्यावर त्यांनीं जबाब असा दिला कीं, लॉर्डसाहेबांनीं मला एक वाजतां भेटण्यास बोलाविलें याचा अर्थच हा कीं, त्यांनीं फराळास रहा ह्मणून ह्मणावें व मीं त्यांचें ह्मणणें कबूल करावें, व मीं नकार केला हेंच शिष्ट संप्रदायास विरुद्ध झालें; ही विचारसरणी मला संमत झाली नाहीं, परंतु देशपरत्वें आचारांचें भिन्नत्व असणें साहजिक समजून मीं अधिक वाद घातला नाहीं.

याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं मी ' जपानीज व्हिलेज ' पहाण्यास गेलों. हें काय आहे हें पाहण्याची केवळ नांवावरून पुष्कळ दिवस इच्छा होती, परंतु फुरसत न मिळाल्यामुळें ती तशीच अतृप्त राहिली. येथें प्रवेश होण्यासाठीं एक शिलिंग द्यावा लागला. आंत गेलों तों असें दिसून आलें कीं, हा एक जत्रेचा किंवा बाजाराचा प्रकार असावा. दारापासून शेवटच्या टोंकापर्यंत दुकानें मांडलेलीं असून त्यांमध्यें चिनी व जपानी वस्तूंचा विचित्र संग्रह होता. तऱ्हेतऱ्हेचीं मातीचीं व लांकडीं भांडीं, पंखे, छत्र्या, कपाटें, पडदे, रेशमी व सुती विणकरीचें काम या प्रकारच्या जिनसा येथें होत्या. सर्व जिनसा विकाऊ असून त्या विकण्याकरितां प्रत्येक दुकानीं एकेक आंग्ल तरुण स्त्रीची योजना केली होती. जिनसा फारच महाग होत्या. एका बाजूस एक लहानसें नाटकगृह असून त्यांत एका जपानी नाटकाचा प्रयोग सुरू होता. हें नाटक पहाण्यास निराळा खर्च पडला. एका टोंकास कांहीं चिनी व जपानी कारागीर काम करीत बसले होते व पलीकडे एक लहानसें विश्रांतिगृह असून तेथें चिनी व जपानी स्त्रिया चहा काफी वगैरे प्रेक्षक जनांस देत होत्या. यांचा पोषाक त्यांच्या देशाचाराप्रमाणें होता एवढेंच नव्हे, तर येथें असलेलीं पानपात्रेंही तद्देशीय होतीं. चहा वगैरे त्यांच्या रीतीप्रमाणें बनविला होता, व तो अगदीं लहान अशा पेल्यांतून देत असत. या सर्व कारणांमुळें येथें मला फार मौज वाटली. याशिवाय दुसरी गम्मत येथें कांहीं नव्हती. प्रेक्षकजनांचीही गर्दी विशेष नव्हती. ही जत्रा पाहून मला एक दोन गोष्टींचें विशेष नवल वाटलें. बाजारांतील

एरव्हींचीं दुकानें आणि येथें असलेलीं दुकानें यांमध्यें कांहीं एक फरक नसून येथेंच प्रवेश होण्यास एक शिलिंग कां म्हणून पहावा ! येथें नाटक, विश्रांतिगृह वगैरे प्रकार आहेत म्हणून म्हणावें, तर त्या प्रत्येकासाठीं निराळे पैसे द्यावे लागतातच. एक शिलिंग देऊन बाजारांतील दुकानाशिवाय दुसरें कांहीं दिसलें नाहीं. ही केवळ पैसे काढण्याची युक्ति, दुसरें कांहीं नाहीं. द्रव्यार्जन कोणत्या मार्गानें करावें याविषयींचा शोध जितका इंग्लंड देशांत सुरू आहे तितका दुसऱ्या कोणत्याही देशांत नसेल हें खचित आहे. दुसऱ्या एका गोष्टीचें मला नवल वाटलें ती ही. या स्थळीं जपानी माल व जपानी कारागीर पाहून प्रथमदर्शनीं मला मोठें समाधान वाटलें. यूरोपीय देश नानातऱ्हेचा माल तयार करून प्राच्य देशांतून द्रव्याचा प्रवाह आपल्या देशाकडे अव्याहत ओढीत आहेत; तेव्हां थेट लंडन शहरांत आपल्या कारागिरीच्या योगानें जपानी लोक कांहीं द्रव्याचा अंश आपल्या देशांत नेतात ही गोष्ट मोठी अभिनंदनीय वाटली; परंतु जास्त बारकाईनें मी शोध करूं लागलों, तेव्हां असें समजण्यांत आलें कीं या संस्थेचे मालक जपानी लोक नसून आंग्ल आहेत. जपानी लोक केवळ मजूरदार आहेत, व त्यांच्या सुंदर कर्तृत्वाचा सर्व फायदा त्यांच्या पदरांत पडत नसून आंग्लचालकांच्या हातांत जात आहे. हें ऐकून प्रथम वाटलेल्या समाधानांत विरजण पडलें व आंग्ल लोकांच्या व्यवसायशालित्वाची अधिक धन्यता वाटली.

तारीख २४ रोजीं आम्ही ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे चालक सर वुइल्यम मॅकिनन यांच्या आमंत्रणावरून आल्बर्ट डॉक्स पहाण्यास गेलों. जुबिलीनिमित्त जमलेल्या हिंदुस्थानी राजेरजवाड्यांस व इतर कांहीं लोकांस या गृहस्थांनीं आमंत्रण केलें होतें. वेस्टमिन्स्टर धक्क्यावर एक लहान आगबोट त्यांनीं मुद्दाम निमन्त्रितजनांसाठीं ठेविली होती. तिच्यामध्यें बसून टेम्स नदीच्या पात्रामधून लंडन शहराची शोभा, बंदरांतील व्यापार व नौकांच्या डोलकाठ्यांचें अरण्य पहात पहात मंडळी आल्बर्ट डॉक्समध्यें दाखल झाली. या दिवशीं आकाश अभ्राच्छादित होतें. गार वारा सुटला होता

व थोडें थोडें धुकेंही पडलें होतें. अशा समयीं नदीच्या कर्द- ममय जलप्रवाहाची शोभा कांहीं विचित्र दिसली. हा दिवस विश्रांतीचा होता ह्मणून गोदीमध्यें मजूरदार वगैरे लोकांची गर्दी नव्हती. जिकडे तिकडे शांतता भासत होती. गोदीम- ध्यें एका धक्याला लागूनच ब्रिटिश इंडिया कंपनीची 'इंडि- या' नांवाची आगबोट होती. त्या आगबोटीवर उपहाराची सर्व तयारी केली होती. बारा वाजण्याचे सुमारास सर्व नि- मंत्रितमंडळी येथें जमा झाली. कच्छचे राव, लिंबडी व मो- र्वीचे ठाकूर, कुचबहारचे महाराज, मॉर्किस आफ लॉर्न, सर- लुइ पेली, येवढी ठळक मंडळी तेथें दिसण्यांत आली. यांशि- वाय हिंदुस्थान देशांत राहिलेले कामदार व स्त्रिया पुष्कळ हो- त्या. कांहीं वेळ परिचय करण्यांत व संभाषणांत गेल्यावर दोन वाजण्याच्या सुमारास सर्व मंडळी दिवाणखान्यांत उपहा- रासाठीं गेली. तेथें शंभरांवर आसनें मांडलेलीं दिसलीं. प्रत्ये- क मेजाच्या टोंकाशीं ब्रिटिश इंडिया कंपनीच्या भागीदारांपैकीं मुख्य मुख्य गृहस्थ बसले होते. मी जेथें बसलों होतों त्या मेजाशीं मार्किस ऑफ लॉर्न बसले होते. हे गृहस्थ राणीसाहे- बांचे जामात आहेत व ब्रिटिश इंडिया कंपनीच्या चालकांपैकीं एक आहेत. मॅकिनन साहेबांनीं मला यांच्याजवळ बसवि- लें होतें ह्मणून यांच्याशीं माझें बरेंच संभाषण झालें. यांचा स्वभाव साधा व मनमिळाऊ दिसला. माझ्या डाव्या अंगास एक बाई बसल्या होत्या. त्यांच्याशीं मॅकिनन साहेबांनीं मा- झा परिचय करून दिला. या बाईस माझ्याशीं बोलण्याचा बिलकुल कंटाळा नव्हता. व यांस हिंदुस्थान सोडल्यास पु- ष्कळ दिवस झाल्यामुळें यांचा दुरभिमान व ताठा बिलकुल नाहींसा झाल्यासारखा दिसला. यांचें माझें संभाषण पुष्कळ झालें, व त्यांत असें निष्पन्न झालें कीं, यांचे यजमान मुंबई इलाख्यांत एका जिल्ह्यांत कलेक्टरच्या हुद्यावर होते, व त्यां- च्या हाताखालीं माझे तीर्थरूप हेडक्लार्कच्या कामावर होते. अ- सें हें सेव्यसेवकाचें नातें लागलें तेव्हां बाईची आस्था कमी व्हावी असा माझा अजमास होता, परंतु तसें झालें नाहीं. त्यांस या गोष्टीचा विशेष चमत्कार वाटला. उपहारानंतर आ-

पल्या यजमानांस ही गोष्ट कळविण्याचें त्यांनीं कबूल केलें. हिंदुस्थानांत जो काल घालविला त्याचें स्मरण वारंवार करून बाई मोठ्या आनंदाचे उद्गार काढीत व आपल्या यजमानांच्या शरीरप्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आपल्यास जास्त दिवस हिंदुस्थानांत राहण्यास सवड झाली नाहीं याविषयीं खेद करीत. याप्रमाणें बऱ्याच शिळोप्याच्या गोष्टी झाल्या व काल मौजेंत गेला. उपहारानंतर बाईनीं कबूल केल्याप्रमाणें आपल्या यजमानांस धुंडून काढून माझ्याकडे आणिलें. या गृहस्थांनींही माझ्याशीं बरीच सलगी केली. माझ्या तीर्थरूपांसंबंधीं हकीकत विचारिली, व आपल्या बिऱ्हाडाचा पत्ता देऊन मला घरीं बोलाविलें. पुढें एकदोन वेळां मी त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों होतों तेव्हां त्यांनीं माझें स्वागत फार उत्तम रीतीनें केलें. आपल्या मुलांची व मुलींची माझी ओळख करून दिली. यांचा थोरला मुलगा सिव्हिलसर्व्हिसच्या परीक्षेंत तेव्हां नुकताच पसंत झाला होता व हल्लीं तो मुंबई इलाख्यांत आहे. त्यास सर्व प्रकारें मदत करण्याबद्दल त्यांनीं मला मुद्दाम विनंति केली. या गृहस्थांच्या एकंदर वर्तनानें मला फार समाधान झालें, परंतु देशपरत्वें यांच्या वर्तनांत इतका फरक कां झाला याचें मला नवल वाटलें. माझ्या तीर्थरूपांच्या तोंडून ऐकिलेलें मला असें स्मरतें कीं, साहेब महसूफ हे फार संशयी, हेकेखोर, तापट व निर्दय स्वभावाचे होते, व तेच गृहस्थ मला आपल्या सौजन्याचा, शांतपणाचा व तितिक्षेचा प्रत्यय देतात, तेव्हां याचा मेळ कसा जमावा! शिवाय सिव्हिलसर्व्हिसमध्यें पसंत झालेल्या त्यांच्या मुलास माझ्याकडून काय मदत होणार हें माझें मला ठाऊकच होतें व त्यांसही ठाऊक असावेंच. परंतु असें असून त्यांनीं मला इतका मोठेपणा दिला याबद्दल मला नवल वाटल्यावांचून कसें राहील? एकंदरीनें या गृहस्थांनीं माझ्याशीं जें वर्तन केलें तें केवळ समाधानकारक होतें इतकेंच नव्हे, तर आमच्या नेहमींच्या अनुभवास विरुद्ध व ह्मणूनच आश्चर्यकारक होतें.

ज्या आगबोटीवर आह्मी होतों ती आगबोट कलकत्त्याकडे नेहमीं जात येत असे, त्यामुळें तिच्यावर बंगाली नोकरचाकर

पुष्कळ होते. यांच्या दर्शनानें मला फार आनंद झाला. परदेशामध्यें कोणत्याही दर्जाचे स्वदेशीय भेटले म्हणजे किती मौज वाटते या गोष्टीचा अनुभव या वेळेस मला आला. दोन तीन महिने एकसारखे गौरवर्णांचे लोक पहाण्यांत येत असल्याकारणानें नेहमींच्या सहवासाचे कृष्णवर्ण स्वदेशीयजन भेटल्यानें बरें वाटलें.

उपहारानंतर कांहीं वेळ इकडेतिकडे फिरण्यांत घालवून आल्या मार्गानें सर्व मंडळी लंडनशहरांत परत दाखल झाली.

याच दिवशीं रात्रीं बकिंगहॅम पॅलेसमध्यें जुबिलीनिमित्त नाच झाला.

तारीख २५ रोजीं दोन प्रहरीं रिकामा वेळ होता ह्मणून मी प्राचीन लंडनशहरांत जाऊन तेथून आग्नेय टोंकाकडील कांहीं उपनगरांतून हिंडलों. प्रथम ऑम्निबसमध्यें बसून लंडनब्रिजवर उतरलों. या पुलावर लोकांची रहदारी विशेष दिसली ह्मणून मौज पहात कांहीं वेळ तेथें सहल करून नंतर टेम्स नदीच्या प्रवाहाखालून केलेल्या भूगर्भगतमार्गानें नदीच्या पलीकडे जावें असें वाटल्यावरून बिशप्सगेट स्टेशनावर दाखल झालों. तिकीट काढून खालीं उतरतों तों एक स्त्री मोठ्यानें हंसून माझ्याजवळ आली. तिच्या मुद्रेवरून ती नीच, असभ्य व दुराचारशील अशी दिसली. तिचा चेहरा राकट, लाल व मलिन होता. अशा प्रकारच्या स्त्रिया मीं पूर्वीं कधींच पाहिल्या नव्हत्या। म्हणून तिला पहातांक्षणींच मला मोठें भय वाटलें, व तिच्याकडे लक्ष न देतां मी तडक प्लॅटफॉर्मचा रस्ता धरला. ती काय ह्मणते हें ऐकण्यास उभा रहातों तर खचित तिनें माझा हात धरिला असता व कोणत्या तरी प्रकारानें कांहीं पैसे उपटण्याचा उद्योग केला असता. अशा प्रकारच्या स्त्रिया रेलवे स्टेशनासारख्या ठिकाणीं सभ्य लोकांची इज्जत घेऊं शकतात किंवा निदान त्यास पीडा तरी करूं शकतात, व त्याचा बंदोबस्त कांहीं होत नाहीं, हें मोठें विस्मयकारक आहे. असाच प्रसंग रसेलस्क्वेअर नांवाच्या शहराच्या भागाकडे जात असतां मजवर आणखी एकदां आला. या भागांत रहदारी फार नसते तेव्हां येथें असे प्रसंग फार संकटावह होतात. एके दिवशीं भर-

दोनप्रहरीं एका स्नेह्याच्या भेटीसाठीं इकडून जात असतां वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या तीन चार बाऱ्या माझ्या अंगावर धांवून आल्या. आसपास मनुष्य कोणी दिसेना. थोड्या अंतरावर एक पुरुष दिसला परंतु तो या बाऱ्यांच्याच वर्गांतला असल्याकारणानें त्याच्याकडून कांहीं मदत होईल असा संभव दिसेना; तेव्हां मी गांगरून गेलों व काय करावें हें सुचेना. तथापि स्तब्ध न राहतां मी आपला रस्ता चालूं लागलों व त्यांच्याकडे मुळीं दुर्लक्ष केल्यासारखें केलें, तेव्हां आपला लाग साधत नाहीं असें वाटून त्या मागें सरल्या. असो.

टेम्स टनेल.

'टेम्सटनेल'ची गाडी मिळण्यापूर्वी मला कांहीं वेळ स्टेशनावर उभें रहावें लागलें.तेवढ्या वेळांत आठ दहा गाड्या गेल्या. एवढ्या गाड्या गेल्या तरी मला हवी ती गाडी मिळाली नाहीं याचें मला आश्चर्य वाटलें, व माझी कांहीं तरी चूक झाली असावी असा माझा तर्क झाला; म्हणून मीं एका हमालाला विचारिलें तेव्हां त्यानें मला खूण सांगितली कीं, इंजिनच्या पुढल्या अंगास अमुक एक नांव लिहिलें असेल अशा गाडींत बसावें. त्याप्रमाणें मीं केलें. टेम्सटनेलमधून गाडी केव्हां गेली हें माझ्या लक्षांत आलें नाहीं. भूगर्भांतून जाणाऱ्या गाड्या केव्हां उजेडांतून व केव्हां अंधारांतून जातात त्याचप्रमाणें आतां झालें. त्यामुळें अमुक प्रांत टनेलचा असें समजण्यांत आलें नाहीं. नदीच्या पात्रापासून दूर अंतरावरून जमीन खोदून मग पात्राखालून रस्ता नेलेला आहे. खालीं पाणी न पाझरण्यासाठीं काय तजवीज केली आहे हें समजलें नाहीं. नदीच्या खालून जातांना अगदीं अंधकार वाटला नाहीं. मधूनमधून थोडा थोडा प्रकाश दिसत होता. तो कोठून येत होता हें समजण्यांत आलें नाहीं. नदीपलीकडे डेप्टफर्ड स्टेशनावर मी उतरलों. स्टेशनांतून बाहेर पडलों तों एक रुंद असा रस्ता लागला; त्यावरून ट्रामवेच्या गाड्या चालत होत्या. विचारपस न करितां मी गाडींत बसलों. थोड्या अंतरावर गाडी थांबली व तेथें गाडीचा रस्ताही संपला. नंतर गांवांतून तसाच पायानें चाललों. गांव स्वच्छ नसून गलिच्छ दिसला.

लोक गरीब, मळकट व असभ्य दिसले. रस्त्यावर दूर दूर अंतरावर पोलिसचे शिपाई आढळत होते. कोणता रस्ता कोठें जातो याचीही विचारपूस मीं केली नाहीं. मला असें भय वाटलें कीं, मीं असा प्रश्न केला ह्मणजे मी रस्ता चुकलों असें त्या लोकांस वाटून ते मला भलतीकडेच नेतील. त्यांच्या उग्र मुद्रेवरून त्यांचा मला विश्वास येईना. एका पोलिस शिपायाजवळ मात्र मीं चौकशी केली. त्यानें मला ग्रीनिचचा रस्ता दाखविला. त्या रस्त्यानें मी तडक चाललों. ग्रीनिचजवळ आलों तसा स्वच्छपणा अधिक दिसला. टेम्स-नदीला मिळणारी एक लहान नदी वाटेंत लागली तिच्या योगानें दृग्विषयाची रूक्षता जाऊन त्यास सौम्यता आली. कांहीं भव्य इमारती दृग्गोचर झाल्यामुळें नेत्रांस आनंद व मनास समाधान वाटलें. कांहीं कालानें अग्रभागीं उंचवस्यावर एक इमारत दिसली तिकडे मी वळलों. टेंकडीच्या पायथ्याशीं एक वृक्षवाटिका असून हरिततृणाच्छादित अशा भूमिका होत्या तेथें गांवांतील मुलें क्रीडा करीत होतीं. कांहीं झाडाखालीं आसनें ठेविलीं होतीं त्यांवर कोठें कोठें स्त्रिया व पुरुष बसलेले आढळले. येथें स्वच्छपणा व नीटनेटकेपणा फारसा नसून लोकांची गर्दीही विशेष नव्हती. शहरांतील उद्यानाप्रमाणें जरी येथें टापटीप व उज्ज्वलता दिसली नाहीं तरी येथें शांतता अधिक होती. वृक्षवाटिकेमधून जाऊन मी टेंकडीवर चढलों. तेथून दृग्विषय फार सुंदर दिसत होता. टेम्सनदीचें पात्र अंशतः दृग्गोचर होत होतें. शहरांतल्याप्रमाणें प्रवाह कलुषित नसून स्वच्छ दिसत होता व त्यावर अल्प नौका इतस्ततः भ्रमण करीत होत्या. आसमंताद्भागाचीं नगरेंही अस्फुट दिसत होतीं. येथें कांहीं वेळ विश्रांति घेण्यासाठीं उभा राहून वर निर्दिष्ट केलेल्या इमारतीकडे वळलों. जवळ गेल्यानंतर ग्रीनिच येथील प्रसिद्ध वेधशाला ती ही असें समजलें. परंतु द्वार बंद असल्यामुळें प्रवेश होईना. द्वारपालास विचारलें तेव्हां त्यानें असें सांगितलें कीं, 'ॲड्मिरल्टी' नामक कार्यगृहांतून परवानगी मिळाल्याशिवाय प्रवेश होण्याचा संभव नाहीं. इतकें लांब येऊन निराशा झाल्यामुळें मन खिन्न

झालें. सायंकाळचा समय नजीक आला होता तेव्हां घरीं परत जाण्याची घाई झाली. आल्या रस्त्यानें परत जावयाचें नाहीं व माहिती कोणाला विचारावयाची नाहीं हा तर मनाचा संकल्प. जीव अगदीं थकून गेला होता, ह्मणून प्रथम एका विश्रांतिगृहांत जाऊन बसलों. चहापाणी झाल्यावर थोडा तक्का आला तेव्हां उठून मार्ग क्रमूं लागलों. परत लंडनशहरांत घरीं पोंचण्यास आठ वाजले.

तारीख २९ रोजीं तिसऱ्या प्रहरीं बकिंगहॅम पॅलेसमध्यें जुबिलीनिमित्त उद्यानोत्सव (गार्डनपार्टी) होता. हा महाल राणीसाहेबांचें लंडनशहरांतील निवासस्थान आहे; परंतु येथें त्यांचें रहाणें फार थोडा वेळ असतें. वुइंडसर कॅसल येथें रहाणें त्यांस जास्त आवडतें. या दिवशीं या महालाचीं दालनें खुलीं नसल्यामुळें पहाण्यांत आलीं नाहींत. बाजूच्या एका लांब दालनांतून पश्चाद्भागीं असलेल्या उद्यानभूमिकामध्यें आह्मीं प्रवेश केला. या भूमिका विस्तीर्ण असून यांमध्यें कृत्रिम नदी व अरण्य आहे. नदीच्या तीरप्रांतीं अल्प नौका ठेविल्या होत्या त्यांमध्यें बसून कांहीं लोक इतस्ततः सहल करीत होते. महालाला लागूनच एक मोठें हरिततृणावृत असें प्रांगण आहे तेथें जनसमाज जमला होता. दोन टोंकांस तंबू ठोकिले होते. त्यांपैकीं कांहींमध्यें उपहारसामुग्री तयार होती व कांहीं अभ्यागतजनास विश्रांति घेण्यासाठीं आसनयुक्त केलेले होते. लोकांची गर्दी बरीच होती. मध्यम प्रतीच्या लोकांसही निमंत्रणें केलीं होतीं, व सर्व निमन्त्रितजन आपलीं इतर कामें एकीकडे ठेवून राज्ञीचें अनुशासन शिरसावंद्य मानून येथें हजर झाले होते. स्थल संकुचित नसल्यामुळें सर्वांचा समावेश सुखानें झाला. राणीसाहेबांनीं एकदां सर्वांस दर्शन दिलें त्यामुळें अभ्यागतजन कृतार्थ झाले. सर्वांनीं स्वेच्छेनें विहार व आहार केला व सायंकालचा समय होण्यापूर्वीं समाज अपसृत झाला.

घरीं येऊन भोजनोत्तर मी ' सेव्हॉय ' नाटकगृहांत गेलों, परंतु तेथील प्रयोग केवळ नृत्यगानमय असल्यामुळें मला प्रिय झाला नाहीं, ह्मणून मी घरीं येण्याकरितां परत फिरलों. रात्र फार झाली नव्हती ह्मणून हैडपार्कमध्यें कांहीं वेळ विश्रांति

घेतली. तेथें एक पोलिसचा शिपाई भेटला त्याचें माझें कांहीं वेळ संभाषण झालें. त्याच्या सांगण्यांत असें आलें कीं, प्राचीन लंडनशहर खेरीजकरून बाकीच्या भागांत एकंदर १४,००० पोलीस शिपाई आहेत. त्यांचें वेतन दर आठवड्यास २४ पासून ३० शिलिंग आहे. त्यांची रहाण्याची सोय सरकारांतून होत नाहीं. परंतु होईल तोंपर्यंत भाडें न देण्याची ते व्यवस्था करितात. ती अशी कीं, भाड्यानें द्यावयाचीं जीं रिकामीं घरें असतील तेथें रहाण्याची ते तजवीज करितात. घराचे मालक या व्यवस्थेस राजी असतात; कारण कीं यामुळें त्यांच्या घराची राखण चांगली होते. भाडोत्री मिळाला म्हणजे तें घर सोडून दुसऱ्या एखाद्या रिकाम्या घरांत जाऊन मुक्काम करितात. मला या गोष्टीचें नवल वाटलें. या शिपायांस नेहमीं ८ तासांवर काम पडत नाहीं. परंतु जास्त काम पडल्यास त्याबद्दल अलाहिदा मुशाहिरा मिळत नाहीं. त्याचा मोबदला जेव्हां कामाचा हंगाम नसेल तेव्हां काम कमी घेऊन देण्यांत येतो. या शिपायाची बायको नुकतीच वारली होती व तिच्यापासून त्यास तीन चार कच्चींबच्चीं होतीं. नोकरीवर असतां तो मुलांस शेजाऱ्याच्या स्वाधीन करीत असे. ज्युबिलीनिमित्त शिपाई लोकांस काय इनाम मिळालें ह्मणून मीं विचारिलें तेव्हां खिन्न मुद्रेनें 'कांहीं नाहीं' ह्मणून त्यानें सांगितलें. असो.

तारीख १ जुलई पासून १५ जुलईपर्यंत—तारीख ४ जुलई रोजीं सकाळीं एक मोठा प्रेक्षणीय समारंभ पहाण्यास आह्मी गेलों. हिंदुस्थान व इंग्लंड देशांच्या वसाहतींच्या फायद्यासाठीं इंपीरियल ॲन्ड कलोनियल इन्स्टिट्यूट या नांवाची एक संस्था स्थापण्याचा उद्योग प्रिन्स ऑफ वेल्स यांनीं पुष्कळ दिवसांपासून सुरू केला होता. त्यानिमित्त हिंदुस्थानी राजेरजवाड्यांकडून वर्गणी गोळा करण्यांत येत होती. या संस्थेसाठीं एक जंगी इमारत बांधावयाचा बेत होता. तिचा उपक्रम या दिवशीं महाराज्ञीच्या हातून व्हावयाचा होता. केन्सिंग्टन नांवाच्या भागांत एक विस्तीर्ण मंडप घातला होता. सुमारें अकरा हजार लोक बसण्याची सोय केली होती. मध्य-

भागीं एक उच्च पीठ बनविलें होतें; त्यावर राणीसाहेब प्रिन्स ऑफ वेल्स व कांहीं युरोपीय राजपुत्र यांस बसण्याची व्यवस्था केली होती. इराणचाही एक राजपुत्र तेथें दिसण्यांत आला; परंतु आमचे हिंदुस्थानचे सर्व राजेरजवाडे यांस तेथें स्थळ मिळालें नाहीं. उच्च पीठाच्या बाजूला इतर बड्या लोकांमध्येंच त्यांच्यासाठीं आसनें मांडलीं होतीं. या गोष्टीमुळें सर्व संस्थानिकांच्या मनांस व्यथा झाली असेल यांत संशय नाहीं. वरच्या दर्ज्याच्या संस्थानिकांस तर या व्यवस्थेमुळें फारच रोष आला. परंतु इलाज काय? सर्व सोसणें भाग होतें ह्मणून ते निमूटपणीं बसले. असो. साधारण प्रतीच्या प्रेक्षकजनासाठीं सभोंवार एकावर एक अशीं आसनें केलेलीं होतीं. सकाळचे नऊ वाजल्यापासून लोक मंडपांत दाखल होऊं लागले. व अकरा वाजतां सर्व आसनें भरून गेलीं. एकंदर समाज फार प्रेक्षणीय होता. राणीच्या आगमनाविषयीं लोकांची उत्सुकता व त्यांच्या आगमनाची संभावना विशेष लक्षांत ठेवण्यासारखी होती. प्रिन्स ऑफ् वेल्स यांनीं लहानसें भाषण केलें व त्या भाषणांत आपल्या पित्याविषयीं उल्लेख केला. त्यासमयीं सर्वांचीं मनें कळवळलीं व सर्वांच्या नेत्रांत अश्रु आले. त्यावेळची राणीसाहेबांची मुद्रा गंभीर, शांत व स्थिर होती. समारंभ आटपल्यावर राणीसाहेब वुइंडसर कॅसलकडे चालत्या झाल्या व प्रेक्षकजन घरोघर गेले.

यासमयीं लंडनशहरांत उष्मा बराच भासूं लागला होता. सुमारें महिनाभर पावसाचा थेंबही न पडल्यामुळें हवेंत उष्णता आली होती व सर्व हिरवेंगार गवत वाळून जाण्याच्या बेतांत आलें होतें. हे त्यांच्या उन्हाळ्याचे दिवस. तथापि ह्या दिवसांतही अनावृष्टि सहन होत नाहीं हें आपल्या लोकांस नवल वाटण्यासारखें आहे. आह्मी गेल्यापासून हा दिवसपर्यंत स्वेदाचा प्रादुर्भाव झाला नव्हता व या दिवशीं सुद्धां हिंदुस्थान देशांतल्या माणसांस वाटण्यासारखी गरमी नव्हती. हा अनावृष्टीचा समय आह्मांस फार सुखकर भासला.

साउथ केन्सिंगटन म्युझियम.

याच दिवशीं दोन प्रहरीं आमच्या येथील सर्व मंडळी न्यू

मार्केट येथें शर्यतीसाठीं गेली. मी मात्र मागें राहिलों. स्वतंत्रपणानें लंडनशहरांतील कांहीं वस्तुसंग्रह पहावे या हेतूनें मी राहिलों. तारीख ५ रोजीं दोन प्रहरानंतर साउथ केन्सिंगटन म्युझियम मीं पाहिलें. हें संग्रहालय हाईडपार्कच्या दक्षिणेस ब्रॉम्प्टन नांवाच्या भागांत आहे. तेथें जाण्यास ऑम्निबस किंवा भूगर्भगत आगगाडी यांची सोय आहे. सोमवार, मंगळवार व शनिवार या दिवशीं सकाळीं १० पासून रात्रीं दहा वाजेतोंपर्यंत सर्व प्रेक्षकांस येथें मुक्तद्वार असतें. इतर दिवशीं सहा पेन्स द्यावे लागतात. हप्त्याचीं, महिन्याचीं किंवा तिमाही तिकिटेंही मिळूं शकतात. इमारतीच्या मध्यभागीं एक विश्रांतिगृह आहे, तेथें स्वल्प दरानें खाद्य व पेय वस्तु मिळतात. स्त्रियांना व पुरुषांना हातपाय धुण्यासाठीं स्वतंत्र सोय आहे.

हें संग्रहालय १८५७ सालीं प्रथम सुरू करण्यांत आलें. विद्याप्रसारासाठीं लंडनशहरांत " काउन्सिल ऑफ् एज्युकेशन " नांवाची एक सभा आहे. तिच्या देखरेखीखालीं जीं भिन्न भिन्न खातीं आहेत त्यांपैकीं शास्त्र व कला यांचें एक स्वतंत्र खातें आहे व या खात्याखालीं हें संग्रहालय मोडतें. याचा वार्षिक खर्च तीन लाख पौन्ड आहे व हा सरकारी तिजोरींतून दिला जातो. १८८६ सालीं प्रेक्षकजनांची संख्या सवा आठ लाख होती, व १८५७ पासून १८८६ सालाअखेर हीच संख्या अडीच कोटींवर झाली होती. या संग्रहालयाचे पांच भाग आहेत—(१) म्युझियम ऑफ ऑर्नमेंटल ऑर ॲप्लाइड आर्ट—येथें अर्वाचीन आणि मध्ययुगीय कलांचे निदर्शक असे २०,००० नमुने आहेत; (२) न्याशनल ग्यालरी ऑफ ब्रिटिश आर्ट—येथें चित्रांचा संग्रह आहे; (३) आर्ट लायब्ररी या पुस्तकालयांत ६२,००० पुस्तकें आहेत, ११,००० नकाशे आहेत, ५२,००० कोरींव नमुने आहेत, आणि ५४,००० फोटोग्राफ आहेत; (४) स्कूल ऑफ आर्ट—येथें नकाशे काढणें, चित्रें काढणें व नमुने तयार करणें या गोष्टी शिकवितात; (५) सायन्स ॲन्ड एज्युकेशन लायब्ररी—या पुस्तकालयांत शास्त्रीय विषयांवर ६०,००० ग्रंथ आहेत.

येथील वस्तुसंग्रह फार मौल्यवान् व नानाविध आहे. कांहीं वस्तु श्रीमंत लोकांनीं संग्रहांत ठेवण्यासाठीं दिलेल्या आहेत. व कांहीं दहा लाख पौंड खर्च करून सरकारानें विकत घेतल्या आहेत. सर्व वस्तूंलगत चिठ्ठ्या ठेविल्या आहेत. या चिठ्ठ्यांवर तद्विषयक थोडीशी माहिती लिहून ठेविलेली असते. सर्व विभागांचें केवळ विहगदृष्ट्या अवलोकन करणें झालें तरी एक सगळा दिवस लागतो. परंतु असें केल्यानें श्रम फार होतात. वस्तूंच्या निरीक्षणापासून व्हावा तसा आल्हाद होत नाहीं. ह्मणून भिन्न भिन्न विभाग भिन्न भिन्न प्रसंगीं सवडीप्रमाणें पहाणें जास्त सोयीचें व सुखाचें आहे. येथें माहितीचीं पुस्तकें व फोटोग्राफ विकत मिळतात.

येथील वस्तुजाताचें सूक्ष्म निरीक्षण करण्यास मला अवकाश नव्हता. या संग्रहालयांत मी तीन चार तासच होतों. तेवढ्या वेळांत जें कांहीं नजरेस पडलें त्यांतील ठळक ठळक वस्तूंचा मात्र उल्लेख करण्याचा विचार आहे. महाद्वाराच्या डाव्या बाजूस सरजमशेटजी जीजीभाई यांचा एक पुतळा आहे. आंत गेलें ह्मणजे प्रथम आर्किटेक्चरल कोर्ट लागतें. या दालनांत प्राचीन व अर्वाचीन इमारतींचे कांहीं अस्सल अवयव व कांहीं त्यांच्या नकला यांचा समावेश केलेला आहे. नंतर पुढें पांच सहा दालनें लागतात. दक्षिण दालनांत भिंतीवरून नामांकित शिल्पकारांच्या प्रतिमा खोदलेल्या आहेत. एका भागांत हस्तिदंती व दुसरें कांहीं सुंदर व चमत्कारिक सामान आहे. हस्तिदंतावर कोरीव काम करण्याची कला मध्ययुगांत किती पूर्ण दशेस आली होती याचा प्रत्यय येथें चांगला येतो. एका दालनांत स्फटिकनिर्मित प्राच्य वस्तु आहेत. त्यांमध्यें अकरा हजार रुपये किमतीची एक दऊत आहे. इच्यामध्यें पांढऱ्या व हिरव्या रंगाचें मिश्रण असून माणिकांच्या जडावाचें काम केलेलें आहे. एका स्थलीं प्राचीन व अर्वाचीन तऱ्हेचें सर्व जवाहीर आहे. एका भागांत चिनी व जपानी वस्तूंचा संग्रह आहे. येथेंच एका कोंपऱ्यांत काचकोशामध्यें चीन देशांतील वनगृहाचे तीन नमुने आहेत व एक चिनी कंदील आहे. हा कंदील चीनच्या बाद-

शहानें नेपोलियनाची पत्नी जोजेफीन इला नजर पाठविलेला होता, व तो पुढें लढाईंत इंग्रजांच्या हस्तगत झाला. एका स्थलीं विणलेलीं वस्त्रें, कांहीं शस्त्रें, चिलखतें, भिन्न भिन्न देशांतील कांचेचें सामान, आबिसिनियामधून आणिलेलें सामान, वगैरे जिनसा आहेत. उत्तरेकडील दालनांत इटालियन पुतळे आहेत. याच दालनाच्या पश्चिम भागांत वाद्यांचा मोठा संग्रह आहे. त्यामध्यें हॅन्डेल याची मुरली व मार्टिन-लूथर याचें एक वाद्य आहे. बाकी राहिलेल्या एकदोन दालनांमध्यें लांकडी कोरलेले सामान, विणलेले पडदे, इराणी मातीचीं भांडीं, विटा, कवलें, गालिचे वगैरे आहेत. इराणच्या शहानें नजर दिलेले विणलेले कपडे येथें आहेत. येथें डमास्कस शहराच्या तऱ्हेची एक खोली आहे. येथें सर्व सामानसुमान तद्देशीय व त्या रिवाजाचें आहे, व भिंतींवर आरबी लेख आहेत. जवळच तुर्की तऱ्हेची एक खोली आहे. याप्रमाणें तळमजल्याची व्यवस्था होती.

वरच्या मजल्यावर उंची व मौल्यवान् असा तसबिरींचा संग्रह आहे. या संग्रहाचें योग्य परिशीलन करण्यास सुसंस्कृत अशी दृष्टि पाहिजे व त्याचप्रमाणें अवकाशही पाहिजे. माझ्या ठिकाणीं दोन्हीचाही अभाव, मग काय विचारावयाचें? परंतु इतकें कबूल केलें पाहिजे कीं, जें मीं पाहिलें त्याच्या योगानें मनास चमत्कार वाटला व आल्हाद झाला. एका दालनाच्या मध्यभागीं कांचेच्या आवरणांत दुसरा चार्ल्स राजा, क्रामवेल, ॲडिसन, बर्न्स, पोप वगैरे पुरुषांचे हस्तलेख आहेत, व चार्ल्स डिकन्स याच्या कित्येक प्रसिद्ध कादंबऱ्यांचे हस्तलेख आहेत. एका दालनांत फ्रेंच तऱ्हेचें सामान, भांडीं, चित्रें, तसबिरा वगैरे आहेत. या सर्व वस्तूंची किंमत २५ लाख रुपये आहे व या जॉन जोन्स नांवाच्या गृहस्थानें आपल्या मरणानंतर संग्रहालयास अर्पण केल्या होत्या. एका दालनांत मातीचीं व दगडाचीं, नक्षीचीं खुरेख पात्रें आहेत. इंग्रजी, जर्मन, इटालिअन, पर्शिअन, आरेबिअन, ऱ्होडिअन, स्पॅनिश, वगैरे तऱ्हेचे सर्व प्रकार येथें आहेत. शिवाय प्राचीन सायप्रस, ग्रीस, रोम, व इटली या देशांतील नमुने आहेत. इमारतीला लागू-

नच बांधलेल्या अशा लांबट अलिंदभूमिका आहेत त्यामध्येंही पुष्कळ तऱ्हेचें सामान आहे. शाळांच्या उपयोगाच्या इमारती व सामान यांचे नमुने, इमारतीसाठीं लागणारें सामान, नौ-शास्त्रसंबंधीं सर्व यंत्रें, सर्व प्रकारच्या वाफेच्या व इतर यंत्रांचे मूळचे नमुने, यांचाही संग्रह येथें आहे. पालेस्टाईन येथून आणिलेल्या वस्तूंचाही एक स्वतंत्र संग्रह आहे.

अमेरिकन एक्झिबिशन.

याप्रमाणें या संग्रहालयांतील वस्तूंचें स्थूल अवलोकन केलें. त्यायोगें आल्हाद झाला व श्रमही बरेच झाले. ह्मणून पुटने नांवाचा शहराचा एक भाग आहे तिकडे फिरावयास गेलों. या भागांत वस्ती विरळ असून झाडी बरीच आहे. त्यामुळें हवा स्वच्छ व शांतता पुष्कळ आहे. येथें कांहीं वेळ फिरून शहरांत परतलों व अमेरिकन एक्झिबिशन नांवाचें एक प्रदर्शन त्यासमयीं सुरू होतें तें पहाण्यास गेलों. हें प्रदर्शन अति विस्तीर्ण व विलक्षण होतें. येथें अमेरिकेंतील वस्तूंचाच संग्रह होता असें नाहीं तर अमेरिकेंतील रानटी लोकही येथें आणिलेलें होते व त्यांची रहाण्याची तऱ्हा, त्यांची शिकार करण्याची रीति, त्यांचे व्यवसाय, त्यांचीं शस्त्रें व अस्त्रें, इत्यादि सर्व प्रकारांचें प्रदर्शन करण्याचा यत्न येथें केलेला दृग्गोचर होत होता. या प्रदर्शनानें एकंदर ३० एकर जमीन व्यापिली होती. त्यापैकीं १७ एकर जमीन केवळ प्रदर्शनांतील वस्तुजात व यंत्रसमूह यांनीं व्यापिली होती, व ३ एकर जमीन ' बफेलो बिल वाइल्ड वेस्ट शो ' या तमाशाकरितां व्यापिली होती. कोडी नांवाच्या एका अमेरिकन गृहस्थानें ताम्रवर्ण इंडियन लोकांशीं बराच सहवास केला, व त्यांची भाषा, त्यांचे आचारविचार, त्यांचें युद्धकौशल्य, अस्त्रप्रक्षेपनैपुण्य, अश्वारोहणकौशल्य वगैरे गोष्टींचें ज्ञान संपादून त्यानें वनमहिषांची शिकार अतिशय केल्यामुळें त्यास ' बफेलो बिल ' हें उपपद प्राप्त झालें आहे. त्यानें चार हजारांवर रानरेडे मारिले अशी ख्याति आहे. त्यानें ताम्रवर्ण इंडियन लोक व त्यांचें सर्व साहित्य जमवून लंडनशहरांत हा तमाशा सुरू केला होता. एकंदर प्रदर्शनाची व्यवस्था फारच

उत्तम होती. प्रेक्षकांस प्रवेश होणें सुसाध्य व्हावें ह्मणून एकं-दर सात प्रवेशद्वारें केलीं होतीं व या विस्तीर्ण भूमिकांमध्यें संचार सुकर व्हावा ह्मणून सात पूल बनविलेले होते. मुख्य इमारत लोहस्तंभ व काष्टफलक यांची बनविलेली असून त्यांत चार विभाग केले होते व प्रत्येक विभागांत सरळ व सुगम असे पथ काढलेले होते.

बफेलो बिल यांच्या तमाशामध्यें शर्यती, बंदुकीचा नेम धरणें व घोड्यावर बसून चमत्कारिक खेळ करणें या गोष्टी मुख्य होत्या. शिवाय ताम्रवर्ण लोकांची शत्रूवर हल्ला करण्याची शैली, त्यांची समरांगणाची व्यवस्था व त्यांची रहाण्याची रीति या गोष्टींचेंही येथें प्रदर्शन होत होतें. त्या लोकांच्या स्त्रिया व पुरुष अशीं दोघेही खेळ करीत असत.

प्रदर्शनामध्यें बहुतेक सर्व प्रकारच्या वस्तूंचा संग्रह होता. या सर्व वस्तू अमेरिकेंत बनविलेल्या होत्या असें समजलें. पुष्कळ वस्तू दिसण्यांत मोहक व किंमतींत स्वस्त अशा आढळल्या. येथें यंत्रेंही प्रेक्षणीय होतीं. कांहीं दुकानांवर स्त्रिया होत्या. त्या आपल्या सौंदर्यानें व मंजुळ स्वरानें प्रेक्षकांस आकर्षित होत्या. अशा दुकानीं अर्थातच विक्री जास्त होत असे. एकंदर दुकानदार मोठे सभ्य, कार्यदक्ष व आदरशील असे होते. सायंकाळचा समय झाल्यानें विद्युत्प्रकाश झळकूं लागले व त्या योगानें त्या प्रदर्शनभवनास अद्वितीय व अवर्णनीय असें सौंदर्य प्राप्त झालें. ठिकठिकाणीं विश्रांतिस्थलें होतीं तेथें उत्तम प्रकारचे खाण्याचे व पिण्याचे पदार्थ तयार होते, व त्यांच्या सेवनानें श्रमाचा अपनोद झाला ह्मणजे प्रेक्षकजन पुनः अवलोकनकर्म सुरू करीत. अशा स्थितींत काळाचा अतिक्रम लक्षांत येण्यासारखा नव्हता. म्हणून मला बराच वेळ झाला तरी मी तेथें नुकताच दाखल झालों असें वाटे. येथील वस्तुजाताचें वर्णन करण्याच्या भरीस पडण्याचा माझा विचार नाहीं. वजन करण्याचें एक यंत्र येथें दृष्टीस पडलें त्याबद्दल मात्र दोन शब्द लिहितों. या यंत्राशेजारीं कोणी माणूस नव्हता म्हणून मी कांहीं वेळ वाट पहात उभा राहिलों. त्याच्या आकृतीवरून हें वजन करण्याचें यंत्र अ-

सावें असें मला वाटलें. जमिनीवर एक लोखंडी चौथरा असून त्याच्या एका बाजूला लागून एक दांडा होता. त्या दांड्यावर मध्यभागीं घड्याळाच्या तकटासारखें एक तकट लाविलेलें होतें. या तकटावर आंकडे मांडलेले होते व मध्यभागीं एक कांटा होता. ही सर्व व्यवस्था सुव्यक्त होती; परंतु यंत्राचा मालक जवळ नसल्यामुळें त्यावर उभें रहाणें मला प्रशस्त वाटलें नाहीं. मी जवळ उभा राहून सूक्ष्म निरीक्षण करूं लागलों परंतु जास्त माहिती कांहींच मिळाली नाहीं. इतक्यांत एक गृहस्थ मजजवळ आला व मला ह्मणाला कीं, यंत्रावरील दांड्याच्या टोंकाशीं छिद्र आहे त्यांत एक पेनी टाका ह्मणजे तुमचें वजन तुह्मांस कळेल. पेनी न टाकिला तर वजन कळेल किंवा नाहीं याविषयीं मीं चौकशी केली तेव्हां त्यानें अनुभव घेऊन पहा ह्मणून सांगितलें. मी यंत्रावर उभा राहिलों परंतु कांटा हालेना. एक पेनी त्या छिद्रांत टाकल्याबरोबर कांटा हालला व वजन समजलें. यावर मीं अशी शंका घेतली कीं, पेनी न टाकितां कांहीं तरी टाकिलें असतांही वजन समजेल काय? याचा अनुभव घेण्यासाठीं एक जस्ताचा तुकडा आंत टाकिला, तरी कार्यभाग झाला नाहीं. कदाचित् पेनीच्या आकाराचा व पेनीच्या वजनाचा तुकडा टाकिला असतां कार्यभाग होण्यासारखा आहे. परंतु यंत्रवाल्यास फसविण्यासाठीं मुद्दाम अशी अक्कल कोणी लढवीत असेल किंवा नाहीं, याची शंका आहे. असो, मला या यंत्राचें व इतर सर्व व्यवस्थेचें मोठें आश्चर्य वाटलें व चित्तास प्राप्त झालेल्या सुखाच्या संस्काराच्या लहरींत मी बाहेर पडलों व घरीं दाखल झालों.

नॅचरल हिस्टरी म्यूझियम्.

तारीख ६ रोजीं तिसऱ्या प्रहरीं मी "नॅचरल हिस्टरी म्यूझियम" नामक संग्रहालय पहाण्यास गेलों. येथें हल्लीं असलेला वस्तुसंग्रह पूर्वकालीं 'ब्रिटिश म्यूझियम' संग्रहाच्या अंगभूत होता. परंतु तो संग्रह जेव्हां फार वाढला तेव्हां व्यवस्थेसाठीं व सोईसाठीं त्याचे दोन स्थूल विभाग करणें

जरूर वाटलें. नैसर्गिक स्थितींत असलेल्या वस्तूंचा स्वतंत्र संग्रह करण्याचें ठरलें व मनुष्याच्या कृतीचा संस्कार ज्यास झाला आहे अशा वस्तू ब्रिटिश म्युझियममध्यें ठेवण्यांत आल्या. व या स्वतंत्र संग्रहासाठीं एक इमारत बांधण्याचें पुष्कळ दिवस घाटून अखेरीस १८८० सालीं इमारत पूर्ण झाली, व १८८१ सालीं प्रेक्षकजनांसाठीं वस्तुसंग्रह खुला करण्यांत आला. ही इमारत पूर्वी वर्णन केलेल्या 'साउथकेन्सिंगटन' संग्रहालयाजवळ असून भररस्त्यावर आहे. इची रचना सुंदर व प्रमाण विस्तीर्ण आहे; इला तीन मजले आहेत. मध्यभागीं दोन व पार्श्वभागीं दोन असे चार मनोरे आहेत; त्यांच्या योगानें सौंदर्यास पुष्टि येते. ही इमारत रविवार खेरीज करून बाकी सर्व दिवशीं खुली असते. प्रवेश होण्यासाठीं कांहीं द्यावें लागत नाहीं. अध्ययन करणारास सर्व प्रकारच्या सोई येथें सुलभ आहेत.

येथें वस्तुसंग्रह मुख्यत्वेंकरून तीन प्रकारचा आहेः---

(१) खनिजविषयक (२) वनस्पतिविषयक व (३) प्राणिविषयक. दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारच्या वस्तूंचे प्रत्येकी दोन विभाग आहेत. एक विभाग प्रस्तुत काळीं उपलब्ध असलेल्या जातींचा व दुसरा प्राचीन काळीं विद्यमान् असून भूगर्भाच्या संशोधनानें दृग्गोचर होत असलेल्या जातींचा. सर्व वस्तुजात इमारतीच्या भिन्न भिन्न भागीं सुंदर व सुव्यवस्थित रीतीनें ठेविलेला आहे.

इमारतींत प्रवेश केल्याबरोबर जें दालन लागतें त्याच्या मध्यभागीं एक अवाढव्य असा अस्थिपंजर ठेविलेला आहे. स्पर्मव्हेल नांवाच्या मत्स्यविशेषाचा हा पंजर आहे. याची लांबी ५० फुटांवर आहे. पुढें गेलें ह्मणजे एक विस्तीर्ण सोपानपरंपरा लागते. तिच्या मध्यभागीं चार्ल्स डार्विन याचा शुभ्रमर्मरोपलनिर्मित पुतळा आहे. याचप्रमाणें तिसऱ्या मजल्यावर जाण्याकरितां जो जिना आहे त्याच्या अग्रभागीं सर जोजेफ बॅंक्स यांचा पुतळा आहे.

वर निर्दिष्ट केलेलें मध्यदालन व सोपानपरंपरा यांच्या योगानें इमारतीचे दोन भाग झाल्यासारखे आहेत. एक पश्चिम भाग व दुसरा पूर्वभाग. पश्चिमभागांत तळमजल्यावर सर्व

तऱ्हेचे पक्षी व त्यांचीं घरटीं, पोंवळीं, मासे, कीटक, सरपटणारे प्राणी, कवचयुक्त प्राणी व मगर मासे, यांचा संग्रह आहे. दुसऱ्या मजल्यावर स्तनवत् प्राण्यांचा संग्रह आहे. हे सर्व प्राणी अशा तऱ्हेनें ठेविलेले आहेत कीं, त्यांची बाह्य आकृति हुबेहुब दिसते. तिसऱ्या मजल्यावर याच जातीच्या प्राण्यांचे अस्थिपंजर आहेत. डोक्याच्या कवटीपासून तों शेपटीच्या टोंकापर्यंत सर्व अस्थि दृग्गोचर व्हावे अशी सुरेख व्यवस्था केलेली आढळते. पूर्वभागांत तळमजल्यावर पूर्वयुगांतील प्राणी व वनस्पति यांचा संग्रह आहे. दुसऱ्या मजल्यावर खनिज पदार्थ व तिसऱ्या मजल्यावर वनस्पति, त्यांचीं बीजें, त्यांचीं फळें, व त्यांचीं काष्ठें यांचा संग्रह आहे.

हा अद्वितीय संग्रह पाहण्यास अवकाश व सुसंस्कृत अशी दृष्टि पाहिजे, हें सांगणें नकोच. शास्त्राचें अध्ययन करणारास या संग्रहापासून विलक्षण लाभ होईल यांत संशय नाहीं. परंतु प्राकृत जनांसही वस्तुजाताचें जातिवैचित्र्य व व्यवस्थेचें चातुर्य पाहून आल्हाद झाल्याशिवाय रहात नाहीं.

या संग्रहाचें अवलोकन होई तोंपर्यंत सायंकालचा समय जवळ आला; ह्मणून तेथून निघून मी केन्सिंग्टन उद्यानांत गेलों व फिरत फिरत 'आल्बर्ट मेमोरियल' जवळ दाखल झालों.

आल्बर्ट मेमोरियल.

हें सुंदर व प्रेक्षणीय स्मारक केन्सिंग्टन उद्यान व हाईडपार्क यांच्या दरम्यान एका प्रशस्त राजमार्गाच्या बाजूला आहे. पार्श्वभागीं लहान प्रांगणभूमिका व पश्चाद्भागीं उद्यानवृक्ष व लता यांचे वलय यांच्या योगानें इमारतीच्या सौंदर्यास पुष्टि आली आहे. हें स्मारक राणीसाहेबांच्या भर्तारांच्या मरणानंतर त्याविषयीं कृतज्ञताबुद्धीचें द्योतक ह्मणून आंग्लराष्ट्रानें उभारलें आहे. यासाठीं बारा लक्षांवर रुपये खर्च झाले आहेत. ही इमारत भव्य व सुंदर करण्याकरितां सर्व कौशल्य खर्च केलेलें आढळतें. एकीवर एक अशा चार वेदिका आहेत. पहिल्या चौथऱ्यावर जाण्याला एक विस्तीर्ण सोपानपरंपरा आहे या

चौथऱ्यावर भिन्न वर्णाचे प्रस्तरखंड जोडलेले आहेत. व ते घों-टून गुळगुळीत केलेले आहेत. या चौथऱ्यावर मध्यभागीं एक चतुष्कोण वेदिका आहे व तिच्या चारी बाजूंनीं पांच सहा हात रुंदीची जागा मोकळी सोडली आहे. या चतुष्कोण वेदिकेच्या कोनाशीं शुभ्र मर्मरोपलांचीं पीठें असून त्यांवर युरोप, एशिया, आफ्रिका व अमेरिका या खंडांचें निदर्शक असे प्रतिमासमूह आहेत. या प्रतिमा फार सुंदर आहेत. या वेदिकेस लोहशलाकांचें आवरण आहे. परंतु चारी बाजूंनीं वर जाण्यासाठीं पद्पंक्ति ठेविल्या आहेत. वर चढून गेलें ह्मणजे एक अष्टकोण अशी वेदिका लागते; तिच्या सर्व बाजूंनीं दहा बारा पायऱ्या आहेत. या वेदिकेच्या मध्यभागीं दीड पुरुष उंचीचा एक चौथरा आहे. याच्या चार कोपऱ्यावर चार प्रतिमासमूह आहेत; हे कृषिकर्मविद्या, शिल्पकर्मविद्या, वाणिज्य व यंत्रविद्या यांचें निदर्शक आहे. चौथऱ्यांच्या सर्व बाजूंच्या पृष्ठभागावर पूर्णाकृति अशा प्रतिमा खोदलेल्या आहेत. या प्रतिमा एकंदर १६९ आहेत. दक्षिण बाजूस प्राचीन व अर्वाचिन कवि व गायनकलाविशारद पुरुषांच्या, पूर्वेस चित्रकारांच्या, उत्तरेस शिल्पकारांच्या, व पश्चिमेस तक्षणकलाप्रवीणांच्या प्रतिमा आहेत. या चौथऱ्यावर चार खांब असून त्यावर चार कमानींचें असें एक छत आहे व त्याच्या शिरोभागीं तीन मजली शिखर आहे, व त्याच्या अग्रभागीं एक त्रिशूल आहे. चार खांबांच्या मध्यभागीं एक उच्च पीठ असून त्यावर आसीन असा प्रिन्स आल्बर्ट यांचा ब्रॉन्झ धातूचा व सोनेरी मुलाम्याचा पुतळा आहे. पीठासुद्धां या पुतळ्याची उंची १५ फूट आहे व एकंदर इमारतीची उंची १७५ फूट आहे. भिन्नवर्ण प्रस्तरखण्ड, धातुमय व शुभ्रमर्मरोपलनिर्मित अशा लहानमोठ्या प्रतिमा, रंगवैचित्र्य व नक्षी या सर्वसामग्रीच्या साह्यानें जेवढें म्हणून सौंदर्य उत्पन्न होण्यासारखें आहे, तेवढें साधण्याचा यत्न सफल झालेला येथें दृग्गोचर होतो. इमारत लहान खरी परंतु सौंदर्यजनक व सौंदर्यपोषक अशा वस्तूंचा समवाय तिच्या ठिकाणीं असल्यामुळें प्रेक्षकांस आल्हाद होतो व त्यांचें चित्त तेथें रममाण होतें.

भाजीपाल्याचा बाजार.

तारीख ७ रोजीं सकाळीं मी कोव्हेंट गार्डन येथील बाजार पहाण्यास गेलों. हा बाजार फार प्रख्यात आहे. येथें भाजीपाला, फळफळावळ व फुलें यांचा व्यापार चालतो. येथें घाऊक विक्री अतिशय होते. सर्व लंडनशहरांतील किरकोळीचा व्यापार करणारे येथून माल घेऊन जातात. बाजार फार सकाळीं भरतो व आठ वाजण्यापूर्वी खलास होतो. माझी अशी कल्पना होती कीं या ठिकाणीं व्यवस्था कांहीं चमत्कारिक तऱ्हेची असेल; परंतु ही कल्पना खरी ठरली नाहीं. पुण्यांतील जुन्या मंडईप्रमाणें येथें उघड्या जागेंत मालाचे ढीगच्या ढीग दिसले व कित्येक ठिकाणीं मधून जाण्यास रस्ताही नव्हता. येथें इमारत फारशी मोठी नव्हती. मध्यभागीं लोखंडी पत्र्यांच्या छताची एक मोठी पडवी असून बाजूनें खुली जागा होती व पलीकडे गाड्या उभ्या करण्यासाठीं सोय केलेली होती. पडवीच्या एका भागांत किरकोळ विक्रीचीं दुकानें व एका भागांत माल सांठविण्यासाठीं खोल्या होत्या. फुलांच्या व फळांच्या दुकानांत मात्र व्यवस्था फार चांगली दिसली. फळांची मांडणी, फुलांची ठेवण, व तीं स्वच्छ रहाण्यासाठीं तजविजी प्रेक्षणीय होत्या. लंडनशहरांत फुलें फार महाग आहेत. प्रसंगीं एका गुलाबाच्या फुलास एक एक शिलिंग पडतो, परंतु येथील गुलाबास आपल्या गांवठी गुलाबाइतका वास नसतो.

इंडिया म्यूझियम.

दोनप्रहरीं इंडिया म्यूझियम पाहिलें. हें संग्रहालय वर वर्णन केलेल्या साउथ केन्सिंगटन संग्रहालयाच्या अंगभूत आहे. येथें मुख्यत्वेंकरून भारतवर्षीय वस्तूंचा फारच विचित्र, सुंदर व प्रेक्षणीय असा संग्रह आहे; व शिवाय इतर कांहीं प्राच्य देशांतील वस्तूही येथें आढळतात. प्रवेश करण्याबरोबर प्रथम जें दालन लागतें त्यांत भारतीय शिल्पकलेचे नमुने आहेत. बुलंदशहर येथील एका घराची देवडी, कानपूर येथील एक दुकान व अहमदाबाद येथील एक घर यांचे हुबेहुब नमुने येथें आहेत. दरवाजावर चंदनी लांकडावर केलेलें कोरींव काम ठेविलेलें आहे

व सर्व भिंतींवरून तऱ्हेतऱ्हेच्या खिडक्या, दरवाजे व सज्जे मांडलेले आहेत. डाव्या बाजूस शेतकीचीं सर्व आयुधें आहेत. भोपाळ प्रांतांतील एका बुद्धप्रार्थनालयाच्या दरवाजाची एक नक्कल आहे. फत्तेपूर सिक्री येथील अकबर बादशहाच्या महालांतील तक्ताच्या खांबाचा नमुना एका ठिकाणीं आहे. कांहीं कपाटांत ब्रम्हदेशांतून आणिलेल्या जिनसा आहेत. त्यांमध्यें थिबा राजाचा पोषाक आहे. पुढें गेलें ह्मणजे एका दालनांत सर्व प्रकारचीं प्राच्य वस्त्रें व एतद्देशीय इमारतींचीं चित्रें आढळतात. एका दालनांत यार्केद, बोर्निओ येथील वस्तु आहेत. एका दालनांत जरतारीचें, कशिदाचें व विणकरीचें काम आहे. व येथेंच दिल्लीदरबाराच्या प्रसंगीं उपयोगांत आणिलेलीं उंची छत्रें ठेविलेलीं आहेत. शिवाय पंजाबांतील शेतकरी लोकांचे पोषाक येथें आहेत. बाकी राहिलेल्या दालनांमध्यें हिंदुस्थानी जीन, छत्र्या, स्त्रीपुरुषांचे सर्व तऱ्हेचे वेष, भिन्न भिन्न तऱ्हेचे रेशमाचे नमुने, वगैरे जिनसा आहेत.

वरच्या मजल्यावर जातांना जिन्याच्या बाजूंनीं एतद्देशीय स्थलांच्या तसबिरी आहेत. वर गेलें ह्मणजे पांच दालनें लागतात. एका दालनांत धातुमय पात्रें आहेत. त्यांवर नक्षी अत्युत्तम तऱ्हेची आहे. तिबेट देशांतील कांहीं पितळेचीं भांडीं फार सुबक आहेत. पुनिआ, तंजावर, ब्रह्मदेश, दक्षिण प्रांत, काश्मीर, अहमदाबाद, बदकशान, व सिआम या प्रांतांतील वस्तूंचा संग्रह दिसण्यांत येतो. या वस्तुजातामध्यें बौद्धधर्मविषयक वस्तु बऱ्याच आहेत. दुसऱ्या दालनांत सर्व प्रकारचे अलंकार आहेत. जयपुराहून आणिलेला एक हत्तीचा अंकुश येथें आहे, तो सुवर्णमय असून त्यावर हिरे व माणकें जडलेलीं आहेत. एक वाघनखांची माळ आहे. महाराज रणजितसिंग यांचें सुवर्णमय तख्त आहे. जवळच हिंदु स्त्रिया दागदागिने कसे घालतात हें दाखविण्यासाठीं एक चित्र उभें केलें आहे. रंगून येथील बौद्धधर्मासंबंधीं कांहीं सोन्याच्या जिनसा आहेत. कांचेचीं भांडीं व कोफ्तगारी नक्षीचीं भांडीही येथें आहेत. तिसऱ्या दालनांत शस्त्र व चिलखतें यांचा संग्रह आहे, जाळीच्या आस्तरणासहित एक हत्तीचा हौदा आहे. एक

हस्तिदंती मेणा आहे. त्यावर युद्धविषयक चित्रें कोरलेलीं आहेत. आफगाणिस्थानांतून आणिलेलीं शस्त्रें व कंदाहारच्या लढाईंत हस्तगत झालेला आयुधखानाचा ध्वज, यांचा येथें संग्रह केलेला आहे. चवथ्या दालनांत मृण्मय पात्रें, विटा व कवलें यांचा संग्रह आहे. उत्तरहिंदुस्थान, सिंध व मद्रास या प्रांतांतील वस्तु विशेष प्रेक्षणीय आहेत. पांचव्या दालनांत कोरींव लांकडाचें व हस्तिदंती काम, निरनिराळ्या रंगांचे दगड बसवून बनविलेल्या वस्तु, लाखेवर केलेलें काम, संगमरवरी दगडावर व सोपस्टोन नांवाच्या ठिसूळ दगडावर केलेलें कोरींव काम या प्रकारच्या प्रेक्षणीय जिनसा आहेत. शिवाय सर्व प्रकारचीं संगीत वाद्यें येथें आहेत. या दालनांत एके ठिकाणीं इंग्रजाला खाणाऱ्या वाघाचें एक चित्र आहे. हें चित्र टिपूसुलतानानें आपल्या करमणुकीसाठीं तयार केलें होतें.

याप्रमाणें या संग्रहालयांतील वस्तुजाताची स्थूलमानानें हकीकत झाली. मुख्य संग्रहालयांतील वस्तूंचा निर्देश पूर्वी केलाच आहे. तो वस्तुसंग्रह जरी प्रस्तुतच्या संग्रहापेक्षां विशाल होता तथापि माझ्या चित्तास तद्दर्शनानें कांहीं विलक्षण व अननुभूतपूर्व असें समाधान झालें नाहीं; व प्रस्तुत संग्रहाशीं त्याची जेव्हां मी तुलना करूं लागलों तेव्हां सौंदर्य, कर्मपाटव, हस्तकौशल्य इत्यादि बाबतींमध्यें भारतीय वस्तु अद्वितीय असा माझा तर्क झाला व या तर्काच्या अंगभूत असे अनेक विचारतरंगही उद्भूत झाले. एतद्देशीय कलाकौशल्यांची प्राचीन उन्नत स्थिति व त्यांची प्रस्तुतची अवनति, व कालान्तरानें त्यांचा होणारा अत्यंत लोप यांविषयीं कल्पनांचें काहूर माजून खिन्नता प्राप्त झाली; परंतु अशा प्रकारची अवस्था अपरिहार्य आहे हें लक्षांत आणून चित्त स्थिर केलें व संग्रहालयांतून बाहेर पडलों.

आल्बर्ट हॉल.

जवळ थोड्याच अंतरावर आल्बर्ट हॉल नांवाची इमारत होती, तिकडे मी वळलों. ही इमारत राणीसाहेबांचे भ्रतार प्रिन्स आल्बर्ट यांच्या नांवानें बांधलेली आहे. हिचा आकार लांबोळा असून ही फार विस्तीर्ण व भव्य आहे. हिची लांबी

२७० फूट व रुंदी २४० फूट आहे व हिचा परीघ ८१० फूट आहे. या इमारतीला वीस लाख रुपायांवर खर्च झाला आहे. बाह्य आकृति सुंदर व मनोहर आहे. आभ्यंतर रचना प्रेक्षणीय आहे. या इमारतीचा उपयोग गायनसमारंभासाठीं किंवा शास्त्रीय परिषद् वगैरे भरण्यासाठीं करण्यांत येतो. येथें आठ हजारांवर लोक सुखानें बसूं शकतात. इमारतीच्या मध्यभागीं एक विस्तीर्ण पीठ असून बाजूनें एकावर एक अशा आसनांच्या रांगा आहेत. वरच्या बाजूला एक विस्तीर्ण अलिंदभूमिका आहे तेथें तसबिरींचा संग्रह आहे. या स्थलापासून इमारतीचा आभ्यंतर भाग चांगला अवलोकनांत येतो. एकंदर दृग्विषय जितका मौजेचा तितकाच विस्मयकारक आहे. इमारतीच्या बाहेरच्या अंगानेंही अशीच अलिंदभूमिका आहे. तेथून आसमन्तात्भागांचा देखावा अतिरमणीय दिसतो. तळमजल्यावरून वर जाण्यासाठीं दोन टोंकांस दोन हैड्रॉलिक लिफ्ट आहेत. या इमारतींत एक प्रचंड वाद्य आहे. त्याला ८००० नळ्या आहेत व या नळ्यांमधून वायुसंचार करण्यासाठीं दोन वाफेचीं यंत्रें जोडलेलीं आहेत. इमारतीच्या शिरोभागीं काचमय आवरण असल्याकारणानें दिवसा विपुल प्रकाश येतो. रात्रीं प्रकाश पडण्यासाठीं ७००० प्रदीपांची योजना केलेली आहे व हे सर्व दिवे फार थोड्या अवकाशांत विजेच्या योगानें लावितां येतात. तळमजल्यावर एक विश्रांतिगृह आहे. तेथें खाण्यापिण्याच्या जिनसा मिळूं शकतात.

न्याशनल गॅलरी व रॉयल अकॅडेमी.

तारीख ९ जुलई रोजीं आह्मी न्याशनल ग्यॅलरी व रॉयल अकॅडेमी येथील चित्रसंग्रह पाहिला. न्याशनल ग्यालरी या संस्थेची स्थापना १८२४ सालीं झाली. आरंभीं सहा लक्ष रुपये सरकारांतून मंजूर करण्यांत आले होते, परंतु एवढ्या रकमेंत फारसा मोठा संग्रह करणें शक्य झालें नाहीं. कालांतरानें या संग्रहांत कांहीं गृहस्थांच्या औदार्यामुळें भर पडत गेली. यांपैकीं कांहींनीं सुंदर तजबिरी नजर केल्या व रोख रक्कम सुमारें पांच लक्षांवर जमा झाली. ज्या इमारतींत हा

संग्रह ठेविला आहे ती इमारत बरीच विशाल आहे, व ट्राफ-ल्गार स्क्वेअर नांवाच्या सुंदर पटांगणाच्या बाजूला आहे. परंतु ती सुरेख नसून रूक्ष व मलिन दिसते. तिची लांबी ४६० फूट आहे. प्रवेशद्वाराशीं उंच असे स्तंभ आहेत. येथें एकंदर २२ दालनें आहेत व त्यांमध्यें एक हजारावर तसबिरी आहेत. प्राचीन व अर्वाचीन नामांकित कारागिरांच्या कर्तृत्वाचे नमुने येथें दृग्गोचर होतात. कांहीं तसबिरी इतक्या मनोवेधक आहेत कीं त्यांच्याजवळून हलावेंसें वाटत नाहीं. सुसंस्कृत अशा दृष्टीला येथें अविरत व बहुकालीन असा उत्सव प्राप्त होईल यांत तर नवल नाहींच, परंतु प्राकृतजनांसही या संग्रहाच्या दर्शनानें आल्हाद झाल्यावांचून रहात नाहीं. सर्व चित्रांवर कारागिराचें नांव व त्याचा काल नमूद केला आहे, शिवाय चित्राचा विषयही निर्दिष्ट केलेला आहे. कालभेद व देशभेदाप्रमाणें चित्रांचे विभाग करून ते परंपरेनें व्यवस्थित केलेले आहेत. प्राचीन चित्रांमध्यें बहुतेक चित्रांचे पौराणिक कथासंबंधी विषय आहेत. जीजस क्राइस्ट व त्याची माता मेरी यांसंबंधी पुष्कळ चित्रें आहेत. चित्रकलेचे जे प्राचीन व अर्वाचीन पंथ झाले त्यांचे विभाग खालीं लिहिल्याप्रमाणें केले आहेतः—टस्कन, सिएनीज, इटालिअन, अंब्रिअन, व्हिनीशिअन व ब्रेशिअन, लांबर्ड, डच व फ्लेमिश, जर्मन, स्पॅनिश, व ब्रिटिश. एकंदर चित्रसमूहामध्यें प्रसिद्ध चित्रकार राफेल, मायकेल ऑन्जेलो, टिशिअन, रुबेन, रेंब्रांट, रेनल्ड्स, व टर्नर यांनीं काढलेलीं चित्रें अधिक प्रमाणानें आहेत. तीं सर्व अति कौशल्यद्योतक, सुंदर, मनोहर, व चित्तवेधक आहेत, व सजीव अशीं भासतात. अंब्रिअन शाखेमध्यें राफेलकर्तृक मॅडोना नामक पौराणिक स्त्रीची एक तसबीर आहे ती ड्यूक ऑफ मार्लबरो यांजपासून १८८४ सालीं सात लक्ष रुपायांला विकत घेतली होती. ही रक्कम एतद्देशीय लोकांच्या कल्पनेच्या बाहेर असेल यांत नवल नाहीं; परंतु युरोपांत ही तसबिरीसाठीं इतकी किंमत दिल्याचें दुसरें उदाहरण नाहीं.

या स्थलीं सोमवार, मंगळवार, बुधवार व शनिवार या रोजीं सर्व प्रेक्षकांस मुक्तद्वार असतें. गुरुवार व शुक्रवार हे

दिवस विद्यार्थिजनांसाठीं राखून ठेविलेले आहेत. या दिवशीं इतर जनांस सहा पेन्स दिल्याशिवाय प्रवेश मिळत नाहीं. १८८६ सालीं या संग्रहालयांतील प्रेक्षकांची संख्या रोजीं चार हजारांवर होती. येथें संग्रहीं असलेल्या तसबिरींची यादी विकत मिळते.

हा संग्रह पाहून नंतर आह्मी अॅकेडेमी पहाण्यास गेलों. ही इमारत वरच्या इमारतीपेक्षां सुरेख आहे. आंत जातांना एक कमानदार रस्ता लागतो. पुढें एक विस्तीर्ण चौक आहे. त्याच्या उत्तरटोंकास चित्रसंग्रह आहे. इमारतीच्या शिरोभागीं नामांकित चित्रकार फिडिअस, लिओनार्डो डाव्हिन्सि, फ्लॅक्समन, राफेल, मायकेल ऑन्जेलो, टिशिअन, रेनल्डस्, रेन, व वाइकहम, यांच्या प्रतिमा आहेत. या स्थळीं प्रतिवर्षी मे महिन्यापासून ऑगस्ट महिन्यापर्यंत अर्वाचीन चित्रांचें व प्रतिमांचें प्रदर्शन होत असतें व प्रेक्षकांची गर्दी बेसुमार होते. प्रवेश होण्यासाठीं एक शिलिंग द्यावा लागतो व चित्रांच्या यादीलाही एक शिलिंग पडतो. हिवाळ्यामध्यें लोकांच्या खासगी संग्रहांपैकीं प्राचीन कारागिरांच्या तसबिरी व पुतळे यांचें प्रदर्शन होत असतें. या इमारतींत एक चांगला पुस्तकसंग्रहही आहे.

याच दिवशीं संध्याकाळीं हॉक्सटन, इस्लिंग्टन, हायगेट वगैरे लंडनशहराच्या उपनगरांत मी फिरावयास गेलों. हे भाग बरेच स्वच्छ आहेत व येथें वस्तीही विरळ आहे. ट्रामवे व ऑम्निबस यांचा संचार सर्व ठिकाणीं आढळला. मी निघालों तेव्हां एकसारखा समोर रस्ता असेल तेथपर्यंत जाण्याच्या विचारानें निघालों, व संकेताप्रमाणें दोन तीन तास असाच ऑम्निबस व ट्रामवेमधून चाललों; तथापि लंडनशहराचा अंत लागला नाहीं. शेवटीं संध्याकाळचा समय जवळ आला ह्मणून परत फिरलों. यावरून लंडनशहर किती विस्तीर्ण व अवाढव्य आहे याची कल्पना थोडी तरी येण्यासारखी आहे. असो. जो प्रांत पाहिला त्या सर्वांमध्यें हायगेट हें उपनगर फार रमणीय वाटलें. एक लहानशी टेंकडी असून त्या टेंकडीवर हें वसलेलें आहे, त्यामुळें विजातीय सौंदर्य त्यास प्राप्त झालें आहे. टेंकडीवर

जाण्याकरितां एक ट्रामवे केलेली आहे तिला घोडे लावण्याची गरज नाहीं. गाड्यांच्या खालुन एक लोहरज्जु गेलेली आहे व ती रज्जु वाफेच्या योगानें हलत असते. एतद्विषयक वर्णन पूर्वी सविस्तर करण्यांत आलेंच आहे.

हा वेळपर्यंत आह्मी लंडनशहराच्या बाहेर शर्यतीचे एक दोन प्रसंग खेरिज करून गेलों नव्हतों. लंडनशहरांत पोंचल्यापासून तेथील नामांकित लोकांचा परिचय करून घेऊन त्यांच्या सहवासांत आमचा काल गेला; परत फिरण्याचे दिवसही जवळ आले, तेव्हां उत्तरप्रांतांतील कांहीं शहरें सवडीप्रमाणें पहाण्याचा जो आमचा प्रथमपासून उद्देश होता तो सिद्धीस नेण्याच्या खटपटीस आह्मी लागलों. ब्रॉड्फर्ड, मॅन्चेस्टर, न्यूकॅसल, बर्मिंगहम व एडिनबर्ग हीं शहरें पहाण्याचा आमचा बेत होता; तेव्हां हीं शहरें व या शहरांतील प्रेक्षणीय वस्तु चांगल्या रीतीनें अवलोकनांत याव्या ह्मणून सरकारी व खासगी रीतीनें आह्मी व्यवस्था केली होती. हीं सर्व शहरें पहाण्यासाठीं आह्मी दोन खेपा केल्या. पहिल्या खेपेंत ब्रॅड्फर्ड व मॅन्चेस्टर हीं आह्मी उरकून घेतलीं व दुसऱ्या खेपेंत बाकीचीं शहरें पाहिलीं.

ब्रॉड्फर्ड शहर.

तारीख ११ जुलई रोजीं पहांटेस तीन वाजतां उठून पांच वाजतां स्टेशनावर दाखल झालों. सवापांच वाजतां गाडी निघाली ती दहा वाजण्याचे सुमारास ब्रॉड्फर्ड येथें दाखल झाली. स्टेशनावर आमचें स्वागत करण्यासाठीं शहरचे मुख्य अधिकारी मेयर व त्यांचे शिरस्तेदार टाऊनक्लार्क हे हजर होते. मेयर सुमारें चाळीस वर्षांचे असून त्यांची मुद्रा सौम्य व शांत होती. त्यांच्या गळ्यांत सर्व कपड्यावर एक सोन्याची रुंद सांखळी होती, ती पाहून आम्हाला मोठें नवल वाटलें. हीं त्यांच्या अधिकाराची खूण होती. टाऊनक्लार्क बरेच वृद्ध असून हसतमुख व साधे भोळे असे दिसले. स्वागत झाल्यानंतर आह्मी स्टेशनांतून बाहेर पडतों तों मोठा जनसमाज दृग्गोचर झाला. आमच्या भावी आगमनाची वार्ता सर्व शहरांत पूर्वीपासून पसरली होती; व आगमनाचा काळही निश्चितपूर्व असल्यामुळें आमच्या-

शारख्या अनागतपूर्व अभ्यागतांची संभावना करण्याच्या उद्देशानें नगरनिवासिजन जमा झाले होते. परदेशीयांचें दर्शन दुर्लभ; व तशांतून भारतीय संस्थानिकांचें नितांतदुर्लभ! तेव्हां अशा प्रसंगीं नागरिकजन कुतूहलवश होऊन स्वकार्यें एकीकडे सारून आमच्या दर्शनाची प्रतीक्षा करीत राहिले, यांत काय नवल! आमच्यासाठीं दोन घोड्यांच्या गाड्या तयार होत्या त्यांत बसून आम्ही एका पथिकाश्रमांत गेलों. तेथें मेयर साहेबांच्या हुकुमावरून आमची सर्व तजवीज लाविलेली होती. प्रातर्विधि व उपहार यासाठीं दोन तासांची फुरसत देऊन मेयर निघून गेले. तेवढ्या अवधींत आम्ही सर्व कार्यभाग आटपून बाहेर जाण्यास सिद्ध झालों. दोन घोड्यांच्या दोन गाड्या पुढेंमागें दोन दोन स्वार व बरोबर टाऊनक्लार्क व एक ऑल्डरमन (अधिकारापन्न स्थानिक सभेचे एक सभासद) अशा थाटानें आमची स्वारी निघाली. ती ब्रॅड्फर्ड गांवामधून चालली. मार्गानें प्रेक्षकजनांची गर्दी बरीच होती. ब्रॅड्फर्ड गांव उंचवट्यावर वसलेलें असल्यामुळें कांहीं भाग उंच व कांहीं सखल आहे. या रचनेच्या तऱ्हेवरून मला कॉन्स्टांटिनोपल शहराची आठवण झाली; परंतु तेथल्याप्रमाणें येथें गलिच्छपणा नसून स्वच्छता चांगल्या प्रकारची होती. रथ्या प्रशस्त असून त्यांच्या बाजूनें उच्च व सुंदर अशा इमारती दिसत होत्या; व चतुष्पथांच्या जागीं कोठें पुतळे व कोठें कारंजीं दृग्गोचर होत होतीं. गांव फार विस्तीर्ण नाहीं, परंतु सुती व लोकरीच्या कापडाचा व्यापार येथें बराच चालतो; यामुळें कामधंद्याला तेजी आहे व लोक सुखी आहेत. आमचा कार्यक्रम असा ठरला होता कीं, सकाळीच सॉल्टेअर नांवाचें जवळच असलेलें गांव पहाण्यास जावें. तेथें तीनप्रहर दिवसपर्यंत राहून परतावें व नंतर ब्रॅड्फर्ड गांवांतील प्रेक्षणीय स्थळें पहावीं. या ठरावाअन्वयें आम्ही गांवांतून बाहेर पडलों तों आमच्या अग्रभागीं एक अतिरमणीय असा दृग्विषय प्रादुर्भूत झाला. एक विस्तीर्ण दरी असून तिचे भूमिभाग हरिततृणावृत व विरल भवनानीं चित्रित होते; त्यावर सूर्यप्रकाश पडल्यानें त्यांची शोभा वृद्धि पावली होती. ज्या मार्गानें आम्ही जात होतों तो

भाग टेंकडीच्या बाजूनें असून उतरता असल्यामुळें त्यावर रविकिरणें पोंचत नव्हतीं. व म्हणूनच अयवर्तिदृग्विषय अधिक सुंदर भासत होता. कांहीं भाग विरल धूमिकेनें आवृत असल्यामुळें आदित्यरश्मीचें संमेलन विशेष मनोहर दिसत होतें. अशा मौजेच्या दृग्विषयापासून होणाऱ्या आल्हादाचा अनुभव घेत घेत आम्ही सॉल्टेअर गांवाजवळ येऊन पोंचलों. हें गांव सर टायटस सॉल्ट नांवाच्या गृहस्थानें वसविलें म्हणून याचें नांव सॉल्टेअर असें पडलें आहे. या गृहस्थानें या स्थलीं एका लोंकरीच्या कारखान्याची स्थापना करून सभोंवतीं मजूरदार लोकांसाठीं, अधिकारी लोकांसाठीं व स्वतःसाठीं लहान मोठीं घरें बांधलीं. मागाहून दुसरे कांहीं सुखवस्तु लोक तेथें येऊन राहिले. अशा रीतीनें हा गांव वसला आहे. गांव लहानच आहे, परंतु त्याची मांडणी सुरेख असून स्वच्छता चांगली आहे. आम्ही गेलों ते प्रथम कारखान्याजवळ दाखल झालों. तेथें अधिकारीजनांची आमची मुलाखत झाली. त्यांनीं आमचें स्वागत चांगलें केलें; व नंतर सर्व कारखाना आह्मास दाखविला. यावेळीं सर टायटस सॉल्ट हे जिवंत नसून त्यांचे मुलगे कारभार पहात होते. त्यांपैकीं वडील चिरंजीवानीं आमची भेट घेतली, आमचा सत्कार केला व कांहीं वेळ कारखान्यांत आमच्याबरोबर फिरण्यांत घालविला. या लोंकरीच्या कारखान्यांतील सर्व पद्धत कापसाचें सूत काढण्याच्या कारखान्याप्रमाणेंच होती. मात्र लोंकरीची निवड करणें, ती स्वच्छ करणें व लहान मोठे तुकडे निराळे करणें या क्रिया भिन्न रीतीच्या होत्या. तेथें लोंकर रंगविण्याचेंही काम होत होतें. व रेशीम व लोंकर यांच्या मिश्रणानें होणारें कापड—मखमल आल्पाक वगैरे—येथें बनविण्यांत येत होतें. मखमल किंवा त्याहीपेक्षां जास्त लवीचें कापड करण्याची तऱ्हा फार चमत्कारिक होती. दुहेरी कापड करून दोन पृष्ठांचा संयोग करणारे जेवढे तंतु असतील तेवढे दोन पृष्ठांमधून जाणाऱ्या एका सुरीच्या योगानें कापून काढतात; ह्मणजे दोन्ही पृष्ठें निराळीं होतात व प्रत्येकावर लहान मोठी हवी तशी लव राखतां येते. कारखाना पा-

हून झाल्यावर तयार झालेलें कापड ज्या दालनांत ठेविलें होतें त्या दालनांत आह्मी गेलों तेथें सर्व तऱ्हेचें लोंकरी कापड आमच्या नजरेस पडलें. तेथून आह्मी कारखान्याच्या बाहेर पडलों तों मजूर लोकांची माध्यंदिनोपहाराची वेळ झाली होती, म्हणून आह्मी बाहेरच्या दरवाज्याजवळ मौज पहाण्या-साठीं उभे राहिलों. पुरुष, बायका, मुलें असा मिश्रजनौघ बाहेर मोठ्या लगबगीनें लोटत होता. हा चार हजार माण-सांचा समाज अपसृत होतांना पहाण्याची गंमत कांहीं विल-क्षण होती. सर्वांस आह्मांकडे पहाण्याची उत्कट इच्छा अ-सावी असें त्यांच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होतें, परंतु आमच्या जवळ कारखान्याचे मालक व अधिकारी उभे असल्यामुळें थेट आमच्याकडे पहाण्याचें धाष्टर्य त्यांच्यानें होईना. सर्व थोड्या अवकाशांत फार व्यवस्थितपणें आपआपल्या घरोघर गेले. सर्वांची चित्तवृत्ति समाधानयुक्त होती व सर्वांमध्यें मालका-विषयीं निष्कपट अशी प्रेमबुद्धि वसत होती.

नंतर आह्मी सर्वजण उपहारास गेलों. या समयीं या गां-वांत एक प्रदर्शन सुरू होतें तेथील एका दालनांत उपहाराची सिद्धता झाली होती. सुमारें दहा पंधरा गृहस्थ मेजवानीस बोला-विले होते त्यांमध्यें अमेरिकाखंडांतील कानडा देशांतील एक गृह-स्थ होते. हे गृहस्थ शिकारीचे फार शोकी होते व शिकारींत मारले-ल्या पशुपक्ष्यांचीं कातडीं, शिंगें, नखें वगैरे जिनसांचा त्यांनीं मोठ्या आस्थेनें संग्रह केला होता व तो संग्रह त्यांनीं या प्रदर्श-नांत दाखलही केला होता. हे गृहस्थ बरेच गमती होते व त्यांनीं आमच्याशीं बरीच सलगी केली. मेजवानीचा थाट बरा होता. उपहारानंतर आह्मी प्रदर्शन पहाण्यास सुरुवात केली. सॉल्टेअरसारख्या खेडेगांवांत एखादें प्रदर्शन असावें व तेथें अवलोकनोत्सुक असा मोठा जनसमाज असावा, या गोष्टीचेंच प्रथम आम्हांस मोठें नवल; परंतु याहीपेक्षां आ-श्चर्यकारक गोष्ट ही कीं येथील संग्रहाचें वैचित्र्य केवळ साधा-रण प्रकारचें नसून विलक्षण होतें. प्रदर्शनगृहाच्या बाहेर एका पटांगणांत एक भाग मर्यादित केला होता व तेथें स्विच् बॅाक व टोबागन या नांवाच्या चमत्कारिक वाहनांची योजना

होती. उच्च व नीच अशा स्तंभांची अल्प अंतरावर प्रस्थापना करून त्यांच्या अग्रभागीं काष्टफलकें जोडलेलीं होतीं, त्यामुळें नतोन्नत असा पृष्टभाग बनला होता. असे एकंदर चार पृष्ट-भाग बनविले होते. दोहोंवर लोखंडी रेल घातले होते व त्यां-वर लोखंडी चाकांचीं वाहनें होतीं. या वाहनांमध्यें पांच पांच आसनें होतीं व प्रत्येक आसनावर दोन दोन माणसें बसत. या वाहनाचें नांव स्विच् बॅक रेलवे. टोबागन नांवाचें दुसरें एक वाहन याच जातीचें होतें, परंतु तें लोखंडी रेलावर चालत नसून काष्टमय पृष्टभागावरून जाण्याचें होतें. वाहनाला खा-लून लहान लहान चाकें होतीं व वरील आसनपंक्ति उंच नसून बैठ्या होत्या. काष्टमय पृष्टभागांच्या बाजूंनीं कठडे जोडलेले होते व त्यांच्या दोन्ही टोंकाशीं मोकळी जागा होती व तेथें जाण्यासाठीं जिने लाविलेले होते. या मार्गानें वर जाऊन तिकिटें घेऊन लोक रिकाम्या आसनांवर बसत. वा-हनाजवळ कांहीं मजूर लोक उभे होते, व सर्व व्यवस्था चा-लविण्यासाठीं एक अधिकारी उभा होता. त्यानें इशारत दि-ल्याबरोबर मजूर लोक गाडी लोटीत व एकदां गति मिळाली ह्मणजे दुसऱ्या टोंकापर्यंत हें वाहन अस्खलित जाई. वाफ, वीज वगैरे कोणत्याही प्रकारच्या गत्युत्पादक द्रव्याचें साहाय्य लागत नव्हतें. या गोष्टीचें प्रथम मोठें आश्चर्य वाटलें; परंतु थोड्या विचाराअंतीं असें लक्षांत आलें कीं प्रथमतः प्राप्त झा-लेली गति पहिल्या उतरणीच्या वेळेस वृद्धि पावली व चढण चढून जाण्यास उपयोगी पडली. दुसरी लहानशी उतरण व चढण लागली त्यांचा प्रकार त्याचप्रमाणें लक्षांत आला. तिसरी उतरण दुहेरी होती. एक उतरण संपतांच थोड्या अंतरावर दुसरी एक लहान उतरण होती. येथें वेगाची क-माल झाली व पुढील चढणीवर गाडी सहज चढून गेली. ही व्यवस्था वर निर्दिष्ट केलेल्या दोन्ही प्रकारच्या वाहनांस लागू होती. या गाड्यांत बसण्याचें प्रथम आम्हांस भय वाटलें; प-रंतु लहान मुलें व बायका यांस देखील जेव्हां बसतांना पाहिलें तेव्हां आमच्या भितीची आम्हांस लाज वाटली; तथापि पुढें जो अनुभव आला त्यावरून आमची भीति अकारण नव्हती

अशी खात्री झाली. गाडींत फार खबरदारीनें बसावें लागतें. उतरणीच्या व चढणीच्या वेळेस जे हिसके बसतात ते बरेच जोराचे असतात, व नव्या माणसास प्रथम उरांत धडकी बसल्याशिवाय रहात नाहीं; परंतु या भीत्युत्पादक संवेदनेबरोबर आल्हादजनक व अभिमत अशाही संवेदनेचा प्रत्यय येतो. गाडी चालत असतां वाराही मोठ्या सपाट्यानें लागतो तेव्हां अंगावरचीं वस्त्रेंही आवरून धरावीं लागतात. टोबागनमध्यें आसनें उंच नसल्या कारणानें भीति कमी वाटते, परंतु ही गाडी रेलावरून चालत नसल्या कारणानें वांकडी तिकडी जाते व त्यामुळें हिसके अधिक बसतात. एकंदरीनें या दोन्ही तऱ्हेच्या गाड्यांची आह्मांला फार मौज वाटली. येथून आह्मी यंत्रें पाहण्यास गेलों. व्यवहारांत लागणाऱ्या साधारण जिनसा करण्याचीं लहान लहान यंत्रें येथें अनुक्रमानें ठेविलेलीं होतीं व यंत्रांजवळ काम करणारे लोक उभे होते. खिळे, टांचण्या, स्टीलपेनें वगैरेपासून तों मेवामिठाईपर्यंत पुष्कळ प्रकारच्या वस्तु येथें तयार होत होत्या. सर्व यंत्रें मोठीं नैपुण्यव्यंजक होतीं, परंतु त्या सर्वांमध्यें कांचेचा रस करून त्या रसाचे हुबेहुब रेशमासारखे तंतु बनवून त्या तंतूंचे गळपट्टे व दोऱ्या तयार करण्याचा कारखाना पाहून अत्याश्चर्य वाटलें. या तऱ्हेचा एक गळपट्टा मी बरोबर आणिला आहे. या प्रदर्शनांत एक चित्रसंग्रहही होता, परंतु आम्हाला अवकाश थोडा असल्यामुळें तो चांगल्या रीतीनें पाहण्यास आम्हांस सवड झाली नाहीं.

याप्रमाणें साल्टेअर येथील प्रदर्शन पाहून ज्या लोकांनीं आह्मास इतकें अगत्य दाखविलें त्यांचे आभार मानून आह्मी परतलों व ब्राड्फर्ड शहरीं आलों. आमच्या गाडीच्या बाजूनें लोकांची अतोनात गर्दी जमली. कित्येक लोक आमच्या गाडीबरोबर पळत होते. हा दिवस सर्वांस मोठा मौजेचा व उत्सवाचा वाटत होता. आह्मी प्रथम टाउनहालांत गेलों. तेथें मेयर साहेबांची भेट झाली. त्यांनीं साल्टेअरची हकीकत विचारिली व नंतर आपली कचेरी व कौन्सिलहॉल दाखविला. नंतर आह्मी सर्वजण टाउनहॉलाच्या पायऱ्यांवर उभे राहिलों

तेथें आमचा फोटोग्राफ घेण्यांत आला. तेथून सर हेन्री मिचेल यांचा कापडगंज पहाण्यास गेलों. येथें विशेषतः सर्व प्रकारचें लोंकरी कापड ठेवण्यांत आलें होतें. तेथून टेक्निकल स्कूल पहाण्यास गेलों. येथील सर्व व्यवस्था पाहून मोठा चमत्कार वाटला व ज्या प्रकारचें शिक्षण येथें देण्यांत येतें तशा प्रकारचें आपल्या हिंदुस्थान देशांत दिल्याशिवाय कारागिरीस उत्तेजन यावयाचें नाहीं असें वाटलें. रसायनशास्त्र व तत्संबंधीं प्रयोग, रंगाचें काम, नकाशाचें काम, नमुने तयार करणें, यंत्रें ओतणें, विणणें वगैरे प्रकार शिकविण्याची येथें तजवीज होती. ही संस्था पाहून आम्हीं पथिकाश्रमांत परत आलों व कपडे वगैरे बदलून मेयर साहेबांकडे जाण्यास सिद्ध झालों. मेयर साहेबांनीं टाउनहॉलांत आम्हास मेजवानी देण्याचा बेत केला होता तिकडे आम्हीं गेलों. मेजवानीस पंधरा वीस गृहस्थांस निमंत्रणें केलीं होतीं. गांवांतील सर्व शिष्ट लोक तेथें होते. त्यांपैकीं बहुतेक त्या शहरांतील कौन्सिलचे सभासद म्हणजे ऑल्डरमेन होते. यांत एक दोन पार्लमेंटचे सभासदही होते. मेयर साहेबांचे वृद्ध तीर्थरूपही त्या प्रसंगीं तेथें होते. टाउनहॉलांत आम्ही गेल्यावर टाउनक्लार्क यांनीं जमलेल्या गृहस्थांशीं आमचा परिचय करून दिला. नंतर कांहीं वेळानें आम्हीं सर्वजण भोजनगृहांत गेलों. तेथें सर्व तयारी उत्तम प्रकारची दिसली. दीपांचा प्रकाश उज्ज्वल असून पुष्पगुच्छांचे अलंकार सर्वत्र दृग्गोचर होते. भिन्न रंगांचीं व भिन्न प्रकारचीं काचपात्रें मेजावर सुव्यवस्थित रीतीनें ठेविलेलीं होतीं. त्यांचें सौंदर्य व प्रकाशाच्या योगानें अधिकतर होणारी त्यांची तेजस्विता यामुळें प्रेक्षकांस आल्हाद झाल्यावांचून रहात नसे. सर्व संभार अभ्यागताविषयीं अगत्य व प्रेम दाखविणारा होता. भोजनगृहांत गेल्यावर टाउनक्लार्क यांनीं निर्दिष्ट केलेल्या आसनावर सर्वजण बसले. सर्व आसनांवर नामनिर्देशक पत्रिका ठेविल्या होत्या. रीतीप्रमाणें भोजनास सुरुवात झाली व सर्व विधि आटपण्यास दोन तास लागले. भोजनसमयीं सर्व लोक मोठ्या आनंदानें परस्परांशीं संभाषण करीत होते. माझ्या शेजारीं जे गृहस्थ बसले होते ते पार्लमेंटचे सभासद होते.

त्यांशीं माझा भिन्न भिन्न विषयांवर संवाद झाला. हिंदुस्थानांतील लोक व कारखाने यांची स्थिति हा विषय मुख्य होता. हे गृहस्थ फार चोकस व माहितगार होते व दुराग्रही नव्हते. भोजनगृहाच्या बाहेर बॉन्ड वाजत होता; व त्यामुळें भोजनविधीस विशेष मजा प्राप्त झाली होती. संभाषणाच्या दर्म्यान वाद्यांचे मंजुळ स्वर कर्णविवरांत प्रवेश करून प्रतीयमान होत असलेल्या आल्हादास पुष्टि देत. भोजनाच्या अखेरीस सांप्रदायिक "टोस्ट" (स्वास्थ्यचिन्तनपूर्वक पान) करण्याची सुरुवात झाली. प्रथम महाराज्ञी व प्रिन्स आणि प्रिन्सेस ऑफ वेल्स यांचें स्वास्थ्यचिंतन झाल्यावर अभ्यागतांचें स्वास्थ्यचिंतन झालें. या प्रसंगीं मेयर साहेबांनीं समयोचित भाषण केलें; व नंतर आमच्याखेरीज सर्व मंडळींनीं उभें राहून आमच्या सहवासानें झालेला आनंद दाखविणारें असें एक गाणें ह्मणून सहपान केलें. आमच्यातर्फे आमच्या बरोबरच्या साहेबांनीं आम्हास जें अगत्य दाखविलें व आमचा सन्मान केला त्याबद्दल त्या सर्वांचे व विशेषतः मेयर साहेबांचे आभार मानिले. शेवटीं मेयरसाहेबांनिमित्त सहपान होऊन विधि खलास झाला. हा प्रसंग आम्हास अतिशय बहारीचा व आश्चर्यजनक वाटला. या देशांत आंग्ल लोकांचें आमच्याशीं नेहमींचें वर्तन जें असतें त्यावरून या दिवशीं प्रत्ययास आलेल्या त्या प्रकाराची कल्पनाही होण्यासारखी नव्हती. परदेश व परकीय लोक हा समज तत्कालीं अगदीं लोप पावला होता. व एकंदरींत आह्मास अननुभूतपूर्व असा आल्हाद प्राप्त झाला. टाउनहॉलांतून बाहेर पडण्यास आम्हांस सुमारें अकरा वाजले. इतक्या रात्रीं देखील नागरिक आमच्या दर्शनासाठीं रस्त्यांत जमा झाले होते.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं साडेनऊ वाजतां आह्मी ब्राडफर्ड सोडून म्यांचेस्टर येथें गेलों. जाण्यापूर्वी पथिकाश्रमाच्या मालकाजवळ खर्चाची यादी मागितली, परंतु त्यानें पैसा घेण्याचा त्यास हुकूम नाहीं म्हणून सांगितलें. मेयरसाहेबांनीं ही व्यवस्था केली असावी हें सहजच लक्षांत आलें. पूर्वीच मेयरसाहेबांनीं असें बोलून दाखविलें होतें कीं आमची उतरण्याची

तजवीज कोणा तरी गृहस्थाच्या घरीं करण्यांत आली असतां, परंतु आह्मास स्वतंत्रता विशेष असावी म्हणून पथिकाश्रमांत तजवीज लाविली होती. आश्रमाच्या मालकास त्यांनीं खूप ताकीद दिली असावी असें तेथील व्यवस्थेवरून लक्षांत आलें. असो. ब्राडफर्ड शहरांत दाखल झाल्यापासून तेथून निघेतोंपर्यंत सर्व प्रकारची व्यवस्था अति उत्तम असून तिच्यामध्यें कोणत्याही प्रकारचें न्यून दिसण्यांत आलें नाहीं. आमच्यासारखा भारतीयजनांचा या प्रकारचा सत्कार ब्राडफर्ड नगरस्थ जनांनीं केला ही गोष्ट आमच्या हृत्पट्टिकेवर स्पष्ट अक्षरांनीं उत्कीर्ण झाली व या अक्षरांचा लोप कालांतरींही होणार नाहीं, हें मी निश्चयानें सांगतों. आम्हास पोंचविण्याकरितां मेयर, ऑल्डरमेन वगैरे मंडळी स्टेशनावर हजर होती व शिवाय इतर जनांची गर्दी स्टेशनाजवळ मनस्वी झाली होती. अल्प सहवासानेंही ज्यांची दीर्घ मैत्री आह्मी संपादन केली अशा गृहस्थांचा वियोग कांहीं अंशीं दुःखप्रद झाला हें सांगणें नकोच.

मॅन्चेस्टर.

आह्मी ब्राडफर्डहून साडेनऊ वाजतां निघालों ते अकरा वाजतां मांचेस्टर मुक्कामीं पोंचलों. स्टेशनावर मेयर, ऑल्डरमेन आमचें स्वागत करण्यास हजर होते व प्रेक्षकजनसमाज असंख्य होता. स्टेशनावरून निघून आह्मी एका पथिकाश्रमांत गेलों. तेथें सामानसुमान ठेवून कपडे बदलून बाहेर निघालों. पथिकाश्रम शहरांतील एका प्रशस्त रथ्येवर असून उच्च प्रतीचा होता. मॅन्चेस्टर शहराचा विस्तार बराच मोठा आहे. शहराची ठेवण व घरांची रचना लंडन शहरासारखी आहे. येथील लोक कापडाच्या व्यापारानें संपन्न झालेले आहेत हें प्रसिद्धच आहे. त्या लोकांचें दळणवळण हिंदुस्थानदेशाशीं फार आहे. व या देशावरच त्यांचें वैभव पुष्कळअंशीं अवलंबून आहे असें ह्मणणें अतिशयोक्ति होणार नाहीं. या कारणानें आमच्यासारख्या अतिथींचें त्यांस जास्त कौतुक वाटावें हें साहजिकच आहे. नागरिक अधिकारिजन व इतर समाज यांनीं आमचा सत्कार चांगला केला; परंतु ब्राडफर्ड येथें जी आस्था दृग्गोचर झाली तिचा प्रत्यय येथें आला नाहीं. मग कदाचित् हें शहर मोठें

असल्याकारणानें व येथील लोक अधिक संपत्तिमान् असल्याकारणानें असें झालें असेल. असो. आश्रमांतून निघून आम्ही प्रथम 'वॉट्स वेअर हाऊस' नांवाचें एक जंगी कापडाचें दुकान पहाण्यास गेलों. हें दुकान घाऊक विक्रीचें होतें. एक तीन मजली विस्तीर्ण इमारत सर्व तऱ्हेच्या व सर्व प्रतींच्या वस्त्रांनीं भरून गेली होती. सर्व प्रकारांचें वर्गीकरण मोठ्या व्यवस्थेनें व टापटिपीनें केलें होतें व वरच्या मजल्यावर जाण्यासाठीं 'हायड्रॉलिक लिफ्ट'ची योजना केलेली होती. हा एकंदर प्रकार पाहून अतिआश्चर्य वाटलें. कापडाचें दुकान, इतकें मोठें, इतकें व्यवस्थित व इतक्या प्रकारच्या मालानें भरलेलें असें पूर्वी आमच्या कधींही अवलोकनांत आलें नव्हतें म्हणून आम्हांस मोठा चमत्कार वाटला. नंतर 'रॉयल एक्सचेंज' पहाण्यास गेलों. या प्रकारची संस्था पाश्चात्य देशामध्यें सर्व मोठ्या शहरांत आहे. व्यापारी लोकांची देवघेव, मालाचा सट्टा, वगैरे सर्व व्यवहार या ठिकाणीं घडतात. यासाठीं एक आलाहिदा इमारत असते. व्यापारी लोक मुंबई शहराप्रमाणें रस्त्यांत उभे राहून व्यवहार करीत नाहींत. जी इमारत आह्मी पहाण्यास गेलों ती इमारत विस्तीर्ण होती. एक प्रशस्त दिवाणखाना असून अग्रभागीं एक अलिंदभूमिका होती. 'हायड्रॉलिक लिफ्ट' मध्यें बसून आह्मीं या अलिंदभूमिकेमध्यें दाखल झालों. तेथून सर्व दिवाणखान्यांतली मौज दिसण्यांत येत होती. नेमलेल्या वेळीं व्यापारी लोक तेथें जमूं लागले व गलबला सुरू झाला. इकडून तिकडे तिकडून इकडे जाणाऱ्या लोकांची एकच गर्दी उडून गेली. व्यापाराची घडामोड सुरू झाली. कोणी माल विकला—कोणी घेतला—अशा प्रकारचे सर्व व्यवहार जारीनें होऊं लागले. एकंदर दृग्विषय मोठा मौजेचा भासला. येथून आह्मी टाऊनहॉलांत गेलों. इमारत जंगी असून सुरेख होती. येथेंच काउन्सिलहॉल, मेयरसाहेबांची कचेरी व त्यांचें रहाण्याचें ठिकाण होतें. माध्यन्दिनोपहाराची तयारी येथेंच केली होती. ऑल्डरमेन व दुसरे एक दोन गृहस्थ मेजवानीस बोलाविले होते. मेजवानीचा थाट चांगलाच झाला. भोजनाच्या अखेरीस अतिथिस्वास्थ्यचिंतनानिमित्त सहपान

संप्रदायाप्रमाणें झालें. उलट आह्मीही त्यांचे आभार मानिले.

याच समयीं या शहरीं एक जंगी प्रदर्शन भरलें होतें. तेथील एक अधिकारी मेजवानीस आले होते त्यांच्याबरोबर नंतर आह्मी प्रदर्शन पाहण्यास गेलों. हें प्रदर्शन शहराबाहेर एका विस्तीर्ण पटांगणांत मांडलेलें होतें. येथील वस्तुजात विविध, विचित्र व विस्मयकारक होता. प्रवेशद्वारानजीक प्राचीन ग्रीक व रोमन प्रकारचीं गृहें, वाहनें व वेष यांची मांडणी सुरेख रीतीनें केलेली होती. पुढें गेल्यावर उजव्या हाताकडे एक पटांगण लागलें तेथें स्विच्बॅक रेल्वे, टोबागन व इतर उघड्या जागेंत करण्याजोगे करमणूकीचे प्रकार यांची योजना होती. येथें वेळ न घालावितां आह्मीं मुख्य इमारतींत प्रवेश केला व प्रथम यंत्रसंग्रहाकडे वळलों. येथें कांहीं यंत्रें हस्तप्रचालित, कांहीं बाष्पप्रेरित व कांहीं विद्युत्प्रचोदित होतीं. आमच्याबरोबरच्या गृहस्थांनीं येथील मुख्य यंत्रांच्या घटनेचा प्रकार व कार्यनिष्पत्ति पद्धति यांचें सूक्ष्म रीतीनें विवरण केलें त्यामुळें फार मौज वाटली. विजेच्या योगानें चीट छापणें व तद्देशीय रिवाजाच्या भिन्न प्रकारच्या टोप्या बनविणें हे दोन प्रकार अदृष्टपूर्व असल्याकारणानें अधिक विस्मयजनक झाले. पायमोजे, सुताच्या गुंड्या वगैरे बारिकसारीक जिनसा हस्तयंत्राच्या योगानें पुष्कळ स्त्रिया करीत होत्या. यन्त्रविभाग पाहून नंतर आह्मी रेशमाच्या कारखान्याकडे व भिन्नभिन्न देशांत उत्पन्न होणारें भिन्न जातींचें रेशीम, त्याची नैसर्गिक स्थिति व नंतर त्यावर घडणारे संस्कार व त्याच्या योगानें त्यास प्राप्त झालेलें रूप वगैरे सर्व प्रकारांचें स्पष्ट वर्गीकरण येथें केलेलें आढळलें. येथून पुढें मृत्पात्रांच्या दालनाकडे वळलों. तेथेंही पात्रांच्या विविध तऱ्हा, नानावर्ण व भिन्नभिन्न आकृति दृग्गोचर झाल्या. नंतर तसबिरींचा संग्रह पाहून गाड्या, साबण, व मेणबत्त्या यांचे कारखाने पाहिले. इतक्यांत सायंकालचा समय झाला. रोषनाई उत्तम प्रकारची झाली. उज्ज्वल अशा इमारतीस व वस्तुसमूहास अधिक तेजस्विता प्राप्त झाली. प्रेक्षकांची गर्दी जास्त झाली व एकंदर दृग्विषयास विशेष शोभा आली.

परंतु ज्या विशेष योजनेमुळें प्रदर्शनास अधिक सौंदर्य आलें होतें तिचा उल्लेख करणें राहिलेंच. ही योजना जलोद्गारयंत्राची. प्रदर्शनाच्या इमारतीमध्यें सर्व चतुष्पथांच्या ठिकाणीं विस्तीर्ण अशीं कारंजीं केलेलीं होतीं. हीं विद्युत्प्रवाहाच्या जोरानें चालत होतीं व त्यांतून उद्भूत होणाऱ्या असंख्य वारिधारांस रंगवैचित्र्य येण्याचीही योजना केली होती, त्यामुळें प्रेक्षकांस चमत्कृति व आनंद यांचा प्रत्यय येई व नयनोत्सव रमणीयतर भासे.

प्रदर्शन पाहून झाल्यावर आह्मी थोडी विश्रांति घेतली. प्रेक्षक जनांच्या सोईसाठीं एका बाजूला एका भोजन गृहाची सजवीज केलेली होती; तेथें पुष्कळ लोक चैनींत सहभोजन व सहपान यांपासून होणाऱ्या सुखांचा अनुभव घेत होते. कांहीं गृहस्थ आपल्या बायकांमुलांसुद्धां येथें आले होते. या भोजनगृहाच्या एका विस्तीर्ण व स्वतंत्र दालनामध्यें प्रदर्शन कमिटीकडून आह्मांस मेजवानी देण्याची तयारी चालली होती. तयारी झाल्यावर आह्मांस सूचना करण्यांत आली; तेव्हां आह्मी तिकडे गेलों. मेजवानीला २५-३० लोक बोलाविले होते. थाट उत्तम तऱ्हेचा होता हें सांगणें नकोच. सर्व लोक मोठ्या मोकळेपणानें व सलगीनें व्यवहार करीत होते; त्यामुळें आह्मांस संकोच बिलकुल वाटला नाहीं. आमच्या सुखाविषयीं व सोईविषयीं त्यांची काळजी व तत्परता वाखाणण्याजोगी होती. अखेरीस संप्रदायाप्रमाणें 'टोस्ट' सुरू झाले. कमिटीचे डेप्युटी चेअरमन यांणीं अतिथिविषयक भाषण केलें. त्याचा जबाब आमच्या महाराजांनीं हिंदुस्थानी भाषेंत दिला. याचें सर्व लोकांस मोठें कौतुक वाटलें. या भाषणांत प्रेम व गौरव फार होतें. त्याचें इंग्रजी भाषांतर मी केलें. महाराजांचें भाषण ऐकून सर्वांस आमच्याविषयीं अधिक प्रेम वाटलें. भोजनोत्तर प्रदर्शनाजवळील उद्यानभूमिकांमध्यें थोडी सहल करून नंतर तेथें असलेल्या एका गच्चीवर आह्मी बसलों. या स्थलापासून सर्व उद्यान दृग्गोचर होत होतें. तेथील दीपसमूह व तत्प्रकाशाच्या योगानें अधिकतर भासणारी जलोद्गारयंत्राची शोभा, अभ्यागतप्रमदांचें इतस्ततः सलीलगमन, आनन्दानुभवानें उल्लसित अशी त्यांची चित्तवृत्ति,

शिशुजनांचें स्वभावानुरूप व्यापार व त्याविषयीं तन्मातृजनांचें कौतुक, जीर्णगात्र वृद्धांची प्रशान्तवृत्ति, अशा विचित्र दृग्विषयाचा उपभोग घेण्यांत अल्पकाल मौजेनें गेला. नंतर कारंजांतील जलतुषारांस रंगवैचित्र्य आणण्याची योजना कोणत्या प्रकारची आहे हें पाहण्यास आह्मी गेलों. तेथें आम्हांस असें दिसून आलें कीं, कारंजाखालीं भुयार असून कारंजाच्या तळाला सफेद कांचा लाविलेल्या होत्या. भुयारांत रोषनाई होती, तिचा प्रकाश कांचेच्या तळांतून वर जाई व जलोद्गारास द्योतमान करी. या कांचेच्या तळाखालीं भिन्न भिन्न वर्णाच्या कांचांचीं आवरणें जोडलेलीं होतीं. हीं आवरणें मर्जीप्रमाणें खुलीं व बंद होत असत. व भुयारांतील दीपप्रकाशाच्या योगानें त्यांचा रंग कारंजांतील पाण्यावर दिसत असे. सर्व योजना अतिचातुर्यव्यंजक वाटली. ही गम्मत पाहून नंतर आह्मी फिरून गच्चीवर गेलों व सर्व मंडळीचा निरोप घेऊन आम्ही पथिकाश्रमांत परत आलों. व प्रातःकालपासून हा वेळपर्यंत काल मोठ्या सुखानें गेला याबद्दल नागरिकजनांची तारीफ करीत निद्रावश झालों.

प्रदर्शनामध्यें आमच्याबरोबर एक वृद्ध गृहस्थ होते, त्यांची व माझी बरीच सलगी झाली. हे गृहस्थ व्यापारी असून बर्मिंगहम येथील राहणारे होते. त्यांचा व मरहूम ब्राईट साहेबांचा अत्यंत ऋणानुबंध होता. व त्या महात्म्यास जी हिंदुस्थान देशाविषयीं कळकळ होती तिचा कांहीं अंश या गृहस्थामध्यें सहवासानें आला होता. पुष्कळ वेळ संभाषण झाल्यानें माझ्याविषयीं त्यांस बरीच आस्था वाटूं लागली व मी एकदां ब्राईट साहेबांस भेटावें असा त्यांचा फार आग्रह पडला. व ब्राइटसाहेबांस चिठी लिहून त्यांस केव्हां फुरसत असते तेंही निश्चित करण्याचें त्यांनीं कबूल केलें. या त्यांच्या आस्थेबद्दल मी त्यांचे आभार मानिले व सवड होईल तेव्हां कळविण्याचें मीं कबूल केलें. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं त्या महापुरुषाचें दर्शन घेण्याचा योग जमून आला नाहीं.

दुसरा दिवसही आम्ही मॅन्चेस्टर येथेंच घालविला. टाउनहॉलामध्यें शहरच्या कौन्सिलाची सभा होती तेथें काम कसें

चालतें हें पाहण्यासाठीं तेथें कांहीं वेळ बसलों. नंतर सर जोजेफ व्हिटवर्थ यांचा लोखंडाचा व पोलादाचा कारखाना पहाण्यास गेलों. हा कारखाना जंगी आहे. येथील भट्या, घन व इतर यंत्रें मोठीं असून प्रेक्षणीय आहेत. येथें मोठमोठीं यंत्रें व तोफा बनविण्यांत येतात. पोलाद बरोबर बनलें आहे किंवा नाहीं याची परीक्षा करण्याचीं कांहीं यंत्रें आहेत तीं फार चमत्कारिक आहेत. हा अवाढव्य कारखाना पाहून नंतर आम्ही "हॉइल्स प्रिन्टिंग" नांवाचा चीट छापण्याचा कारखाना पाहिला. हाही जंगी असून येथील सर्व क्रिया मनोरंजक होत्या. तेथून गोल्डस्मिट्स वेअरहाउस पहाण्यास गेलों तेथें तयार झालेला माल कोणत्या प्रकारानें दाबून त्याचे गठ्ठे बनवितात हें पहाण्यांत आलें. या पर्यटनामध्यें शहराचा बराच भाग आमच्या नजरेखालून गेला. शहर विस्तीर्ण, रथ्या प्रशस्त, प्रसिद्ध पुरुषांच्या प्रतिमांनीं अलंकृत, व सुंदर भवनांनीं मर्यादित, लोक उद्योगशील, संपन्न व कार्यव्यग्र—असें आमच्या प्रत्ययास आलें. सहल करून परत आश्रमांत आलों व अल्प उपहाराचें सेवन केलें. या समयीं शहरांतील एक संभावित व्यापारी तेथें होते त्यांच्याशीं माझें अर्थशास्त्रविषयक कांहीं बोलणें झालें. व इतर लोकांचेंही लक्ष तिकडे वेधलें. हिंदुस्थानांत येणाऱ्या विलायती मालावरील जकात लार्ड रिपनसाहेबांच्या कारकीर्दींत कमी झाली ती हिंदुस्थानाच्या हितासाठीं का मॅन्चेस्टरच्या हितासाठीं हा प्रश्न उपस्थित झाला; तेव्हां अर्थात् त्यांनीं ठराविक पूर्वपक्ष केला व मी तद्विषयक जी अविरत चर्चा आपल्या देशामध्यें चालली आहे तिच्या जोरावर उत्तरपक्ष स्वीकारला. अर्थशास्त्रदृष्ट्या व व्यवहारदृष्ट्या कोणती गोष्ट प्रशस्त आहे हें प्रतिपादन करण्याचा माझा हेतु होता. या बाबतींत त्या लोकांचे सिद्धांत ठरीव बनलेले असल्या कारणानें प्रथम त्या गृहस्थास माझें बोलणें रुचेना. व वर निर्दिष्ट केलेल्या गृहस्थांखेरीज करून अखेरपर्यंत इतर कोणासही तें रुचलें नाहीं. या गृहस्थांनीं मात्र शेवटीं असें कबूल केलें कीं, हिंदुलोकांचें स्वराज्य असतें तर अशी गोष्ट कधीं झाली नसती. त्यांनीं असें स्वच्छ सांगितलें कीं हिंदुस्था-

नच्या हितासाठीं ही जकात रद्द केली असें ह्मणणें म्हणजे केवळ लपंडाव आहे. असो. पांच वाजल्यावर आह्मी सर्व तयारी करून आश्रमांतून निघालों व स्टेशनावर दाखल झालों. तेथें नागरिकजनांचा समाज मोठा जमला होता. मेयर व ऑल्डरमेन हेही हजर होते. सर्वांशीं हस्तस्पर्श होऊन प्रेमानें आह्मीं त्यांचा निरोप घेतला. त्यांनीं केलेल्या आदरातिथ्याबद्दल केवळ औपचारिक नव्हे तर मनःपूर्वक आभार मानून, व त्या अल्प सहवासाचें विस्मरण कधींही होणार नाहीं असें वारंवार सांगून आह्मी निघालों व परत लंडनशहरांत दाखल झालों.

तारीख १६ जुलईपासून ३१ जुलईपर्यंत—तारीख १६ जुलई रोजीं राणीसाहेबांच्या हुकुमानें आमच्या महाराजांचा फोटोग्राफ काढण्यांत आला. दोन प्रहरीं रानेलाक्लबमध्यें आह्मी गेलों. तेथें घोड्यांच्या शर्यती होत्या; त्यांमध्यें आमच्या बरोबरचे एक सरदार आपल्या स्वतःच्या घोड्यावर स्वार होऊन दाखल झाले होते; व एक वेळ त्यांस यशही आलें. या गोष्टीची सर्व लोकांत मोठी तारीफ झाली. याच दिवशीं महाराजांस राणीसाहेबांकडून खाशा पंक्तीस भोजनाचें आमंत्रण होतें म्हणून महाराज वुइंडसर कासलकडे रवाना झाले. आमच्या महाराजांविषयीं जें राणीसाहेबांचें प्रेम विश्रुत होतें त्याचाच हा एक पुरावा होता. खाशा पंक्तीचा लाभ फार थोड्या लोकांस होतो व त्याची मोठ्या सन्मानांत गणना आहे. बरोबरच्या सरदारांस क्लबच्या लोकांनीं निमंत्रण दिलें म्हणून ते तेथें राहिले व मी घरीं परत आलों.

न्यूकासल.

तारीख १७ रोजीं संध्याकाळीं आह्मीं न्यूकासल येथें जाण्यासाठीं लंडनशहर सोडलें. आह्मी ज्या गाडीनें गेलों ती स्कॉटलंडपर्यंत जाणारी गाडी होती. दरम्यानच्या थोड्याच स्टेशनांवर ती उभी राहिली. तिची गति मिनिटाला माइलाप्रमाणें होती. इतकी गति असतांही ज्या गाडींत आह्मी बसलों होतों तेथें धक्के बसले नाहींत व कर्णास जर्जर करणारा असा ध्वनीही ऐकूं आला नाहीं. याचें कारण आमचा डबा पहिल्या प्रतीचा होता येवढेंच नव्हे, तर त्यांत सर्वप्रका-

रच्या विशेष योजना होत्या, हें होतें. गाडींत नि-
जावयाची सोय होतीच व गार्डानें बिछाने वगैरे सर्व तयारी
केली होती. आह्मी स्वस्थ निजलों व आह्मांस कोणत्याही प्र-
कारची तसदी झाली नाहीं. न्यूकासल स्टेशन येण्यापूर्वी दहा
मिनिटें गार्डानें आह्मांस जागें केलें. स्टेशनावर पोंचलों तों पहां-
टेचे दोन वाजण्याचा समय होता. स्टेशनावरच एक प-
थिकाश्रम आहे. तेथील व्यवस्थापकास पूर्वी तार केली होती
त्याप्रमाणें सर्व तजवीज लागलेली होती. इंग्लंडांत बहुतेक
मोठमोठ्या शहरांत रेलवेच्या स्टेशनावर पथिकाश्रम आहेत.
हे फार सोईचे असतात हें सांगणें नकोच. अवेळीं तेथें पोंच-
ल्यास किंवा अवेळीं येथून निघणें झाल्यास अशा प्रकारचे आ-
श्रम फार सुखावह असतात. गाडीच्या वेळेवर नोकर लोक
आपणास जागे करितात, आपल्या सामानसुमानाची व्यवस्था
लावितात व निद्रारूप विश्रांतीचा भंग बाजवीपेक्षां अधिक
होत नाहीं. असो.

आह्मी आपापल्या दालनांत जाऊन राहिलेली रात्र
अर्धवट झोंपेंत काढिली. प्रातःकालीं शहरचे मेयर व लॉर्ड
आर्मस्ट्रांग साहेबांचे कारभारी कॅप्टन नोबल आह्मांस
भेटण्यासाठीं आश्रमांत आले. लॉर्ड आर्मस्ट्रांग यांचा न्यूका-
सल शहरीं नौका तयार करण्याचा व तोफा घडविण्याचा जंगी
कारखाना आहे. त्या कारखान्यास 'एल्सिक वर्क्स' अशी
संज्ञा आहे. तेथें तेरा हजार लोक कामावर आहेत व तेथील
सर्व व्यवस्था कॅप्टन नोबल यांचे हातांत आहे. यांस महारा-
जांच्या एका स्नेह्यानें लंडनशहराहून पत्र धाडल्यामुळें त्यांनीं
आह्मांस तो कारखाना दाखविण्याचें कबूल केलें होतें. मेयर
साहेबांस सरकारी रीतीनें सूचना गेली होती. म्हणून हे दोघे गृह-
स्थ आमच्या भेटीस आले. दोघांच्याही वर्तनांत फारसें अगत्य
दिसलें नाहीं. अनिर्वाहपक्ष ह्मणून ही कामगिरी त्यांनीं पत्करि-
ली, असें त्यांच्या आचरणावरून लक्षांत येण्यासारखें होतें. थोडें
औपचारिक संभाषण झाल्यावर मेयर निघून गेले व नोबल
साहेबांबरोबर आह्मी प्रदर्शन पाहण्यास गेलों. आतांपर्यंत ज्या
ज्या शहरांत आह्मी गेलों त्या त्या शहरांत प्रदर्शन आढळलें ही

गोष्ट आह्मांस विस्मयकारक वाटली. मग का काकतालीयन्यायानें ही गोष्ट घडून आली किंवा त्या देशांत नेहेमीं अशींच प्रदर्शनें होत असनात हें समजलें नाहीं. प्रदर्शन बरेंच मोठें व विचित्र होतें. येथें नौका घडविण्याच्या व नौका निर्माण करण्याच्या क्रिया पहाण्यांत आल्या. शिवाय कोळशाच्या व शिशाच्या खाणींचे नमुनेही येथें दाखविण्यांत आले. खाण फोडून कोळसे बाहेर काढण्यास कोणकोणत्या योजना कराव्या लागतात, याचें दिग्दर्शन येथें स्पष्ट रीतीनें केलें होतें. भूगर्भामध्यें भूपृष्ठावरील सर्व तजविजी केलेल्या आढळल्या. कोळसे उकरण्यास यंत्रयोजना, मग ते वाहून नेण्यास लोहमार्ग, स्वच्छ हवा व प्रकाश येण्यासाठीं गवाक्षांची मांडणी, इत्यादि सर्व गोष्टी सुव्यवस्थित, सुंदर व सुखावह अशा प्रकारांनीं केलेल्या आढळल्या. या प्रदर्शनांत एक विद्युद्वेगानें चालणारी ट्राम गाडी होती. या प्रकारची गाडी आह्मीं पूर्वीं पाहिली नव्हती म्हणून आह्मांस तिचें मोठें नवल वाटलें. आम्हांस गाडीमध्यें बसवून गाडी चालविण्यांत आली होती. सर्व व्यवस्था नीट दिसली. आह्मी प्रदर्शन पहात असतां मेयर एकदां आमच्या दृष्टीस पडले. प्रदर्शन पाहून झाल्यावर महाराज लॉर्ड आर्मस्ट्रांग साहेबांचा कारखाना पहाण्यास गेले. मला कांहीं कारणासाठीं आश्रमांत परत जावें लागलें. मेयरसाहेबांनीं स्वतःच्या गाडींत घेऊन मला तेथें पोंचविलें. वाटेनें त्यांच्याशीं संभाषण करण्याचा मीं उपक्रम केला, परंतु त्यांच्याकडून उत्तेजन न मिळाल्यामुळें मी स्तब्ध झालों. आश्रमाजवळ मला सोडून ते पुढें चालते झाले. हा सर्व प्रकार माझ्या पथ्यावरच पडला. स्वतंत्रपणें शहरांत हिंडण्याची मला संधि सांपडली व तिचा उपयोग मीं केला. भाड्याची गाडी बोलावून मी एकटा शहरांत फिरावयास निघालों. हें शहर टाइन नदीच्या तीरीं वसलेलें आहे; परंतु सर्व शहर एकसारख्या सपाटीवर नसून नतोन्नत अशा भूभागावर आहे, व याच कारणानें नदीवर उंच व सखल असे दोन प्रकारचे पूल बांधलेले आहेत. नदीचें पात्र संकुचितच ह्मटलें तरी चालेल. मी प्रथम सखल पुलावरून जाऊन नंतर उंच पुलावरून परत आलों. शहरांत रस्ते मोठे व स्वच्छ आहेत. कांहीं रस्त्यांवरून

ट्रामगाड्या चालतात. येथें मुख्यत्वेंकरून कोळशाचा व्यापार मोठा चालतो व त्यामुळें लोक संपन्न आहेत. कांहीं शहरांत हिंडून नंतर शहराबाहेरचा कांहीं भाग पाहिला. वस्ती विरळ असून गृहाभोंवतीं उद्यानभूमिका होत्या, परंतु त्या सुपरिष्कृत नसल्याकारणानें त्यांवर वनशोभेची झांक मारीत होती. अशा प्रदेशांत मार्ग क्रमीत क्रमीत एका उपवनांत दाखल झालों. हें उपवन वर उल्लेख केलेल्या आर्मस्ट्रांग साहेबांच्या नांवानें प्रसिद्ध आहे. येथील भूमिभाग बरेच विस्तीर्ण असून विचित्रही आहेत. कांहीं स्थलीं अत्यंत परिष्कार, सुव्यवस्था, रचनाचातुर्य, व सर्व प्रकारचें कृत्रिम सौंदर्य दृष्टिगोचर होत होतें. एका भागांत एक विस्तीर्ण दीर्घिका असून तिच्यामध्यें जललतांचा अभिनिवेश केला होता. तीरप्रान्तीं आसनें मांडलेलीं होतीं व श्वेतवालुकास्तृत असे पथ योजिलेले होते. एका भागांत कन्दुकक्रीडा व कसरत करण्यासाठीं प्रांगणभूमिका बनविल्या होत्या. अन्यस्थलीं वनश्रीचा प्रत्यय येत होता. दीर्घवृक्षवाटिका, वनलतांचीं स्वभावतः बनलेलीं गृहें, कुंजान्तर्गत असंस्कृत अशा काष्ठखंडांचीं केलेलीं आसनें, क्षुद्रपर्वत व अल्पगव्हर, यांच्या योगानें हें वनदेवतांचें निवासस्थान किंवा क्रीडाकानन आहे कीं काय असा भास होई. मधून मधून पक्ष्यांचें कूजित व भ्रमरांचा गुंजारव श्रुतिगोचर होई व पवनान्दोलित अशा वृक्षपर्णांचा जर्जर शब्द कर्णपथावर येऊन थडके. अशा विविध प्रकारच्या दृग्विषयाचा उपभोग घेण्यासाठीं नागरिक पुरुष, स्त्रिया व मुलें तेथें आलेलीं दृष्टीस पडलीं. दिवसाचा समय असतांही येथें या जनांचा संचार पाहून थोडा चमत्कार वाटला. न्यूकासलसारख्या उद्योगाच्या ठिकाणीं सर्व जन कार्यव्यग्र असावयाचे असें असून या जनांस अशा समयीं अशा प्रकारच्या ऐषआरामास सवड कशी मिळावी याचें आश्चर्य वाटलें. कदाचित् या दिवशीं कांहीं विशेष कारणामुळें व्यवसायशैथिल्य झालें असेल असें मनांत आणून या गोष्टीचा अधिक विचार केला नाहीं. असो. एकंदर प्रकार पाहून नेत्रांस सुख, चित्तास आल्हाद व मनास विश्रांति झाली. येथून मी आश्रमांत जाण्यासाठीं परत फिरलों. याच दिवशीं संध्याकाळीं

आह्मीं न्यूकासल सोडून एडिनबर्गकडे चालते झालों. या शहरीं आमच्याविषयीं लोकांमध्ये आस्था बिलकुल दिसण्यांत आली नाहीं. आदरातिथ्याच्या नांवानें शून्य ह्मटलें तरी चालेल. याचें कारण काय असेल कोण जाणे. माझ्या मतें या कामांत मेयर वगैरे प्रमुख मंडळीची अनास्थाच दोषास्पद होती. 'महाजनो येन गतः स पन्थाः' या न्यायानें इतर जनांनीं यांच्या औदासीन्याचें अनुकरण केलें यांत नवल काय? अभ्यागतांचें स्वागत स्वशक्त्यनुरूप करणें हा शिष्टसंप्रदाय व आंग्लराष्ट्र शिष्टाचारसंपन्नतेंत नांवाजलेलें ह्मणून अशा प्रकारच्या वर्तनास दोष द्यावयाचा. केवळ आमचें स्वागत केलें नाहीं ह्मणून हा दोषारोप नव्हे. असो.

एडिनबर्ग.

तारीख १८ जुलई रोजीं सायंकालच्या समयीं आह्मी एडिनबर्ग शहरीं दाखल झालों. मार्गांत पर्वत व वनप्रदेश यांचें सृष्टिसौन्दर्य चित्तवेधक व नेत्रोत्सवकारक असें दृग्गोचर झालें. पर्वतांचा उर्ध्वभाग मेघमंडलांनीं व्याप्त असून इतर प्रदेश विरलधूमिकावृत होते. गिरिनिर्झर व जलप्रपात यांचे अस्फुट ध्वनि श्रुतिपथावर आक्रमण करीत होते व वृक्षपल्लव अल्पवृष्टितुषारांनीं अभिषिक्त व पवनानें विकंपित झाल्याकारणानें अम्लान व सलील दिसत होते. हा दृग्विषय इंग्लंड व स्कॉटलंड यांचीं मर्यादाभूत जी पर्वतराजि आहे तिच्या ठायीं दृष्टिगोचर झाला. एडिनबर्ग शहरीं पोंचलों तों तेथेंही मोठ्या बहारीचा देखावा आमच्या नयनांस आल्हाद देण्यास सज्ज होता. आकाश मेघाक्रांत असून सर्वत्र धुकें पसरलें होतें. मरीचिमालीच्या मरीचींचा प्रत्यय येत नसल्यामुळें त्याच्या यथार्थनामत्वाविषयीं संदेह उत्पन्न झाला. त्या प्रदेशांत अगोदरच तीव्र किरणांचा अभाव व तशांतून अस्तास जाण्याचा समय अशा प्रसंगीं संधि साधून धूमिकारूप शत्रूनें त्या सहस्त्रकिरणांची पायमल्ली करण्याचें मनांत आणिलें यांत आश्चर्य कोणतें! खरें ह्मटलें तर ही धूमिकेची कृति अपकारक नसून आह्मांस उपकारकच भासली. कारण कीं, तेजोमय किरणांच्या अभावामुळेंच असा नेत्रानंदकारक दृग्विषय अनुभवास आला. शहरां-

तील कांहीं भवनांचीं उच्च शृंगें आपलें उत्तुंगत्व ज्ञात करण्यासाठींच जणूं वरचेवर नेत्रपथावर आक्रमण करीत होतीं. एका बाजूस एका उंच डोंगरावर एक किल्ला दिसत होता व दुसऱ्या बाजूस एक टेंकडी असून तिच्या शिरोभागीं एकदोन इमारती व एक उंच मनोरा होता. या दोन उंचवस्थांच्या दरम्यान सर्व शहर वसलेलें आहे. या उंचवस्थांच्या योगानें दृग्विषयास वैचित्र्य प्राप्त झालें आहे. वर निर्दिष्ट केलेल्या कारणामुळें यासमयीं या सर्व रचनेचा आम्हांस केवळ अस्फुट प्रत्यय येत होता. स्टेशनावर उतरून आम्ही एका पथिकाश्रमांत गेलों. हा आश्रम शहरांतील एका प्रशस्त मार्गावर होता. या मार्गानें ट्रामगाड्या जात होत्या. आश्रमाजवळच अनेक शृंगविभूषित लहानशी इमारत होती व तिच्यामध्यें एक पुतळा बसविलेला होता. हा पुतळा सर वॉल्टर स्कॉटचा असून या इमारतीचें नांव ' स्कॉट्स मॉन्युमेंट '. ही इमारत जरी लहान आहे तरी हिचें शिखर बरेंच उंच असल्याकारणानें नगरांतील सर्व भागांमधून ही दिसते. सर वॉल्टर स्कॉट याचें स्मरण चिरकाल रहावें म्हणून ही इमारत सार्वजनिक द्रव्याच्या साहाय्यानें उभारण्यांत आली, व ही मूर्तिमंत राष्ट्राची कृतज्ञताबुद्धिच आहे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शहरांतील मुख्य अधिकारी (ज्यास लॉर्ड प्रोव्होस्ट अशी संज्ञा आहे) व त्यांचे शिरस्तेदार टाऊन क्लार्क हे आमच्या भेटीसाठीं आश्रमांत आले, व त्यांच्याबरोबर शहर पहाण्यासाठीं आम्ही बाहेर निघालों. शहराची रचना फारच सुरेख दिसली. शहराला लागूनच असलेल्या टेंकड्यांच्या योगानें शोभा विशेष दिसत होती. शहराचे कांहीं भाग उंच व कांहीं सखल आहेत, व या भागांस जोडणारे पूल आहेत. शहरांतील मुख्य रथ्या 'प्रिन्सेस स्ट्रीट ' तिच्यामधून आम्ही चाललों. या रथ्येच्या कांहीं भागांत एका बाजूनेंच घरें आहेत व दुसऱ्या बाजूनें सुव्यवस्थित व परिष्कृत अशा उद्यानभूमिका आहेत. पार्श्वपथही प्रशस्त असून स्वच्छ आहेत. पार्श्ववर्ति भवनेंही उंच व सुरेख आहेत. ' स्कॉट्स मॉन्युमेंट ' वरून पुढें गेलों तों डाव्या हाताला 'क्याल्टन हिल ' टेंकडी लागली. तिच्या अग्रभागीं लॉर्ड नेल्सन यांचें स्मारक होतें.

जवळच दुसरीं दोन तीन स्मारकें होतीं व वेधशाळेचा उंच मनोरा दृष्टीस पडत होता. या मनोऱ्याला लागूनच कांहीं उंच खांब दिसले. हे खांब आथेन्स येथील प्राचीन देवालय " पार्थेनन " याच्या खांबासारखे होते; त्या नमुन्याची एक जंगी इमारत उभारण्याचें एका कालीं घाटत होतें असें समजलें. येथून पुढें आह्मीं ' होलीरूड ' नांवाचा प्राचीन प्रासाद पाहिला. स्कॉटलंड देशांत स्वतंत्र राजे होते त्यासमयीं हें त्यांचें निवासस्थान होतें. ही इमारत विस्तीर्ण असून एका डोंगराच्या पायथ्याशीं आहे. इला चार मजले आहेत. मध्यभागीं एक चौक असून इमारतीच्या कोंपऱ्याशीं लहान लहान व सुरेख असे बुरूज आहेत. पुरोभागीं एक विस्तीर्ण प्रांगण आहे व त्याच्या मध्यभागीं एक व्हिक्टोरिया राणीचा पुतळा आहे. आह्मीं इमारतींतील मुख्य मुख्य सर्व दालनें पाहिलीं. हीं हल्लीं उपयोगांत नसल्यामुळें रूक्ष व भयाण दिसतात. भिंतीवर व छतावर नानातऱ्हेची सुंदर नक्षी आहे, परंतु पुष्कळ ठिकाणीं ती छिन्नभिन्न झाली आहे. कांहीं दालनामध्यें प्राचीन चित्रयवनिका आहेत, व एका विस्तीर्ण दालनांत प्राचीन राजांच्या तसबिरी आहेत. ह्या यवनिका जरी विस्तीर्ण व कौशल्यद्योतक आहेत तथापि उज्ज्वलतेच्या अभावामुळें प्रेक्षकांच्या चित्ताचें आकर्षण करण्यास त्या असमर्थ आहेत. क्वीन मेरीचें दालन, व तिचा खासगी चिटणीस रिझिओ याचा खून जेथें झाला ती जागा, ज्या जिन्यानें मारेकरी आले तो जिना–हीं सर्व आह्मांस दाखविण्यांत आलीं, व त्यांच्या दर्शनानें आमच्या चित्तवृत्तींत तात्कालिक निर्वेद उत्पन्न झाला. प्रासाद पाहून झाल्यावर आह्मी वर निर्दिष्ट केलेल्या टेंकडीवर गेलों. येथें ' आर्थर सीट ' नांवाचें एक स्थल आहे व बाजूच्या तुटलेल्या कड्यास ' सॉल्स्बरी क्रॅग्स ' असें नांव आहे. या अल्प पर्वताचा अधित्यकाभाग बराच विस्तीर्ण असून येथून आसमन्ताद्भागाचा दृग्विषय मोठ्या बहारीचा दिसतो. शहराच्या आड एक उंचवटा आल्यामुळें तें दृष्टिगोचर होत नाहीं व ह्मणूनच कृत्रिम सौंदर्याशीं मिश्रण न पावलेलें असें शुद्ध, शान्त व मनोहर सृष्टीचें रूप प्रतीयमान

होतें. दूरतः फोर्थ नदीचा आपल्या प्रिय पतीशीं समागम मोठा चमत्कृतिजनक भासतो. अल्पजलप्रवाह क्रमानें समुद्र-जलौघांत तादात्म्य पावलेला पाहून असा भास होतो कीं, ह्या चमत्काराच्या योगानें पतिपत्नीभाव कसा अभेद्य असावा याचें निदर्शनच देण्याचा सृष्टीचा हेतु आहे. येथें किती वेळ उभें राहिलें तरी समाधान होणें नाहीं. ज्या ज्या दिशेकडे दृष्टीची प्रेरणा करावी त्या त्या बाजूला नूतन सृष्टिचमत्कार अवलोकनांत येई. एका कवीनें ह्मटलें आहे कीं:—

क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः ।

प्रतिक्षणीं जें नवें भासेल तेंच रमणीयतेचें खरें स्वरूप. या उ-क्तीचा प्रत्यय या स्थलीं पूर्णपणें आला. कांहीं कालानंतर मोठ्या कष्टानें या नेत्रोत्सवापासून परावृत्त होऊन आह्मीं शहराचा मार्ग सुधारला. ज्या बाजूनें आह्मी शहरांतून बाहेर पडलों होतों ती बाजू सोडून दुसऱ्या बाजूनें प्रवेश केला. या भागांत वस्ती दाट आहे. पांच पांच सहा सहा मजल्यांचीं कांहीं घरें आहेत. कांहीं फार प्राचीन असल्यामुळें मलिन व रूक्ष आहेत. ' प्रिन्सेस स्ट्रीट 'वर तीन चार मजल्याहून अधिक मजल्यांचीं घरें दिसण्यांत आलीं नाहींत. ही रचना बहुधा नवी असावी व प्राचीन रचनेंत अधिक मजल्यांच्या घरांचा समावेश होत असावा. या भागांत सार्वजनिक कार्यगृह " टाउन हॉल " आहे. येथें लॉर्ड प्रोव्होस्ट यांची कचेरी व नागरिक सभा भर-ण्याचें ठिकाण होतें. या दिवाणखान्यांत आह्मी गेलों व तेथें एका वहीवर आमच्या सर्वांच्या सह्या घेण्यांत आल्या. अशा प्रकारें अभ्यागतांच्या हस्तलेखांचा संग्रह करण्याची चाल त्या देशांत सार्वत्रिक आढळली. येथून आह्मी किल्ला पहाण्यास गेलों. हा किल्ला प्राचीन असून एका टेंकडीवर बांधलेला आहे. एका बाजूनें टेंकडीचा कडा तुटला असल्यामुळें वरील इमारतीस शोभा विशेष आली आहे. या बाजूनें एक तीन चार मजली इमारत दिसण्यांत येते; परंतु ज्या बा-जूनें प्रवेशद्वार आहे त्या बाजूनें केवळ कांहीं बुरूज व तट मात्र दिसतात. पायथ्याशीं एक बैठी पण सुरेख अनेकस्तंभाविभूषित व उपवनपरिवेष्टित अशी इमारत

आहे. या बाजूनें किल्ल्याची शोभा कांहीं निराळ्या प्रकारचीच दिसते. पूर्वकालीं हें राजांचें निवासस्थान व उंची दर्जाच्या कैद्यांचें कारागृह होतें. या किल्ल्यामुळें एडिनबर्ग शहरास अधिक सौंदर्य प्राप्त झालें आहे. शहरच्या कोणत्याही भागांतून किल्ला दिसण्यासारखा असल्यामुळें जशी कांहीं नगराची एक अधिष्ठात्री देवताच तो बनून राहिला आहे. येथें क्वीन मेरीचें दालन, काऊन-रूम, व अर्गाइल टावर हे भाग आम्हांस दाखविण्यांत आले. ' क्राऊन रूम ' मध्यें प्राचीन मुकुट व राज्याभिषेकाचीं उपकरणीं यांचा संग्रह केला आहे.

याच दिवशीं दुपारीं एडिनबर्ग शहरापासून कांहीं अंतरावर लॉर्ड रोजबरी साहेबांचें वनगृह आहे तें पहाण्यास आह्मी गेलों. वाटेनें देखावा फार मौजेचा आढळला. नूतन शस्यावृत अशीं दीर्घ क्षेत्रें एका बाजूस पसरलेलीं होतीं. एका बाजूनें वृक्ष व लता यांची गर्दी होती. कांहीं भाग उंच; कांहीं सखल; मधून अल्पप्रवाह व त्यावर सुरेख पूल; कांहीं हरिततृणावृत प्रांगणें व लतागुल्म व वृक्षसमूह यांनीं तिरोहित झालेलीं अल्प भवनें; असा मनोज्ञ व विचित्र दृग्विषय येथें अनुभवास आला. लॉर्ड रोजबरी साहेबांच्या बंगल्याशीं दाखल झालों तेव्हां रखवालदार पुढें आला. त्यास आमची इच्छा निवेदन केली; परंतु यजमानाच्या परवानगीशिवाय खाजगी दालनें उघडण्याचें त्यानें नाकारलें. इतक्या लांब येऊन शेवटीं परत जाण्याचा प्रसंग. लंडनशहरांत असतांना लेडी रोजबरी यांनीं वारंवार अगत्यानें बजावलें होतें कीं, एडिनबर्ग शहरीं गेल्यावर त्यांच्या वनगृहाकडे अवश्य वळावें; परंतु येथें परवाना वगैरे लागेल याची आह्मांस कल्पना नव्हती. शेवटीं लॉर्ड साहेबांचें पुस्तकालय व इतर कांहीं इमारतींचे बाहेरचे भाग पाहून कांहीं वेळ बगिच्यांत हिंडलों व परत फिरलों. येथून फोर्थ नदीवर तेव्हां नवा होत असलेला भव्य व विशाल लोखंडी पूल आमच्या दृष्टीस पडला. हा पूल अतिशय उंच आहे. असो. जरी बंगला पहावयास मिळाला नाहीं, तरी या देशाची ठेवण व सृष्टिरचना यांचें ज्ञान झालें, हा कांहीं लहानसान फायदा झाला नाहीं. आह्मी शहरांत परत आल्यावर लॉर्ड प्रोव्होस्ट यांच्या

घरीं गेलों. तेथें त्यांच्या पत्नीची भेट घेऊन थोडा फलाहार करून आम्ही थेट स्टेशनावर गेलों.

बर्मिंगहम.

आम्ही संध्याकाळच्या सुमारास एडिन्बर्ग शहर सोडलें व मध्यरात्रीनंतर बर्मिंगहम मुक्कामीं पोंचलों. स्टेशनाजवळच्या पथिकाश्रमांत उतरण्याची पूर्वी तजवीज केलेली होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं शहरचे मेयर आमच्या भेटीस आले व त्यांच्याबरोबर आम्ही बाहेर निघालों. बर्मिंगहम शहर तेथील अनेक प्रकारच्या कारखान्यासाठीं प्रसिद्ध आहे. हें 'ली' नदीच्या काठीं वसलेलें आहे व लंडनशहरापासून १०० मैल दूर आहे. हें विस्तीर्ण असून याची रचनाही सुरेख आहे. सार्वजनिक विश्रांतिस्थानें, उपवनें व क्रीडाभवनें येथें पुष्कळ आहेत. नानातऱ्हेचे उद्योग जारीनें सुरू असल्याकारणानें लोक संपन्न आहेत. येथें स्नानगृहेंही पुष्कळ आहेत. येथील मुख्य कारखाने ह्मटले ह्मणजे बंदुका तयार करण्याचे, काचेचे सामान बनविण्याचे व मुलामा देण्याचे. शिवाय लोखंड, पितळ, पोलाद, ब्रॉन्झ वगैरे धातूंच्या जिनसा, स्टीलपेनें, पेन्सली, टांचण्या, खोगीर, बाहुल्या वगैरे सर्व प्रकारचीं खेळणीं, काचेचीं व हाडांचीं बटणें, व बारीकसारीक तकलादी जिनसा, याही येथें मोठ्या प्रमाणानें तयार होतात. वाफेचीं यंत्रें तयार करण्याचा एक कारखाना येथें आहे. तो सर्व जगांत मोठा आहे. या सर्व कारखान्यांवर एकंदर वीस हजार कुटुंबांचा चरितार्थ चालतो अशी गणना केली आहे.

आह्मीं प्रथम बंदुका, पिस्तुलें व त्यांस लागणाऱ्या लहानमोठ्या गोळ्या तयार करण्याचा कारखाना पाहिला. बंदुकांचें भिन्न अवयव कसकसे तयार होतात व ते सर्व पूर्ण स्थितींत आहेत किंवा नाहींत याची परीक्षा कशी होते, नंतर ते जोडण्यांत कसे येतात, वगैरे सर्व क्रिया अनुक्रमें आह्मीं पाहिल्या. येथें काम बरेंच जिकिरीचें असतें. येथें मजूरही विशेष खबरदार व अक्कलमंद लागतात, व त्यांस मुशाहिराही चांगला मिळतो. दर आठवड्यास एक पौंडापासून चार पौंडापर्यंत मजूरीचें मान आहे. येथून स्टीलपेनें व पेन्सली कर-

ण्याचा गिलटसाहेबांचा कारखाना पाहिला. येथेंही पोलादाच्या पत्र्यापासून तों पेन तयार होईपर्यंत अवश्य होणारे सर्व प्रयोग पाहून मोठा चमत्कार वाटला. येथें पुष्कळ कामावर स्त्रियांचीच योजना केलेली आढळली. नंतर एल्किंग्टन साहेबांचा मुलामा देण्याचा कारखाना पाहिला. येथें प्रथम मातीचा नमुना तयार करून त्या नमुन्यावर विजेच्या योगानें धातूचा रस अभिनिविष्ट करून पात्रें तयार करण्याची कृति मोठी विस्मयोत्पादक आहे. मुलामा करण्याचीही कृति चमत्कारिक आहे. एका दालनामध्यें निरनिराळे हौद असून त्यामध्यें पाणी असतें, व या पाण्यांत तारेला जोडून सोन्याची किंवा रुप्याची लगड सोडून दिलेली असते. याच हौदामध्यें विद्युयंत्राचीं दोन टोकें सोडलेलीं असतात. एक टोंक आंत राहून देऊन दुसरें टोंक ज्या वस्तूस मुलामा द्यावयाचा असेल-त्या वस्तूवर फिरविलें ह्मणजे मुलामा तयार होतो. एकाच वस्तूवर कांहीं भागांत एका प्रकारचा व कांहीं भागांत दुसऱ्या प्रकारचा मुलामा करणें झाल्यास तसें सहज करितां येतें. विलायतेमध्यें मुलाम्याच्या वस्तूंचा उपयोग मोठ्या लोकांमध्यें सुद्धां करण्यांत येतो. या मुलाम्याचें कवच जाड असलें तर मुलामा १० वर्षेंपर्यंत देखील जात नाहीं; ह्मणून मुलाम्याच्या कारखान्यांस तेथें तेजी फार आहे. हा कारखाना पाहून आह्मी आश्रमांत परत आलों. नंतर कांहीं वेळानें ऑस्लरचा काचेचा कारखाना पहाण्यास गेलों; परंतु ज्या कारखान्यांत आह्मी गेलों तेथें काच तयार करण्याचीं यंत्रें नसून केवळ काच साफ करण्याचीं व कापण्याचीं यंत्रें होतीं. काचेचा रस करून त्याच्या ओतींव वस्तु पहाण्याची मौज असते; परंतु तो कारखाना शहरापासून दूर असल्यामुळें तेथें जाण्यास आह्मांस सवड झाली नाहीं. काचा कापण्याच्या व घर्षणाच्या योगानें त्यावर नक्षी वगैरे उठविण्याच्या क्रियाही मनोरंजक होत्या. या सर्व फारच नाजूक होत्या, कारण कीं काचेसारख्या पदार्थाशीं गांठ; जरा जास्ती जोर पडला कीं तुकडेच व्हावयाचे! या घर्षणाच्या कामीं एका विशिष्ट प्रकारच्या मृत्तिकेचा उपयोग करण्यांत येत होता. हा कारखाना पाहून नंतर

तयार झालेल्या जिनसांचा संग्रह आह्मीं पाहिला. हा संग्रह फारच चमत्कारिक व विचित्र होता. येथें सर्व प्रकारचे लहानमोठे काचकलश, सुंदर व नक्षीदार सर्व तऱ्हेचीं पानपात्रें व पुष्पपात्रें, सुरेख व रंगवैचित्र्ययुक्त नानाविध शामदानें, हंड्या, झुंबरें, ग्लोब, मून वगैरे मनोहर व चमत्कृतिजनक वस्तु, यांचा तर संग्रह होताच, परंतु विशेष आश्चर्योत्पादक वस्तु ह्मटल्या ह्मणजे काचमय विशाल जलोद्गारयंत्रें होत. हीं कारंजीं ओतण्यांत किती खबरदारी, किती करामत व किती कौशल्य खर्च झालें असेल याची कल्पना वर्णन करून येण्यासारखी नाहीं. असो. येथून आह्मी शहरांतील टाउन हॉल पहाण्यास गेलों. ही इमारत मोठी असून शहरांतील एकंदर भवनसमूहांत अतिसुंदर अशी गणलेली आहे. या इमारतींतील कौन्सिल हॉल आह्मी पाहिला. येथें मेयरसाहेबांनीं आमचें स्वागत केलें. कांहीं काल संभाषणांत गेल्यावर आह्मी थेट स्टेशनावर गेलों व लंडनशहरांत दाखल झालों. बर्मिंगहम शहरांतही आमच्याविषयीं जनसमाजांत अगत्य दिसून आलें नाहीं. ब्रॅड्फर्ड शहरांत जो स्वागतप्रकार झाला तो अतिउत्तम; त्याच्या खालोखाल मॅन्चेस्टर येथील. बाकी शहरांत जो प्रकार आढळला त्यांत फारसें समाधान मानण्यासारखें कांहींच नव्हतें. व न्यूकासल येथील प्रकार तर केवळ दूषणीय होता. असो.

नेव्हलरिव्ह्यू.

तारीख २३ रोजीं नौकानिरीक्षणाचा (नेव्हल रिव्ह्यू) समारंभ झाला. जुबिलीमहोत्सवानिमित्त जे समारंभ झाले, त्यांतील हा अखेरचा होय. हा समारंभ पोर्टस्मथ बंदरांत झाला. या समारंभाची व्यवस्था अशी होती कीं, महाराणी साहेबांनीं आपल्या खाशा नौकेमध्यें बसून बंदरांत जमा झालेल्या लढाऊ जहाजांचें अवलोकन करावें; यासाठीं सर्व नौका, केतु, ध्वज व पताका इत्यादि सर्व प्रकारांनीं अलंकृत केल्या होत्या. नौकाविषयक ज्ञानांत आंग्लराष्ट्र अग्रगण्य व जलप्रदेशाच्या अधिपतित्वाविषयीं सर्व राष्ट्रास अभिमान; तेव्हां या समारंभास प्रेक्षकांची गर्दी होणें साहजिक आहे. याप्रसंगीं पोर्टस्मथसारख्या लहान गांवास केवढें महत्व येऊन राहिलें होतें! लंडन-

सारख्या अवाढव्य शहरांतील जनसमाजाचा ओघ या गांवीं लोटल्यावर त्याची त्रेधा होईल यांत काय आश्चर्य ! बंदरांतील लहानमोठ्या सर्व नौकांचा भाव चढला. किनाऱ्यावरील घरांतील सर्व जागा भरून गेली. पादचारिजनांचा संमर्द तीरप्रांतीं मिळण्यासारखें होतें तेवढें दृष्टिसुख घेण्याच्या भरांत गुंग झाला. सरकारी जहाजां (ट्रुपशिप्स) पैकीं कांहींची नेमणूक आंग्लअधिकारिजनांकरितां, युरोपीय अभ्यागतांकरितां, व राजवर्गीयांकरितां झालेली होती. एक जहाज भारतवर्षीय जनांसाठीं नेमलेलें होतें. त्यावर मोठ्या राजेरजवाड्यांपासून तों हलक्या दर्जाच्या ॲंग्लो-इंडियन कामगारापर्यंत सर्वांचा समावेश करण्याची योजना केलेली होती. राजेरजवाडे व इतर कांहीं मोठ्या दर्जाचे भारतवर्षीय लोक यांस पोर्टस्मथ येथें जाण्याकरितां एक ' स्पेशलट्रेन ' तयार ठेविलेली होती. तिच्यामध्यें बसून आम्ही पोर्टस्मथ स्टेशनावर गेलों. तेथें गाडींतून उतरण्यास पुष्कळ अवकाश लागला. गाडींतून उतरल्यावर पुढची तजवीज ठेवण्यासाठीं तेथें कोणी नव्हतें. ज्या आगबोटींत आम्हांस बसावयाचें होतें त्या आगबोटीचें नांव मात्र आम्हांस ठाऊक होतें. शोध काढीत काढीत स्टेशनापासून पायांनीं बरेंच रखडावें लागलें. बरें, रस्ता तरी सरळ ! तर नाहीं. गोदीमधून जावें लागलें ! त्यामुळें वाटेंत यंत्रें, रूळ वगैरे वलांडावे लागत होते व त्रास बराच झाला. आगबोटीवर पोंचलों तों एकच गर्दी ! उभें रहावयास पुरेशी जागा होती नव्हती अशी स्थिति होऊन गेली होती. कांहीं वेळ इकडे तिकडे आगबोटीवर फिरण्यांत व ओळखीच्या गृहस्थांस भेटण्यांत गेला. एवढ्यांत दोन वाजण्याचा सुमार झाला, तेव्हां मंडळी खालच्या मजल्यावर जाऊं लागली. तेथें दिवाणखान्यांत मध्यभागीं एकाशीं एक अशीं मेजें जोडलेलीं होतीं व त्यांवर एक सफेत कपडा घातलेला होता. बसण्यासाठीं खुर्च्या वगैरे कांहीं नव्हत्या. मेजांवर कांहीं खाण्याच्या जिनसा मांडलेल्या होत्या व पुष्कळ नोकर लोक हजर होते; परंतु लोकांची गर्दी फार असल्यामुळें सर्व व्यापार व्यवस्थितपणें चालेनात. कोणाची दाद कोणाला नाहीं अशी एकच गर्दी उडून गेली.

खाण्याच्या कामांत हयगय नाहीं व संकोच नाहीं, हें तद्देशीय लोकांच्या स्वभावाचें तत्व अनेक वेळां निर्दिष्ट करण्यांत आलेंच आहे, तेव्हां त्याविषयीं अधिक टीका करण्यांत अर्थ नाहीं. स्वभावानुरूप सर्वांनीं वर्तन सुरू केलें. कसें तरी करून दोन सुग्रास पोटांत जाऊन मिळण्यासारख्या असतील त्यांत उत्तम मदिरा सेवन करून जीव शांत झाला ह्मणजे कृतार्थता झाली अशी त्या लोकांची स्थिति होऊन गेली. अशा धांगडधिंग्यांत स्त्रीजनांची आबाळ होण्याचा संभव, परंतु तज्जातिविषयक जी त्या लोकांची प्रशंसनीय आस्था ती त्या संभवाच्या निरसनास कारणभूत झाली. पुरुषांची हातांत बशा घेऊन इकडून तिकडे व तिकडून इकडे करण्याची धांदल मोठी प्रेक्षणीय होती. फराळास जाण्याबद्दल विनंति किंवा निमंत्रण करण्याची चाल दिसण्यांत आली नाहीं; परंतु गरजच नसल्यास चाल कशानें पडणार ! आगबोटीवर येण्याची परवानगी मिळाली ह्मणजे इतर सर्व प्रकारास निराळें आमंत्रण नको. असो. ही विचारपद्धति आमच्यांत मुरली नसल्याकारणानें आमचे बरेच हाल झाले. आह्मांस कोणी विचारीना व पुसेना. पण तेथें विचारणार कोण ? सर्वच यजमान. आह्मांस मात्र अगदीं चुकल्यासारखें झालें. स्वस्थपणें कुठें जाऊन बसेन म्हटलें तर जागा नाहीं; तेव्हां इकडे तिकडे फिरणें ओघासच आलें. यांत येवढा फायदा झाला कीं, ओळखीचे लोक जे तेथें आले होते त्यांच्या भेटी झाल्या. यापैकीं जे स्ववर्गीय होते ते तर आमच्याकडे ढुंकून देखील पहात नव्हते. कांहीं मुसलमान व कांहीं पार्शी लोक भेटले, परंतु त्यांची हौस साहेबांत मिसळण्याची. ते आह्मांस काय म्हणून विचारतील ? परंतु ओळखीच्या साहेबांची वृत्ति याहून भिन्न होती. या इलाख्यांत मोठ्या हुद्यांवर असलेले कांहीं लोक भेटले. त्यांनीं मोठ्या अगत्यानें सर्व प्रकारची चौकशी केली. दोन तीन लोकांची नवी ओळख झाली. यांपैकीं एकजण पूर्वी अकौंटंट जनरल होते त्यांनीं फार आस्था दाखविली. आपल्या घराचा पत्ता सांगून सवड झाल्यास घरीं येण्याविषयीं त्यांनीं विनंति केली, व माझा पत्ता विचारून घेऊन मला भेटण्याचें कबूल

केलें. या गोष्टीचें मला फार आश्चर्य वाटलें. दुसरे एक गृहस्थ लष्करी खात्याचे होते त्यांस हिंदुस्थान सोडून बरेच दिवस झाले होते, व या देशासंबंधीं पूर्व वृत्तांतील पुष्कळ गोष्टी त्यांनीं सांगितल्या व या देशाविषयीं आपल्यापेक्षां अधिक आस्था दुसऱ्या कोणासही नसेल हें त्यांनीं बोलून दाखविलें. त्यांचे चिरंजीव मुंबईसरकारचे मुलकी खात्यांतील अंडरसेक्रेटरी होते व प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांस लवकरच पेन्शन घेऊन परत जावें लागलें होतें. अशा एक का दोन-नानाप्रकारच्या त्यांनीं गोष्टी सांगितल्या. डाक्तर वाइल्ड नांवाचे एक गृहस्थ भेटले. त्यांनीं बौद्ध व इतर धर्मविषयक ग्रंथासंबंधीं आपल्या परिश्रमाची हकीकत सांगितली. याप्रमाणें आगबोटीवर करमणूक होती. तीन वाजल्यानंतर आगबोट धक्का सोडून चालू लागली व हळू हळू तशीच चालत राहिली. चार साडेचाराच्या सुमारास राणीसाहेब आपल्या खास नौकेमध्यें बसून जातांना दृष्टीस पडल्या. लढाऊ जहाजांवरून तोफांची सरबत्ती झाली. सर्वांनीं तालिकाप्रहारांनीं व टोप्या व रुमाल उडवून आपला आनंद व राजनिष्ठा प्रकट केली. झालें. समारंभ आटपला. आमची आगबोट त्या लढाऊ जहाजांजवळ देखील गेली नाहीं. समुद्रांत इकडून तिकडे मंदगतीनें चालत होती. दूरदर्शकयंत्राच्या योगानें पुष्कळ लोक अवलोकनांत व्यग्र होते. त्यांस काय मजा दिसली असेल ती असो. मला कांहीं मौज वाटली नाहीं. केवळ जनसमाजाची गंमत ह्मणावी तर वर सांगितल्याप्रमाणें जो त्रास झाला होता, त्यामुळें चित्तास उद्वेग व अस्वस्थता वाटून त्या आल्हादांत विरजण पडलें. तरी येवढ्यानें परिसमाप्ति झाली नाहीं. समारंभ आटपल्यावर मंडळीची परत जाण्याविषयीं गडबड उडाली. आगबोट धक्क्यापासून दूर असल्याकारणानें दुसऱ्या बोटींत बसणें जरूर पडलें. ही बोट अर्थात् लहान, तेव्हां प्रत्येक खेपेस थोडीं थोडीं माणसेंच जाण्याचा संभव; परंतु सर्वांसच घाई झालेली, तेव्हां ज्या बाजूला ती बोट लागेल असा संभव दिसला, तिकडे लोकांचा चेप सुरू झाला. ही मौज पहाण्यासारखी होती. सर्व दर्जांचे लोक-राजेरजवाडे व इतर जन-एकाच मार्गानें जाणार तेव्हां

हाल काय विचारतां ! बरें मागें रहावें, तर सायंकालचा समय जवळ आला व सर्व दिवसभर झालेला शीण घरीं जाऊन स्वस्थपणानें व स्वेच्छेनें बसल्यानिजल्याशिवाय कसा हरण होणार ? अशाप्रसंगीं गमनोत्सुक मंडळीमध्यें आह्मीही आपला नंबर लावला; परंतु आमच्यामध्यें त्या लोकांचें धाष्टर्य व त्यांचा बेमुर्वतपणा नसल्यामुळें आमचा नंबर टिकला नाहीं. लोक बेलाशक मागून येऊन धक्के देऊन पुढें जात. अशा प्रकारचें आचरण इतर लोकांत असभ्य गणलें गेलें असतें, परंतु येथें तसें म्हणण्याची सोय नाहीं ! असो. धांदलींत एक बोट तर निघून गेली. दुसऱ्या बोटींत मोठ्या कष्टानें प्रवेश झाला. या सर्व प्रकाराचा मला मनापासून तिटकारा आला, म्हणून मी गर्दींत न जातां स्वस्थ मागें उभा राहिलों होतों, तथापि दुसऱ्या बोटींत मला जागा मिळाली. बरें येवढ्यानें हाल संपले कां ? नाहीं. धक्क्यावर पोंचल्यावर आगगाडींत जागा मिळण्यासाठीं धांदल सुरू झाली. पूर्वीप्रमाणेंच त्या गर्दीमधून रस्ता खेटावा लागला व तशांतून धांवपळीचा प्रसंग. इतक्या प्रयासानें एकदाची आगगाडींत जागा मिळाली. लंडनशहरांत परत येण्यास दहा वाजले.

या सर्व अव्यवस्थेची मुद्दाम सविस्तर हकीकत दिली आहे. केवळ अव्यवस्था होती असें म्हटल्यानें कोणाच्या मनांत खरी कल्पना येण्याचा संभव नाहीं, म्हणून असें केलें आहे. मला स्वतःला या सर्व प्रकारापासून अत्यंत खेद झाला. इतक्या लांब गेलेल्या अतिथिजनांची खचित मनांत असतें तर यापेक्षां सुखावह अशी तजवीज लावितां आली असती. परंतु असें कां झालें नाहीं याचें कारण सांगण्याचें धाडस मी करीत नाहीं. अज्ञानानें किंवा धांदलीमुळें ही चूक झाली असेल असें माझ्या मतें संभवत नाहीं. खरें इंगित काय असेल तें असो !

आमच्या महाराजांविषयीं राणीसाहेब व प्रिन्स ऑफ वेल्स यांनीं एकंदरींत फार अगत्य दाखविलें व याचा प्रत्यय पूर्वी प्रसंगानुसार उल्लेख केलेल्या कांहीं गोष्टींवरून येण्यासारखा आहे. याचा आणखी एक प्रत्यय असा कीं, राणीसाहेबांनीं सिडनेहाल नांवाच्या नामांकित चित्रकाराकडून महाराजांचीं

तसबीर काढविण्याची तजवीज केली, परंतु तसबीर काढण्या-साठीं समस्त महाराजांस त्या चित्रकाराच्या घरीं दोन वेळ जावें लागलें, व त्याच्यासमोर कांहीं वेळ स्तब्ध बसावें लागलें. असें केल्याशिवाय हुबेहुब तसबीर बनवितां येत नाहीं असें त्या चित्रकारानें सांगितलें. प्रत्येक खेपेस सुमारें दोन दोन तीन तीन तास बसावें लागलें. हा सर्व व्यापार मोठा कंटाळ-वाणा खरा, परंतु राणीसाहेबांच्या इच्छेस मान दिला पाहिजे म्हणून त्यास सादर व्हावें लागलें.

तारीख २५ रोजीं अखेरचा शर्यतीचा समारंभ पहाण्यास महाराज गुडवुड येथें गेले. मी बरोबर गेलों नाहीं. हे दोन तीन दिवस मी स्वतंत्रपणें फिरण्यांत घालविले. एक दिवस व्हाइट चॅपेल वगैरे पूर्व नगरांतील कांहीं भाग पाहिला. या भागांतील मोठे रस्ते फार गलिच्छ दिसले नाहींत. लोक गरीब व हलकट व उग्ररूप दिसत होते खरे, ते इतके कीं, त्यांच्याकडे नुसतें बघितलें तरी हे वर्दळीवर येऊन मारामारीचा प्रसंग आणतील असें मनांत येई; घड्याळाची सांखळी बाहेर दिसत असेल तर ती खिशांत घालून लपवावी असें वाटे, व या प्रांतांतून सुख-रूप आपण बाहेर कसे पडतों असें होई.

डालिच.

एक दिवस डालिच उपनगरांत गेलों. तेथें माझ्या कचेरीं-तील वरिष्ठ साहेब पेन्शन घेऊन राहिले होते, त्यांचा शोध काढीत त्यांच्या घरीं गेलों. हे गृहस्थ हिंदुस्थानांत असतांना मोठ्या हुद्यावर होते व त्यांचा माझा विशेष बोलण्याचाल-ण्याचाही प्रसंग आला नव्हता; तथापि त्यांस भेटणें माझें कर्तव्य जाणून मीं त्यांची भेट घेतली व या गोष्टीचा मला पश्चात्ताप झाला नाहीं हें सांगण्यास मला फार आनंद वाटतो. मला पाहून या गृहस्थास मोठा विस्मय झाला. त्यांनीं मोठ्या आदरानें माझें स्वागत केलें. त्यांच्या बिऱ्हाडाची जागा लहा-नच होती, परंतु नीटनेटकी होती. घराच्या पुढल्या बाजूला एक लहानशी बाग होती. आम्ही ज्या दालनांत बसलों होतों तें दालन लहानच होतें. सामानसुमान बेतावाताचेंच असून ऐषआराम किंवा अलंकार यांचें द्योतक कांहीं एक नव्हतें.

माझें आतिथ्य कोणत्या प्रकारें करावें याची त्यांना पंचाईत पडली व त्यांनीं मला तोच प्रश्न केला. भेटीचा लाभ झाला हेंच आतिथ्य झालें असें सांगून मी दुसऱ्या कांहीं गोष्टी बोलूं लागलों. त्यांची प्रकृति फार क्षीण झाली होती. हिंदुस्थानांत फार दिवस राहिल्यानें त्यांस विलायतेची हवा मानत नव्हती. जेव्हां सूर्यप्रकाश असे तेव्हांच त्यांना बरें वाटे व भारतभूमींतील अविरत रविप्रतापाचें स्मरण होऊन त्याचा अनुभव पुनः यावयाचा नाहीं याबद्दल वाईट वाटे. त्यांनीं कचेरींतील मोठ्या अधिकाऱ्यापासून तहत शिपाईप्याद्यापर्यंत सर्वांचें कुशल विचारलें व कामासंबंधींही कांहीं चौकशी केली. थोड्या वेळानें मी रजा घेतली. हा प्रांत वृक्षमय असल्याकारणानें फार रमणीय दिसतो. पहावें तिकडे तरूंची व लतांची गर्दी दिसते. अशा उपनगरांत रहाणें फार सुखावह असेल यांत शंका नाहीं. मुख्य नगराचें सांनिध्य असल्यामुळें सर्व व्यवहार अव्याहत चालण्याची सवड असते व घरीं आलें म्हणजे शांतता व सुख यांचा अनुभव मिळतो. शिवाय जागेचें भाडें कमी असतें व नोकरचाकर मिळण्याची पंचाईत पडत नाहीं. असो. येथून परत लंडनशहरीं जाण्यासाठीं मी गाडींत बसलों. मला अशी शंका आली कीं गाडीचा एक भाग एका बाजूला व दुसरा दुसऱ्या बाजूला जाण्याचा असेल; ह्मणून मीं डब्यांतील कांहीं माणसांजवळ चौकशी केली, परंतु कोणीं उत्तर दिलें नाहीं. रेल्वेचे नोकरही दांडगे व बेपर्वा होते. गार्डाची वेळ झाल्यामुळें गाडी चालू झाली. गाडींत तीन चार अल्पवयस्क स्त्रिया होत्या त्या माझ्याकडे पाहून हंसूं लागल्या, परंतु कोणासही माझ्या शंकेचें समाधान करण्याइतकें दाक्षिण्य नव्हतें. अखेरीस मला वाटलें होतें तसेंच झालें. मी भलत्याच स्टेशनावर गेलों. मग तेथें अधिक पैसे देऊन फिरून ऑम्निबसमध्यें बसलों. येथें एक अमेरिकन गृहस्थ भेटले. त्यांच्याशीं भाषणप्रसंगांत मीं सहज वरच्या गोष्टीविषयीं उल्लेख केला व ग्राम्यजनांच्या असभ्य वर्तनाविषयीं टीका केली. त्यांचें मला पूर्ण अनुमोदन मिळालें. शिवाय त्यांनीं असेंही बोलून दाखविलें कीं, दुसऱ्या

कोणत्याही देशामध्यें परकी लोकांविषयीं इतके बेपर्वा लोक आढळावयाचे नाहींत. असो.

हॉम्प्टन कोर्ट.

याच दिवशीं तिसरे प्रहरीं ' हॉम्प्टन कोर्ट ' नांवाचा प्राचीन प्रासाद पहाण्यासाठीं मी घरून निघालों; परंतु तेथें जाण्यासाठीं कोणत्या गाडींत कुठें बसावें याची पक्की माहिती न मिळाल्यामुळें केन्सिंग्टन स्टेशनावर गेलों; परंतु हॉम्प्टनकोर्टाजवळच्या स्टेशनावर पोंचेपर्यंत चार वेळ गाडी बदलावी लागली व अतिशय खोळंबा झाला. या गोष्टीचा मला फार कंटाळा आला. परंतु उद्दिष्ट स्थानीं गेल्याशिवाय परतावयाचें नाहीं असा मीं निश्चय केला होता व अखेरीस तेथें जाऊन पोंचलों. वाटेनें रिचमंड हिल वगैरे प्रांत लागला. तो अतिमनोहर व रम्य होता. स्टेशनावरून राजमहालास जातांना एक विस्तीर्ण 'चेस्नट' वृक्षांची वाटिका लागली. या वाटिकेस व आसमन्ताद्भागास 'बुशिपार्क' अशी संज्ञा आहे. या भूमिका फारच प्रशान्त व गंभीर आहेत व यांचा विस्तार अकरा हजार एकर आहे. हीं झाडें तिसऱ्या वुइलियम राजानें लाविलीं होतीं. चेस्नट झाडांमधून लाइम झाडेंही आहेत. हे सर्व वृक्ष बुंधापासून अग्रापर्यंत पल्लवितशाखामय असल्यामुळें शोभा विलक्षण दिसते. चार चार झाडांच्या रांगा एक एक मैल लांबीच्या आहेत व त्यांच्यायोगानें तीन तीन तरुवीथिका बनल्या आहेत. या तरुवीथिकांचे निरनिराळे समूह आहेत व त्यांच्या दरम्यान कांहीं खुली जागा आहे व प्रशस्त मार्ग आहेत. या मार्गावरून भाड्याच्याही गाड्या जातात. या उपवनांत हरिणें मोकळीं सोडलीं आहेत व त्यास कधीं उपद्रव पोंचत नाहीं यामुळें शाकुन्तलांत वर्णिल्याप्रमाणें जनसंचारास न जुमानतां तीं नष्टशंक व अभिन्नगति अशीं मन्द मन्द फिरत असतात, व त्यांची मौज पहाण्यासारखी असते.

हा सुंदर व विस्तीर्ण प्रासाद आठव्या हेन्रीच्या राज्यांत प्रसिद्धीस आलेला कार्डिनल वुल्सी यानें बांधविला व नंतर राजास नजर केला. मागाहून क्रॉमवेल, दुसरा चार्लस, तिसरा वुइलियम, व पहिला व दुसरा जॉर्ज यांच्या कारकीर्दीत राजमहाला-

सारखा याचा उपयोग होत होता. हल्लीं येथें ज्यास सरकारांतून नेमणूक आहे असे लोक रहातात. या इमारतीचा विस्तार फार मोठा आहे व हिला तीन मजले आहेत. बाहेरच्या बाजूनें मधून मधून लहान लहान बुरूज आहेत व सर्व बाजूच्या भिंतींचे अग्रभाग नतोन्नत आहे त्यामुळें इमारतीला एखाद्या दुर्गाचें सादृश्य प्राप्त झालें आहे. इमारत लाल विटांची बनविलेली आहे व बाहेरून रंगही लाल दिला आहे. हिचे सर्व अवयव जरी पूर्णावस्थेंत आहेत, तथापि पतिप्रत्यादेशामुळें म्लान व उदास झालेल्या स्त्रीप्रमाणें ही इमारत निस्तेज, रूक्ष व अनुकंपाजनक भासते. येथें मोठे असे तीन चौक आहेत, त्यांस निरनिराळीं नांवें आहेत. या इमारतींतील सर्व दालनें ठरलेल्या क्रमाप्रमाणें दाखविण्यांत येतात. प्रवेश झाल्यानंतर एक अनेक स्तंभविभूषित असा दीर्घ मार्ग आहे. त्यामधून गेलें ह्मणजे एक विस्तीर्ण सोपानपरंपरेच्या पायथ्याशीं आपण जातों. या सोपानाची संज्ञा ' किंग्स ग्रान्ड स्टेअरकेस ' अशी आहे. या मार्गानें राजमहालांत प्रवेश होतो. या जिन्याच्या बाजूच्या भिंतीवर व छतावर पौराणिक व काल्पनिक अशा देवतांचीं चित्रें आहेत. हीं चित्रें प्रसिद्ध चित्रकार व्हेरिओ याच्या कारागिरीचे नमुने होत. चित्रकलेच्या आधुनिकपद्धतीप्रमाणें हीं सर्व चित्रें नापसंत ठरलीं आहेत. चित्रांशिवाय इतर अलंकारही अतिरिक्ततेच्या दोषास पात्र आहेत. औज्ज्वल्य, सौन्दर्य, व वैचित्र्य या सर्वांचा अतिरेक झालेला भासतो. हा प्रकार फ्रेंच तऱ्हेला अनुरूप झाला. दुसरा चार्लस व तिसरा वुइलियम या दोघांनीही या प्रकारास फार आश्रय दिला. जिना चढून वर गेलें ह्मणजे जें पहिलें दालन लागतें तेथें जो रखवालदार होता, तो पूर्वी हिंदुस्थानांत लष्करीखात्यांत होता. त्यानें मला फार अगत्य दाखविलें. या दालनांत भिंतीवर तऱ्हेतऱ्हेचीं शस्त्रास्त्रें व्यवस्थित रीतीनें लावून ठेविलीं आहेत. पुढें एकसारखीं राजे व राजपत्न्या यांचीं दालनें लागतात. हीं सर्व चित्रयवनिका (टापेस्ट्री) व तसबिरी यांनीं भरलेलीं आहेत. यांमध्यें दुसऱ्या चार्लस राजाच्या मेहेरबानींतल्या सुंदर स्त्रियांच्या तसबिरी आहेत. आलेक्झांडर दी ग्रेट या महावीराच्या चरित्रांतील कांहीं

मार्गाचें निदर्शक असें एक चित्र आहे व लखनौच्या बादशहा-चें एक चित्र आहे. एका दालनांत ॲान राणीचा व एकांत शार्लट राणीचा असे चिछानें आहेत. तिसऱ्या वुइलियमच्या तख्ताचा शिरोभाग एका स्थलीं आहे. एका दालनांत एक पुरातन घड्याळ आहे. त्यास वर्षांतून एक वेळ किल्ली दिली ह्मणजे पुरतें. शेवटीं एक लांब दालन लागतें. त्याच्या एका भिंतीवर एक सलग चित्रपरंपरा आहे. सीझरचा विजय व तत्संबंधानें रोम शहरांत निघालेली मिरवणूक हीं येथें फार सुरेख रीतीनें व यथाक्रम दाखविलेलीं आहेत. ही कारागिरी मॅन्टेग्ना नांवाच्या चित्रकाराची होय व मार्किस ऑफ मॅान्चुआ यांच्या इतर चित्रसंग्रहाबरोबर पहिल्या चार्लस राजानें हा चित्रपट खरेदी घेतला होता. चित्रांचे कांहीं भाग जीर्णत्वामुळें अस्पष्ट झाले आहेत. या सर्व पटावर काचेचें आवरण केलें आहे. या इमारतींत एक जंगी दिवाणखाना आहे. त्याची लांबी १०६ फूट व रुंदी ४० फूट व उंची ६० फूट आहे. याचें सर्व काम आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीत झालें. याचें छत फारच सुंदर व चमत्कारिक आहे. तें काष्टमय असून नतोन्नत असें आहे. या दिवाणखान्यांत ज्या चित्रयवनिका आहेत, त्यांवर आब्राहामच्या चरित्रांतील भाग निर्दिष्ट केले आहेत.

इमारतीच्या सर्व बाजूंस सुंदर उद्यानभूमिका आहेत. अग्रभागीं जें उद्यान आहे त्याची रचना फ्रेंच तऱ्हेची आहे व हें सर्वांत उत्तम आहे. एका बाजूस एक मोठा पाण्याचा कालवा आहे व एका बाजूनें टेम्स नदीचा प्रवाह चालला आहे. दक्षिणबाजूस एक फार प्राचीन द्राक्षवेल आहे. हा वेल १७६८ सालीं लाविला होता. हल्लीं त्याच्या बुंधाचा घेर ३८ इंच आहे व त्याच्या शाखासमूहाचा विस्तार १०० फूट आहे. यावर कधीं कधीं २५०० घड येतात असें सांगतात. प्रासादाच्या उत्तरेस एक कृत्रिम अरण्य आहे, त्यामध्यें मार्गांची अशी कांहीं व्यवस्था आहे कीं, आंत गेलेल्या मनुष्यास बाहेर येतां येत नाहीं. कालातिक्रम झाल्यामुळें मला हा द्राक्षाचा वेल व हें भ्रमोत्पादक अरण्य पहाण्यास सवड झाली नाहीं.

हा प्रासाद पहाण्यास रविवारीं लोकांची गर्दी अधिक असते;

कारण कीं या स्थलाखेरीज इतर कोणतेंही अशा प्रकारचें कर्मणुकीचें स्थल रविवारीं खुलें नसतें. हॅाम्टन कोर्ट, क्यूगार्डन व रिचमंड हीं स्थळें जवळ जवळ असल्याकारणानें हीं सर्व एका खेपेस पहाण्याचा लोकांचा रिवाज आहे.

परत जातांना विम्बल्डन व क्लापहामवरून व्हॉक्सहॉल स्टेशनावर उतरलों. हा प्रांत फार रमणीय आहे. सृष्टिसौन्दर्य व कृत्रिम रचना यांचें मिश्रण येथें फार दृग्गोचर होतें.

लॉ-कोर्ट.

तारीख २८ जुलई रोजीं दुपारीं आम्निबसमध्यें बसून मी 'न्यू-लॉ-कोर्ट' नांवाची इमारत पहाण्यास गेलों. ऑम्निबसमध्यें माझ्या शेजारीं एक १० वर्षांचा मुलगा बसला होता. त्याच्या चर्येवरून तो सभ्य व चाणाक्ष दिसला, ह्मणून त्याशीं मीं थोडें बोलणें सुरू केलें. या मुलाचा बाप मोलमजुरी करून पोट भरीत असे, परंतु कांहीं अपघातामुळें तो अपांग झाला, तेव्हां मुलास शाळा सोडून मोलमजुरी करणें जरूर पडलें. या मुलाला दरआठवड्यास सहा शिलिंग मिळत होते. याच्या सांगण्यावरून असें समजलें कीं, लंडनशहरांत मोलमजुरी करणाऱ्या मुलांस तीन शिलिंगांपासून आठ शिलिंग वेतन मिळतें. ऑम्निबसमध्यें बसण्यासाठीं पैसे कशाकरितां खर्च करावे ह्मणून मीं त्यास विचारिलें, तेव्हां त्यानें मला असें सांगितलें कीं, गाडीभाड्याचे पैसे त्याच्या यजमानानें दिले होते; कारण कीं, काम जरूरीचें होतें. तो मुलगा पगाराचे पैसे सर्व बापाजवळ देत असे. मात्र सहा पेन्स दरआठवड्यास ब्यांकेंत घालीत असे, दुसरे पैसे त्याच्या हाताशीं नसत. हा सर्व मजकूर ऐकून मला फार आश्चर्य वाटलें. एवढ्या वयाच्या मुलास अशा प्रकारच्या व्यवस्थितपणाची संवय फारच प्रशंसनीय होय ! असो.

हीं इमारत स्ट्रँड नांवाच्या रस्त्याच्या पूर्वेच्या टोंकास आहे. त्या रस्त्याकडील बाजूची लांबी पांचशें फूट आहे. इमारत विशाल आहे व तिचें बाह्यरूप शृंगारादि साधनांनीं अलंकृत करण्याचा यत्न केलेला आहे, परंतु माझ्या मतें हा सर्व प्रकार सौंदर्यपोषक न होतां सौंदर्यविघातक झाला आहे. इमारत नवीनच असल्याकारणानें तिच्यावर सर्वत्र साधारण जो

कृष्णवर्ण त्याचा पूर्ण संस्कार घडला नाहीं, परंतु यामुळें वि-रूपता अधिक भासते. १८८२ सालीं ही इमारत प्रथम उप-योगांत आणिली. हिच्यावर पाऊणकोट रुपये खर्च झाले आहेत. बाह्यरूपानें झालेला प्रेक्षकांचा प्रतिकूल ग्रह आभ्य-न्तररचना व व्यवस्था यांच्या योगानें निरस्त न होतां दृढ होतो. मध्यभागीं एक विस्तीर्ण दिवाणखाना आहे. याची लांबी २३८ फूट, रुंदी ४८ फूट, व उंची ८० फूट आहे. याची जमीन चित्रवर्णांच्या प्रस्तरखंडांची केलेली आहे. या दा-लनाशिवाय दुसरीं १९ दालनें आहेत. तेथें कोर्टाचें काम चाल-तें. शिवाय अधिकाऱ्यांचीं वगैरे पुष्कळ दालनें आहेत. सर्व ठिकाणीं प्रकाशाची कमतरता भासली. दोन तीन कोर्टांत जाऊन कांहीं वेळ उभा राहिलों; परंतु फारशी गंमत वाटली नाहीं, व तेथील व्यवस्था व प्रकार यांमुळें विशेष चमत्कार वाटला नाहीं. सर्व दालनांत प्रेक्षकांकरितां अलिंदभूमिका आहेत.

हॉटफील्ड हाउस.

तारीख २९ जुलई रोजीं सकाळीं मी मिस मॉनिंग बाईच्या भेटीस गेलों. लंडनशहरांतील आमच्या अल्पवासाची अखेर होत आली होती ह्मणून त्यांचा शेवटचा निरोप घ्यावा अशा उद्देशानें मी गेलों होतों. त्याच दिवशीं दोन प्रहरीं लंडनश-हरांत असलेल्या भारतीय विद्यार्थिजनांस लॉर्ड सॉल्सबरी यांचा 'हॉटफील्ड हाउस' नांवाचा वाडा दाखविण्याकरितां घेऊन जाण्याची तजवीज केली होती. सर्वांबरोबर मींही जावें अशी त्यांची इच्छा दिसल्यावरून मीं कबूल केलें. मुंबईच्या दोन स्नेह्यांचा त्यांनीं मला पत्ता सांगितल्यावरून मी त्यांच्याकडे गेलों व सर्वजण मिळून आह्मी नेमलेल्या वेळीं कि-ग्सक्रास स्टेशनावर दाखल झालों. तेथें मिस मॉनिंग व दुसऱ्या एक वृद्ध बाई अशा दोघी आह्मांस भेटल्या. आह्मी एकंदर १५ २० जण जमलों होतों. त्यांमध्यें कांहीं बंगालीबाबू, कांहीं मुस-लमान, कांहीं पारशी, व कांहीं वाणी होते. असा समाज मुंबई सोडल्यापासून मला दिसला नव्हता, ह्मणून मला फार आनंद झाला. सर्वजण एकाच तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत

बसलों व हॅटफील्ड स्टेशनावर उतरलों. येथें पोंचण्यास सुमार एक तास लागला. स्टेशनापासून वाडा फार लांब नव्हता ह्मणून आह्मी चालत गेलों. विस्तीर्ण भूमिकांच्या मध्यभागीं एका उंच चौथऱ्यावर हा प्रासाद अधिष्ठित आहे. ही इमारत सतराव्या शतकांत बांधलेली आहे. या इमारतीच्या जागीं पूर्वी एक राजवाडा होता व त्यांत इलिझाबेथ राणीस नजर कैदेंत ठेविलें होतें. मेरी राणी मरण पावल्याची खबर ज्या वेळेस इलिझाबेथ राणीस पोंचली त्या वेळेस ती उपवनांतील एका झाडाखालीं बसली होती. हें झाड हल्लीं विद्यमान नाहीं, परंतु त्याचें स्थल आह्मांस दाखविण्यांत आलें होतें. लॉर्ड सॉल्सबरी यांचे मूळ पुरुष सेसिल घराण्यांतील होत. या पुरुषास इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीत मोठा अधिकार होता व तेव्हांपासून आतांपर्यंत या घराण्याची मानमान्यता व संपत्ति मोठी आहे. तख्तनशीन राजाचे व राज्ञीचे पाय या प्रासादास प्रसंगवशात् लागत असतात व याची साक्ष त्यांच्या त्यांच्या नांवाची दालनें या ठिकाणीं आहेत यावरून मिळते. पहिला जेम्स, क्वीन ॲान, प्रिन्स आल्बर्ट व क्वीन व्हिक्टोरिया यांच्या नांवाचीं दालनें येथें आहेत. त्याचप्रमाणें लॉर्ड बीकन्सफील्ड यांच्या नांवाचेंही एक दालन आहे. आंग्ल राजकुलांतील स्त्रीपुरुषांच्या तसबिरी ठिकठिकाणीं लाविलेल्या आहेत. सर्व सामानसुमान व व्यवस्था उत्तम प्रकारची आहे, परंतु इमारत पुरातन असल्याकारणानें उज्ज्वल दिसत नाहीं. इमारतींतील दालनें पाहून आह्मी उपवनांत गेलों. तेथें उंच व प्रच्छाय अशा वृक्षांच्या विस्तीर्ण वीथिका होत्या, त्यांमधून मंदगतीनें मित्रांशीं संभाषण करीत फिरण्याची मोठी मौज वाटली. एकंदरीनें हा प्रसंग मला फार सुखदायक वाटला. कांहीं वेळ उपवनांत फिरून मंडळीनें विश्रांति घेतली व नंतर सर्वजण परत फिरलों. संध्याकाळच्या सुमारास लंडनशहरीं दाखल झालों. मी घरीं गेलों नाहीं. मुंबईच्या दोघां मित्रांबरोबर नार्थब्रुक क्लबमध्यें जाऊन तेथेंच रात्रीं दहा वाजेत तोंपर्यंत खेळण्यांत व करमणुकींत वेळ घालविला. येथें पांच सहा

सभासदच हजर होते. त्यांपैकीं कांहींनीं माझी थट्टा करण्याचा उपक्रम केला. त्यांस लंडनशहरांतील चैनबाजी चांगली मानवली होती व हिंदुस्थानांत परत येण्याचा विचार त्यांस मोठा कष्टावह भासे. त्यांची विशेष टीका माझ्या स्वदेशीय पोषाखावर होती. असो.

तारीख ३० जुलई रोजीं आह्मी रेडिंग येथील बिस्किट तयार करण्याचा कारखाना पहाण्यास गेलों. हंटले आणि पामर यांचा कारखाना सर्वत्र प्रसिद्ध आहे. यांपैकीं हंटले हे गृहस्थ हल्लीं विद्यमान नसून पामर साहेबांच्या हातांतच सर्व व्यवस्था व त्यांचीच मालकी आहे. रेडिंग हा गांव बराच मोठा असून त्याची मांडणी सुंदर आहे. स्वच्छता चांगली, रस्ते मोठे, इमारती सुरेख व सोयी सर्व प्रकारच्या आहेत. हें गांव आगगाडीच्या रस्त्यावर आहे. आह्मीं तेथें सकाळीं गेलों व दोन तासांत कारखाना पाहिला. तेथील सर्व क्रिया मनोरंजक आहेत. आरंभीं हा कारखाना कसा उपस्थित केला व त्याची प्रस्तुतची परिणतावस्था कशी प्राप्त झाली याबद्दलचा थोडासा वृत्तांत मालकांनीं आह्मास सांगितला व तो ऐकून आंग्ल लोकांविषयीं मला धन्यता वाटली व ते द्रव्यार्जन करितात तें त्यांच्या श्रमाचें व अकलेचें योग्य फल आहे असें वाटलें. आपल्या देशांत जी नानातऱ्हेची मिठाई खपते तिची यंत्रानें निष्पत्ति करण्याचा विचार कधीं कोणाच्या मनांत आला आहे काय? पण तो यावा कसा! आणि आमची अक्कल, आमचा उद्योग, आमचा परस्पर विश्वास हीं सर्वच नष्टप्राय झालीं आहेत, तेव्हां जें आहे तें ठीकच आहे असें ह्मणून स्वस्थ बसावें लागतें. असो.

हा कारखाना पाहून आह्मी स्टेशनावर परत आलों. कारखान्याचे मालक आह्मांस पोंचवण्यास आले होते. आमच्या महाराजांस एका गृहस्थाकडे आमंत्रण होतें ह्मणून ते आगगाडीनें पुढें गेले. मला लंडनास परत जावयाचें होतें, परंतु गाडीला अवकाश होता ह्मणून स्टेशनावर न बसतां पामरसाहेबांबरोबर परत गांवांत गेलों व जवळच एक पुस्तकालय होतें तेथें त्यांनीं मला सोडलें. हें पुस्तकालय सार्वजनिक होतें. तेथें

जाऊन पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचण्यास सर्वांस मुभा होती, व कोणासही पैसे द्यावे लागत नव्हते. अशा प्रकारच्या पुस्तकालयांस 'फ्री लायब्ररी' ह्मणतात, व अशा संस्था बहुतेक मोठमोठ्या गांवांत आहेत, व त्या उपस्थित होण्यास धार्मिक लोकांची परोपकारबुद्धि कारणभूत आहे. अशा कामाकरितां लाखों रुपये संपन्न लोकांनीं धर्मादाय केले आहेत. येथील सर्व व्यवस्था मला फार मौजेची वाटली. सर्वांस सर्व ठिकाणीं बसण्याची परवानगी असल्यामुळें सायंकाळीं एखादा यजमान व एखादा नोकर शेजारीं शेजारीं वर्तमानपत्रें वाचीत बसलेले पहाण्यास मिळावयाचे. या गोष्टीचें त्या देशांत मुळींच आश्चर्य नाहीं. अशा प्रकारच्या संस्था स्वतंत्रतेचे अंकुर जनपदांच्या मनांत उत्पन्न करण्यास साधनभूत होतात हें उघड आहे. या पुस्तकालयांत जो कारकून होता त्यास 'थिआसफी,' 'मेस्मेरिझम,' 'क्लुअरव्हायन्स' वगैरे गोष्टींचा नाद होता. त्यानें मला स्वतःच्या योगाभ्यासाबद्दल कांहीं गोष्टी सांगितल्या व कांहीं पुस्तकें वाचण्याविषयीं शिफारस केली. दृग्गतींत अशा वस्तु कांहीं विलक्षण शक्तीच्या योगानें आपल्यास दिसतात असें त्यानें मला सांगितलें. या सर्वांत तथ्य किती होतें, त्याचा प्रत्यय घेण्यास मला अवकाश नव्हता. त्या गृहस्थाच्या एकंदर तऱ्हेवरून ढोंग माजविण्याची त्याची इच्छा दिसली नाहीं; परंतु त्यास केवळ भ्रम झाला होता किंवा खरोखरीच त्यास कांहीं युक्ति प्राप्त झाली होती हें सांगणें कठीण आहे. गाडीचा वेळ होईतोंपर्यंत वेळ चांगला गेला. लंडनशहरांत परत येऊन एका 'शाकभोजनगृहांत' (व्हेजिटेरिअन रेस्टरान्ट) गेलों. येथें नोकरलोक बहुतेक बायका होत्या. खाण्याच्या पदार्थांत तुरीची डाळ, पावटे वगैरे धान्यें व भाजीपाला होता. तेथील व्यवस्था कशी असते हें पहाण्याचाच माझा हेतु होता व तो तेथील एका नोकराशीं संभाषण करण्यानें सिद्धीस गेला. अलीकडे मांसाशनाचा त्याग करणाऱ्या मंडळीचा एक स्वतंत्र पंथ निघाला आहे; तेव्हां अशा लोकांच्या सोयीसाठीं शहराच्या भिन्न भिन्न प्रांतीं अशीं भोजनगृहें काढण्यांत आलीं आहेत व

तीं चांगलीं चाललीं आहेत. 'मांस' या शब्दांत अंड्याचा समावेश होत नाहीं, हें पूर्वीं एकदां सांगितलेंच आहे. असो.

पुनरागमन.

तारीख १ आगस्टपासून २२ आगस्टपर्यंत.—आतां आमच्या लंडनशहरांतील अल्पवासाची अखेर झाली. उद्दिष्ट-कार्यक्रम बहुतेक पार पडला. ज्युबिलीमहोत्सवाचा अंत झाला. स्वदेशनिवर्तनाविषयीं उत्कंठा प्रादुर्भूत झाली. जुलई महिना संपला, पार्लमेंट बंद होण्याचा समय जवळ आला व सभासद बाहेरगांवीं जाऊन विश्रांतिकालाची संभावना करण्याच्या उद्योगास लागले. लंडनशहरांतील मौज अर्थात कमी झाली. स्वदेशीं परत जाण्याविषयींचा कथालाप कर्णमधुर भासूं लागला. इष्टमित्र, स्नेहीसोबती, व प्रिय बन्धुजन यांचा बहुत कालपर्यंत अंतरलेला सहवास पुनः प्राप्त होण्याची संधि जवळ आली ह्मणून चित्तवृत्ति चंचल झाली; विचारसागरांत नाना-तरंग उद्भूत झाले; आनंदलहरींत मन वारंवार निमग्न होऊं लागलें. अल्प सहवासानें झालेल्या मित्रांचा निरोप घेण्यांत, सर्व कामाची व्यवस्था लावण्यांत, बांधाबांधी व आटपाआटपी करण्यांत अखेरचे दिवस तेव्हांच निघून गेले. लॉर्ड क्रॉस साहेबांचा निरोप घेण्यास महाराज गेले तेव्हां मी बरोबर होतों. जोधपूर संस्थानाविषयीं इंग्लिश सरकारची आस्था व प्रेमबुद्धि महाराजांच्या सहवासानें वृद्धि पावली असें साहेब महशुकांनीं बोलून दाखविलें. हा शेवटचा प्रसंग मोठा समाधानकारक झाला.

पांचवी आगस्ट येऊन ठेपली. या दिवशीं सायंकालीं आमचें प्रयाण मुकरर झालें होतें. सर्व व्यवस्था यथास्थित लागली. आह्मी स्टेशनावर दाखल झालों. तेथें फिट्झरल्ड व ब्राडफर्ड साहेब आह्मांस पोंचविण्याकरितां आले होते. दुसरी कोणी मंडळी आली नव्हती. आमच्या सर्व मंडळीमध्यें लंडन-शहरांत राहण्याचा मला अधिक कंटाळा आला होता, ह्मणून मला लंडनशहर सोडण्यास बिलकुल वाईट वाटलें नाहीं. परत जातांना पारिस व इटली देशांतील शहरें पाहण्यास मिळतील अशी जी पूर्वीं आशा होती तिचा मात्र थेट जाण्याचा विचार

ठरल्यामुळें भंग झाला. थोरल्या महाराजांचें एकदम येण्याविषयीं पत्र आल्यामुळें आह्मांस मार्गामध्यें कालक्षेप करण्यास सवड राहिली नव्हती. अशा यात्रेचा प्रसंग वारंवार येत नाहीं, तेव्हां याच समयीं साधण्यासारखें असेल तेवढें साधेल तर बरें असें माझ्या मनांत येई; परंतु परतंत्रतेमुळें तसें झालें नाहीं. एक आठवड्याची अवधि मिळाली असती ह्मणजे वाटेंत स्विट्झर्लंड व इटलींतील मुख्य स्थळें पहातां आलीं असतीं; परंतु तदभावीं मार्गांत अग्निरथवेगानें जेवढें निरीक्षणसुख उपलब्ध झालें तेवढ्यावरच समाधान मानून घेणें भाग पडलें. असो.

आह्मीं तारीख ५ आगस्ट रोजीं सायंकाळीं साडेचार वाजतां लंडनशहर सोडलें, व शार्नक्लिफ नांवाचें एक लष्करी ठिकाण आहे, तेथें एका गृहस्थाचा निरोप घेण्यास गेलों. हें गांव अगदीं लहान आहे, व याच्या जवळपास खडूच्या खाणी आहेत. रस्त्यांत धूळ फार होती व आसमन्ताद्भागाचा प्रदेश रूक्ष दिसत होता. येथून रात्रीं डोव्हर येथें गेलों व तेथें आगबोटींत बसून कॅाले मुक्कामीं उतरलों. इंग्लिश चॅनलमध्यें वादळ नसून जलप्रवाह स्थिर व वातावरण शांत होतें. धक्क्याला आगबोट लागली, परंतु प्रकाश विपुल नसल्याकारणानें बरीच धांदल उडाली. आमचें सामान उतरण्यास कोणी मजूरदार मिळेनात. पुष्कळ लोक आमच्याजवळ येऊन जात व फ्रेंच भाषेंत कांहीं बडबड करीत. परंतु आह्मांस कांहींच उमज पडेना. अखेरीस असें ठरलें कीं कांहींजणांनीं सामानाजवळ उभे राहून कांहींनीं थोडें थोडें सामान घेऊन पुढें जावें. शेवटीं मी व महाराज राहिलेलीं दोन गांठोडीं घेऊन आगगाडीकडे चाललों तों वाटेंत एका माणसानें आमच्या हातांतील सामान हिसकावून घेतलें. मीं इंग्रजींत बरेंच वाक्पांडित्य चालविलें; परंतु कांहींएक उपयोग झाला नाहीं. आह्मी मनाई करावयास लागलों तों धक्काबुक्कीचा प्रसंग आला. आजूबाजूचे लोक आमचे विचित्र पोषाक पाहून आपसांत कांहीं कुजबुजत, परंतु आह्मांस मदत करण्यास कोणी जवळ येईना. अशा लट्ठालट्टींत आह्मी कस्टमच्या चौकींत गेलों. तेथील अधिकारीही आमची दाद घेईना. फ्रेंच राष्ट्राची सभ्यता, शिष्टाचार व दाक्षिण्य यांविषयीं मोठी

कीर्ति आहे; परंतु आमच्याशीं जें या प्रसंगीं त्या लोकांचें वर्तन घडलें, तें या कीर्तीचा लोप करण्यासारखें होतें. सर्व प्रवासामध्यें आमच्याशीं असा उच्छृंखलपणा कोणीं केला नव्हता. या सर्व कृत्यांत हाताला हात लागावा असा हेतु दिसला व तदनुरूप तजवीज करण्यासही मीं मागेंपुढें पाहिलें नसतें, परंतु मुळीं ते आमच्या बोलण्याकडे लक्षच देईनात व त्यांची भाषा आम्हांस समजेना, तेव्हां नाइलाज झाला. अखेरीस आमच्याबरोबरचे साहेब व ज्या डब्यांत आम्हांस बसावयाचें होतें त्या डब्याचा गार्ड हे तेथें आले तेव्हां सर्व समजूत झाली. असो.

मध्यरात्रीच्या सुमारास गाडी कॉलेहून निघाली. ज्या डब्यांत आह्मी बसलों होतों, त्यांत निजण्याची वगैरे सर्व सोय होती. त्याचप्रमाणें खाण्यापिण्याचीही सर्व तजवीज मध्यम प्रकारची होती. आह्मी पांचव्या तारखेस रात्रीं आगगाडींत बसलों, ते सातव्या तारखेस मध्यरात्रीचा समय उलटून गेल्यानंतर ब्रिंडिसी येथें उतरलों. सहाव्या तारखेस आह्मीं आल्पस पहाडामधून मार्गक्रमण केलें. स्वित्झर्लंड एका बाजूस पंधरा मैल दूर राहिलें होतें. अग्निरथांतून दृग्गोचर होत असलेली पर्वतशिखरांची व आसमन्ताद्भागच्या प्रदेशाची शोभा अवर्णनीय होती. पर्वताचे शिरोभाग सुंदर व उच्च वृक्षांनीं आवृत असल्याकारणानें, ते गगनचुंबन करितात कीं काय असा भास होत होता. कांहीं शृंगें मेघमंडलांनीं व्याप्त होतीं व त्यामुळें त्यांचीं अग्रें दृगतीत होतीं, व तीं आकाशविवरांत किती दूरपर्यंत गेलीं होतीं याची कल्पना करणें अशक्य होतें. पायथ्याशीं कुठें विस्तीर्ण सरोवरें व कुठें अल्प पल्वलें नेत्रांस आपल्या स्फटिकोपम जलपृष्ठाच्या अद्वितीय सौंदर्यानें आकर्षीत होतीं. त्यांच्या तीरप्रांतीं मूलापासून शिखरापर्यंत पल्लवयुक्त असे उत्तुंग वृक्ष होते, व पवनविकंपनानें त्यांचें होणारें चलन व त्यापासून उद्भूत होणारा मर्मर शब्द यांच्यायोगानें ते प्रेक्षकांस शिरश्चालनपूर्वक आव्हान करीत आहेत कीं काय असा भास होई. अशा नेत्रोत्सवाचा प्रत्यय घेतां घेतां सायंकालचा समय झाला. संध्याकालीन रविकिरणांच्या मंद तेजानें दृग्विषयास अधिक

शोभा आली. परंतु अल्प कालांतच हा अविरत नेत्रोत्सव रजनीतिमिरानें लुप्त होणार ह्मणून चित्त दुःखाकुल झालें. नैसर्गिक नियम अनुलंघनीय, हें तत्त्व साधारणदृष्ट्या सुखावह खरें, परंतु प्रस्तुत प्रसंगीं तें आह्मांस दुःखप्रद भासलें व रात्र न होतां हा रमणीय प्रदोषसमय आल्प्सपहाड संपेतोंपर्यंत राहील तर बरें असें वाटलें. असो. कल्पना आणि वस्तुस्थिति यांमध्यें अशा प्रकारचा विसंवाद प्रसंगोपात्त व्हावयाचाच. तेव्हां त्याबद्दल अधिक जल्पना करण्यांत अर्थ नाहीं. रात्र तर झालीच. नयनाभिराम असा दृगुत्सव अंधकारानें अंतरित झाला. शिशिरवातसंस्काराशिवाय पर्वतगामी मार्गाचा प्रत्यय देण्यास दुसरें साधन उरलें नाहीं. पण असें नव्हे. आणखी एक साधन होतें; त्याचा उल्लेख केला पाहिजे. पर्वतांमधून खोदलेलीं अशीं कांहीं विवरें होतीं व यांमधून गाडी गेली ह्मणजेही पर्वतगामी मार्गाचें स्मरण होई. एक विवर नऊ मैल लांबीचें होतें. या विवराच्या मध्यभागीं गाडी कांहीं कारणानें थोडा वेळ उभी राहिली, तेव्हां उतारू लोकांत बरीच चळवळ सुरू झाली. सर्वांचीं मनें थोडीबहुत शंकाकुल झालीं. परंतु ही अस्वस्थता फार वेळ राहिली नाहीं. थोड्या वेळांत हरकत दूर झाली व गाडी चालू झाली. याच रात्रीं गाडी इटली देशाच्या हद्दींत गेली, तेव्हां कस्टम अधिकाऱ्यांस दाखविण्याकरितां सर्व सामानसुमान बाहेर काढावें लागलें. अपरात्रीं अशा प्रकारचा त्रास फार दुस्सह होतो परंतु तो अनिवार्य आहे. तारीख ७ रोजीं सकाळीं नऊ वाजण्याचे सुमारास आह्मांस गाडी बदलावी लागली. आतां गाडीचा मार्ग बहुतेक आड्रिआटिक समुद्राच्या तीरावरून व समुद्राशीं समांतर होता, त्यामुळें सायंकालपर्यंत प्रवास सुखकर झाला. मार्गानें जो प्रदेश लागला तो एकसारखा सपाट होता. खेड्यापाड्यांतील व शहरांतील कांहीं घरें कवलारू दिसलीं, त्यामुळें हिंदुस्थानाची आठवण झाली. हवेचें मान, सूर्यप्रतापाचें तीव्रत्व, भूपृष्ठरचना इत्यादि इतर गोष्टींनींही हा प्रदेश भारतवर्षाशीं साम्य पावतो. स्टेशनावर जे लोक दृष्टीस पडत त्यांमधील स्त्रीवर्गाचे शिरोभाग बहुधा अनावृत असत व कांहींच्या मस्तकावर विरल अशा वस्त्रांचें आवरण

असे. ज्या ज्या लोकांची आमच्याकडे नजर जाई, ते ते लोक विस्मयाविष्ट होत व सकुतूहल आमच्याकडे पहात रहात. कांहीं कांहीं स्थलीं नग्न असा बालकगण समुद्रजलांत अवगाहन करून तीरप्रांतीं यथेच्छ क्रीडा करितांना दृष्टीस पडला त्यामुळें विशेष मौज वाटली. अशा प्रकारचें अवलोकन करीत करीत आह्मीं मार्ग क्रमिला तों संध्याकाळ झाली. याच सुमारास समुद्रतीर सोडून गाडीचा रस्ता आभ्यन्तरप्रदेशामधून चालला. प्रचंड वायुवेगानें भूपृष्ठावरील रजःकण वातावरणांत मिश्रित होऊन आमचा प्रवास दुःसावह करण्यास कारणीभूत झाले. प्रातःकालापासून अनुभविलेल्या आल्हादांत विरजण पडलें. वांटेनें कांहीं ओढे व नद्या लागल्या त्यांत जलाचा अभाव दृष्टिगोचर होत होता, त्यावरून वृष्टीची अपेक्षा व्यक्त होत होती. सायंकाल अतिक्रांत झाल्यानंतर कांहीं वेळानें सर्व शांत झालें व उतारू लोक आपापल्या शयनीं स्वस्थ झाले; परंतु ही स्वस्थता अल्पकालीन होती. मध्यरात्रीनंतर लौकरच गाडी ब्रिंडिसी येथें दाखल झाली, तेव्हां अग्निरथ सोडून नौकेचा आश्रय करणें जरूर झालें. अशा आडनीड वेळीं सामानसुमान घेऊन आगबोटीवर जावयाचें व तेथें सर्व लावालावी करावयाची ह्मणजे सर्व व्यापार कष्टमय हें सांगणें नकोच. धक्क्याला लागून 'तंजावर' नांवाची आगबोट होती तेथें सर्व असबाब नेण्यांत आला तो तपासून सर्व व्यवस्था लावण्यांत दोन तास गेले. पहांटेचे तीन वाजले तेव्हां सर्व ठाकठीक झालें. ही आगबोट लहान असून जुनी होती. विद्युद्वादनयंत्र वगैरे नव्या प्रकारच्या सर्व योजनांचा येथें अभाव होता. आमच्यासाठीं खालच्या मजल्यावरच्या खोल्या राखून ठेविल्या होत्या; परंतु त्या आह्मांस पसंत झाल्या नाहींत ह्मणून कप्तानास सांगून वरच्या मजल्यावरील खोल्या आह्मीं घेतल्या. उतारूंची गर्दी फार नव्हती ह्मणून असें करतां आलें. या रात्रीं दगदग फार झाली व झोंप स्वस्थ आली नाहीं यामुळें दुसरा दिवस वाईट गेला. आगबोटीवर आह्मी तीन दिवस काढले. भरतपूरचे कर्नल गंगाबक्ष, आग्र्याचे डाक्टर टायलर, मद्रासचे कर्नल टिलर्ड, मंबईचे व्हायडलसाहेब व त्यांची पत्नी इत्यादि

मंडळी आमच्या सहवासाला होती. हारव्हे नांवाचे एक व्यापारी गृहस्थ होते. त्यांचा माझा बराच परिचय झाला. हिंदुस्थानाची औद्योगिक स्थिति या विषयाची चर्चा बरीच झाली, परंतु माझ्या मतांचा व त्यांच्या मतांचा मेळ पडला नाहीं. या देशांतील उद्योगधंदे परिणतावस्थेंत आणण्याचा यत्न केला असतां सफळ होईल व तसें करण्याकडे सर्वांचें लक्ष लागलें पाहिजे हा माझा पूर्वपक्ष त्यांस संमत झाला नाहीं व त्यामुळें त्यांनीं तद्विषयक संभाषण सोडून दिलें. असो. आगबोट वाईट, उतारूंची संख्या थोडी, करमणुकीच्या सर्व प्रकारांचा अभाव, भूमध्यसमुद्राची प्रक्षुब्धावस्था, अशा कारणसमवायामुळें हे तीन दिवस दुरतिक्रम झाले.

तारीख ११ रोजीं पहांटेस आगबोट आलेक्झांड्रिआ बंदरांत येऊन पोंचली. धक्क्याला लागूनच आगगाडीचे डबे उभे होते. प्रातरुपहार आटपल्यानंतर सर्व उतारू आगगाडींत बसले. आगबोट बंदरांत आल्यानंतर कांहीं वेळानें फोटोग्राफ व दुसऱ्या कांहीं चमत्कारिक वस्तु विकणाऱ्या लोकांची गर्दी जमली. बोटीवरचे नोकर लोक त्यांस घालविण्याचा प्रयत्न करीत परंतु तो सफल होत नसे. एका बाजूनें खालीं उतरून दुसऱ्या बाजूनें वर चढण्याचा त्यांचा क्रम सुरू होताच. ज्या बाजूला आगबोट लागली होती तो भाग शहरापासून बराच दूर असावा असें अनुमान झालें; कारण कीं धक्क्यावरून शहर दिसण्यांत येत नव्हतें. कदाचित् शहराभोंवतील तटाचा कांहीं भाग दरम्यान आल्यामुळेंही असें झालें असेल.

सकाळीं दहा वाजण्याच्या सुमारास आह्मी आलेक्झांड्रियाहून निघालों ते सायंकाळीं सुएझ मुक्कामीं दाखल झालों. जातांना केरोस जाऊन तेथून आलेक्झांड्रियास गेलों होतों, परंतु तो प्रवास रात्रीं झाल्याकारणानें प्रदेश पहाण्यांत आला नव्हता. या खेपेस तो सर्व प्रदेश दिसला, परंतु दोन्ही प्रसंगीं 'सुएझ कनाल' दृष्टीस पडला नाहीं, यामुळें थोडेंसें वाईट वाटलें. आलेक्झांड्रियापासून सुएझपर्यंत जो प्रदेश पाहिला त्यापैकीं अर्धा भाग सुपीक असून त्यास पाटाच्या पाण्याचा पुरवठा होता व अर्धा भाग केवळ वालुकामय मरुभूमि होती. कांहीं

स्थलीं पाट फारच अरुंद असून त्यांतील पाणी गढूळ होतें. घरें बहुतेक मातीचीं असून त्यांचे शिरोभाग सपाट होते त्यामुळें खानदेशांतील माळवदाच्या घरांचा भास होई. आगगाडीच्या बाजूनें कुंपण नसून कोणासही लोहमार्गावरून इतस्ततः फिरण्याची मनाई दिसली नाहीं. हा प्रवास दिवसा घडल्यामुळें प्रदेश दृष्टिगोचर झाला खरा, परंतु भूपृष्ठापासून उडणारे असंख्य धूलिकण यांच्यायोगानें दुःसह पीडा झाली. जसजशी दुपार होत गेली तसतसा वायूचा वेग वाढत गेला व त्याच्या ओघाबरोबर रजःकणांचा समूह सर्व शरीरावर आक्रमण करूं लागला. कांचेचीं तावदानें लावावीं तर असह्य उष्मा होण्याचा संभव. धूळ झाडण्याच्या भरीस पडावें तर आक्रमणवेगाची बरोबरी करणें अशक्य होतें. अशा प्रसंगीं वस्त्रांवर, व अनावृत शरीरभागावर रजःकणांचा समुदाय वाढूं देण्यापलीकडे तोडच उरली नाहीं. दुःखांत सुख एवढेंच होतें कीं उन्हाच्या झळया मारीत नव्हत्या. वारा बराच गार होता व यामुळें उष्णतेचा उपशम होत होता. सुएझ येथें गाडी साडेसात वाजतां येऊन पोंचली. आगगाडींतून उतरून होडींत बसून आगबोटीवर चढेतोंपर्यंत दहा वाजण्याचा अजमास झाला. सुएझ बंदरावर आल्यानंतर आल्हादकारक अशी स्वच्छ वाऱ्याची झुळूक गात्रस्पर्श करूं लागली, तेव्हां दिवसभर झालेल्या त्रासाचा अंशतः अपनोद झाला; परंतु आगबोटीवर जाऊन कपडे बदलून हातपाय धुवीतोंपर्यंत स्वस्थता वाटली नाहीं. या आगबोटीचें नांव ' सुरत ' होतें. ही आगबोट जुनीच आहे व रुंदीच्या मानानें लांब अधिक आहे, त्यामुळें तरंगाकुल अशा प्रक्षुब्ध उदधिपीठावर तिला समता व स्थैर्य नसतें व त्यामुळें बराच त्रास होतो. व्यवस्था व सोय साधारण बरी होती. या आगबोटीवर आम्हांस ११ दिवस काढावे लागले. हे दिवस सुखानें गेले नाहींत. प्रतिदिवशीं कार्यक्रम ठरींव व एकसारखा असल्यामुळें, उतारूंची संख्या थोडी असल्यामुळें, व करमणुकीचा अभाव असल्यामुळें फार कंटाळा आला; व तशामध्यें समुद्र प्रशान्त नसल्याकारणानें बरेच हाल झाले. तांबड्या समुद्रांत उष्णतेची कमाल

झाली. दिवसा स्वस्थता नाहीं व रात्रीं झोंप नाहीं, असा क्रम एकसारखा तीन दिवस चालला. तारीख १४ रोजीं वादळ झालें. समुद्राच्या दोन्ही तीरांवरील सर्व प्रदेश वालुकामय झाला. हवा प्रथम अगदीं कुंद झाली व मागून जोराचा वारा सुटला. सूर्यप्रकाश बराच लुप्त झाला. पुरोभागीं, पश्चाद्भागीं व पार्श्वभागीं सर्वत्र एकसारखा प्रकार होऊन गेला. अशा स्थितींत दुसऱ्या आगबोटीशीं टक्कर होण्याचा संभव फार. असे प्रकार घडल्याचे दाखलेही आहेत व या समुद्रांत भग्न नौकांचे अवशेष कांहीं स्थळीं दृष्टिगोचरही होतात. अशा प्रसंगीं उतारू लोकांत थोडा संभ्रम उत्पन्न झाल्यास फारसें नवल नाहीं. जहाजाचे कप्तान फारच व्यवस्थित, हुषार व सावध होते, तेव्हां त्यांच्यावर सर्वांची भिस्त होती. ईश्वरकृपेनें कांहींच विघ्न उपस्थित झालें नाहीं. वायुवेगानें नौकेचें आन्दोलन अतिशय होत होतें, त्यामुळें मात्र कांहीं लोकांस त्रास झाला. या पलीकडे दुःखावह असा कांहीं परिणाम झाला नाहीं.

तारीख १६ रोजीं सकाळीं साडेनऊ वाजतां आह्मी एडन येथें येऊन पोंचलों. येथें समुद्र शांत असून हवा थंड होती, यामुळें मनाला फार स्वस्थता वाटली व मुंबईपर्यंत अशीच अनुकूल स्थिति राहिल्यास प्रवासाची अखेर चांगली होईल असें वाटलें. एडनबंदरांतील सर्व प्रकार पूर्ववर्णनानुरूपच होता. मात्र त्याच वेळीं दुसरी एक आगबोट बंदरांत असल्यामुळें आमच्या आगबोटीवर माल विकणारांची गर्दी फार नव्हती. साडेतीन वाजण्याच्या सुमारास आह्मी एडन सोडलें. जसजशी आगबोट अरसमुद्रांत दाखल होऊं लागली, तसतसा प्रबल वायुवेगाचा प्रत्यय येत चालला. नारळी पौर्णिमा होऊन गेली होती तेव्हां समुद्राच्या क्षोभाचा उपशम कांहीं अंशीं तरी झाला असेल अशी आमची कल्पना होती, परंतु तसा अनुभव आला नाहीं. दोन तीन दिवस आगबोट फारच हालली व त्यामुळें त्रास फार झाला. एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे आगबोट इतकी कले कीं, खोल्यांतील सर्व सामान एका टोंकाकडून दुसऱ्या टोंकाकडे गडबडत जाई. खाण्याच्या मेजावरील कांचेचीं भांडीं

सर्व पडून फुटलीं. भांडीं ठेवण्यासाठीं लांकडी ठोकळे केलेले होते तरी त्यांसकट भांडीं उलटून पडत. मला खोलींतून बाहेर पडण्याची सोय नव्हती, व खोलींत बसून अस्वस्थता अधिक होत होती. बाजूच्या खिडक्यांतून पाणी आंत येई म्हणून त्या खिडक्या लावून घेतल्या होत्या, तेव्हां स्वच्छ हवा येण्याची बंद झाली. जेवणाखाणाचेही हालच. उठून बसण्याची पंचाईत. सर्व प्रवासांत झाले नाहींत असे हाल अखेरच्या दिवसांत झाले, याबद्दल विशेषच वाईट वाटलें.

असा प्रकार तारीख १७ पासून १९ पर्यंत झाला. तारीख २० रोजीं हवा अंमळ निवळली. समुद्रानें उग्र रूपाचा त्याग करून सौम्यतेचें अवलंबन केलें. मी खोली सोडून वर मोकळ्या हवेंत गेल्यानें मला हुषारी वाटली. चित्ताला समाधान प्राप्त झालें, मुंबईच्या बंदरांत पोंचण्याविषयींची उत्कंठा वृद्धिंगत झाली, व म्हणूनच दिवस मोठे व कंटाळवाणे वाटूं लागले. एक दिवस संध्याकाळीं पाऊस लागला, परंतु तो विशेष जोराचा नव्हता.

या जगांत सर्व गोष्टींस अंत आहे हें समाधानकारक आहे. नाहीं तर शरीरयात्रा केवळ कष्टमय झाली असती. मनुष्यमात्रास सुखाचें अवसान व्हावें असें वाटत नाहीं; परंतु ही समजूत भ्रममूलक आहे. अविरत सुखाचा अनुभव येईल तर त्या सुखाचा वास्तविक आस्वाद नाहींसा होईल. दुःखानें सुख अंतरित झालें म्हणजे त्या सुखाची खरी मातब्बरी कळते. त्याचप्रमाणें सतत दुःख होईल तर चित्तवृत्तीस अनभिमत असें औदासीन्य प्राप्त होईल; व त्यायोगानें ऐहिक व्यवहारांचा व्हावा तसा निर्वाह होणार नाहीं. दुःखाचा अंत होऊन सुखप्राप्ति झाली ह्मणजे मनोवृत्ति उल्लसित होते; नष्टप्राय झालेली कार्यक्षमता पुनरुद्भूत होते व जगांतील सर्व व्यापाराविषयीं आस्था वाटते. असो. माझी तत्कालीन मानसिक स्थिति फार विलक्षण होती. उत्कंठेची पराकाष्ठा झाली होती. अखेरचे दिवस संन्निध आलेल्या प्रियजनसमागमाविषयीं काल्पनिक आनंदतरंगांत विहार करण्यांत घालवावयाचे; त्यास प्रत्यवाय आल्याकारणानें चित्तास उद्विग्नता प्राप्त झाली व या उद्वेगाचा अंत

केव्हां होईल असें झालें. वर निर्दिष्ट केलेल्या तत्वाप्रमाणें त्याचा अंत व्हावयाचा होता खचित; परंतु त्याविषयीं त्यावेळीं पक्का भरंवसा वाटला नाहीं. न जाणों, दुसरा कांहीं अंतराय प्रादुर्भूत होईल. चित्त अस्वस्थ असलें ह्मणजे चांगल्या कल्पना मनांत येत नाहींत; याचा सर्वांस अनुभव असेलच. असो. हें सर्व कल्पनेचें राज्य झालें. याचा अंमल वस्तुस्थितीवर तिलमात्रही घडला नाहीं हें सांगणें नकोच. माझ्या कल्पनेमुळें नौकेचा वेग अधिक झाला नाहीं व शिथिलही झाला नाहीं. कालाची गतीही अबाधितच राहिली. कल्पनांचें काहूर माझ्या मनांतच जीर्ण झालें. तारीख २२ रोजीं मध्यरात्रीच्या सुमारास कुलाब्यावरील उज्ज्वल दीप दृष्टिगोचर झाला. जो दीप माझ्या स्नेह्यांच्या आग्रहास्तव गमनसमयीं मार्गदर्शक झाला होता असें या प्रवासवृत्ताच्या आरंभीं ह्मटलें आहे, तोच प्रदीप प्रत्यागमनसमयीं आल्हाद व आश्वासन देण्यास सिद्ध आहे असें पाहून अत्यंत समाधान वाटलें. बंदरांत दाखल होण्यास सुमारें आणखी दोन तास लागले. तारीख २३ रोजीं पहांटेस दोन वाजतां आगबोटीनें नांगर टाकिला. सर्व रात्रभर झोंप लागली नाहीं. अपरात्रीं बंदरांत दाखल झाल्याकारणानें सूर्योदयापूर्वी उतरण्यास सवड नव्हती. प्रातःकाल झाला. मी कपडे घालून वरच्या मजल्यावर गेलों. मुंबईबंदरांत येऊन पोंचलों याविषयीं खात्री झाली. स्वभूमीच्या दर्शनानें अवर्णनीय आल्हाद झाला. परिचित अशा दृग्विषयाच्या निरीक्षणानें चित्तवृत्ति समाधान पावल्या. सर वॉल्टर स्कॉट कवीनें वर्णन केल्याप्रमाणें स्वदेशप्रत्यागमनाविषयीं हृदय जळत होतें तें शांत झालें. महायात्रेचा प्रसंग निर्विघ्नपणें अवसित झाला म्हणून ईश्वराचा धन्यवाद केला. सामानसुमान काढणें, उतरविणें वगैरे कष्टमय व्यापार अति प्रिय भासले. होडींत बसून धक्क्यावर उतरलों. तिघेजण जिवलग मित्र उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करीत होते, त्यांची भेट झाली. परम संतोष झाला. ज्यांचा नित्य सहवास असावयाचा त्यांचें सुमार पांच महिन्यांत मुखावलोकनही शक्य झालें नाहीं, यामुळें पुनःसमागम अत्यंत सुखकारक झाला. मित्रांसहवर्तमान बिऱ्हाडीं गेलों. मुंबईतील

रस्ते, घरें वगैरे सर्वच प्रकार चमत्कारिक दिसला. रस्ते लहान व घरें क्षुद्र भासलीं. असो.

या प्रवासवृत्तकथनाचा शेवट झाला. वर्णनात्मक भाग संपला. आतां पूर्वी कबूल केल्याप्रमाणें आंग्ल लोकांचे आचारविचार, त्यांची सामाजिक स्थिति व आनुषंगिक इतर कांहीं गोष्टींबद्दल माझा ग्रह काय झाला, याबद्दल थोडेंसें सांगून हें बरेंच लांबलेलें आख्यान संपविण्याचा विचार आहे.

कोणत्याही राष्ट्रांतील समाजाचे जसे स्थूलदृष्ट्या उत्तम, मध्यम, व कनिष्ट असे तीन विभाग कल्पितां येतात, तसेंच आंग्ल समाजाचेही तीन मुख्य विभाग आहेत: (१) अमीर उमराव व इतर संपन्न लोक; (२) मध्यम स्थितींतील खाऊनपिऊन सुखी लोक; व (३) सामान्य प्रतीचे लोक. या तीनही वर्गांपैकीं मध्यवर्गांतील लोकांची सुस्थितीविषयीं ख्याति आहे. सुधारणेच्या परिणामाचें अकलुषित रूप, विद्यासंस्काराचा यथावत् परिपाक, शिष्टाचार, सद्गुण, दाक्षिण्य, उदारचरितत्व, मनःसंकोचराहित्य इत्यादि सर्व गुणगणांचा परिचय या स्थितींतील कुटुंबांच्या सहवासानें मिळतो असें सर्वतोमुखीं ऐकूं येतें. दुर्दैवानें हा परिचय मला झाला नाहीं. आमचा सहवास उच्चप्रतीच्या लोकांशीं होता, यामुळें मध्यम प्रतीच्या कुटुंबांतील शांति, सौख्य, व आनंद यांचें सावकाश परीक्षण करणें शक्य झालें नाहीं. शिवाय या स्थितीचें खरें स्वरूप लंडनशहरांत दिसण्यासारखें नसून बाह्य प्रदेशांतच त्याचा प्रत्यय घेतला पाहिजे. तसेंही करण्यास आम्हांस चांगली सवड झाली नाहीं; परंतु जो थोडा अनुभव आला तो समाधानकारक होता. या लोकांची रहाण्याची पद्धति अनुकरणीय आहे. या पद्धतीमध्यें यथावकाश सर्वांस सुलभ अशा प्रकारांचा समावेश केलेला आढळतो. घरांतील व्यवस्था, टापटीप, नीटनेटकेपणा अवर्णनीय असून त्यामध्यें अनवश्यक छानछोकीचा लेशही दिसण्यांत येत नाहीं. सामानसुमान ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें असावयाचें, पण तें स्वच्छ, उपयोगी, साधें व व्यवस्थित रीतीनें मांडलेलें असावयाचें. थोड्याबहुत चांगल्या तसबिरींनीं गृहाचे आभ्यंतर कक्ष सुशोभित असतात. प्रांगण-

भूमिकांमध्यें व वातायनाच्या पुरोभागीं फुलझाडें दिसण्यांत येतात. लहानसें पुस्तकालय असतें व विश्रांतीच्या वेळीं करमणूक होण्यासाठीं चित्रांचीं पुस्तकें व खेळण्याचे प्रकार यांची तजवीज असते. स्वयंपाकगृहांत व मागीलदारींही स्वच्छता व व्यवस्था प्रेक्षणीय असते. यजमान व यजमानीण बाई यांचें वर्तन कित्ता घेण्याजोगें असतें. व्यवहारदक्षता, कार्यक्षमता, उद्योगशीलता या गुणांचा परिचय त्यांच्या ठिकाणीं मिळत असल्यामुळें, गडीमाणसें व मुलेंबाळें यांसही तीच संवय लागते. स्त्रियांचा सर्व वेळ संसारसंबंधीं कृत्यांत व मुलाबाळांच्या व्यवस्थेंत जातो. शेजाऱ्यापाजाऱ्यांचा समाचार घेणें व अडलेल्यास यथाशक्ति मदत करणें, या सत्कृत्यांचाही त्यांच्या कार्यक्रमांत समावेश होतो. अशा प्रकारें यांची संसारयात्रा समाधानयुक्त व आनंदमय होते. जगाच्या रीतिप्रमाणें दुःखाचे प्रसंग कधींकधीं येत असतील, परंतु जी पद्धत एकदां ठरवून ठेविली तिचा अतिक्रम न करण्याविषयीं त्यांचा विशेष कटाक्ष असतो. सर्व गोष्टी नियमानें होत असल्याकारणानें त्या सुखप्रद होतात. सर्व प्रकारचें तारतम्य विचारानें ठरविलें असल्यामुळें सर्व क्रम अबाधित चालतो. संकट वाटण्याइतकी काटकसर नसावयाची व दिवाळें निघण्याइतकी चैनही नसावयाची. अशा तऱ्हेची मध्यम स्थितींतील लोकांची स्पृहणीय अवस्था आहे.

इंग्लंड देशांतून हिंदुस्थान देशांत कामधंद्यासंबंधानें जे लोक येतात त्यांपैकीं कांहींची गणना मध्यम स्थितीच्या वर्गांत होण्यासारखी असते. असें जरी आहे तथापि त्यांची जी रहाण्याची तऱ्हा व त्यांचें वर्तन येथें अनुभवास येतें त्यावरून तद्वर्गीय तत्रस्थ जनांविषयीं अनुमान करणें चुकीचें होणार आहे. याचीं कारणें अनेक आहेत. या देशांत ते केवळ विदेशीय असतात येवढेंच नव्हे, तर त्यांचा एतद्देशीयांशीं सेव्यसेवकभाव असतो, ह्मणून व्यवहाराच्या रीतीनें त्यांनीं तुटस असावें हें साहाजिक आहे; परंतु ज्या रीतीचें अवलंबन केवळ व्यवहारासाठीं प्रथम केलें जातें तीच रीति स्वाभाविक होऊन बसते व ह्मणूनच चित्तवृत्तीवर तिचा परिणाम विलक्षण होतो. उच्चत्वाची ऐट, कर्तृत्वाचा गर्व, शहाणपणाची घमेंड, यांचा प्रादु-

भाव त्यांच्या चित्तांत अल्प कालांत होतो व त्यांचें एतद्देशी-यांशीं वर्तन तदनुरूप होतें. दुसरें कारण असें कीं, स्वदेशांत असुलभ अशी सत्ता, सुखोपभोग, ऐषआराम व संपत्ति यांचा योग येथें घडून आल्यानें मनाचा समतोलपणा नाहींसा होतो; व प्रसंगीं उच्छृंखलपणाचें वर्तन त्यांच्याकडून होतें. ज्या स्त्रियांस घरीं नोकरचाकर वागविण्याचा कधीं प्रसंग नसतो त्यांस एकदम पांच दहा परिचारकांवर हुकुमत चालविण्याचा प्रसंग आला असतां त्यांच्या वृत्तींत बदल व्हावा हें मानवी स्वभावाशीं विसंवादक नव्हे. ज्यांस प्रादेशमात्र जागेंत सर्व व्यवहार करण्याची संवय त्यांस विस्तीर्ण अशा बंगल्यांत वा-वर करण्याची सवड मिळाल्यावर त्यांच्या मनाची स्थिति चमत्कारिक व्हावी, हें साहजिक आहे. त्याचप्रमाणें ज्यांस पादचाराचा किंवा ऑम्निबसाचा अभ्यास त्यांस गाड्या, घोडे, व इतर लवाजम्याचें ऐश्वर्य प्राप्त झालें असतां उत्सेक होईल यांत कांहीं आश्चर्य नाहीं. या लोकांस येथें जितकी द्रव्य-प्राप्ति होते तितकी जरी इंग्लंड देशांत झाली, तरी इथल्या थाटानें त्यांस तेथें रहातां यावयाचें नाहीं; कारण कीं तेथें सर्वच गोष्टींची महार्घता. जें ऐश्वर्य या देशांत कामदार लोक भोगितात तें त्या देशांत केवळ अतिसंपन्न जनांसच सुलभ आहे. अशी जेथें स्थिति आहे तेथें वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें परिणाम ओघानें घडून येतात, व त्यांबद्दल त्या लोकांस दोष देणें माझ्या मतें वाजवी नाहीं. स्थितीचें परिवर्तन करून विचार केला तर आपल्याकडूनही तसेंच वर्तन होणार आहे. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, जी स्थिति येथें दृष्टिगोचर होते त्या स्थितीवरून तेथील स्थितीचें अनुमान करणें मोठें साहस आहे.

उच्चप्रतीच्या लोकांचा प्रकार निराळा आहे. या वर्गांतील बहुतेक लोक विद्याविभूषित असतात. परंतु संपत्तीचा अव-लेप, भाग्याचा उत्सेक व उच्चावस्थेचा मद यांच्यामुळें कांहींचें चित्तस्थैर्य नाहींसें होतें व त्यांस दुर्गुण जडतात. स्त्रियाही गृहव्यवस्थेविषयीं निष्काळजी व ऐषआराम व शरीरप्रसाधन यांत मग्न असतात. समाधानाशिवाय या जगांत सुख नाहीं

व चैनबाजींत कधींच समाधान नाहीं ह्मणून या वर्गांतील लोकांस खऱ्या सुखाचा अनुभव मध्यस्थितींतील लोकांपेक्षां कमी असावा. आतां या वर्गापैकीं कांहीं लोक राजकीय व्यवहारांत मन घालतात व प्रजाजनांचें हित करण्यांत आपल्या कालाचा व्यय करितात हें खरें, परंतु मध्यवर्गीयांशीं तुलना केली असतां यांच्यांत उद्योगशीलता कमी असें माझें मत आहे. हें जें विधान मीं केलें तें वंशपरंपरागत सरदारी ज्यांस प्राप्त झाली आहे त्यांस मुख्यत्वेंकरून लागू आहे. इंग्लंडांत असा नियम आहे कीं, वडील मुलाशिवाय इतर कोणासही सरदारीचा किताब व आनुषंगिक जहागीर व स्थावर मालमत्ता हीं प्राप्त होत नाहीं. या नियमामुळें कांहीं घराण्यांतील वडील मुलगे व्यसनासक्त व उद्योगपराङ्मुख निघतात व बाकीच्या मुलांस निर्वाहासाठीं कामधंदा पत्करावा लागतो; परंतु सर्वांस लहानपणीं सारखें शिक्षण देण्यांत येतें ही गोष्ट मोठी महत्वाची आहे. या शिक्षणाचा उपयोग ज्याच्या त्याच्या स्थितीप्रमाणें इच्छानुरूप होण्यासारखा असतो. विद्येचा संस्कार झाल्याकारणानें सर्वांस अभिमत अशा व्यवसायांचें अवलंबन करण्यास सवड सांपडते. वडील मुलास कामधंदा करण्याची गरज नसली तरी सार्वजनिक हितासंबंधीं उद्योग करण्याची प्रवृत्ति विद्येमुळेंच होते, व इतरांस तिचा उपयोग त्याच्या व्यवसायांत होतो. या वर्गांतील लोकांची आपल्या देशांतील जहागीरदार व संस्थानिक मंडळीशीं तुलना केली असतां अस्मान व जमीन यांचें अंतर दिसण्यांत येईल. याचें कारण एकपक्षीं विद्यासंस्कार व दुसऱ्यापक्षीं त्याचा अभाव हें होय. आपल्या देशांत विद्यार्जन व सेवाधर्म यांचा परस्पर अविच्छेद्य संबंध कल्पिलेला आहे. ज्यांस पोटापाण्याची सोय असेल त्यांनीं विद्यार्जन करण्याचें कारण नाहीं, कारण कीं त्यांस चाकरी करण्याची गरज नाहीं, अशा प्रकारचें विधान करण्याची आपल्या लोकांस संवय पडली आहे. हळू हळू हा ग्रह कमी होत चालला आहे खरा, परंतु तो अगदीं नाहींसा होण्यास पुष्कळ काल लागेल हें खचित आहे.

या वर्गांतील लोकांची संपत्ति विपुल आहे, व कांहीं लो-

कांचें वार्षिक उत्पन्न लाखों रुपये आहे. याच मानानें त्यांचे ऐषआराम, आदरातिथ्य, व रहाण्याची तऱ्हा हे प्रकार आहेत.

राहिलेला तिसरा वर्ग सामान्य लोकांचा. या वर्गांतही दोन प्रकार आहेत. एका प्रकारचे लोक मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा निर्वाह करितात व सुखांत व समाधानांत दिवस काढतात. या वर्गांतील लोकांपैकीं कांहीं कुटुंबांची स्थिति प्रेक्षणीय असते. घरांतील यजमानीण सडासंमार्जनापासून तों मुलांच्या शिक्षणापर्यंत सर्व कार्यभार स्वतः उरकते. घरांत स्वच्छता, टापटीप व नीटनेटकेपणा राखण्याविषयीं तिची फार खबरदारी असते. मुलांचे व नवऱ्याचे कपडे दुरुस्त करणें व ते नीट ठेवणें हीं कामेंही तिच्या हातून होत असतात. स्वतः सैंपाक करून नंतर मुलांबाळांसह आपल्या नवऱ्याच्या पंक्तीस भोजनास बसण्याचीही तिची तयारी असते. एकंदरीनें सर्व प्रकार समाधानकारक असतो. उत्पन्नापैकीं कांहीं अंश शिलकेंत ठेवून विशेष प्रसंगासाठीं तजवीज केलेली असते. याच वर्गांतील दुसऱ्या प्रकारच्या लोकांची स्थिति शोचनीय आहे. व्यसनासक्ति, उद्योगपराङ्मुखता, व यांचा परिणाम जें दारिद्र्य यांच्या योगानें यांची स्थिति केवळ अनुकंपार्ह आहे. यांची रहाण्याची तऱ्हा गलिच्छ, वस्त्रें मलिन व छिद्रशतांनीं अलंकृत; यांच्या शरीरांस स्नानाचा संस्कार नाहीं व केशांस फणीचा योग नाहीं; यांची मुद्रा क्रूर व भयोत्पादक; खाण्यास पोटभर अन्न न मिळाल्यानें व शरीराच्छादनास अवश्यक वस्त्रें सुलभ नसल्यामुळें इंग्लंडदेशासारख्या शीत प्रदेशांत या लोकांचे हाल फार होतात. यांच्या दुःखनिवारणासाठीं पुष्कळ तजविजी योजिल्या आहेत व विशेष कायदेही केले आहेत, परंतु यांच्या विपत्तीचा उपशम झालेला दिसत नाहीं. बाहेरगांवापेक्षां खुद्द लंडनशहरांत जे या प्रकारचे लोक आहेत त्यांची दशा अतिशोचनीय आहे. बाहेरगांवापेक्षां कामधंद्याला लंडनशहरांत तेजी आहे खरी, परंतु कामधंदा नसल्यामुळें तेथें होणारे हाल अधिक आहेत. अन्नसामुग्रीची महार्घता व निवासस्थानाची दुर्मिलता यांच्यामुळें तेथें कामधंद्याशिवाय रहाणें कष्टावह होतें, व विपन्नावस्था प्राप्त झाली ह्मणजे चांगल्याची

बाईट, सुबुद्धाचीं दुर्बुद्ध, निमकहलालाचीं निमकहराम, अशीं माणसें होतात तद्देशीय अतिसंपन्न लोकांची संपत्ति जितकी कल्पनातीत आहे तितकेंच या लोकांचें दारिद्र्य व यांची दुर्दशा हीं अतर्क्य आहेत. असो.

अशा प्रकारचा समाज त्या देशांतला आहे. परदेशांत नवीन जाणाऱ्या मनुष्याचे पूर्वज्ञानाच्या योगानें कांहीं ग्रह ठरलेले असतात; परंतु प्रत्यक्ष अनुभव आला म्हणजे त्यांत बदल होणें साहजिक आहे. आतां या मतपरिवर्तनाचे दोन प्रकार आढळून येतात. तरुण जनांचीं मनें कोणत्याही प्रकारच्या नूतन संस्कारास अधिक पात्र असल्याकारणानें त्यांची मति प्रथमदर्शनींच गुंग होऊन जाते व त्यांस आंग्ल लोकांचे आचारविचार, त्यांचे पोषाक, त्यांच्या स्त्रियांचा पेहराव, त्यांची कुटुंबव्यवस्था, त्यांचे संप्रदाय हे सर्वच अनुकरणीय भासतात व त्यांचें अवलंबन करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते. हाच संस्कार दृढ होत गेला ह्मणजे फारच अहितकारक असे परिणाम घडतात. स्वदेशविषयक आस्था शिथिल होते, ज्ञातिबांधवांचे, आप्तजनांचे व इष्टमित्रांचे संबंध अनभिमत होतात, त्यांचे आईबाप त्यांस शोभेनासे होतात, त्यांच्या धर्मपत्नीचा सहवास त्यांस दुःसह होतो, पूर्वीची रहाण्याची तऱ्हा त्यांस कष्टावह भासते. हा परिणाम जरी श्रेयस्कर नाहीं तरी साहजिक आहे. परंतु या लोकांच्या मतांच्या धोरणानें तेथील स्थितीविषयीं अभिप्राय ठरविणें जितकें चुकीचें आहे तितकेंच तद्देशीयांचें सर्व कांहीं दूषणीय आहे असें प्रतिपादन करणें भ्रममूलक आहे. त्या लोकांच्या स्थितींत गुणदोषांचें तारतम्य आहेच; कांहीं गुण किंवा दोष हे तत्वतः तसे नसून केवळ आचारभेदामुळें आपणांस तसे भासण्याचा संभव आहे; तेव्हां कायमचें मत ठरवितांना आपणास या गोष्टीचा विशेष विचार केला पाहिजे. कोणत्याही दोन देशांच्या स्थितींची तुलना करतांना दोन्ही ठिकाणच्या एकंदर परिस्थितीचें पर्यालोचन न करितां केवळ एकेक बाबतींतच तुलना करून प्रशस्याप्रशस्यतेचा निर्णय करणें हें जितकें दोषास्पद तितकेंच अनर्थमूलक आहे. तो देशसुधारणेच्या उच्च कोटीप्रत पोंचलेला आहे हें निर्विवाद

आहे. सुधारणा सर्वांसच श्रेयस्कर असली पाहिजे ह्मणून त्या देशांत प्रतीयमान होत असलेले सुधारणेचे सर्वच प्रकार जशाचे तसे या देशांत सुरू केले असतां जशीं मधुर फळें त्या वृक्षास त्या देशांत आलीं तशींच येथेंही येतील अशी आशा करणें खेदास कारण होणार आहे. सुधारणा चांगली खरी, परंतु देशकालानुरोधानेंच तिचें वळण पाहिजे. आंग्ल राष्ट्राचा प्रथम आपल्यास सहवास घडल्यानंतर व पाश्चात्य शास्त्रीय ग्रंथांचें अवलोकन आपल्या लोकांनीं प्रथम केल्यानंतर एकदम तिकडील सर्व प्रकार या देशांत सुरू व्हावे असें त्यांस वाटूं लागलें व तसें न झाल्यास आपली धडगत नाहीं अशी सर्वत्र चर्चा सुरू झाली; परंतु कालक्रमानें या कोटिक्रमांतील दोष लक्षांत येऊं लागला आहे. असो.

त्या देशांत स्त्रियांस स्वतंत्रता फार आहे, अविवाहित स्त्रिया पुष्कळ आहेत, परिचारकवर्गांत स्त्रियांचा भरणा अधिक आहे, वगैरे गोष्टींवरून तेथें व्यभिचार अधिक असलाच पाहिजे असें विधान नेहमीं करण्यांत येतें. परंतु सूक्ष्म विचाराअंतीं यांत भ्रमाचा भाग पुष्कळ आहे. त्या व या देशाची नीतिभ्रष्टतेच्या बाबतींत पायरी वर व खालीं ठरवणें हें काम दुष्कर व साहसाचें आहे. माझा स्वतःचा ग्रह या बाबतींत वर निर्दिष्ट केलेल्या विधानाप्रमाणेंच होता. मला असें वाटत होतें कीं, नेहमीं स्त्रियांशीं प्रसंग असणें अनर्थावह असलेंच पाहिजे; परंतु अनुभवानें हा ग्रह अंशतः खोटा ठरला. याचें मुख्य कारण असें कीं, ज्या गोष्टीचा मोठा बाऊ वाटतो तीच गोष्ट नेहमींच्या प्रचारांतली झाली ह्मणजे तिच्या संबंधानें पूर्वी उद्भूत होणाऱ्या मनोवृत्ति लय पावतात. आपल्या देशांत स्त्रियांचा सहवास कमी या योगानें त्यांच्या समागमापासून अनुभवास येणारें मनश्चांचल्य जेथें त्यांची अविरत संगति तेथें प्रत्ययास येत नाहीं. दुसरें कारण असें कीं, विद्येचा संस्कार व स्वतंत्रतेचा आस्वाद यांच्या योगानें येथील स्त्रिया जशा अधिक धीट व शहाण्या तशा निग्रही व स्वमतावलंबी आहेत. स्वतंत्रतेमुळें जितकी व्यभिचाराची सवलत असते तितकीच तत्पराङ्मुख होण्याविषयीं त्यांस खबरदारी ठेवतां येते. या प्रतिपादनावरून असें

अनुमान काढावयाचें नाहीं कीं, तेथें व्यभिचार मुळींच नाहीं. सांगण्याचा मुद्दा येवढाच कीं, त्याचा अव्याहत प्रचार असेल अशी जी आपली कल्पना होते ती चुकीची आहे. आपल्या देशांत स्त्रियांस विद्येचा संस्कार नाहीं व त्यांस स्वतंत्रता नाहीं ह्मणून त्यांस सुखाचा लेशही नाहीं हें विधान जितकें दोषास्पद आहे तितकेंच त्या देशांतील सर्व स्त्रिया व्यभिचारिणी आहेत असें ह्मणणें दोषास्पद होय. दोन्हीही विधानांत एकतर्फीपणाचा भाग फार आहे. तो काढून टाकून बाकी जें अनुमान निघेल तें माझ्या मतें वस्तुस्थितीशीं बरेंच संवादक होईल. आतां येवढें मात्र सांगितलें पाहिजे कीं, लंडनशहरांत व्यभिचाराचा जो उघड प्रकार आढळतो त्याचा मासला आपल्या देशांत कोठेंच आढळणार नाहीं. कांहीं मोठमोठ्या रस्त्यांवरून व बगीच्यांतून व्यभिचारिणी स्त्रिया पुरुषजनांस लोभविण्यासाठीं संध्याकाळपासून तों पहांटेपर्यंत फिरतांना आढळतात. हा प्रकार तद्देशीयांस अभिमत आहे असें नाहीं, परंतु त्याचा प्रतीकार करणें अजूनपर्यंत शक्य झालें नाहीं. ही गोष्ट वैदेशिकास फारच विस्मयकारक वाटते, परंतु येवढ्यावरूनच सर्व राष्ट्राच्या नीतिमत्तेविषयीं निर्णय ठरविणें दोषास्पद होईल. गांव आहे तेथें महारवाडा आहेच, हें सर्वांसच कबूल केलें पाहिजे; परंतु या गोष्टीची अधिक मीमांसा करण्यापासून फलनिष्पत्ति कांहींच होणार नाहीं. विद्याचारसंपन्न अशा कांहीं स्त्रिया व्यभिचारिणी निघाल्या ह्मणून सर्व दोष विद्येकडे देणें हें, जो मनाची समता ठेवून कोणत्याही गोष्टीचा विचार करतो त्यास गर्हणीय वाटल्यावांचून रहाणार नाहीं. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें आचारभेदामुळें त्या लोकांचे पुष्कळ व्यवहार आपणास अनर्थमूलक भासतात, परंतु वस्तुतः ते तसे नसण्याचा संभव आहे हें नेहमीं लक्षांत आणून नंतर या विषयासंबंधानें मत ठरविण्याचें काम सर्वांनीं करावें येवढेंच सांगण्याचा माझा हेतु आहे.

आतां प्रौढवयस्क परंतु अविवाहित अशा स्त्रिया रहाणें श्रेयस्कर आहे किंवा नाहीं हा प्रश्न बिकट आहे. जे आचारविचार आपल्या हाडामांसाला खिळले आहेत त्यांच्या धोरणानें

पाहिलें ह्मणजे आपल्यास ही गोष्ट अप्रशस्त वाटणें यथार्थ आहे, परंतु त्या देशांतही या मताचे लोक पुष्कळ सांपडतात ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. विवाह करणें बरें किंवा वाईट ह्या प्रश्नाची गेल्या दोन तीन वर्षांत त्या देशांत बरीच चर्चा झाली आहे व तिचें पर्यालोचन केलें असतां असें लक्षांत येण्यासारखें आहे कीं, प्रौढवयांत अविवाहित रहाणें अप्रशस्त, असें त्या देशांतही पुष्कळ लोकांस वाटतें. कित्येक स्त्रियांस विवाह करणेंच अनभिमत असतें व कित्येकांस योग्य पति न मिळाल्यामुळेंच कुमारिकाव्रत पत्करावें लागतें. त्या देशांत पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या जास्त आहे असें ह्मणतात व हें खरें असेल तर पुष्कळ स्त्रिया भिन्न भिन्न कारणांमुळें अविवाहित रहाव्या हें साहजिक आहे. त्या देशांत स्वतंत्रतेचा सर्वांस हव्यास आहे. त्यांची स्वतंत्रतेविषयीं निरति प्रसिद्ध आहे, व राजकीयदृष्ट्या या गुणाचें जितकें प्राबल्य असेल तितकें श्लाघ्य आहे. परंतु सामाजिक विषयासंबंधानें या गुणाची प्रतिष्ठा किती राखावी हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आह्मी लंडनमध्यें रहात असतां आमच्या येथें एक मोलकरीण होती ती स्वभावानें फार गरीब, कामांत दक्ष, चालचलणुकींत निर्मळ अशी होती. तिच्या धंद्याच्या स्त्रियांविषयीं कांहीं माहिती मिळवावी ह्मणून मीं एक दिवस तिच्याशीं संभाषणाचा उपक्रम केला. बोलतां बोलतां स्त्रीजातीस विवाह इष्ट का अनिष्ट हा प्रश्न निघाला; तेव्हां त्या बाईनें स्पष्टपणें सांगितलें कीं, विवाह करून आपली स्वतंत्रता घालविण्याचा आपला विचार नाहीं. विवाह केला असतां नवऱ्याच्या मर्जीप्रमाणें वागावें लागणार, व तो दुष्ट स्वभावाचा असल्यास हाल भोगावे लागणार, त्यापेक्षां अविवाहित राहणें बेहेत्तर आहे. हें उत्तर ऐकून मला मोठा विस्मय वाटला. अशा प्रकारच्या विचारांचा प्रचार असणें हें समाजास कितपत हितावह आहे हें सांगणें सोपें नाहीं. स्वतंत्रतेचें खूळ इतक्या लांब पल्ल्यावर नेल्यास या जगांतील पुष्कळ व्यवहार बंद पडतील व ज्या विद्येच्या प्रसाराचा हा परिणाम त्या विद्येच्या दृष्टीनें संमत असे व्यापार

कुंठित होतील. अशा प्रकारची स्थिति सुखावह नाहीं व तिचा प्रतीकार करणें आवश्यक आहे. असो.

आंग्लसमाजासंबंधानें लक्षांत येण्यासारखी दुसरी ठळक गोष्ट संप्रदायप्राबल्य. लहानसान व्यावहारिक गोष्टींपासून तों धर्मविषयक आचारापर्यंत संप्रदायाचें अवलंबन केलेलें दृष्टीस पडतें. भिन्न भिन्न देशांत भिन्न भिन्न आचार व चालीरीति असावयाच्याच. या चालीरीति व हे आचार प्रथम प्रचारांत येण्यास मुख्य कारण देशकालानुरूपता होय; परंतु क्रमानें हा निर्बंध सुटत जाऊन तत्वाच्या ठिकाणीं केवळ उपचार आढळण्यांत येतो. थोड्याबहुत अंशानें अशी स्थिति सर्व देशांत दृष्टोत्पत्तीस येण्यासारखी आहे. असें आहे तर मग आंग्लसमाजासंबंधानें तद्विषयक विशेष विवरण करण्याचें प्रयोजन काय असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. याचें उत्तर असें आहे; आंग्लजानपदांचा व भारतीयजानपदांचा अविच्छेद्य असा संबंध घडला आहे. या संबंधामुळें तद्देशीय लोकांचा संसर्ग एतद्देशीयांशीं दिवसानुदिवस अधिक होत चालला आहे. राजकीय वर्चस्व, विद्यासंस्कार, कलानैपुण्य इत्यादि गोष्टी अनुकूल असल्यामुळें त्यांस जी श्रेष्ठता प्राप्त झाली आहे त्या श्रेष्ठतेच्या अनुरोधानें इतर बाबतींतही आपलें वर्चस्व मिरविण्याचा प्रकार वारंवार दृग्गोचर होतो. हा प्रकार कितपत सयुक्तिक आहे या गोष्टीची मीमांसा करणें अवश्यक आहे. ते लोक सुधारणादेवीच्या प्रसादास पात्र झाले आहेत. त्यांची उद्योगशीलता, कार्यनिष्ठा व द्रव्यार्जननैपुण्य हीं अवर्णनीय आहेत. त्यांचा अधिकार मोठा, त्यांची सत्ता जंगी, त्यांचें कर्तृत्व अतर्क्य, त्यांच्या आज्ञा अनुल्लंघ्य, त्यांची सद्दी चमत्कारिक, हें सर्व खरें, परंतु एवढ्यावरूनच त्यांच्या चालीरीति व त्यांचे आचार अनुकरणीय व आमचे त्याज्य असें ह्मणणें साहस आहे. आपलें तें सर्वच चांगलें व दुसऱ्याचें तें सर्वच वाईट, हा दुराग्रह जितका त्यांच्या संबंधानें दूषणार्ह तितकाच आमच्या संबंधानेंही आहे. आचाराच्या प्रशस्यताप्रशस्यतेबद्दल विचार करतांना फार सावधगिरी बाळगिली पाहिजे. जे आचार जेथें प्रचारांत आहेत त्यांचा विचार तद्देशीयांच्या दृष्टीनेंच केला

पाहिजे व नंतर त्यांवर आक्षेप काढणें वाजवी आहे. दोन्ही देशांच्या आचारांची व चालीरीतींची तुलना करून पहातां सांप्रदायिक व औपचारिक भाग त्या लोकांच्या रिवाजांत अधिक आहे असें माझें मत झालें. पुरुष व स्त्रिया यांच्या पोषाकांची योजना कांहीं बाबतींत सुखास अनुलक्षून नसून केवळ संप्रदायास अनुरूप आहे. त्यांची रहाण्याची तऱ्हा, त्यांचे एकमेकांस भेटण्याचे प्रकार या गोष्टीही पुष्कळ अंशीं औपचारिक आहेत. भोजनाचे निरनिराळे काल ठरविण्यांत देखील संप्रदायाचें प्राधान्य दिसण्यांत येतें. स्नानभोजनादि विधींत सुद्धां संप्रदायास अननुरूप अशा गोष्टी त्या लोकांस खपत नाहींत. लिहिणें, वाचणें, पत्रव्यवहार या बाबतींतही तोच प्रकार आहे. सुधारलेल्या लोकांस अशा प्रकारचें बंधन कसें सुखावह होत असेल याचा चमत्कार वाटण्यासारखा आहे. परंतु दृढ अभ्यासानें या सर्व गोष्टी त्यांच्या अंगवळणीं पडल्यासारख्या झाल्या आहेत व त्यांचें खरें स्वरूप त्यांच्या लक्षांत येत नाहीं; ह्मणूनच दुसऱ्या लोकांच्या आचारांवर टीका करण्याची त्यांची प्रवृत्ति होते.

प्रार्थना करणें, देवळांत जाणें वगैरे गोष्टींत देखील केवळ उपचार व संप्रदाय यांचा अनुभव येतो. दर रविवारीं बायकामुलांसुद्धां देवळांत जाण्याची चाल आहे. त्या चालीप्रमाणें आचरण अनुभवास येतें, व आपलीकडे धर्मश्रद्धा, भक्ति, किंवा योग यांचा प्रत्यय येत नाहीं. एकंदरीनें त्या देशांत प्रवृत्तिमार्गाचें अवलंबन जारीनें सुरू असल्याकारणानें निवृत्तिपक्षाचा स्वीकार केलेला आढळत नाहीं. आपल्या देशांत ज्याप्रमाणें भाविक लोकांचें यात्रेस जाणें व भजन करणें, साधू लोकांचा इंद्रियनिग्रह व योगाभ्यास, यतींचा संसारत्याग व ईश्वरप्राप्तीच्या साधनांचें अवलंबन, इत्यादि गोष्टी स्थलीं स्थलीं न्यूनाधिक मानानें दृष्टीस पडतात, तसा प्रकार त्या देशांत प्रत्ययास येत नाहीं. आपल्या लोकांस या गोष्टीचा विस्मय वाटणें साहजिक आहे. आपल्यामधील शंकराचार्यांसारख्या महापुरुषांचा यत्न संसारनिवृत्तीकडे घडल्याकारणानें इतर जनांची प्रवृत्ति तदनुरूप होणें साहजिक. हा प्रकार ऐहिकदृष्टीनें घातक आहे; परंतु

भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें प्रवृत्तिनिवृत्तिमार्गांचा मेळ घात-ला ह्मणजे सर्व सुसंगत होण्यास हरकत नाहीं. असो. इतकें सूचित कीं, पाश्चात्य लोकांत भक्ति, योग व वैराग्य यांविषयीं आस्था व परिश्रम नाहीं.

तिसरी गोष्ट त्या लोकांचें आपल्या लोकांशीं वर्तन. जे आंग्ल लोक या देशांत येतात त्यांचें एतद्देशीयांशीं वर्तन कोणत्या प्रकारचें असतें हें सांगण्याची अवश्यकता नाहीं.त्यांचें तसें वर्तन असण्या-चीं कारणें काय असावीं याविषयीं दिग्दर्शन पूर्वीं केलेलें आहे. आतां एतद्देशीय जे लोक त्या देशांत जातात त्यांच्याशीं आंग्ल लोकांचें कोणत्या प्रकारचें वर्तन असतें, त्यांच्याविषयीं त्यांचा काय ग्रह आहे, त्या लोकांस आपल्याविषयीं कितपत कळकळ आहे व त्यांस या देशाविषयीं माहिती कोणत्या प्रकारची असते याविषयीं थोडें विवेचन करूं.

मुंबई सोडतांना आगबोटीवर माझ्या परिचयाचे कोणी लोक नव्हते. एडन येथें पोंचेतोंपर्यंत कांहीं लोकांच्या ओळखी झा-ल्या. जे लोक अगोदर माझ्याकडे ढुंकून देखील पहात नव्हते ते आस्थापूर्वक माझ्याशीं संभाषण करूं लागले. जसजसे आह्मी हिंदुस्थानापासून दूर गेलों तसतसा त्यांच्या वर्तनांत मला फेर दिसूं लागला. असें कां झालें याचीं दोन कारणें असण्याचा संभव आहे. एक तर सहवास जसजसा अधिक होत गेला तस-तशी सलगी अधिक होत गेली हें साहाजिकच झालें; परंतु दुसरें कारण असें असण्याचा संभव आहे कीं, स्थानपरत्वें जें वर्तन अंगवळणीं पडलें होतें त्याचा हेतु नाहींसा झाल्यामुळें त्यांत फेरबदल झाला. ही गोष्ट जे लोक हिंदुस्थानांत राहिलेले असून आमच्याबरोबर आगबोटींत सहवासाला होते त्यांची झाली. आगबोटींत एक तरुण गृहस्थ मला भेटले. हे गृहस्थ संपन्न असून वयानें लहान होते. हे हिंदुस्थानदेशांत प्रवास करून परत चालले होते. हे विद्वान् असून मोकळ्या मनाचे होते. यांच्या व इतर आंग्लो-इंडियन लोकांच्या तऱ्हेंत फरक उघड दिस-ण्यासारखा होता. यांचें माझें संघट्टन इतकें झालें कीं त्यांच्याशीं मोकळेपणानें बोलण्यास मला संकोच वाटत नसे. आह्मी सुएझ येथें उतरण्यापूर्वीं त्या गृहस्थांनीं मला त्यांचें ‘ शेक्सपियर ’च्या

न टकांचें पुस्तक नजर केलें. ज्या लोकांस या देशाचें वारें लागलें नाहीं त्यांच्या तऱ्हेविषयीं हा जो ग्रह झाला त्यास कालक्रमानें पुष्टीच मिळत चालली. कान्स्टांटिनोपल येथें कांहीं आंग्लजनांचा सहवास झाला, तोही समाधानकारक होता. अखेरीस लंडन येथें असतांना अमीर, उमराव लोकांचा परिचय झाला व त्यांशीं निकट संबंध घडला. त्या एकंदर व्यवहारांत उच्चनीच भाव किंवा पंक्तिप्रपंच दिसण्यांत आला नाहीं. या देशांत साहेबलोकांस हस्तस्पर्श करण्यासही संकोच वाटतो व मेम साहेबांस तर त्या गोष्टीसारखी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची चीड नसते; परंतु इंग्लंडांत मोठमोठे अमीर उमराव व त्यांच्या स्त्रिया यांनीं माझ्याशीं हस्तस्पर्श केला. येवढेंच नव्हे, तर माझें स्वागत उत्तम प्रकारचें केलें. पंक्तिप्रपंच दिसण्यांत आला नाहीं येवढेंच नव्हे, तर परकी म्हणून आमच्याविषयीं अधिक आस्था नेहमीं दाखविण्यांत येत असे. या देशांतून पेन्शन घेऊन किंवा रजा घेऊन परत गेलेल्या लोकांची मात्र थोडीशी तारांबळ उडत असे. सलगीचें वर्तन करावें तर तसा पूर्वीचा परिपाठ नाहीं. बरें, न करावें तर आपल्यापेक्षां पुष्कळ वरच्या दर्जाचे लोक देखील आमचा मान ठेवीत. प्रथमतः अशा प्रकारचा चित्तवृत्तीचा द्वैधीभाव होत असे, परंतु परिणामीं त्यांचे वर्तन सलगी करण्याच्या व पूर्वीचा संबंध विसरण्याच्या झोंकांत जात असे.येथें पोलिटिकल एजंटच्या कामावर असलेल्या एकदोन गृहस्थांचा परिचय झाला त्यांनीं इतकें अगत्य दाखविलें कीं, स्वतःबरोबर नेऊन लंडनशहरांतील प्रेक्षणीय वस्तु दाखविण्याचें त्यांनीं कबूल केलें. कांहींनीं आपल्या घरीं निमंत्रण केलें, व कांहींनीं उत्तम प्रकारचें आदरातिथ्य केलें. एकंदरींत सर्व प्रकार प्रशंसनीय होता.

आंग्ल लोकांचा मूळ स्वभाव निर्भीड, बेपर्वा व तुटक आहे. होतां होईल तोंपर्यंत ओळख दुसऱ्या कोणी करून दिल्याशिवाय संभाषण सुरु करावयाचे नाहींत. आगगाडींत शेजारीं बसले तरी एक शब्दही तोंडांतून निघावयाचा नाहीं. त्यांस अधिक प्रसंगाचा तिटकारा आहे व फार सलगीची हौस नाहीं. हा नियम खरा परंतु यास कांहीं अपवाद त्या देशांत आढळतात.

या देशांतील लोकांचें त्यांस बरेंच कौतुक वाटतें व सहवास व्हावा अशी त्यांची इच्छा असते.

त्या लोकांचा आपल्या लोकांविषयीं ग्रह वाईट नाहीं. जे लोक या देशांत येतात त्यांचीं कारणपरत्वें मनें कलुषित झालेलीं असतात व त्यांच्या सहवासानें कांहीं लोकांचीं मनें दूषित झालेलीं असतील, परंतु त्यांशिवाय इतर लोकांच्या मनांचा ग्रह एतद्देशीयांच्या बुद्धिमत्तेविषयीं अनुकूल आहे. भारतीय लोक जात्याच हीनबल, मंदमति, कार्याक्षम व सत्यपराङ्मुख असें जें कांहीं ग्रंथकर्त्यांचें मत आहे तें ज्यांस मान्य नाहीं असे लोक तेथें पुष्कळ आढळण्यांत येतात ही गोष्ट मोठी समाधानकारक आहे.

त्या लोकांस आपल्या लोकांविषयीं खरी कळकळ कितपत आहे हा प्रश्न बिकट आहे. त्या देशांत जे राजकीय तट आहेत त्यांचा परस्परांत विरोध आहे. दोन्ही पक्षांतील लोक आपआपल्या पक्षाच्या समर्थनासाठीं सर्व प्रकारचे उपाय योजीत असतात व त्यांच्या अनुषंगानें जेव्हां या देशाविषयीं कळकळ दाखविण्याचा प्रसंग येतो तेव्हां तिचा प्रवाह बराच मोठा असतो, परंतु तो प्रसंग टळून गेला ह्मणजे त्या प्रवाहाचा मागमूस देखील रहात नाहीं. अशा प्रकारची स्थिति असणें हें फारसें आश्चर्यकारक नव्हे. राज्याची व्यवस्था व पद्धत एकदां ठरून गेली असल्यामुळें व सरकारी अधिकारी आपल्या कामांत दक्ष असल्यामुळें इतर जनांस या देशाच्या कारभाराविषयीं फारशी पंचाईत करण्याची इच्छा नसते. हिंदुस्थानासारख्या विस्तीर्ण प्रदेशाच्या कारभाराच्या चौकशीपेक्षां त्यांस लहानसहान स्थानिक गोष्टी अधिक महत्वाच्या वाटतात; तेव्हां अर्थातच अधिकाऱ्यास दहशत वाटण्याचें कारण नाहीं. उपदेश आणि आचरण यांमध्यें विसंवाद सर्व देशांत थोडाबहुत असावयाचाच; किंबहुना जितकी सुधारणेची पायरी वरची तितका हा विसंवाद अधिक स्पष्ट असें ह्मटलें असतां चूक होणार नाहीं; तेव्हां आपल्या देशाविषयीं कळकळीचा जो प्रकार अनुभवास येतो त्यांस नवल वाटण्याचें कारण नाहीं. केवळ निरपेक्षबुद्धीनें या

देशाविषयीं कळकळ बाळगणारे पुरुष कधीं कधीं दृष्टीस पडतात; परंतु ते केवळ साधारण नियमाला अपवाद होत.

त्या देशांत आपल्या देशाविषयीं माहिती सर्वांसच नसते. दिवसानुदिवस दोन्ही देशांमध्यें दळणवळण वाढत चाललें आहे ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु त्या मानानें माहिती जितकी अधिक असावी तितकी नाहीं. याचें कारण उघड आहे. त्या लोकांचा अंमल स्थिर झाल्याकारणानें त्यांस एतद्देशीयांची फारशी पर्वा राहिली नाहीं. ते आपल्याशीं सहवास ठेवीत नाहींत, यामुळें त्यांस आपल्या आचाराविचारांचें यथार्थ ज्ञान होत नाहीं. येथें जे लोक येतात त्यांपेक्षां तेथें असणाऱ्या लोकांस या विषयांची जिज्ञासा खचीत अधिक आहे; परंतु ती तृप्त होण्याचे मार्ग फार थोडे आहेत. जसजसे आपले लोक त्या देशांत अधिक जाऊं लागतील तसतसें त्या देशांतील लोकांचें ज्ञान खचीत वाढेल; परंतु कदाचित् विपरीत परिणाम होण्याचाही संभव आहे. हल्लीं थोडेच लोक तिकडे जातात ह्मणून त्यांविषयीं आस्था दिसण्यांत येते. पण त्यांची संख्या वाढत चालली ह्मणजे आस्थेच्या ऐवजीं अवज्ञेचा प्रत्यय कदाचित् येईल ! कसेंही असलें तरी इतकें कबूल केलें पाहिजे कीं, आपल्यापेक्षां ते लोक जात्याच अधिक उत्साही, प्रयत्नशील, जिज्ञासु व कार्यक्षम आहेत. या स्थितीचें कारण काय हा प्रश्न स्वतंत्र आहे, परंतु वस्तुस्थितीचा अपलाप करावयाचा नसेल तर ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केली पाहिजे. प्राचीनकालीं आपल्यांत कर्तृत्वशक्ति चांगली होती ह्मणून प्रस्तुतकालीं तिचा अभाव कबूल न करणें ह्मणजे दुराग्रह ह्मटला पाहिजे. त्या लोकांची विद्या, त्यांचा उद्योग व त्यांचें कर्तृत्व हीं कबूल केलींच पाहिजेत, व तसें केलें असतां स्वदेशाभिमानाला बाध येण्याचें कारण नाहीं.

आतां अखेरीस त्या लोकांत अनुकरणीय असे गुण कोणते आहेत याविषयीं विचार करावयाचा. त्यांच्या सर्व गुणांत मोठा महत्वाचा गुण ह्मटला ह्मणजे त्यांची स्वतंत्रतेची आवड. सूक्ष्म विचार केला असतां असें लक्षांत येण्यासारखें आहे कीं, या एका गुणामुळें पुष्कळ इतर गुण त्यांच्या अंगीं आले आहेत.

दुसरा गुण सतत प्रयत्न करण्याचा नेम. तिसरा कोणत्याही बाबतींत समाधान न पावणें. समाधान झालें ह्मणजे अधिक सुखाची इच्छा रहात नाहीं व तसें झालें ह्मणजे राष्ट्रांची जी हल्लीं एक प्रकारची शर्यत सुरू आहे त्या शर्यतींत मागें पडण्याचा प्रसंग येणारच. लहानसान घरांतील सोयीपासून तों राज्यप्राप्तीसारख्या राजकीय घडामोडीपर्यंत या प्रकारची मनोवृत्ति स्पष्ट दिसून येते. जसजशी सुखाची कल्पना वाढते तसतसे तद्विषयक प्रयत्न जारीनें सुरू होतात. लोकांस धंदा मिळतो, संपत्ति वाढते व मन उद्विग्न न होतां उपभोगक्षम होतें. अशा प्रकारचा उद्योग अबाधित चालला आहे याचें दुसरें कारण असें आहे कीं, उद्योगाबरोबरच विश्रांति व चैन यांची तजवीज होत असते. सुखाची अपेक्षा अधिक झाली ह्मणजे अधिक द्रव्याचें अर्जन करण्याकडे प्रवृत्ति होते व यामुळेंही उद्योगशीलता व नवीन शोध करण्याचा कल हीं वाढतात. आणखी एक घेण्यासारखा गुण असा आहे कीं, ते लोक कालानुरूप वर्तन ठेवण्यांत मोठे बहादर आहेत. यामुळें जगांत कोठेंही कांहीं चांगलें असेल त्यापासून आपला फायदा करून घेण्यास ते मागेंपुढें पहात नाहींत. त्यांचा नीटनेटकेपणा, त्यांची संकेतपालनाची आवड, त्यांची टापटीप हे गुण तर प्रशंसनीय आहेतच. पण आपल्या लोकांनीं अवश्य अनुकरण करण्यासारखा असा एक विशेष गुण आहे त्याविषयीं स्वतंत्र उल्लेख केला पाहिजे. हा गुण कोणता तर त्यांस कोणतीही गोष्ट अशक्य वाटत नाहीं. एखादा मोलमजुरी करून पोट भरणारा हमाल असला तरी श्रीमंताकडे पाहून तशी स्थिति आपल्यास कसली प्राप्त होणार, अशा प्रकारचे निराशेचे उद्गार त्याच्या तोंडांतून सहसा निघावयाचे नाहींत. " आपने आपने तामने चिडिया भी मस्तान है " या हिंदुस्थानी ह्मणीप्रमाणें स्वतःची स्थिति त्यास सुखकर वाटते, एवढेंच नव्हे तर आपल्यास श्रीमंताच्या बरोबरीनें सर्व प्रकारचे हक्क आहेत अशी त्याची खातरी असते, व या हक्कांचा उपयोग प्रसंगविशेषीं त्यास करतांही येतो. अशी स्थिति असल्यामुळें श्रीमंतास विनाकारण वचकून रहाण्याची रीति

त्यास लागत नाहीं. अशा प्रकारें व्यक्तींना जें वळण लागतें तें राष्ट्राच्या उद्यास कारणीभूत होतें, लोकांमध्यें कर्तृत्वशक्ति उत्पन्न होते व वाढते व कोणतीही गोष्ट अशक्य न वाटल्यामुळें अविरत प्रयत्न सुरू रहातो.

त्या लोकांची स्वतःविषयीं प्रीति वर्णन करण्यासारखी आहे. स्वतःचें घर, स्वतःचा देश, स्वतःचे आचारविचार या सर्वांचा त्यांस फार अभिमान असतो व त्यायोगानें त्यांच्यांत ऐक्य रहातें. कसाही द्वेष असो व कोणत्याही कारणानें कलह असो, स्वदेशासंबंधीं कार्य उद्भूत झालें ह्मणजे परस्पर वैमनस्य नाहींसें होतें. ही गोष्ट फारच लक्षांत ठेवण्यासारखी आहे. दैवगतीनें आपला व आंग्ल लोकांचा संबंध अतिनिकट जडला आहे. गुणांपेक्षां दुर्गुण अनुकरण करण्यास फार सोपें; किंबहुना ते प्रयत्नाशिवायही जडतात; तर त्याविषयीं खबरदारी बाळगणें आपलें कर्तव्यकर्म आहे; परंतु कांहीं दुर्गुण असले ह्मणून गुणाचें मोल न समजणें हें मूर्खपणाचें काम आहे. अशा सुधारलेल्या विद्याचारसंपन्न राष्ट्राचा संबंध घडला असतां आपण नीरक्षीरन्यायानें गुणगणांचेंच मनन करून आपलें हित साधावें हेंच प्रशस्त आहे.

हें कथानक संपलें. विलायतेहून परत आल्यास चार वर्षें होऊन गेलीं तरी हें चऱ्हाट संपलें नाहीं, ही गोष्ट प्रवासवृत्ताच्या आरंभींच निर्दिष्ट केलेल्या माझ्या उत्साहबहादुरीची द्योतक आहे हें सांगितल्याशिवाय समजण्यासारखें आहे. कसेंही झालें तरी हें आख्यान शेवटास गेल्यामुळें मला स्वतःला फारच समाधान होत आहे. ' अकरणान्मंदकरणं श्रेयः ' असा माझा दृढ समज आहे; तेव्हां कालावधीनें कां होईना, परंतु आरंभिलेलें काम शेवटास गेलें यांत मला संतोष आहे. अखेरीस ज्या माझ्या मित्रानें प्रवासवृत्त लिहिण्यास मला उद्युक्त केलें व वारंवार उद्बोधन करून काम करून घेतलें त्याचे आभार मानणें जरूर आहे. शिवाय ' केसरी ' पत्रकारांनीं आश्रय दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानिले पाहिजेत व केसरीच्या वाचकांस तसदी दिल्याबद्दल माफीही मागितली पाहिजे.

समाप्त.